# स्वतकार वि. ल. भावे

यांच्या, इतिहास आणि वाङ्मय यांविषयींच्या
अप्रकाशित व असंकलित लेखांचा संग्रह

१०७९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २७५८



REFBK-0018175

संपादक
## रामचंद्र चिंतामण ढेरे

सारस्वतकार

# वि. ल. भावे

यांच्या,

इतिहास आणि वाङ्मय

यांविषयींच्या

अप्रकाशित व असंकलित

लेखांचा संग्रह

# वारसा

संपादक

रामचंद्र चिंतामण ढेरे

विश्वकर्मा साहित्यालय

## आमची संग्राह्य प्रकाशने

अर्धविराम
(कै. म. गो. बर्वे)
संपादक नरूभाऊ लिमये
रु. ६–००

श्रीनामदेव एक विजययात्रा
रा. चिं. ढेरे, अशोक कामत
रु. ६–००

शिल्पकार फडके
(र. कृ. फडके)
संपादक : ह. वि. मोटे
रु. ६–००

लोकसंस्कृतीची क्षितिजे
रामचंद्र चिंतामण ढेरे
रु. ८–००

लग्नानंतरचे पहिले वर्ष
संपादिका सौ. कृष्णाबाई मोटे
रु. ९–००

प्रतिभा-विलास
ना. सी. फडके
रु. १०–००

नाना : एक शिल्पकार
सविता भावे
रु. १२–००

पराजित-अपराजित
वि. स. वाळिंबे
रु. २०–००

वारसा
सारस्वनकार भावे शतवार्षिक
जयन्ती प्रकाशन
संपादक–रा. चिं. ढेरे
रु. १२–००

## आगामी प्रकाशने

उजळल्या दिशा (कादंबरी)
अनंत मनोहर
संवादिनी (कथासंग्रह)
व. पु. काळे

७८२०९
७१९२१७९ निबंध -
कार्शी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ७८२०९ वि: निबंध
क्रमांक २९५८ नोंद दि: ३१-३-५८

# सारस्वतकार वि. ल. भावे

यांच्या,

इतिहास आणि वाङ्मय

यांविषयींच्या

अप्रकाशित व असंकलित

लेखांचा संग्रह

REFBK-0018175

# वारसा

संपादक

रामचंद्र चिंतामण ढेरे

विश्वकर्मा साहित्यालय

मुद्रक : वि. ग. माटे, विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रा. ) लि., ४०५ नारायण, पुणे ३०.

प्रकाशक : सौ. मालती माटे, विश्वकर्मा साहित्यालय, २०३५/२ सदाशिव, पुणे ३०.

मुखपृष्ठ : विश्वकर्मा मुद्रणालय कलाविभाग

प्रकाशन बाविसावे

प्रथमावृत्ती ६ नोव्हेंबर १९७१

बारा रुपये

सारस्वतकार
# वि. ल. भावे

यांच्या,
इतिहास आणि वाङ्मय
यांविषयींच्या
अप्रकाशित व असंकलित
लेखांचा संग्रह

# वारसा

संपादक
रामचंद्र चिंतामण ढेरे

विश्वकर्मा साहित्यालय

**मुद्रक :** वि. ग. माटे, विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रा. ) लि., ४०५ नारायण, पुणे ३०.

**प्रकाशक :** सौ. मालती माटे, विश्वकर्मा साहित्यालय, २०३५/२ सदाशिव, पुणे ३०.

मुखपृष्ठ : विश्वकर्मा मुद्रणालय कलाविभाग

प्रकाशन बाविसावे

प्रथमावृत्ती ६ नोव्हेंबर १९७१

**बारा रुपये**



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे व सारस्वतकार वि. ल. भावे

Kolhapur 10 Dec 1901.

My dear Mr. Bhave,

Let me know whether you have put in print the सौतिसंग्रह and whether you have written your preface. Please send to me the forms as they get out so that I may write my own preface to the proposed preface. Please give my compliments to [illegible] [illegible] [illegible] [illegible]. Yours sincerely V. K. Rajwade

इतिहासाचार्य राजवाडे यांचें भावे यांना आलेलें इंग्रजी पत्र

[ राजवाडे इंग्रजीत लिहिणें कटाक्षानें टाळीत असत, म्हणून त्यांच्या इंग्रजीपत्राचें विशेष महत्त्व. ]



सारस्वतकार वि. ल. भावे
(पंचविशीतले छायाचित्र)

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.................. वि: ..................
क्रमांक.................. नों: दि: ..........

## अंतरंग


- संपादकीय निवेदन १
- सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे
  व्यक्ति, वाङ्मय आणि कार्य ३

विभाग पहिला : इतिहासविषयक लेख ४७–१३४

- अफजलखानाचा वध ४९
- श्रीशिवाजीमहाराजांचें एक राजकारण ९१
- षाहिस्तेखानाची मोहीम १०३
- शिवाजीची वंशकुळी ११८
- श्रीशिवाजीमहाराजांचा होन, वाघनखें व भवानी तरवार १२३
- मराठ्यांच्या इतिहासाचीं दोन शतकें १२६
- मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें १३१

विभाग दुसरा : वाङ्मयविषयक लेख १३५–१६०

- महाराष्ट्राच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा
  व किमत १३७
- काव्य : परमेश्वराचें आणि मानवाचें १४८
- काव्य आणि त्याचा प्रभाव १५१
- अनंतसुत त्र्यंबक १५४
- दासो दिगंबरकृत संतविजय १५९

विभाग तिसरा : भावे-वाङ्मयसूची व संदर्भसाहित्य १६१–१६८

# संपादकीय निवेदन

सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे यांच्या शतवार्षिक जयन्तीनिमित्त त्यांचा वाङमयीन वारसा नव्या पिढीपुढें ठेवण्याच्या हेतूनें आज 'वारसा' हा लेख-संग्रह प्रकाशित होत आहे.

भावे यांचा संपादन-लेखन-संभार फार मोठा आहे. परंतु आज त्यापैकीं 'महाराष्ट्र-सारस्वत' आणि 'चक्रवर्ती नेपोलियन' या दोन कृतींशिवाय अन्य पुस्तकांचा व लेखांचा परिचय सर्वसाधारण वाचकांना उरलेला नाहीं. त्यांचीं बाकीचीं पुस्तकें आणि त्यांनीं ज्यांतून स्फुट लेख लिहिले तीं नियतकालिकें दुर्मिळ झालेलीं आहेत.

भावे यांच्या संशोधन-कार्याचीं दोन प्रमुख अंगें होतीं : एक वाङमयविषयक संशोधन आणि दुसरें इतिहासविषयक संशोधन. पैकीं वाङमयविषयक संशोधनाचा प्रातिनिधिक ग्रंथ म्हणजे 'महाराष्ट्र-सारस्वत'. हा ग्रंथ मराठी वाचकांपुढें आत सातत्यानें राहिलेला आहे. परंतु त्यांचें इतिहासविषयक संशोधन मात्र नजरेआड होऊं लागलें आहे. विशेषतः त्यांनीं प्रमाणभूत साधनांच्या आधारें शिवचरित्रा-विषयीं जें लेखन केलें, तें त्यांच्या वेधक कथनशैलीमुळें आजहि वाचनीय आहे. तें शिवप्रेमी महाराष्ट्रांतल्या नव्या पिढीच्या हातीं असणें आवश्यक आहे.

भावे यांच्या या प्रकाशित परंतु दुर्मिळ बनलेल्या लेखनाशिवाय अप्रकाशित लेखनहि बरेंच आढळलें. तें त्यांचे सुपुत्र श्री. लक्ष्मण विनायक तथा राजाभाऊ भावे, ठाणें, यांनीं पितृनिष्ठेनें सुरक्षित राखलें आहे.

दुर्मिळ प्रकाशित लेखन आणि अप्रकाशित लेखन यांपैकीं इतिहास आणि वाङमय या दोन विषयांवरील भावे यांचे कांहीं लेख प्रस्तुत 'वारसा' या संग्रहांत संकलित केलेले आहेत. त्यांतल्या प्रकाशित लेखांचें पूर्वप्रकाशन कोठें आणि केव्हां झालें, हें सूचीवरून कळेलच. इतिहास विभागांतील शेवटचे दोन लेख आणि वाङमय विभागांतील पहिले तीन लेख या संग्रहांत प्रथमच उजेडांत येत आहेत.

'श्रीशिवाजीमहाराजांचा होन' आणि 'श्रीशिवाजीमहाराजांचीं वाघनखें व भवानी तरवार' हीं दोन स्वतंत्र टिपणें होतीं, तीं येथें एकत्र छापलीं आहेत. अप्रकाशित लेखांची हस्तलिखितें जुळवून लावतांना असें आढळलें कीं, तीं बहुतेक अपूर्ण आहेत; त्यांतला कांहीं भाग लुप्त झाला आहे. परंतु उपलब्ध भागांचेंहि महत्त्व जाणवल्यामुळें त्यांचा येथे समावेश केला आहे. 'महाराष्ट्राच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङमयाचा दर्जा व किंमत' हें त्याच्या प्रारंभावरून व्याख्यानाचें लिखित रूप दिसतें. परंतु तें व्याख्यान केव्हां आणि कुठें झालें, तें सांगण्यास साधन नाहीं.

भावे-वाङमयाची मीं सिद्ध केलेली सूची विस्तृत असली, तरी पूर्ण असेल, अशी खात्री देतां येत नाहीं. विशेषतः त्यांचे नियतकालिकांतील अनेक स्फुट लेख नजरे-

आड झाले असण्याचा संभव आहे. दाते सूची मंडळाची संकलित 'नियतकालिकांतील लेखनाची सूची' प्रकाशित झाल्यावर भावे आणि त्यांच्यासारखे अनेक पूर्वसूरी यांनीं केलेल्या स्फुट लेखनाचा पूर्ण तलास लागूं शकेल. 'पुरंदरच्या किल्ल्याची हकीकत' या नांवानें उल्लेखिला जाणारा लेख मला पहायला मिळाला नाहीं; परंतु 'श्रीशिवाजीमहाराजांचें एक राजकारण' या लेखाचा विषय तोच असल्यामुळें त्याचेंच तें नामांतर असावें, असें वाटतें.

वाङ्मयविषयक लेखांच्या विभागांत भावे यांनीं मराठी वाङ्मयासंबंधीं जे विचार मांडले आहेत, त्यांच्या प्रकटीकरणाचा काळ अनिश्चित आहे. मराठी भाषा आणि वाङ्मय यांविषयींचा जाज्वल्य अभिमान त्यांनीं अन्यत्र अनेकदां व्यक्त केला आहे, हें ध्यानीं घेऊनच वाचकांनीं या लेखांचा विचार करावा.

भावे यांच्या व्यक्तित्वाचा, वाङ्मयाचा आणि कार्याचा परिचय घडविणाऱ्या प्रास्ताविक लेखांत मीं अनेक ठिकाणीं प्राप्त झालेले लहान लहान धागे जुळेविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु प्रामुख्यानें त्यांचे स्नेही श्री. रा. स. भागवत व श्री. सी. म. अभ्यंकर यांनीं लिहिलेले मृत्युलेख, स्वतः भावे यांनीं ग्रंथांच्या प्रस्तावनेंतून केलेलीं प्रासंगिक आत्मकथनें आणि त्यांच्या ग्रंथांत उमटलेलें त्यांचें अंतरंग यांचा मुक्त वापर करून मी भावे यांचें दर्शन घेऊं शकलों आहे. त्यांचे शब्द उद्धृत करतांना मला विस्तार आवरणें शक्य झालें नाहीं. हेतु असा कीं, माझ्या मध्यस्थीवांचून वाचकांना भावे यांची अंतरंग-भेट घेतां यावी.

भावे यांचा हा 'वारसा' या समृद्ध स्वरूपांत सादर करतां आला, याचें श्रेय श्री. राजाभाऊ भावे यांच्या सौजन्यशील सहयोगाकडे जातें. त्यांनीं अत्यंत आस्थेनें आपल्या थोर पित्याचें अप्रकाशित साहित्य आमच्या हातीं दिलें; त्यांचा पत्रव्यवहार दाखविला आणि अन्य अनेक प्रकारची उपयुक्त माहिती पुरवली. ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कांहीं कार्यकर्त्यांनींहि आम्हांला मुक्त सहकार्य दिलें. यांशिवाय श्री. पां. रा. तथा तात्यासाहेब ढमढेरे, डॉ. स. गं. मालशे डॉ. सु. रा. चुनेकर या स्नेह्यांच्या स्नेहल सहयोगाचा आवर्जून निर्देश करायला हवा.

'वारसा' प्रकाशित करण्याच्या संकल्पाची सिद्धि केवळ एक महिन्याच्या अवधींत झाली, ती विश्वकर्मा साहित्यालय आणि विश्वकर्मा मुद्रणालय यांच्या साक्षेपी तत्परतेमुळेंच. या सर्वांचा सहयोग सारस्वतकारांविषयींच्या गाढ प्रेमाचा द्योतक आहे.

सारस्वतकारांच्याच ज्ञानवाटिकेंतील कांहीं टवटवीत सुगंधी फुलें वेचून, त्यांची गुंफलेली ही माला आज शतवार्षिक जयन्तीच्या दिनीं सारस्वतकारांच्या कंठीं अर्पण केली आहे. ती त्यांना संतोषदायी वाटेल, असा विश्वास वाटतो.

६ नोव्हेंबर, १९७१ — संपादक

# सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे
# व्यक्ति, वाङ्मय आणि कार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८९५५

सदेह शतायुषी होण्याचें भाग्य कदाचित् अनेक अज्ञात जीवांना लाभत असेल, परंतु ज्यांचा कीर्तिदेह जरामरणावर मात करून शतकांच्या सीमा ओलांडतो, असे भाग्यवंत विरळाच. सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे यांचें नांव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत अशा विरळा भाग्यवंतांत गणावें लागेल. त्यांनीं पाऊण शतकापूर्वीं संस्थापिलेलें ठाण्याचें मराठी ग्रंथसंग्रहालय आणि त्यांनीं रेखाटलेलें महाराष्ट्र-सारस्वताचें चरित्र-चित्र यांना आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांत विशेष स्थान प्राप्त झालें आहे. ग्रंथसंग्रहालयानें मराठी ग्रंथालयांच्या प्रसाराची गंगा प्रवाहित केली आणि 'महाराष्ट्र-सारस्वता'नें मराठी वाङ्मयाचें सहा शतकांचें स्वरूप प्रथमच सर्व रंगरेखांनिशीं मराठी रसिकांच्या नि अभ्यासकांच्या दृष्टीपुढें उभें केलें. कधीं काळीं संग्रहालय जुनें झालें आणि 'सारस्वत' शिळें झालें, तरी भावे यांनीं या कृतींच्या द्वारां प्रवाहित केलेल्या धारांना खंड पडणार नाहीं. अर्थातच या धारांच्या उगमतीर्थांशीं भावे यांचें संस्मरण अपरिहार्य आहे.

## बालपण आणि प्रारंभिक शिक्षण

भावे यांचें घराणें मूळचें श्रीवर्धनचें. कौशिकगोत्री कोंकणस्थ ब्राह्मण. श्रीवर्धनहून तें कुलाबा जिल्ह्यांत पनवेलजवळच्या पळस्पें गांवीं आलें. विनायकरावांपूर्वींच्या तीन पिढ्या तरी पळस्पें येथेंच शेतीभाती नि कारकुनी करीत राहत होत्या. पणजे लक्ष्मण, आजे बळवंत आणि वडील लक्ष्मण यांचें राहणें पळस्पें येथेंच असे. लक्ष्मणरावांची पत्नी सरस्वती ही पुण्याच्या नगरकरांची कन्या होती. विनायकरावांचा

जन्म पळस्पें येथेंच आश्विन वद्य ९, सोमवार, शके १७९३ (दि. ६ नोव्हेंबर १८७१) या दिवशीं झाला. त्यांची जन्मकुंडली उपलब्ध आहे.[१]


त्यांचें पाळण्यांतलें नांव विष्णु आणि लौकिकांतलें नांव विनायक. ते लहान असतांनाच त्यांचे वडील लक्ष्मणराव ऊर्फ कोंडोपंत ठाणें येथें रहायला येऊन वकिलीचा व्यवसाय करूं लागले. आठव्या वर्षी त्यांची मुंज झाल्यावर त्यांचा मराठी शाळेंत प्रवेश झाला. आपल्या प्रारंभिक शिक्षणाविषयीं त्यांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं, "मला शाळेंतला पहिला धुळाक्षरांचा धडा प्रो. घाटे यांचे वडील बाबा घाटे यांनीं देऊन विद्या शिकविण्यास प्रारंभ केला. गायत्रीमंत्रोपदेश वे. शा. सं. श्रीधरभट काळे यांनीं केला. माझी प्रकृति अशक्त व शरीर फार कृश असल्यामुळें लहानपणीं विद्या प्राप्त व्हावी तशी झाली नाहीं. तिसऱ्या पुस्तकांतील 'मुला, मी कोण व माझे नांव काय ?' या सूर्याच्या धड्यापर्यंत शिक्षणाची मजल आल्यावर माझी शाळा सुटली. नंतर कांहीं वर्षे घरींच थोडेंफार शिक्षण होऊन मी एकदम इंग्रजी चवथ्या इयत्तेंत बसलों आणि सर्व तऱ्हेची अळंटळं करीत, ढकलत ढकलत सातव्या इयत्तेची सीमा गांठली. अखेर इ. स. १८९१ (श. १८१३) मध्यें मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर कॉलेजांत गेलों."[२]

शाळकरी वयांतील विनायकरावांच्या हूड जीवनक्रमाची कल्पना श्री. रा. स.

---

१. ॥ श्री ॥

शके १७९३, आश्विन वद्य ९, सोमवार, आश्लेषा नक्षत्र, घ. ५, प. ५२, इष्ट घ. ५३, प. ५, लग्न कन्या, राशी सिंह.




| | | |
|---|---|---|
| १ के. | ६ र. २७ | ७ मं. |
| २० शु. २१ | १० चं. ३७ | १८ रा. ८ गु. |

२. भावे यांचें 'आत्मकथन'.

भागवत आणि श्री. सी. म. अभ्यंकर यांनीं लिहिलेल्या मृत्युलेखांतून आलेल्या तपशिलावरून स्पष्टपणें येते. ते वडिलांचे फार लाडके असल्यामुळें वडिलांनीं त्यांच्या हूडपणाकडे दुर्लक्ष केलें. प्रकृति अशक्त आणि स्वभाव नादिष्ट, यांमुळें शाळेंतील शिक्षणाकडे त्यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. शेवटचा नंबर त्यांनीं कधीं सोडला नाहीं. शाळेंत फारसें हजर रहायचें नाहीं आणि हजर असल्यावर लक्ष द्यायचें नाहीं, हा खाक्या कायम टिकून राहिला. सारा वेळ उनाडपणानें भटकण्यांत जायचा. कधीं परसिकच्या डोंगरावर जाऊन स्वैर विहरावें; कधीं पोखरणीवर जावें; कधीं घरीं पाळलेलीं कबुतरें खिशांत घालूने खाडीकांठीं जावें नि कबुतरें उडवून त्यांच्या गगनगतीचें निरीक्षण करीत रहावें, कधीं लोखंडी चक्र बरोबर घेऊन शहरभर तें फिरवीत फिरवीत भरकटावें, अशा नाना क्रीडांत त्यांचा सारा वेळ व्यतीत व्हायचा. रानावनांतून पशुपक्षी पकडून आणावे आणि त्यांना घरीं पाळून त्यांच्यासवें रमावें, हा त्यांचा सर्वांत आवडता खेळ !

अर्थात् या नादीपणामुळें त्यांनी जरी शाळेंतल्या नियत अभ्यासाकडे दुर्लक्ष केलें, तरी पुस्तकांच्या जगाकडे पाठ फिरवली, असें नव्हे. ‘काव्येतिहाससंग्रहा’चे उत्पादक-संपादक श्री. जनार्दन बाळाजी मोडक हे त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांचें मराठ्यांच्या इतिहासाचें नि प्राचीन मराठी कवितेचें वेड विनायकरावांसारख्या छांदिष्ट विद्यार्थ्याच्या मनावर, त्या हूडपणाच्या काळांतहि परिणाम करूं शकलें. त्यामुळें जुन्या मराठी कवितेची ओळख त्यांना लहान वयांतच घडली. इंग्रजी साहित्याशीं त्यांचा परिचय घडला तोहि असाच योगायोगानें. विनायकराव इंग्रजी शाळेंत शिकत होते, त्या वेळीं ठाणें कारागृहाचे युरोपियन अधिकारी श्री. वेलिन यांचीं तीन-चार मुलें विनायकरावांच्या उनाड मित्रमंडळांत होतीं. पांखरें पकडण्याच्या नि कबुतरें उडवण्याच्या छंदांतले ते सहकारी. त्यांच्या मैत्रीमुळें विनायकरावांचें त्यांच्या घरी जाणें-येणें घडे. या इंग्रज मित्रांच्या घरचा ग्रंथसंग्रह विनायकरावांना खुला झाला आणि त्यांनीं मिल्टन, शेक्सपिअर, थॅकरे, ॲडिसन, पोप, मेकॉले, इत्यादि आंग्ल वाङमयकारांच्या कृतींशीं जवळीक साधली. इंग्रजी संभाषणांतहि ते या मित्रांच्या सहवासांत तयार झाले. इंग्रजी चालीरीती, संभाषण-चातुर्य आणि वाङमयास्वाद यांचा उपयोग त्यांना महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळांत आणि पुढें व्यवसायक्षेत्रांत मोठ्या प्रमाणांत झाला.

विनायकराव ठाणें येथें शिकत होते, त्या काळांत ठाण्यास अनेक नामांकित

शिक्षक अध्यापनाचें कार्य करीत होते. प्रख्यात ज्योतिर्विद् शंकर बाळकृष्ण दीक्षित, रावबहादूर सखाराम केशव भागवत, रावबहादूर गणेश नारायण खरे, कोल्हापूरचे माजी दिवाण रघुनाथ व्यंकाजी सबनीस, काव्येतिहाससंग्रहकार जनार्दन बाळाजी मोडक इत्यादि पुढें प्रख्यात बनलेल्या या शिक्षकांचा त्या काळीं ठाण्याशीं संबंध होता. परंतु मोडकांचा अपवाद वगळतां, विनायकरावांवर अन्य कोणाचा प्रभाव पडला नाहीं.

## महाविद्यालयीन शिक्षण

मोडकांसारख्या कवितावेड्या शिक्षकांमुळें क्रमिक पुस्तकांतल्या, 'नवनीतां'-तल्या आणि 'काव्येतिहासंग्रहां'तल्या कवितांनीं विनायकरावांना मोहून टाकलेंच होतें; आंग्ल मित्रांमुळें इंग्रजी वाङ्मयांत त्यांचा प्रवेश झाला होता, तसेंच 'अरुणोदय', 'जगत्समाचार' आणि 'हिंदु पंच' या ठाण्याहून निघणाऱ्या तीन वृत्तपत्रांमुळें त्यांना चुरचुरीत शैलींतल्या वृत्तपत्रीय लेखनाचा परिचय घडला होता. विशेषत: 'हिंदु पंचां'तील उपहासगर्भ लेखनाचें त्यांच्या थट्टेखोर स्वभावाला फार आकर्षण वाटलें. या वृत्तपत्राचे मालक श्री. दावक यांच्या परिचयानें ते 'हिंदु पंचा'च्या कचेरींत जाऊन बसत आणि तेथें विनिमयार्थ येणारीं वृत्तपत्रें व मासिकें वाचून काढीत. याशिवाय "त्या वेळीं ठाणें येथें 'सूर्योदय' नांवाचा एक फार जुना छापखाना होता. त्यांत पूर्वीपासूनचीं पुस्तकें होतीं. हा पुस्तकांचा संग्रहहि वाढत गेला आणि त्यांतच सर्व वेळ जाऊं लागला," असें भावे यांनींच लिहून ठेवलें आहे.[१]

'जो नाद धरावा, तो सारखा चालू ठेवावा, या खोडीमुळें' मुंबईस विल्सन कॉलेजांत प्रवेश केल्यावरहि त्यांचें काव्याचें वाचन एकसारखें वाढतच केलें. कॉलेजच्या वसतिगृहांतील विनायकरावांची खोली म्हणजे मित्रमंडळाच्या दिलखुलास बैठकीचें स्थान होतें. ठाण्यापासूनचे त्यांचे सहाध्यायी आणि कॉलेजांत आल्यावर भेटलेले नवे स्नेही यांची तिथें वर्दळ असे. बाबा दांदे, शंकरराव खारकर, गोविंदराव प्रधान, आत्मारामपंत चित्रे, वसंत सखाराम राऊत, नीळकंठ बाबाजी रानडे, इत्यादींचा या मित्रमंडळांत समावेश होता.

विल्सन कॉलेजांतील प्राध्यापकांपैकीं प्रा. अलेक्झांडर, प्रा. हरिभाऊ भडकमकर आणि प्राचार्य मॅकिकन् यांच्या अध्यापनाचा आणि सान्निध्याचा भावे यांना अत्यंत

१. तत्रैव.

उपयोग झाला. भावे हे विज्ञानाचे विद्यार्थी होते. डॉ. अलेक्झांडर हे त्यांना प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र शिकवीत असत. वृक्षवल्लींशीं आणि पशुपक्ष्यांशीं लहान वयापासून जिव्हाळ्याचें नातें जोडलेल्या भाव्यांना डॉ. अलेक्झांडर यांच्या अध्यापनानें आकर्षित केलें आणि त्यांनीं आपल्या मूळच्या वेडाला वैज्ञानिक अध्ययनाची जोड दिली. महाविद्यालयीन शिक्षण संपवून घरीं आल्यावर त्यांनीं साष्टी तालुक्यांत सर्वत्र भ्रमण करून अनेक वनस्पतींचा बारकाईनें अभ्यास केला आणि घरीं पशुपक्षी शास्त्रीय पद्धतीनें पाळून त्यांच्या जीवनक्रमाचा व संवयींचा सूक्ष्म अभ्यास केला. 'पांखरांचा परिचय' हें त्यांचें अप्रकाशित पुस्तक म्हणजे त्यांच्या पक्षिविषयक अध्ययनाचें नि प्रेमाचें वाङ्मयरूपच आहे.

मॅट्रिक परीक्षेंत त्यांची दुसरी भाषा फारसी होती, तरी कॉलेजांत त्यांचा संस्कृतचे प्राध्यापक हरिभाऊ भडकमकर यांच्याशीं विशेष संपर्क घडला. त्यांच्या साधेपणाचा, सच्छील वर्तनाचा आणि संस्कृत प्रेमाचा प्रभाव भावे यांच्यावर विशेष पडला. प्राचार्य डॉ. मॅकिकन हे मिशनरी होते. मिशनऱ्यांविषयीं भावे यांचें मत ठीक नसे. परंतु डॉ. मॅकिकन हे मराठी संतकवितेचे भोक्ते असल्यामुळें भावे यांचें त्यांच्याशीं सख्य जुळलें. विद्यार्थिदशेंतहि भावे यांची वृत्ति राष्ट्रवादी होती. त्यामुळें मिशनऱ्यांचें अंतरंग काय आहे, याची त्यांना जाणीव होती. प्राचार्य आगरकर वारल्याची वार्ता डॉ. मॅकिकन् यांना आपण सांगितली, तेव्हां त्यांनीं साधें औपचारिक दुःखहि व्यक्त केलें नाहीं, याची सखेद नोंद भावे यांनीं आपल्या दैनंदिनींत[१] करून ठेवली आहे.

आर्थिक दृष्ट्या महाविद्यालयीन शिक्षणाचा काळ ओढगस्तीचा होता. वडिलांच्या संमतीनें जरी ते कॉलेजांत गेले होते, तरी कॉलेजची फी भरण्यास वडील फारसे राजी नसत. त्यांची वकिली चांगली चालत असे. जरी ते मराठी वकील होते, तरी फौजदारी खटल्यांत निष्णात वकील म्हणून त्यांचा लौकिक होता. ते फारसे श्रीमंत नव्हते, पण मुलाच्या शिक्षणाचा खर्च न परवडण्याइतके दरिद्रीहि नव्हते. तरीहि कांहींशा चिकट स्वभावामुळें ते शिक्षणखर्चाची हयगय करीत. विनायकरावांच्या मॅट्रिक परीक्षेपूर्वींची एक घटना त्यांच्या वडिलांच्या चिकटपणावर प्रकाश टाकणारी आहे. विनायकरावांचा इतिहास विषय कच्चा होता आणि त्यांना त्यासाठीं त्रिवेदींचें

१. दैनंदिनीच्या कांहीं वह्या श्री. राजाभाऊ भावे यांच्या संग्रहीं आहेत.

इंग्रजी इतिहासाचें पुस्तक हवें होतें. परंतु वडिलांनीं तें विकत घेऊन देण्याचें नाकारलें. ते मुलाला म्हणाले, "अरे बाबा, तूं हें पुस्तक विकत घेतल्याशिवाय पास झालास तर ठीकच आहे. मग पुस्तक घेण्याची आवश्यकताच राहणार नाहीं. आणि जर तूं नापास झालास, तर तुझ्या आजच्या सोबत्यांपैकीं कोणाचें तरी पुस्तक पुढच्या वर्षी सहज तुला वाचायला मिळेल !"

वडिलांच्या या वृत्तीमुळें भावे यांना महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळांत बराच त्रास झालेला दिसतो. १८९६ च्या ऑक्टोबरांत यांनीं श्री. रामभाऊ घांगुरडे यांना विल्सन कॉलेजांतून एक पत्र लिहून त्यांनीं दोनशें रुपये उसने मागितले होते. पुढें इतरांच्या अडचणींच्या काळीं लाख लाख रुपये एका रकमेनें सहजपणें वापरायला देणाऱ्या भाव्यांची शिक्षणकाळांत अशी कुतरओढ व्हावी, हें पाहिलें म्हणजे भाग्य-चक्राच्या विचित्र गतीची स्पष्ट जाणीव होते.

इ. स. १८९५ मध्यें भावे बी. एस्‌सी. झाले आणि कर्तेपणानें जीवनसंघर्षांत उतरले. 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या पहिल्या आवृत्तीचें लेखन आणि ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचें संस्थापन हीं त्यांच्या कर्तृत्वाचीं दोन्ही शिखरें महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळांतच उभारलीं गेलीं होतीं, हें विशेष आहे.

## प्रपंचांत पदार्पण

कॉलेजमध्यें शिकत असतांनाच विनायकरावांचा विवाह झाला होता. वडिलां-कडून फीचे पैसे मिळणें कठीण जात असल्यामुळें त्यांना प्रसंगीं आपल्या पत्नी-जवळची हातखर्चाची शिल्लकहि वापरावी लागे. इ. स. १८९५ मध्यें बी. एस्‌सी. झाल्यावर ते पुढें एल्‌एल्. बी. होण्याच्या हेतूनें आणखी एक वर्ष मुंबईस राहिले होते. परंतु हा अभ्यासक्रम त्यांनीं पूर्ण केला नाहीं. १८९८ मध्यें त्यांचे वडील प्लेगला बळी पडले आणि साऱ्या प्रपंचाचा भार विनायकरावांच्या शिरावर येऊन पडला. घरची परिस्थिति फारशी वाईट नव्हती; परंतु इस्टेटीवर बरेंच कर्ज होतें आणि वडिलांच्या मृत्यूनंतर सावकारांची वक्रदृष्टि इस्टेट गिळंकृत करूं पाहत होती. विशेषत: वडिलांनीं ठाण्यापासून बारा मैलांवर बेलापूर या ठिकाणीं जें एक मिठागर घेऊन ठेवलें होतें, त्यावर सावकारांचा डोळा होता. ही दुभती धेनू साव-कारांच्या घशांत जाणार, हें ध्यानीं येतांच भावे यांनीं वकिलीचा अभ्यास सोडून दिला आणि ते मिठागरांत उतरले.

सावकारांचें कर्ज चुकतें करण्यासाठीं त्यांना मुंबईचे गिरणीवाले सोमण

यांनीं सहाय्य केलें. सावकारांची डोकेदुखी थांबतांच भावे मिठाचा व्यापार निर्वेधपणें चालवूं शकले. लहानपण हूडपणांत नि तरुणपण पुस्तकांत घालविलेले भावे व्यापारांत अननुभवी होते. व्यवसायाचें ज्ञान नाहीं, जवळ भांडवल नाहीं, व्यवसायक्षेत्रांत सहयोग देणारे स्नेही-सोवती नाहींत, अशा स्थितींतहि त्यांनीं केवळ एकटयाच्या हिमतीवर व्यवसाय चालू ठेवला आणि त्यांत अमाप यश प्राप्त केले. आपल्या मिठागराशिवाय दुसऱ्यांचीं मिठागरें मक्त्यानें घेऊन ते फार मोठणा प्रमाणांत व्यापार करूं लागले. हा व्यवसाय स्वत:च्या पायावर उभा करण्यासाठीं प्रारंभीं भावे यांनीं जे अफाट परिश्रम केले, ते अवर्णनीय आहेत. वेळेला जवण नाहीं, पुरेशी झोप नाहीं, अशा प्रकारें अष्टौप्रहर एकच ध्यास घेऊन त्यांनी अडचणींवर जिद्दीनें मात केली. एका तपाच्या आंतच त्यांच्या तपश्चर्येला भरघोस फळ प्राप्त झालें आणि १९०८ च्या सुमारास त्यांची धनवंतांत गणना होऊं लागली.

## जोडोनियां धन उत्तम वेव्हारें

व्यापाराची ही उभारणी एकीकडे चालू असतांना त्यांची ज्ञानलालसा आणि काव्यरसिकता यत्किंचितहि ओसरली नव्हती. ग्रंथसंग्रहालयाचें काम चालू होतें, 'महाराष्ट्रकवी'चें संपादन चालू होतें, पोथ्यापुस्तकांचा धांडोळा चालू होता; मित्रमंडळांतला काव्यशास्त्रविनोद ओसरला नव्हता आणि पशुपक्ष्यांचें नि वृक्षवेलींचें विस्मरण घडलें नव्हतें. हे सारे त्यांच्या चित्ताच्या विसाव्याचे विषय होते.

व्यापारांत जम बसल्यावर त्यांना स्वास्थ्य लाभलें. आर्थिक दृष्टया ते उत्तम प्रकारें स्थिर झाले. मग त्यांनीं ज्ञानोपासनेकडे अधिक वेळ द्यायला प्रारंभ केला. जुलै ते नोव्हेंबर हा मिठाच्या व्यवसायांत संपूर्ण सुटीचा काळ. या काळांत ते गांवोगांव हिंडत, मठमंदिरांचा नि जुन्या घराण्यांचा शोध घेत आणि हस्तलिखित पोथ्या व कागदपत्रें गोळा करीत. दरवर्षी त्यांचा हा क्रम चालू असे. या साधनसंकलनांतून 'सारस्वता'च्या परिष्करणाची सिद्धता झाली; इतिहासांतलीं अज्ञान रहस्यें उलगडूं लागलीं आणि संशोधनाचीं नवनवीं क्षितिजें दृष्टीपुढें स्पष्ट होऊं लागलीं. १९१२ मध्यें त्यांचे स्नेही श्री. विष्णु भास्कर पटवर्धन वारल्यानंतर भावे हे ठाण्याच्या वातावरणांत बरेच एकाकी बनले. त्यांच्या वृत्तीप्रवृत्तींचीं, त्यांच्या क्षमतेचीं आणि त्यांच्या रसिकतेला साजेशीं माणसें ठाण्यांत विरळ झालीं होतीं. त्यामुळें भावे एकटेच आपल्या आर्थिक आणि वाङ्मयीन उद्यमांत मग्न राहात असत.

नेपोलियनच्या असामान्य गुणांनीं त्यांना आकर्षित केल्यानंतर ते त्याच्या चरित्रचिंतनांत दीर्घ काळपर्यंत गुंगून गेले. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयांतून नेपोलियनविषयक अनेक ग्रंथ आणवून त्यांनीं त्या सर्व सामग्रीचें आलोडन केलें; टिपणें काढलीं आणि १९१७ मध्यें 'चक्रवर्ती नेपोलियन' हा सुंदर चरित्रग्रंथ प्रकाशित केला. नेपोलियनचें चरित्र प्रकाशित झाल्यावर लौकरच भावे व्यापारांतून निवृत्त झाले. इ. स. १९०० मध्यें त्यांनीं या व्यापारांत पदार्पण केलें आणि १९१८ मध्यें दीड तपाच्या परिश्रमांचें फल तृप्तीनें अनुभवून, ते आवडीच्या उद्योगांना पूर्ण वेळ देण्यासाठीं त्यांतून बाजूला झाले. चढत्या क्रमानें हवा तेवढा द्रव्याचा लाभ होण्याचें चित्र समोर दिसत असतांनाहि भावे यांनीं द्रव्याचा हव्यास सोडून ज्ञानाच्या हव्यासासाठीं सारा वेळ द्यायला सिद्ध व्हावें, हें त्यांच्या अंतरंगावर झगझगीत प्रकाश टाकणारें आहे.

त्यांनीं उत्तम व्यवहारानें विपुल धन जोडलें आणि इष्ट त्या ठिकाणीं मुक्त हस्तानें खर्चहि केलें. त्यांना न पटणाऱ्या, न आवडणाऱ्या गोष्टीसाठीं केवळ उपचार म्हणून एक पैहि खर्च करण्याची त्यांची तयारी नसे. परंतु त्यांना पटणाऱ्या व आवडणाऱ्या गोष्टींसाठीं ते मुळींच हात राखून वागत नसत. महर्षि धोंडो केशव कर्वे हे आपल्या महिला विद्यापीठाला देणगी मागण्यासाठीं श्री. रा. स. भागवत यांना बरोबर घेऊन भावे यांच्याकडे गेले. कर्वे यांची अपेक्षा अवघ्या एक हजार रुपयांची होती. परंतु भावे यांनीं एकदम पन्नास हजार रुपयांचे बॉंड देऊं केले. या प्रसंगीं कर्वे आनंदानें उद्गारले : "दक्षिणी लोकांत इतकी मोठी रक्कम देणारा हाच गृहस्थ मला भेटला. या दानानें माझ्या कार्याचें चीज झालें."

पुढें भावे यांनीं देऊं केलेल्या रकमेपेक्षां अनेक पटींनीं मोठी रक्कम सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं कर्वे यांना दिल्यामुळें आणि दोन्ही देणग्यांच्या अटींचा परस्परांशी विसंवाद येऊं लागल्यामुळें कर्वे भाव्यांची देणगी तांत्रिक कारणांनीं स्वीकारूं शकले नाहींत. लोकमान्य टिळकांना चिरोल केसच्या वेळीं भावे यांनीं एक लाख रुपये एका रकमेनें वापरायला दिले होते!

## एक जीवघेणा अपघात

इ. स. १९२२ च्या दिवाळींत (दि. ११ ऑक्टोबर १९२२ या दिवशीं) भावे यांना एक अपघात झाला होता आणि त्या अपघातांतून ते कसेतरी बचावले होते, असें त्यांनी 'सारस्वता'च्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत लिहून ठेवलें आहे :

"शके १८४४ च्या आश्विनांत दीपोत्सवाच्या सुमारास मी सहल करीत असतां माझी गाडी भरधाव धावत होती. शेपट्या वर करून बैल बेफामपणानें पळत होते. या वेळीं गाडी रस्त्याच्या अगदीं कडेला गेली. रस्ता अरुंद असून त्याच्या दोन्ही अंगांना खालीं नजर पोंचत नाहीं असे खोल कडे तुटलेले होते व तळाला एक मोठी दरी होती. या दरींत कैक प्राणी आतांपर्यंत पडले, पण त्यांतून एकहि वर जिवंत आला नाहीं, हें मला माहीत होतें. माझे गाडीचा वेग तर कांहीं केल्या आवरेना. यामुळें मी फारच घावरलों आणि माझी बोबडी वळली. आणखी थोडा वेळ जाता, तर मी पार गेलोंच होतों. पण इतक्यांत माझे वर्ध्याचे स्नेही रा. गोपाळराव देशमुख हे तेथें आले. त्यांनीं हां हां म्हणता बैल चुचकारून गाडी चकारींत आणली . . या प्रसंगीं माझे प्राण वाचले खरे, पण घाव माझ्या असे वर्मीं लागले कीं, मी जन्माचा लुळा झालों."

या अपघातामुळें आलेल्या आजारपणांतच 'सारस्वता'च्या तिसऱ्या आवृत्तीचें काम सुरू झालें.

## इंग्रजी न्यायाचा जाच

स्वास्थ्याचा उपयोग आवडीच्या कामांत करावा, म्हणून त्यांनीं व्यवसायांतून निवृत्ति स्वीकारली खरी; परंतु त्यांना तें स्वास्थ्य उपभोगतां आलेंच नाहीं. त्यांना ड्यूओडोनल अल्सरचा विकार जडला. त्यामुळें पथ्यपाणी पाळावें लागे आणि त्याचा परिणाम म्हणून क्षीणतेला तोंड द्यावें लागे. हें आजारपण जडलें असतांनाच पैशाच्या व्यवहारांतील काहीं कटकटी निर्माण झाल्या. लेफ्टनंट डी. एल्. पटवर्धन या नांवाच्या व्यक्तीच्या पुढाकारानें सरकारनें त्यांच्यावर फौजदारी फिर्याद केली. अन्यायानें दुसऱ्यावर फिर्याद केल्याचा आरोप भावे यांच्यावर ठेवलेला होता. या फिर्यादीच्या काळांत ठाण्याच्या फर्नांडीस नांवाच्या मॅजिस्ट्रेटनें त्यांना अत्यंत अप्रतिष्ठेनें आणि निर्दयपणानें वागवलें. हा खटला चालू असतांना अनेकदां त्यांचें आजारपण वाढलें होतें. परंतु कोर्टांत हजर रहाण्याची शक्ति उरलेली नसतांनाहि त्यांना मुदत देण्याचें सौजन्य मॅजिस्ट्रेटनें दाखविलें नाहीं. त्यांच्या डॉक्टरांनी, एवढेंच नव्हे तर ठाण्याच्या सिव्हिल सर्जननें दिलेल्या सर्टिफिकेटालाहि मॅजिस्ट्रटनें किंमत दिली नाहीं. भावे खरेच आजारी आहेत कीं नाहींत, हें तपासण्यासाठी मुंबईहून तीनदां त्यानें गोरे डॉक्टर बोलावले. डॉक्टरांनीं वीस दिवसांच्या रजेची शिफारस केली; परंतु मॅजिस्ट्रेटनें फक्त तीन दिवसांची रजा मंजूर केली. असें अनेकवार घडत राहिलें. भावे यांनीं ज्या प्रतिष्ठितांना साक्षीदार म्हणून पुढें केलें,

त्यांच्यावर अकारणच पकड वॉरंटें सोडण्यांत आलीं. प्रत्यक्ष कोर्टांतहि तो भावे यांच्याशीं हलकटपणानें वागत असे.

मनस्ताप वाढतच राहिला. त्याचा परिणाम म्हणून ते विषमज्वरानें आजारी पडले. पोटांतला अल्सरहि उघडला. या जीवघेण्या आजारांतून ते उठतात तोंच खटल्याचा निकाल लागून त्यांना दोन वर्षे सक्त मजुरीची आणि एक हजार रुपये दंडाची कठोर शिक्षा सुनावण्यांत आली. त्यांचा जामीनहि नाकारला. मुलीचें लग्न घरीं चालू असतांना दंडवसुलीला शिपाई पाठवून जप्तीची धमकी देण्यांत आली. वरिष्ठ कोर्टांत मात्र त्यांना लगेच जामिनावर मुक्त केलें आणि अपिलांत भावे हे संपूर्ण दोषमुक्त ठरले. अपील ठाण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. सेन यांच्यापुढें चाललें. त्यांनीं आपल्या निकालपत्रांत मॅजिस्ट्रेटवर कठोर आघात करून त्याच्या सूडबुद्धीकडे लक्ष वेधलें होतें. ज्या पटवर्धनांच्या पुढाकारानें भावे यांचा सरकारनें छळ केला, त्या पटवर्धनांच्या खोटेपणाची सेन यांना खात्री पटली आणि त्यांनीं त्यांना नोटीस बजावली.

या सर्व मनस्तापाचा त्यांच्या प्रकृतीवर फार गंभीर परिणाम झाला. उदर-व्यथा वाढीस लागली. हवापालट करण्यासाठीं ते ठाण्याहून पुणें येथें आले; परंतु तेथेंहि दुखणें आटोक्यांत आलें नाहीं. अखेरीस पुण्यांस आल्यावर दहाच दिवसांनीं हा ज्ञानाचा उपासक, वाङमयाचा रसिक आस्वादक पुणें मुक्कामीं वाकडेवाडींतील रामनारायण बंगल्यांत दि. १२ सप्टेंबर १९२६ या दिवशीं कालवश झाला. काळानें त्यांचा पांचभौतिक देह हिरावून घेतला; परंतु त्यांचा कीर्तिदेह कालवंचना करून अजर अमर झाला आहे !

## संस्थासंपर्कांतील विधायक दृष्टि

महाविद्यालयीन जीवनांत भावे यांना लागलेलें ग्रंथवेड महाराष्ट्राच्या ज्ञान-जीवनाला नितांत उपकारक ठरलें. ग्रंथवाचनाच्या वेडामुळें त्यांच्याजवळ 'हळू-हळू त्या वेळच्या मानानें मराठी पुस्तकांचा उत्तम संग्रह जमला.' आणि त्यांनीं आपल्या संग्रहाला सार्वजनिक स्वरूप देऊन ज्ञानाचें मुक्त सत्र सुरू करण्यासाठीं १ जून १८९३ या दिवशीं आपल्या स्नेह्यांच्या सहयोगानें ठाणें येथें मराठी ग्रंथसंग्रहा-लयाची स्थापना केली. हें 'या देशांतलें पहिलें मराठी ग्रंथसंग्रहालय' असल्याची सार्थ जाणीव त्यांना होती.[1] या कामीं श्री. विष्णु भास्कर पटवर्धन यांचें सहकार्य

१. भावे यांचें 'आत्मकथन'.

त्यांना पहिल्या क्षणापासून होतें.

संग्रहालय सुरू केल्यावर त्याची शुश्रूषा भावे मनोभावें करूं लागले. ' लोकांनीं यास पुस्तकें नजर द्यावीं आणि तीं लोकांजवळ मागण्याचा आपणांस थोडा हक्क मिळावा,' म्हणून त्यांनीं ' जवळ एक चिटोरेंहि न ठेवतां सर्व मराठी पुस्तकांचा संग्रह या संस्थेला दिला. यापुढें इतर स्नेह्यांनींही बरींच पुस्तकें दिलीं व संग्रहालयास बाळसें आलें. '

भावे यांचें प्रकृतिवैशिष्ट्य असें कीं, ' अनेक लोकांचे उपहास आणि आडकाठ्या दूर सारून ' स्थापन केलेल्या या संस्थेच्या योगक्षेमासाठीं त्यांनीं मनोभावें कष्ट घेतले; परंतु ते त्या संस्थेच्या कोणत्याहि पदावर आरूढ झाले नाहींत. पहिलीं अनेक वर्षें संस्थेचे अहवालहि ते स्वतःच लिहीत असत. पहिल्या वर्षीच्या अहवालांत नोंदविलेलें संस्थेचें उदिष्ट भावे यांच्या क्रांतदर्शित्वाची साक्ष देणारें आहे : " आपली देशी भाषा सुधारण्यासाठीं पुष्कळांनीं पुष्कळ प्रयत्न केले. कोणीं नवीन ग्रंथ लिहिले, कोणी परक्या भाषेंतील भाषांतरें केलीं, कोणी जुने ग्रंथ मिळवून तपासून ते प्रसिद्ध केले. परंतु त्या सर्वांची मेहनत म्हणजे हे सगळे ग्रंथ एके ठिकाणीं जमविण्याचा प्रयत्न कोणी नीटसा केलेला ऐकिवांत नाहीं. आपल्या देशांत पुस्तकालयें बरींच आहेत; परंतु मराठी भाषेच्या संबंधानें पाहतां त्यांतील व्यवस्था समाधानकारक नाहीं. बहुतकरून सर्व चांगल्या ग्रंथसंग्रहालयांत इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतील पुस्तकें ठेवण्याचा संप्रदाय असतो. आतां इंग्रजी भाषेंत मराठीपेक्षां ग्रंथसंग्रह विशेष चांगला व जास्त, यांमुळें बहुतेक पैसा इंग्रजी पुस्तकें घेण्याकडेच खर्ची पडतो व मराठी ग्रंथांचा संग्रह व्हावा तसा होत नाहीं. ही आपल्या देशांत भाषेसंबंधानें मोठी उणीव आहे. ही उणीव लक्षांत आणून हें मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन झालें. "[१]

जुनीं पुस्तकें व हस्तलिखितें मिळवून त्यांचा संग्रह करणें, वाचनाची अभिरुचि निर्माण करून ती वाढविणें आणि तदनुषंगिक अनेक वाङ्मयीन कार्यें उभारणें अशा व्यापक उद्दिष्टांनीं भावे यांनीं या संस्थेतर्फेंच प्राचीन मराठी ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं ' महाराष्ट्रकवि ' मासिक पुस्तक सुरू केलें. तें त्यांच्या व्यापक उद्दिष्टांशीं संवादी होतें.

या संस्थेच्या स्थापनेपासूनच संग्रहालय आणि वाचनालय अशा दोन अंगांनीं

१. मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें, अमृतमहोत्सव स्मरणिका, पृ. २.

ही संस्था वाढावी, असें भावे यांचें स्पष्ट मत होतें. ग्रंथ हे वाचण्यासाठीं आहेत, हें खरें असलें, तरी ग्रंथसंग्रहाचें सातत्यानें रक्षण करणेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. याचमुळें ग्रंथसंग्रहालयांतलीं पुस्तकें इमारतीबाहेर जाऊं नयेत आणि विशेष अभ्यासाच्या गरजेवांचून हाताळूं नयेत, अशी त्यांची अपेक्षा होती. संग्रहालयाला कोणतेंहि पुस्तक वर्ज्य नाहीं, हेंहि त्यांनीं आर्जवून सांगितलें आहे : "या ठिकाणीं महाराष्ट्रभाषेंतील सर्व तऱ्हेच्या पुस्तकांचा संग्रह करावयाचा आहे. मग तीं कोणीहि लिहिलेलीं असोत, कोणत्याहि विषयांवर असोत व त्यांचा आकार केवढाहि असो. सरकारकायद्यांनीं मना न केलेलें असें मराठी भाषेंतील कोणतेंहि पुस्तक येथें असण्याला काहीं एक प्रत्यवाय नाहीं. म्हणजे हें संग्रहालय हा एक पुस्तकांचा मोठा समुद्रच व्हावयाचा, असा हेतु आहे. यांत मोत्येंहि असावयाचीं, पोवळीं असावयाचीं, तशा कवड्या आणि फुटक्या शिंपाहि असावयाच्या. मात्र टिपणकारांनीं अमुक टिपावें, असा नियम नाहीं. कोणी मोत्यांच्या अनुपम तेजानें आपलें चित्त रमवीत बसावें व कोणी शिंपा, फुटक्या कवड्या टिपून टाकण्यांत आपलीं बोटें झिजवावीं. हें ज्याचेत्याचे रुचीवर व योग्यतेवर अवलंबून राहील." [१]

संग्रहालयाच्या स्थापनेच्या वेळीं मराठींत सुमारें सहा हजार ग्रंथ प्रकाशित झालेले होते. संस्थेच्या संग्रहीं तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस यांपैकीं जवळ जवळ एक-तृतीयांश ( १७५४ ) ग्रंथ जमले होते. पहिल्या वार्षिक समारंभाचें अध्यक्षस्थान डॉ. कीर्तिकर यांनीं भूषविलें होतें, तर तिसऱ्या वार्षिक समारंभाला लोकमान्य टिळक अध्यक्ष म्हणून लाभले होते. या संग्रहालयाला उभ्या महाराष्ट्रानें सहाय्य देऊन मराठी भाषेच्या उत्कर्षाची वाट मोकळी करावी, असें आवाहन लोकमान्यांनीं आपल्या भाषणांत केलें.

पुढें पटवर्धनांच्या मृत्यूनंतर (१९१२) भावे यांचे या संस्थेशीं संबंध राहिले नाहीत; परंतु त्यांनीं केलेलें पायाभरण इतकें सुदृढ होतें कीं, त्यांच्या दूरदृष्टीनें स्थापन झालेलें, त्यांच्या नेतृत्वानें चालणारें आणि त्यांच्या प्रतिष्ठेनें वाढणारें हें ग्रंथसंग्रहालय महाराष्ट्रांतील ग्रंथालय चळवळीचें गंगाद्वार ठरलें आणि त्यानें गेल्या पाऊण शतकांत स्वत:चें आणि आपल्या अंतिम उदिष्टांचें सुविकसित स्वरूप अनुभवलें. अवघ्या ४२ सदस्यांनीं ५५८ पुस्तकांच्या संग्रहानें सुरू झालेलें हें संग्रहालय आज

१. तत्रैव, पृ. ३.

स्वत:च्या भव्य वास्तूंत चाळीस हजार पुस्तकांनीं समृद्ध बनलें आहे आणि त्याची सभासद-संख्या बाराशेंवर गेली आहे.

वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षीं भावे यांनीं या संस्थेचा पाया घातला, हें मुद्दाम ध्यानीं घ्यायला हवें. या संस्थेच्या उभारणींत भावे आणि त्यांचे स्नेही कशा प्रकारें झिजत होते, याची एक हकीगत ऐकण्यासारखी आहे : एकदां या तरुण मंडळींनीं मुंबईंत रस्त्यावर लिलावांत एक कपाट विकत घेतलें. तें आगगाडींतून ठाण्यास आणलें. पण तें स्टेशनावरून ठिकाणावर नेण्यासाठीं हमाल दीड रुपया मागूं लागले. त्या वेळच्या परिस्थितींत एवढी हमाली देणें शक्य नसल्यामुळें या तरुणांनीं आपल्या पगड्या-फेटे काढून एकाजवळ दिले आणि उपरणीं डोक्याला गुंडाळून आठ जणांनीं तें कपाट मुक्कामावर आणलें. त्या ध्येयवादी तरुणांच्या तळमळीची साक्ष देणारें तें कपाट आजहि संग्रहालयांत आहे.[1]

ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाशिवाय पुणें येथील महाराष्ट्र साहित्य परिषद् आणि भारत इतिहास संशोधक मंडळ या दोन मातबर संस्थांशीं त्यांचा स्थापनेपासून संबंध होता. परिषदेचे तर ते पहिले चिटणीस होते. १९०६ ते १९०८ या तीन वर्षांसांठीं श्री. कृ. प्र. खाडिलकर आणि श्री. वा. गो. आपटे यांच्याबरोबर त्यांनीं चिटणीसपदाची जबाबदारी संभाळली. पुन: १९१२ मध्यें ते कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. १९०७ मध्यें त्यांनीं प्राचीन मराठी कवींच्या कृतींची एक यादी तयार करून स्वखर्चानें परिषदेच्या नांवावर छापली. मंडळाचे ते स्थापनेपासून सदस्य होते. तेथील कामकाजांत ते भाग घेत; सभांत निबंध वाचीत, इतरांच्या निबंधां-वरील चर्चेंत भाग घेत आणि तेथील साधनांचा अभ्यास करण्यासाठीं बैठकीहि मारीत. मंडळाला त्यांनीं एक हजार रुपयांची देणगीहि दिली होती. अभ्यासाच्या बाबतींत त्यांची उत्कटता अत्यंत तीव्र असे. एकदां मंडळाच्या संग्रहांतील एक पुस्तक त्यांना संदर्भासाठीं तांतडीनें हवें होतें. कपाटाची किल्ली कारकुनाकडे घरीं राहिली असल्याचें श्री. पोतदारांनीं त्यांना सांगितलें. परंतु किल्ली उपलब्ध नसल्यानें अभ्यास थांबावा, हें भावे यांच्या उत्कट स्वभावाला मानवणारें नव्हतें. त्यांनीं कपाटाच्या कांचेंतून पुस्तकाची जागा हेरली आणि सरळ कांच फोडून पुस्तक वेळेवर मिळविलें ! पोतदारांनीं भावे यांचा हा ' गुन्हा ' मंडळाच्या दप्तरीं दाखल करून

१. वच्छहरण, प्रस्तावना, पृ. १.

कांचेचा खर्च १२ आणे हिशेबांत नोंदवलेला आहे.[१] आपल्या उत्कटतेशीं विसंवाद आढळला कीं ते अस्वस्थ होत. मग मोठ्यांचें मोठेपण त्यांना थिटें वाटे. संग्रहालयासाठीं केलेली पुस्तकांची विस्तृत यादी त्यांनीं न्या. रानडे यांना त्यांच्या गरजेनें पुरविली आणि ती यादी रानड्यांना फार उपयुक्त वाटल्याचें पाहून त्यांनीं संग्रहालयाचे आजीव सदस्य बनावें, अशी इच्छा भावे यांनीं व्यक्त केली. रानड्यांनीं तें टाळलें, ही गोष्ट भावे यांना खटकली आणि त्यांनीं आपला विषाद नोंदवून टाकला.[२] एखादें कार्य अथवा वेड अंगीकारलें म्हणजे ते अशा उत्कटतेनें त्याचा पाठपुरावा करीत असत.

## ' महाराष्ट्रकवी 'चा जन्म

भावे यांचे गुरु जनार्दन बाळाजी मोडक हे प्राचीन मराठी कवितेचे मर्मज्ञ अभ्यासक होते. त्यांच्या सान्निध्यांत भावे प्राचीन कवितेच्या अंतरंगांत प्रविष्ट झाले आणि तिच्या अनेकानेक वैशिष्ट्यांवर मुग्ध झाले. महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळांत ते स्नेह्यांच्या संगतींत प्राचीन मराठी कवितेचा मनसोक्त आस्वाद घेतांना स्वत:ला सर्वस्वीं विसरून जात असत. ' नवनीतां 'तील अनेक काव्यें त्यांनीं कंठस्थ केलीं होतीं. एकोणिसाव्या शतकांतलीं बहुतेक सर्व नियतकालिकें त्यांच्या अवलोकनांत असत. त्यांतल्या त्यांत ' सर्वसंग्रह ', आणि त्यांचे गुरु श्री. मोडक यांनीं अनुक्रमें पुणें व मुंबई येथें चालविलेलीं ' काव्येतिहाससंग्रह ' व ' काव्यसंग्रह ' या मासिकांचें कार्य त्यांच्या अभिरुचीला आदर्शवत् ठरलें होतें. विशेषत: ' काव्येतिहाससंग्रहा 'नें व ' काव्यसंग्रहा 'नें त्यांना विशेष प्रेरित केलें आणि प्राचीन कवींच्या कृतींच्या संग्रहा-बरोबरच त्यांचें संपादन-प्रकाशन एखाद्या स्वतंत्र मासिकाच्या द्वारां आपणहि करावें, असें त्यांच्या मनानें घेतलें. हा संकल्प शके १८२५ (इ. स. १९०३) च्या आश्विनांत विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर ' महाराष्ट्रकवि ' नामक मासिकाच्या रूपानें साकार झाला आणि प्रतिमासीं अप्रकाशित प्राचीन मराठी कृति प्रकाशांत येऊं लागल्या. या मासिकाचें स्वरूप आपल्या अपेक्षेप्रमाणें ठेवण्यासाठीं आणि त्याचें सातत्य राखण्यासाठीं त्यांना त्यांची पूर्वसाधना खूप उपकारक ठरली.

---

१. म. म. पोतदारांकडून कळलेली हकीकत. या घटनेचा तपशील श्री. रा. स. भागवत व श्री. शं. ना. जोशी यांनीं थोडा वेगळा सांगितला आहे. पहा : ' संशोधकसप्तर्षि', पृ. १२२.

२. महानुभाव-कवि-काव्य-सूची, प्रस्तावना, पृ. १.

## वाङ्मयसूचीचे प्रयत्न

'सारस्वता'च्या परिवर्धित स्वरूपाचा आणि 'महाराष्ट्रकवि' मासिक पुस्तकाचा मूलस्रोत म्हणून, भावे यांच्या वाङ्मय-सूचीच्या प्रयत्नांचा विचार आवश्यक आहे.[१] 'ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाची जुळवाजुळव व मांडणी करीत असतां, आपल्यापुढें कामाचा किती बोजा आहे, हें अजमावून पाहण्यासाठीं' त्यांनीं 'मराठी भाषेंतील सर्व ग्रंथांची यादी' करण्याचा प्रथम प्रयत्न केला. त्या वेळीं मुंबई विद्यापीठांत मराठी भाषा चालू करण्याविषयीं खटपट करणाऱ्या न्या. रानडयांनीं ही यादी मुद्दाम मागून घेतली होती आणि ती पाहून त्यांनीं अत्यंत समाधान व्यक्त केलें होतें.

यानंतर 'महाराष्ट्रकवि' मासिक पुस्तक काढीत असतां त्यांनीं पुन्हा दुसरी एक यादी तयार केली. 'हींत फक्त काव्यग्रंथच घातले होते व कोणतें काव्य पूर्वी छापलें गेलें आहे व कोणतें अप्रकाशित आहे, हें दाखविलें होतें. आणि कवींचीं नांवेंहि दिलीं होतीं.' या वैशिष्टयाचा हेतु असा कीं, एकदां छापलेलीं काव्यें पुन्हा छापलीं जाऊं नयेत; केवळ अप्रकाशित काव्येंच छापतां यावींत. भावे गांवोगांव हिंडून पोथ्या व वाडें हुडकीत असतांना अशा यादीचा उपयोग करीत आणि नवनवे ग्रंथ आढळले कीं यादींत भर टाकीत असत. अशी नवी भर टाकीत टाकीत त्यांनीं तीन-चार वेळां ही यादी परिष्कृत केली आणि तिला बऱ्याच प्रमाणांत पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला. यांपैकीं कांहीं ग्रंथ मुंबई विद्यापीठांत पाठ्यग्रंथ म्हणून नियुक्त झाले होते.

शके १८२९ मध्यें (म्हणजे इ. स. १९०६ मध्यें) भावे यांच्याकडे महाराष्ट्र साहित्य परिषदेचें चिटणीसपद आलें. या वर्षाच्या अखेरीस ( इ. स. १९०७ च्या प्रारंभीं ) त्यांनीं 'आपले खर्चानें साहित्य परिषदेच्या नांवावर, कविनाम व काव्यें यांचा निर्देश करून एक यादी छापून प्रसिद्ध केली.' पुढें त्या यादींत आणखी माहिती घालून व भर घालून ती पुरी करून पुन्हा छापावी, असा त्यांचा विचार होता. म्हणून एक विस्तीर्ण यादी ते तयार करूं लागले व खर्डेवजा लेखी प्रत त्यांनीं तयारहि केली. त्याच वेळीं त्यांचे एक स्नेही कै. गो. का. चांदोरकर यांच्याहि मनांत अशी एक यादी छापावी, असें आलें आणि त्यांनीं भावे यांची यादी घेऊन सुधारून 'संतकविकाव्य-सूची' या नांवानें शके १८३७ मध्यें प्रसिद्ध केली. वाङ्मयसंशोधकांना आजहि अति-

१. महानुभाव-कविकाव्यसूची, प्रस्तावना, पृ. १–२.

शय उपयुक्त ठरणाऱ्या या सूचीमागें भावे यांचीच कल्पकता आणि अखंड परिश्रमशीलता असल्याचें समजल्यावर त्यांच्याविषयींचा कृतज्ञताभाव द्विगुणित होतो.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या तृतीय संमेलन-प्रसंगीं ( वैशाख व. २, शके १८३७ या दिवशीं ) "रा. भावे यांनीं आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेल्या (चालू किंवा बंद पडलेल्या ) सुमारें ४०० मासिक पुस्तकांची परिश्रमपूर्वक तयार केलेली मौल्यवान यादी मंडळास नजर केली."[1]

यानंतर त्यांनीं शके १८४१ मध्यें 'सारस्वता'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या शेवटीं 'एक लहानशी तात्पुरती यादी' तयार करून छापली आणि शके १८४६ मध्यें 'महानुभाव-महाराष्ट्र–ग्रंथावली' (कविकाव्यसूची) प्रकाशित केली. या 'यादींत सुमारें ६७५ कवींचीं नांवें आहेत आणि त्या सर्वांमिळून पांच हजारांवर मराठी ग्रंथ-लेखांची नोंद नांवनिशीवार दिली आहे.'

वाङ्मयसूचीच्या स्वरूपाचे भावे यांचे हे प्रयत्न समग्र वाङ्मयप्रवाहाचें स्वरूप एका दृष्टिक्षेपांत आकळण्यासाठीं त्यांना उपकारक ठरले आणि त्यांतूनच क्रमानें महाराष्ट्र-सारस्वताचें चित्र नवनव्या रंगरेखांनीं फुलत राहिलें.

## 'महाराष्ट्रकवी'ची संकल्पसिद्धि

शके १८२५ च्या आश्विनापासून शके १८२९ च्या आश्विनापर्यंत एकूण चार वर्षें आणि एक महिना एवढा काळ 'महाराष्ट्रकवी'ची वाटचाल सुरू होती. या काळांत दोन अधिक मास धरून एक्कावन्न अंक निघाले. या एक्कावन्न अंकांपैकीं आठ अंक प्रत्येकीं तीन-तीन अंकांना सामावून घेणारे असे निघाल्यामुळें दृश्यतः 'महाराष्ट्रकवी'चे एकूण पस्तीस खंडच प्रकाशित झाले. सुमारें अडीच हजार पृष्ठ-संख्या व्यापणाऱ्या या पस्तीस खंडांत नागेश, रंगनाथस्वामी निगडीकर, रंगनाथस्वामी मोगरेकर, सामराज, दासोपंत, कृष्णदास मुद्गल, शिवरामस्वामी कल्याणीकर, माधव, जगन्नाथ, मृत्युंजय इत्यादि मातबर कवींची विपुल अप्रकाशित कविता प्रकाशांत आली.

"या यत्नानें कोणत्याहि तऱ्हेनें 'काव्यसंग्रहा'स व्यत्यय येईल, अशी दिशा केव्हांहि आम्ही पत्करणार नाहीं," असें भावे यांनीं पहिल्याच अंकांत प्रकट केलें होतें. 'काव्यसंग्रहां'त छापला जाणारा मजकूर या मासिकांत येऊं नये, म्हणून जे

---

१. भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलनवृत्त, शके १८३७, पृ. ४.

ग्रंथ आपण छापणार त्यांची यादी ते काव्यसंग्रहकारांकडे पाठवून, कोणते ग्रंथ 'महाराष्ट्रकवीं'त छापावे, याविषयीं त्यांचा सल्ला घेत असत.

मजकुराच्या दृष्टीनें 'महाराष्ट्रकवी'चें भरणपोषण करण्यासाठीं भावे यांनीं गांवोगांवच्या मठमंदिरांशीं आणि कविवंशजांशीं संपर्क साधून अनेक ग्रंथ गोळा केले होते. ग्रंथ विकत घेण्याला त्यांचा विरोध होता. कोणी एखाद्या ग्रंथाची नकल करून पाठविली, तर ते नकलेचा खर्च जरूर देत असत. "ज्यांनीं हे ग्रंथ रचले, त्यांनीं ते केवळ परमार्थबुद्धीनें, सर्वांच्या उपयोगी पडावे, याच हेतूनें रचले. त्यांनीं त्याबद्दल कांहीं मागितलें नाहीं किंवा त्यांवर आपला अमुक एक असा हक्कहि ठेवला नाहीं. असें असतां केवळ ते कोणाजवळ यदृच्छेनें आहेत, येवढ्याबद्दल त्यांनीं द्रव्य मागावें, व अशा गोष्टींतहि पैसा मिळविण्याची चाड ठेवावी, हें केव्हांहि परमेश्वरास आवडणार नाहीं," अशा शब्दांत त्यांनीं आपली याविषयींची भूमिका वाचकांपुढें मांडली आहे.

'महाराष्ट्रकवी'ची वार्षिक वर्गणी अवघी एक रुपया होती आणि सुट्या अंकाची किंमत चार आणे होती. वर्गणीदारांची जास्तींत जास्त संख्या १५०० झाली होती.[1] वर्षाचा प्रत्यक्ष खर्च सुमारें १७०० रुपये येत असे. प्रती २००० काढीत असत. संपादक आणि त्यांचे सहकारी विनावेतन काम करीत असत. थोड्या देणग्यांनीं तोटा भरून काढण्याचा प्रयत्न करावा लागे. 'महाराष्ट्रकवी'च्या वर्गणीदारांस प्रलोभन म्हणून श्री. गणेश बळवंत मोडक यांनीं प्रकाशित केलेले शिवकल्याणांच्या दशमस्कंधाचे पहिले दोन भाग ( पृष्ठें ५००, मूल्य २ रुपये ) निम्म्या किंमतींत देण्याचें अंक क्र. १६ मध्यें जाहीर केलें होतें. "इतक्या क्षुल्लक वर्गणींत हें मासिक पुस्तक चालवूं नये आणि हें चालणारहि नाहीं," [2] असा उपदेश मित्रमंडळीकडून सतत मिळत असतांनाहि भावे यांनीं नेट धरून चार वर्षं तें सातत्यानें चालविलें, हें त्यांच्या जिद्दीचें आणि प्राचीन मराठी कवितेविषयींच्या प्रेमाचें द्योतक आहे.

भावे आणि त्यांचे सहकारी यांनीं या मासिकाच्या योगक्षेमासाठीं अपरिमित कष्ट घेतले. या निरलस आणि निरपेक्ष परिश्रमांची कल्पना भावे यांनींच एके ठिकाणीं दिली आहे. तें लिहितात : "या वेळीं माझ्या अनेक मित्रांनीं सर्व कामें मोठ्या हौसेनें व मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय फार आनंदानें केलीं; म्हणूनच पन्नास पानांचें मासिक पुस्तक सालिना अवघ्या एक रुपयाच्या वर्गणींत वर्गणी-

.........................................

१. भा. इ. सं. मंडळ प्रथम संमेलनवृत्त, शके १८३५, पृ. ७८.
२. 'महाराष्ट्रकवि', वर्ष १, अंक १, उपोद्घात, पृ. ४.

दारांस देतां आलें. रा. गणपतराव साठे, बळवंतराव दामले, नारायणराव अत्रे विनायकराव आठवले, वगैरे माझे अनेक मित्र मोठ्या तत्परतेनें मला मदत करीत. मुंग्या कामाला जुडाव्या, त्याप्रमाणें आम्ही सर्व एकजुटीनें काम करीत असूं. यांपैकीं बहुतेकांचा पेशा सरकारी नोकरीचा होता. दिवसां नोकरी करावी आणि रात्रीं हें काम करावें, असा क्रम चाले; आणि अंगमेहनत करून पैपैशा-पासून खर्चाची बाजू आम्हीं वांचवीत असूं." [१] अंगीकृत कार्याविषयींची ही असाधारण निष्ठा, त्या निष्ठेपोटीं हवे ते श्रम घेण्याची सिद्धता आणि मग अशा निष्ठापूर्वक परिश्रमांनीं लाभणारी कार्यासिद्धीची कृतार्थता जीवनाला महनीयता प्राप्त करून देते—पुढिलांना अशीं जीवनें दीपस्तंभांप्रमाणें पथप्रदर्शक ठरतात. ज्ञानोपासनेच्या क्षेत्रांत मराठी माणसांनीं भावे यांना वाट पुसली पाहिजे, एवढें त्यांचें तप निःसंशय आहे.

## 'महाराष्ट्रकवी'चें उद्दिष्ट

'महाराष्ट्र-कवी'चें संपादन-प्रकाशन भावे यांनीं अंगावर घेतलें, तें प्राचीन मराठी कवितेच्या प्रेमानें. 'महाराष्ट्रकवी'च्या पहिल्या अंकाच्या उपोद्घातांत त्यांनीं या मासिकाचें उद्दिष्ट विस्तारानें विशद केलें आहे. त्यांनीं प्रारंभींच म्हटलें आहे कीं, "गेल्या सहाशें वर्षांत महाराष्ट्रभाषेमध्यें अनेक कवि होऊन गेले. त्यांनीं निरनिराळ्या वेळीं आणि देशाच्या व समाजाच्या निरनिराळ्या स्थितींत आपली बुद्धिमत्ता ग्रंथरचनेकडे खर्चून देशाला व भाषेला सर्व बाजूंनीं संपन्न करण्याचा यत्न केला आहे. यांपैकीं दरएकांनीं आपापल्या रुचीप्रमाणें वेदांत, योग, साहित्य, वैद्यक, ज्योतिष, गणित वगैरे अनेक विषयांवर ग्रंथरचना केली आहे. आपल्या बंधूंनीं विपन्ना-वस्थेंत पडूं नये व आपल्या भाषेला जगांतील श्रेष्ठ भाषांमध्यें स्थळ मिळावें, याकरितां ज्यांनीं ग्रंथरचनेंत आपला काळ घालविला, त्या थोर पुरुषांच्या कृतींचा आदर आपण सन्मानपूर्वक व अभिमानानें केला पाहिजे. या थोर पुरुषांची पुष्कळ कृति अजून अनुपलब्ध आहे. तिचा शोध लावून, ती सर्वांना पहावयास सापडेल, अशी कांहीं तरी व्यवस्था होणें, हें महाराष्ट्राच्या आजच्या स्थितीला फार अवश्य आहे. कारण या कृति, म्हणजे हे जुन्या कवींचे ग्रंथ हळूहळू नष्ट होत चालले आहेत; आणि कसर हवा वगैरेंच्या हातून आतांच योग्य वेळीं यांची सोडवणूक न केल्यास महाराष्ट्र या

१. वच्छहरण, प्रस्तावना, पृ. १.

ग्रंथांना कायमचा आंचवेल, यांत संशय नाहीं. इतके वर्षांत अनेक राज्यक्रांत्या व उलाढाली झाल्यामुळें या ग्रंथांची दैना होऊन गेली आहे व आतां या कालांत तर त्यांचें पुरें दुर्दैव ओढवल्यासारखें झालें आहे. मुद्रणकलेच्या प्रसाराबरोबर हस्तलिखित ग्रंथांविषयीं असलेली पूज्यबुद्धि व आस्था हीं समूळ नाहींशीं होत चाललीं आहेत. याकरितां या आपल्या पडत्या काळांत आपल्या पूर्वजांच्या आचारविचारांची आपणांस ओळख व्हावी, त्यांचे शब्द सर्व काळ आपल्याजवळ रहावे, त्यांच्या उपदेशाची जोड केव्हांहि घडावी व त्यांनीं श्रमपूर्वक रचलेले ग्रंथ अगदीं नष्ट होऊं नयेत, अशा हेतूनें आम्ही येथें ' महाराष्ट्रकवि ' या नांवाचें हें मासिक पुस्तक सुरू केलें आहे. "

' महाराष्ट्रकवीं 'तून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची कालकक्षा आणि विषयकक्षाहि त्यांनीं पहिल्याच अंकांत सांगितली आहे : " या मासिक पुस्तकांत शके १७४० च्या पूर्वींचे, म्हणजे स्वराज्याच्या आमदानींतले व त्यापूर्वींचे काव्यग्रंथ छापण्याचा विचार योजला आहे. यांत वेदांत, पुराण, ज्योतिष, गणित, वैद्यक, चरित्र, पवाडे, लावण्या, कटाव, पदें वगैरे सर्व तऱ्हेचे विषय हळूहळू येतील. "

तिसऱ्या वर्षाच्या प्रारंभींच्या अंकांत त्यांनीं पुन: स्पष्ट केल्यानुसार " देवगिरीकर जाधवांच्या अमदानीच्या अखेरीपासून तों पुणेंकर पेशव्यांच्या राजवटीच्या अखेरीपर्यंत महाराष्ट्रांत जें जें कांहीं काव्यमय वाङमय महाराष्ट्रीयांनीं निर्माण केलें, त्या सर्वांचा या मासिक पुस्तकांत अंतर्भाव " करण्याचें व्यापक उद्दिष्ट त्यांच्या दृष्टीपुढें होतें. अर्थात् असा अंतर्भाव करतांना पूर्वप्रकाशित रचना वगळून केवळ अप्रकाशित कृतींनाच प्रकाश लाभावा, यावर त्यांचा कटाक्ष होता.

## महाराष्ट्र-संस्कृतीचें स्वरूप ओळखण्याचीं साधनें

उपलब्ध असलेली सर्व मराठी कविता छापून झाली आहे व आतां छापावयाचें असें फारसें कांहीं राहिलें नाहीं, असा ज्या पुष्कळांचा समज होता, त्यांना अप्रकाशित मराठी रचनेच्या व्यापाची भावे यांनीं स्पष्ट कल्पना दिली आहे. " छापून काढावयाचा भाग छापलेल्या भागाच्या पुष्कळ पटीनें जास्त आहे, " ही वस्तुस्थिति असूनहि अशा प्रयत्नांच्या बाबतींत उदासीनता कां आढळते, याचाहि त्यांनीं विचार केला होता. " हे ग्रंथ पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांपेक्षां काव्य या दृष्टीनें कदाचित् जरा कमी योग्यतेचे वाटण्याचा संभव आहे, " याची त्यांना स्पष्ट जाणीव होती. परंतु वाङमयाचा उपयोग आस्वादनाशिवाय इतरहि अनेक बाबतींत होतो, हें त्यांच्या शोधक दृष्टीला पुरतेपणीं आकळलेलें असल्यामुळें, त्यांचे स्नेही

इतिहासाचार्य राजवाडे यांच्याप्रमाणेंच त्यांनीही कुरकुऱ्या वाङ्मयभक्तांना वाङ्मयाच्या अनेकांगी महत्त्वाची जाणीव देण्याचा प्रयत्न केला आहे.

या संदर्भात त्यांनीं म्हटलें आहे कीं, "हें सर्व वाङ्मय अनेक कारणांसाठीं फार उपयोगी आहे. या ग्रंथांनीं त्या त्या वेळचे आपले आचार व विचार आपणांस कळूं लागतील. त्या वेळच्या शकुनवंत्या, व्यवहारनिर्णय, मायनेपत्रक, संवत्सरफलें वगैरे कागद जगापुढें मांडतां आले, तर आपल्या सामाजिक इतिहासावर नवीन प्रकाश पडेल. वास्तविक पाहतां यापेक्षां आणखीहि निराळ्या तऱ्हेचे जुने ग्रंथ छापून निघणें अवश्य आहे. हलीं ज्यांचा 'इतिहास' म्हणून संग्रह करण्यांत येतो. त्यांहून अगदीं भिन्न असे ग्रंथ महाराष्ट्रांत वारंवार आढळतात. वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, सिंहासनबत्तिशी, वगैरेसारख्या कथा, जुन्या काळच्या कर्त्या पुरुषांच्या सोप्या शब्दांनीं सांगितलेल्या आख्यायिका किंवा कहाण्या, विद्यार्थिदशेंतल्या होतकरू मुलांस वाचण्यासाठीं रचलेल्या बखरी, त्या वेळचीं नाटकें, तशाच आजोबांनीं नातवांना सांगितलेल्या कावळ्याचिमण्यांच्याच, परंतु अर्थपूर्ण गोष्टी, हीं सर्व एका दृष्टीनें पाहतां आपल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा काळच्या इतिहासाचीं उपांगें होत. आणि या पूर्वकालीन स्थितीची कल्पना बांधण्याला या सर्वांचें प्रकाशन होणें फार अवश्य आहे. पश्चिमेकडे गाजलेली, ग्रीक मुलांच्या कोवळ्या मनाला वळण लावण्याकरितां जशी 'इसापनीति' रचली गेली, तशीच आर्यावर्तांतल्या मुलांकरितां 'विष्णुशर्म्याची नीति' लिहिली गेली. याच दृष्टीनें पाहतां लहानसहान गोष्टींपासून तों भारत-रामायणापर्यंतचे सर्व ग्रंथ हे एक तऱ्हेचे शिक्षक होत. लहान मुलांचीं मोठीं माणसें व मोठ्या माणसांचे कर्ते पुरुष बनविण्याच्या कामीं या सर्वांचें सहाय्य अवश्य आहे. हीं केवळ करमणुकीचीं साधनें नसून, यांची कामगिरी फार मोठी आणि फार महत्त्वाची आहे. ह्या ग्रंथांवरून महाराष्ट्र-संस्कृतीचें स्वरूप ओळखण्यास फार सहाय्य होणार आहे. त्या त्या काळीं लोकांच्या आचारांचें व विचारांचें रूप काय काय होतें, कोणत्या कल्पना विशेष प्रचलित होत्या व कोणत्या महाकल्पनेच्या सिद्धीकडे राष्ट्राचें मन वेधलें गेलें होतें, हें या ग्रंथांच्या प्रकाशनापासून समजणार आहे. तेव्हां असले हे ग्रंथ अवश्य प्रसिद्ध झाले पाहिजेत."[१]

अगदीं याच प्रकारें इतिहासाचार्य राजवाडेहि वाङ्मयीन साधनांचें अनन्य-

१. 'महाराष्ट्रकवि', वर्ष १, अंक १, उपोद्घात, पृ. २–३.

साधारण महत्त्व वारंवार विवरून सांगत असत. 'महाराष्ट्रकवी'चें प्रकाशन थांबल्यानंतर साडेपांच वर्षांनीं, त्याचें पुनरुज्जीवन भा. इ. सं. मंडळाकरवीं व्हावें, असा ठराव आला असतां, हरिभाऊ आपट्यांनीं दर्शविलेल्या नापसंतीचें राजवाड्यांनीं अशाच शब्दांत खंडन केलें होतें. लोकवाङ्मयासकट सर्व वाङ्मयीन साधनांचें महत्त्व सांस्कृतिक इतिहासाच्या बांधणींत कसें आहे, हें विशद करणारे भावे यांचें निवेदन मुद्दामच येथें विस्तारानें उद्धृत केलें आहे. पाऊण शतकापूर्वींच व्यापक अध्ययनदृष्टि राखून संशोधन करणाऱ्या, राजवाडे-भावे यांच्यासारख्या मर्मज्ञ पूर्वसूरींचा वारसा आपण अजूनहि आकळूं शकलों नाहीं, याची खंत वाटते. त्या वारशाचें स्वरूप विस्मृत होऊं देऊं नये, यासाठींच विस्ताराचा दोष पत्करूनहि भावे आणि त्यांचे सांगाती यांचे मूळ उद्‌गार सादर केले आहेत.

## 'महाराष्ट्रकवी'च्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न

'महाराष्ट्र-कवी'चें प्रकाशन थांबवावें लागलें, याची खंत भावे आणि त्यांच्या कार्याविषयीं आस्था बाळगणारे त्यांचे कांहीं संशोधक स्नेही यांना सलत होती. या खंतीपोटींच 'महाराष्ट्र-कवी'च्या पुनरुज्जीवनाचा अयशस्वी प्रयत्न झाल्याची नोंद आढळते. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या प्रथम संमेलन-प्रसंगीं ( दि. २ मे १९१३ रोजीं ) धुळ्याचे श्री. शंकररावजी देव यांनीं 'महाराष्ट्र-कवी'च्या पुन:प्रकाशनासंबंधींचा एक ठराव मांडला : "'महाराष्ट्र-कवि' मासिक पुस्तक बंद होऊन साडेपांच वर्षें झालीं. तें आजपर्यंत चालू असतें, तर सुमारें तीन हजार पृष्ठें आतांपर्यंत छापून निघतीं. तितकीं पृष्ठें छापून काढण्याची जबाबदारी रा. विनायकराव भावे आपणांवर घेत आहेत. तीन हजार पृष्ठें भरतील, इतकी चांगली कविता त्यांस मंडळानें पुरवावी व यापुढें 'महाराष्ट्र-कवि' मंडळानें चालवावा." या ठरावावर देवांनीं आवाहनात्मक भाषणहि केलें. ते म्हणाले, "माझा आपणांस असा सवाल आहे कीं, असल्या उत्तमोत्तम ग्रंथसंपत्तीचा लोकांस परिचय करून देण्याची जबाबदारी काव्येतिहाससंग्रहाची लोकांस गोडी लावणाऱ्या मंडळावर खचित येत नाहीं काय ? आपले प्रतिनिधि बाहेर स्वारीवर निघून गाड्यावारी ग्रंथसंपत्ति आणतील, त्यांचा अल्पसा तरी परिचय महाराष्ट्रास करून देण्याची जबाबदारी आपणांवर खचित येते. पुणें हें फार पुढें गेलेलें असें शहर आहे. अशा शहरांतून जर शंभर सभासद २५, १२ अगर ६ रुपये वर्गणी देणारे आपण गोळा केलेत, तर धुळ्याच्यातर्फेहि पांच-पन्नास नवीन सभासद मिळवून देण्याची मी व माझे मित्र रा. चांदोरकर अवश्य खटपट

करूं. रा. भावे हे आपणांवर तीन हजार पृष्ठें छापून काढण्याची जबाबदारी घेत आहेत, ही अत्यंत थोरपणाची गोष्ट आहे. तेव्हां आपण या ठरावास अनुमोदन देऊन आपल्या मंडळाचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढविण्याची खटपट कराल, अशी मला आशा आहे."[१]

श्री. देवांच्या भाषणानंतर भावे यांनीं मासिक बंद पडण्याचीं कारणें स्पष्ट करून म्हटलें कीं, "माझ्याजवळ सध्यां १५०० पृष्ठें होतील इतकी दासोपंतांची व आणखी दुसऱ्या कवींची चरित्रात्मक–काव्यात्मक मिळून कविता आहे व आणखी १५०० पृष्ठांची चांगली कविता मंडळानें मला दिल्यास मी ३००० पृष्ठें एकदम छापून प्रसिद्ध करीन व पुढें मात्र या मासिकाची जबाबदारी मंडळानें आपल्या शिरावर घ्यावी."

मंडळानें मासिकरूपानें कविता छापून काढण्याच्या कल्पनेस श्री. ह. ना. आपटे यांनीं मात्र नापसंती दर्शविली. "मासिक निघण्याची वेळ आली, जवळ पुरेसा चांगला मजकूर नसला, म्हणजे कांहीं तरी मजकूर घालून जागा भरून काढावी लागते,' हें त्यांच्या नापसंतीचें कारण होतें. म्हणून "जी कविता छापावयाची असेल, ती पृथक्पणें खंडशः काढावी व हा मजकूर प्रसिद्ध करण्यापूर्वीं एखाद्या पोटकमिटीपुढें ठेवावा, म्हणजे त्यांतून निवड होऊन चांगला तेवढाच मजकूर प्रसिद्ध होत जाईल," अशी सूचना त्यांनीं केली.

श्री. हरिभाऊ आपटे यांच्या सूचनेंतील सूर ध्यानीं घेऊन इतिहासाचार्य राजवाडे बोलायला उठले आणि त्यांनीं आपल्या मर्मस्पर्शी वाणीनें आपट्यांना जाणवणाऱ्या अडचणींचें निराकरण केलें. मराठी कवींच्या रचनांच्या विस्तीर्णतेची जाणीव देऊन ते म्हणाले कीं, "मी आपणांस असें खात्रीपूर्वक सांगतों कीं, आपण कविता ग्रंथरूपानें प्रसिद्ध करा, मासिकाच्या द्वारानें प्रसिद्ध करा, काव्यांची वाण केव्हांहि पडावयाची नाहीं. याशिवाय निरनिराळीं काव्यें निरनिराळ्या दृष्टीनें पहावयाचीं असतात. कांहींत व्याकरणाचीं जुनीं अशीं रूपें येतात, तर कांहींत तत्कालीन धर्मसमजुती नमूद केलेल्या असतात, तर कांहींत इतर ऐतिहासिक कथा अगर लौकिक कथा ग्रथित केलेल्या असतात. विषयाचें महत्त्व काय आहे, हें न कळल्यानें एखाद्यास कांहीं भाग टाकाऊ व कंटाळवाणा वाटेल, तर तोच दुसऱ्यास मनोरंजक व उपयुक्त वाटेल.

१. भा. इ. सं. मंडळ प्रथम संमेलन वृत्त, शके १८३५, पृ. ७८.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
बि:
नोंद दि: ३१-३-८२

एकंदरींत सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, उत्कृष्ट काव्यांची उणीव केव्हांच पडणार नाहीं. व एखाद्या वेळीं एखाद्यास एखादा भाग कंटाळवाणा वाटला, तरी तो दुसऱ्यास महत्त्वाचा कां वाटतो, हें समजून घेतलें असतां, काव्य कंटाळवाणें आहे, असें वाटून हिरमुसलें होण्याचें कांहीं कारण उरणार नाहीं."

यावर "रा. भावे यांची हरकत नसेल, तर मूळ ठरावांत 'पुस्तकरूपानें' हा शब्द घालण्यास माझी हरकत नाहीं," असें ठराव मांडणाऱ्या देवांनीं सांगितलें. भावे यांची या गोष्टीला हरकत असण्याचें कांहीं कारणच नव्हतें. ते कोणत्याहि उपक्रमाला प्रवृत्त होतांना, त्याचा व्यवहारपक्षहि बारकाईनें पाहत असत. आपला मासिक-प्रकाशनाचा अनुभव, इतर मासिककारांचा अनुभव आणि ग्रंथप्रकाशकांचा अनुभव यांचा एकत्र विचार करूनच त्यांनीं मासिकाच्या पुनरुज्जीवनाजी कल्पना मांडली होती. मंडळास ती गैरसोयीची वाटल्यास, त्यांचा तसा आग्रह नव्हता. "आपणांस तें गैरसोयीचें व नापसंत असल्यास आपण पुस्तकरूपानें कवि प्रसिद्ध करा; माझी त्यास हरकत नाहीं," असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आणि "आपण आपलें काम सुरू केलें व मला १५०० पृष्ठें चांगली कविता दिली, म्हणजे मी माझ्या वांटचाचें शिल्लक राहिलेलें काम तत्काळ प्रसिद्ध करीन," असें नि:संदिग्ध आश्वासनहि त्याच वेळीं दिलें.

यानंतर मूळ ठरावांत 'पुस्तकरूपानें' हा शब्द समाविष्ट करून, तो एकमतानें संमत करण्यात आला.

मंडळानें पुढें शके १८३५ च्या कार्तिकांत प्रथम संमेलनाचें जें वृत्त प्रसिद्ध केलें, त्याच्या मुखपृष्ठामागें नव्या मासिक पुस्तकाची जाहिरात पुढीलप्रमाणें दिली आहे :

**महाराष्ट्रसारस्वत**

(यांत 'महाराष्ट्र-कवी'चा समावेश केला आहे.)

पहिल्या संमेलनांत ठरविल्याप्रमाणें महाराष्ट्र-कवि पुन: सुरू करून मुकुंद, एकनाथ, तुकाराम, मैराळ, संतिदास, कान्हो पाठक, नवरसनारायण, वगैरे अनेक संतकवींच्या अप्रसिद्ध कृतींची जुन्या प्रतींवरून महाराष्ट्रास नव्यानें ओळख करून देण्याचें भारत इतिहास संशोधक मंडळानें योजिलें आहे. महाराष्ट्रांतील भाविक व विद्वान् लोक या भाग्याच्या पर्वणीचा वेळींच वर्गणी-दार होऊन फायदा घेतील व हें कार्य यशस्वी करतील, अशी उमेद आहे. कागद व छपाई उत्तम. मासिक पृष्ठसंख्या ४०. वार्षिक वर्गणी रु. ४, ट. ख. व व्ही. पी.

८७. पहिला अंक मार्गशीर्ष शु. १५, १८३५ ला निघेल.

प्रत्यक्षांत हें मासिक 'महाराष्ट्रीय सारस्वत व महाराष्ट्र-कवि' अशा जोड-नांवानें सुरू झालें आणि मार्गशीर्ष शके१८३५ ते वैशाख शके १८३६ या सहा महिन्यांचे सहा अंक निघून थांबलें. 'महाराष्ट्रकवी'चीं वर्षें आणि तें मासिक बंद पडल्यानंतरचीं वर्षें मिळून दहा वर्षें धरून, या पुनरुज्जीवित मासिकाचें प्रारंभवर्ष अकरावें धरलें होतें. त्याचें मुद्रण धुळयाला आत्माराम छापखान्यांत होत होतें.

कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थपरिमळ आगळा ।
तेणें संतषट्पदकुळा । आनंद होये ।।

या समर्थोक्तींचें ब्रीद शिरोभागीं वागवणाऱ्या या मासिकाच्या सहा अंकांत मुकुंदमुनींचें संस्कृत 'महाभाष्य', दासोपंतांचा 'ग्रंथराज' आणि स्फुट प्रकरणांचे दोन भाग प्रकाशित झाले.

'महाराष्ट्रकवि' चालविण्याचें मंडळानें मान्य केल्यानंतर त्याच्या नांवांत जो वदल केला, तो सकारण होता. "महाराष्ट्रांतील कवींनीं विचार–व–विकार–प्रदर्शन गेल्या हजार वर्षांत मुख्यत: संस्कृत-प्राकृत अशा दोन द्वारांनीं केलेलें आहे, गद्य व पद्य अशाहि दोन्ही तऱ्हांनीं झालेलें आहे. तसेंच अशा सर्व प्रकारच्या सारस्वताचा अंतर्भाव मासिकांत करतां यावा म्हणून 'महाराष्ट्रीय सारस्वत व महाराष्ट्रकवि' अशा दुहेरी नांवानें मासिक सुरू केलें.'[1] मूळच्या 'महाराष्ट्र-कवि' या नांवांत केवळ मराठी भाषेंतील आणि पद्य माध्यमांतील वाङमयाचेंच सूचन घडतें. असें असूनहि भावे यांनीं त्यांतून गद्य पंचतंत्र संपादून प्रकाशित केलें होतेंच. परंतु नांवांतहि मर्यादा राहूं नये, म्हणून 'महाराष्ट्रीय सारस्वत' हें नांव नव्यानें स्वीकारलें गेलेलें दिसतें. या नांवांत महाराष्ट्रीयांनीं निर्माण केलेल्या कोणत्याहि भाषेंतील आणि गद्य वा पद्य अशा कोणत्याहि माध्यमांतील वाङमयाचा समावेश होऊं शकतो. ठरावाशीं विसंवाद येऊं नये, म्हणून या नव्या नांवाच्या जोडीनें मूळ नांवहि सुरक्षित राखलें गेलें.

या पुनरुज्जीवित मासिकांत ग्रंथ-संपादनाचें काम वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक (मुकुंदराजकृत संस्कृत महाभाष्य), श्री. अमृत वापूजी रसाळ, श्री. शंकर श्रीकृष्ण देव, श्री. गो. का. चांदोरकर, श्रीमंत आवासाहेव मुजुमदार, इतिहासाचार्य

१. भा. इ. सं. मंडळ द्वितीय संमेलनवृत्त, शके १८३६, वृत्तविभाग, पृ. १–२.

वि. का. राजवाडे इत्यादि संशोधक-अभ्यासकांनीं केलें. या नव्या मासिकास वर्गणीदार अत्यल्प मिळाल्यामुळें मंडळास पदरखर्च करावा लागला आणि अखेरीस अवघ्या सहा अंकांनंतर (शके १८३५ मध्यें चार व शके १८३६ मध्यें दोन) तें बंद करावें लागलें. भावे यांना पुरवावयाचा १५०० पृष्ठांचा मजकूर श्री. देवांनीं तयार केल्याची आणि 'तो ताब्यांत घेऊन सत्वर प्रसिद्ध करण्याबद्दल' भावे यांना विनंती केल्याची नोंद मंडळाच्या दप्तरीं मिळतें.[1] परंतु ठरावांप्रमाणें मासिक चालू राहिलें नसल्यामुळें भावे यांच्यावरहि तो मजकूर छापण्याचें बंधन उरलें नाहीं, हें उघडच आहे.

'महाराष्ट्रकवी'ची ही कहाणी अनेक दृष्टींनीं उद्बोधक आहे. त्याच्या एकूण ५७ (५१×६) अंकांत जे ग्रंथ प्रकाशित झाले, ते आजहि प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप जाणून घेण्यास नितांत उपयुक्त आहेत. नागेशाचें 'सीतास्वयंवर' आणि सामराजाचें 'रुक्मिणीहरण' असे दोन-तीन अपवाद वगळले, तर या ग्रंथांचें पुनः संपादन करण्याचा प्रयत्नहि झालेला नाहीं. ते सारे ग्रंथ आजहि 'महाराष्ट्रकवीं'-तूनच अभ्यासावे लागतात. तीन हजारांवर पृष्ठसंख्या असलेलें हें प्राचीन वाङ्मय भावे यांच्या प्रयत्नांमुळें सुरक्षित राहिलें आणि अभ्यासकांच्या भावी पिढ्यांना उपलब्ध होऊं शकलें. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अध्ययनक्षेत्रांत आवडीनें वावरणाऱ्या अभ्यासकांचा वर्ग त्यांचें हें कार्य विसरणें अशक्य आहे.

## 'महाराष्ट्र-सारस्वता'ची समृद्धि

भावे यांच्या वाङ्मयप्रेमाचें बीजारोपण लहानपणींच झालें होतें, हें आपण पाहिलेंच आहे. छत्र्यांचा 'बाळमित्र' आणि कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या 'अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' यांच्या वाचनामुळें जरी त्यांना वाचनाची गोडी लागली असली, तरी परशुरामतात्यांचें 'नवनीत' आणि जनार्दन बाळाजी मोडकांसारख्या शिक्षकाचें प्राचीन मराठी कवितेविषयींचें कार्य यांमुळेंच भावे यांच्या ठायी वाङ्मयप्रेमाचा उमाळा उसळला. अर्थात् निसर्गाविषयीं त्यांना वाटणारी सहजात ओढ त्यांच्या वाङ्मयरसिकतेला नितांत पोषक ठरली. कॉलेजच्या वसतिगृहांतील त्यांच्या खोलींत मित्रमंडळ गोळा झालें कीं भावे कधीं श्रीधर–महीपतींच्या ग्रंथांतल्या रसाळ ओव्या वाचून दाखवीत; कधीं मुक्तेश्वराच्या वनपर्वातलीं अरण्याचीं, सूर्योदयाचीं, सूर्यास्ताचीं, रात्रीच्या गडद काळोखाचीं नि पर्जन्यधारांत

१. तत्रैव, पृ. १–२.

न्हाऊन निघणाऱ्या गिरिशिखरांचीं कल्पनारम्य प्रत्ययकारी वर्णनें उत्कटतेनें सादर करीत; तर कधीं आपण या प्राचीन कवींवर लिहिलेले शोधक वा आस्वादक निबंध पुढें ठेवीत.

या प्रारंभींच्या निबंध-टाचणांतूनच 'महाराष्ट्र-सारस्वता'चें लघुरूप सिद्ध झालें. छापील शंभर पृष्ठें भरतील एवढा हा निबंध त्या वेळच्या उपलब्ध साधनांचा मागोवा घेऊन लिहिलेला होता आणि त्यांत मराठी वाङ्मयाचें स्थूल चित्र कालक्रमानें रेखाटलेलें होतें. 'ज्यांस आपल्या भाषेच्या इतिहासाचें केवळ विहंगमदृष्टीनेंच अवलोकन करावयाचें असेल,' त्यांच्या उपयोगासाठीं लिहिलेल्या या निबंधाचें लेखन १८९३-९४ च्या सुमारास म्हणजे ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेच्या सुमारास झालें, असें स्वतः भावे यांनींच लिहून ठेवलें आहे : "याच सुमारास या पुस्तकाची प्रथम आवृत्ति मीं लिहिलीं. पण त्या वेळीं कोणीहि ती छापण्याचें कबूल करीना. मासिक-पुस्तककारांनींहि कांहीं दिवस ठेवून घेऊन माझ्या वह्या परत कराव्या, असें होई. अखेर 'ग्रंथमाले'च्या संपादकांनीं तो लेख छापून प्रसिद्ध केला. 'मालें'त लेख पुरा झाला, त्याच सुमारास माझा कॉलेजांतील शिक्षणक्रमहि पुरा झाला. पण मराठी काव्यें वाचण्याचा व तीं मिळविण्याचा हव्यास मात्र पुरा झाला नाहीं."[1]

'ग्रंथमालें'त हा ग्रंथ मार्च १८९८ ते मे १८९९ असा धारावाहिक स्वरूपांत प्रकटला. या निबंधवजा ग्रंथाच्या प्रकाशनानंतर प्राचीन मराठी कवितेच्या शोधाचा, संपादनाचा, प्रकाशनाचा व अध्ययनाचा क्रम भावे यांनीं वेगानें चालविला आणि त्यांतून मराठी सारस्वताचें चित्र त्यांच्या दृष्टीपुढें अधिक विस्तृत प्रमाणांत नि अधिक सूक्ष्म स्वरूपांत तरळूं लागलें. 'महाराष्ट्रकवी'च्या निमित्तानें कितीतरी जुन्या कवींची विपुल रचना त्यांच्या हातीं आली. या सर्वांचा परिपाक त्यांच्या मनीं मुरत होता; सारस्वताचें भव्य सुंदर चित्र अंतर्दृष्टीपुढें क्रमानें उमलत होतें; परंतु अनेक व्यापांतून लेखनाला स्वस्थता लाभत नव्हती. ही स्वस्थता त्यांनीं एका विचित्र मनःस्थितीत विरंगुळा मिळावा म्हणून घेतली आणि मूळच्या शंभरपानी ग्रंथाचा सहाशें पृष्ठांइतका विस्तार करून त्याला त्यांनीं ग्रंथराजाचें स्वरूप दिलें. 'सारस्वता'ची ही द्वितीय आवृत्ति भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे १९१९ मध्यें प्रकाशित झाली. कोणत्या मनःस्थितींत आपण हें कार्य केलें, त्याचें स्पष्टीकरण

.............................................

१. भावे यांचें 'आत्मकथन'

भावे यांनीं दिलें आहे तें असें : " सुमारें दोन वर्षांपूर्वी ( इ.स. १९१८ ) माझा वडील पुत्र अनंत हा मृत्यु पावला व नंतर थोडेच दिवसांत ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेंतल्या कांहीं प्रकारामुळें त्या संस्थेचा संबंध तोडणें अवश्य झालें. प्रेमानें वाढवलेला मुलगा सोडून गेल्यामुळें व हौशीनें पुत्रवत् वाढवलेल्या संस्थेचा संबंध सोडणें अवश्य वाटल्यामुळें चित्ताला अस्थिरता वाटली आणि आयुष्यभर ज्या मराठी कवींच्या कृतींमुळें व ज्या पशुपक्ष्यादिकांच्या सहवासामुळें काळ आनंदाचा गेला, त्यांपकीं एकाची-- म्हणजे मराठी कवींची व त्यांच्या कृतींची-- यथामति व यथाशक्ति थोडीशी सेवाचाकरी करण्याच्या उद्देशानें या ग्रंथाची ही द्वितीय आवृत्ति तयार केली· आयुष्य, बळ व उत्साह राहिल्यास दुसऱ्याचीहि अशीच सेवा कदाचित् माझे हातून घडावी, अशी वासना आहे. " [१]

द्वितीय आवृत्ति प्रकाशित झाल्यानंतरहि त्यांचा प्राचीन मराठी कवितेचा व्यासंग सुटला नाहीं. त्यांचा स्वत:चा व्यासंग आणि त्यांच्या संशोधक सहप्रवाशांनीं मांडलेला व्यासंग यांच्या आधारें तृतीय परिवर्धित आवृत्तीचीहि सिद्धता त्यांनीं चालविली होती. या आवृत्तीसाठीं 'महाराष्ट्रभाषासरस्वतीच्या महालांतील एक अज्ञात दालन' त्यांना गवसलें होतें. महानुभाव महंतांचें सहकार्य त्यांना लाभलें होतें आणि त्यामुळें महानुभावीय मराठी वाङमयाचें मूल्यवान् भांडागार खुलें झालें होतें. १९२३ मध्यें म. दत्तलक्षराज आणि म. गोपीराज हे दोन मातवर महानुभाव महंत भावे यांच्या घरीं शेकडो पोथ्या बरोबर घेऊन आले आणि सात महिने त्यांच्या घरीं राहून त्यांनीं भावे यांना या भांडागारांतील रत्नें लुटण्यासाठीं सर्व 'किल्ल्या' दिल्या. सांकेतिक लिप्यांत बद्ध असलेलें हें वाङमय खुलें झालें. मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं 'महाराष्ट्रभाषासरस्वतीच्या महालांतील एक अज्ञात दालन' याच शीर्षकानें भावे यांनीं या अज्ञात वाङमयाचा शोध प्रकट केला आणि 'सारस्वता'च्या तृतीयावृत्तींत त्याचा विस्तृत रसाळ परिचय घडविला. तिसऱ्या आवृत्तीचा विस्तार फार वाढतो आहे, असें दिसतांच त्यांनीं ती दोन खंडांत काढण्याचें योजिलें. पैकीं पहिला खंड १९२४ मध्यें निघाला आणि दुसऱ्या खंडाच्या प्रकाशनापूर्वींच भावे यांचा अंत झाला. पुढें दुसरा खंड द्वितीयावृत्तीवरून त्यांच्या चिरंजिवांनीं पुनर्मुद्रित केला.

---

१. तत्रैव.

'महाराष्ट्र-सारस्वत' हा परिवर्धित स्वरूपांतील ग्रंथराज म्हणजे भावे यांच्या अध्ययनशीलतेचें, मराठीप्रेमाचें, रसिकतेचें आणि नितांतरम्य भाषाप्रभुत्वाचें परिणत स्वरूप आहे. "अजून शे-दीडशे उन्हाळे उलटले नाहींत, त्या वेळीं म्हणजे तुमचे-आमचे आजे-पणजे स्वतंत्रतेच्या वातावरणांत समाधानानें वावरत होते, त्या वेळीं साऱ्या हिंदुस्थानभर जी भाषा बोलण्याविषयीं कित्येक थोर पुरुष यत्न करीत, दूरदूरचे राजे रजवाडे ज्या भाषेंतले विद्वान् सन्मानानें आपल्या पदरीं बाळगीत व ज्या भाषेमध्यें पुण्यास लिहिलेले हुकूम दिल्ली, पंजाब, कलकत्ता, कर्नाटक, मद्रास वगैरे प्रांतांत मोठ्या आदबीनें वाचले व पाळले जात, हें थोर भाग्य भारतखंडांतल्या छपन्न भाषांपैकीं ज्या एकीला व फक्त एकटीलाच लाभलें,"[१] त्या मराठी भाषेचें संकीर्तन करतांना भावे यांची रसवंती सागराकडे झेपावणाऱ्या संगमोत्सुक सरितेप्रमाणें वेगतरंगवती होऊन या ग्रंथांत वाहते आहे. विनय आणि आत्मविश्वास यांचें अद्भुत रसायन त्यांच्या भाषेंत उतरलें आहे. त्यांच्या भाषाकुमुदिनीला व्यासंगाचा नयनमनोहर रंग आहे आणि रसिकतेचा मनोवेधक गंध आहे. तिच्या दळादळावर एक रसरशीत प्रसन्नता विलसते आहे.

आपण या ग्रंथांत मराठी रसिक वाचकांना कोणत्या दृश्यांचें दर्शन घडविणार आहों, हें सांगतांना भावे यांच्या वाणीनें कसें कमनीय रूप धारण केलें आहे तें पहा : "या आपल्या सरस्वतीचा उगम कोठें झाला व पुढें ही वाक्तरंगिणी स्वराज्याच्या सीमेपर्यंत कशी कशी वाहत गेली, याचें किंचिन्मात्र दिग्दर्शन करण्याचा यांत यत्न करूं. तुमचे बरोबर येऊन या ज्ञानगंगेच्या कांठचीं देवळें आणि मठ आम्ही दाखवून देऊं. वाटेवरच असतील, त्यांचें दर्शन घडवूं व जरा पलीकडे असतील, त्यांच्या कळसांना व गोपुरांनाच दुरून नमस्कार करूं. पण एखाद्या देवळाचे आंत जाऊन बसून तेथल्या अपूर्व नक्षीकामाची शोभा व कुसरीचा थाट कोणास नीट पाहावयाचा असेल, तर तो ज्याचा त्यानेंच सवडीनुसार पाहिला पाहिजे. यात्रेंत इतका वेळ सांपडणार नाहीं. तेथले देखावे मात्र दुरून दाखवून देऊं. तसेंच ही वाट चालत असतां आजूबाजूंनीं उगवलेल्या हिरव्यागार शेवाळी आणि लहानमोठे लव्हाळ्यांचे पुंजकेहि तुम्हांला जरा जरा दिसतील. त्यांतच या मंदाकिनीच्या कांठच्या राजहंसांचीं घरटींहि थोडीफार आम्ही दाखवूं; आणि या नदीच्या जलौघांत कोण

१. महाराष्ट्र भाषासरस्वतीच्या महालांतील एक अज्ञात दालन, पृ. १.

कोण सुस्नात झाले व कोणीं कोठें विहार केले, याचाहि थोडासा पत्ता आम्ही लावून देऊं. वाटेंत कोठें कोठें या ज्ञानरसतरंगिणीचे पाट फोडून त्यानें ओलावलेल्या जमिनींत कल्पनांच्या फुलांनीं फुललेल्या आणि प्रमेयांच्या घोसांनीं लहडलेल्या काव्यलतांचे सुंदर ताटवे केलेले आढळतील, त्यांतून कांहीं कळचाहि तुम्हांस खुडून देऊं. तृषा उत्पन्न झाल्यास ती भागविण्याकरितां थोडेंसें आचमनहि करवूं. फार तर शब्द-पल्लवांच्या द्रोणांत या दिव्य गंगेचें थोडेंसें पाणीहि क्वचित् प्रसंगीं आणून देऊं. पण यापलीकडे येथें कांहीं नाहीं. "[१]

भावे यांनीं हें जें दाखविलें आहे, तें काय थोडें आहे? मराठी वाङमयाचे रसिक अभ्यासक गेलीं पांच दशकें या 'सारस्वता'च्या मंदाकिनींत मनसोक्त मज्जन करीत करीत राहिले आहेत, इतका तिचा मोह अनावर आहे. या वाक्तरंगिणीकांठच्या यात्रेंत भावे यांनीं जें 'दिग्दर्शन' केलें आहे, त्या बाबतींत कांहीं यात्रिक केव्हां तरी नाराज झाले, तरी त्यामुळें या सौंदर्यवेधी वाटाड्याचें महत्त्व उणावत नाहीं. त्या वेळीं त्यांना उपलब्ध झालेलीं साधनें, त्या साधनांचें स्वरूप आकळण्याची पद्धति, त्या काळची संशोधनक्षेत्रांतली राष्ट्रवादी प्रवृत्तिपर दृष्टि– या सर्व बाबींचा विचार करतां आपल्याला आज चुकीचें वाटणारें दिग्दर्शन आपण फार तर आपल्या नव्या जाणतेपणानें दुरुस्त करून घ्यावें, परंतु या वाटाड्याचें ऋण विसरूं नये. ज्याच्या तीन तपांच्या तपश्चर्येमुळें आपली सारस्वतयात्रा आजहि सहज आणि सुखावह होऊं शकते, त्याच्या ऋणाचा अव्हेर करणें हें आपल्या चारित्र्याला बाधक नि प्रगतीला रोधक ठरणारें आहे.

भावे यांना कलुषित दृष्टीच्या निंदकांची जाणीव नव्हती, असें नाहीं. अशा निंदकांची दखल त्यांनीं आवर्जून घेतली आहे. आपल्या रूपकशैलींत त्यांनीं म्हटलें आहे कीं,[२] " देव दगडाचे खरे, तरी त्यांचीं देवालयें सर्वांना पूज्य असतात; पण कावळे त्यांच्या कळसांवर विष्ठेनें घाण करितात, म्हणून कळसांना कोणी कांटे बांधले आहेत काय ? पण कावळ्यांनीं आपली खोड टाकावी, अशी इच्छा करणें, यांत कांहीं वावगें नाहीं. बाकी कावळे थोडेच मानणार ! त्यांना देवळांचे कळस तेथें बसून यथेच्छ मळमूत्र करण्यास आयते मिळतात. तद्वतच हा माझे बोलांचा मळा टीकाकारांच्या

१. महाराष्ट्र-सारस्वत, द्वितीय आवृत्ति, प्रस्तावना.
२. महाराष्ट्र-सारस्वत, तृतीय आवृत्ति, प्रस्तावना.

नजरेसमोर आल्यावर त्यांस भाषाप्रभुत्वाचें प्रदर्शन करण्यास आणि खेळ खेळण्यास पुष्कळच उपयोगी पडेल, यांत संशय नाहीं. असें झालें, तरी त्यांत आनंदच आहे. कारण तितका तरी मी त्यांचे उपयोगीं पडलों असें होईल. "

भावे यांचे हे उद्गार त्यांच्या आत्मविश्वासाचे द्योतक आहेत. आणि खरोखरीच कुणाचीहि 'काकदृष्टि' आणि 'काकसृष्टि' तुच्छ लेखून त्यांच्या 'सारस्वता 'चा कीर्तिकलश मराठीच्या गगनांत उत्तुंगतेनें झळाळत राहील, यांत यत्किंचितहि संशय नाहीं.

## राष्ट्रीय अस्मितेचा ज्वलन्त उद्रेक

वाङमय-संशोधनाइतकेंच इतिहास-संशोधनाचेंहि वेड भावे यांना लागलें होतें. यामागची त्यांची प्रेरणा सर्वस्वीं राष्ट्रीय अस्मितेच्या उत्थापनाची होती मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाविषयीं त्यांना नितांत अभिमान वाटत असे. आणि मराठ्यांच्या पतनाची कहाणी त्यांना बोचत राहत असे. पारतंत्र्याची त्यांना मनस्वी चीड होती. इंग्रजांनीं हेतुत: केलेली आपल्या इतिहासाची विटंबना पाहून त्यांचा संताप अनावर होत असे. राष्ट्राचा तेजोभंग करणारें हें इंग्रज-पुरस्कृत इतिहासलेखन पुसून टाकावयाचें असेल, तर आमचीं इतिहाससाधनें आम्हीं परिश्रमपूर्वक धांडोळलीं पाहिजेत, आमच्या दृष्टीनें अभ्यासलीं पाहिजेत आणि मग राष्ट्रीय इतिहासाची रचना केली पाहिजे, असें त्यांना वाटत असे. त्यांची या बाबतींतली दृष्टि राजवाड्यांच्या दृष्टीशीं सर्वस्वीं संवादी होती. अर्थात् आपल्याला ज्या राष्ट्राशीं मुकाबला करून पुन: स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचें आहे, त्याच्या बलस्थानांचेंहि त्यांना पूरेपूर भान होतें. शत्रूचीं सारीं बलस्थानें हेरून आणि त्याच्यावर मात करून पूर्व-वैभव प्राप्त करण्यासाठीं आवश्यक असणार सामर्थ्य महाराष्ट्र प्रगट करूं शकेल, असा त्यांना महाराष्ट्राच्या इतिहासपरंपरेवरून विश्वास वाटत असे. इतिहास-चिंतनाचा राष्ट्रीय अस्मितेच्या जागृतीशीं कसा संबंध आहे, हें त्यांनीं आपल्या प्रभावी वाणीनें देशबांधवांना सांगितलें आहे. ते म्हणतात .

" ज्या राष्ट्रांशीं चढाओढ करावयाची आहे व ज्यांचे पंक्तीला जाऊन बसावयाचें आहे, त्या राष्ट्रांच्या बरोबरीनें सर्व बाजूंनीं आपली संस्कृति वाढविली पाहिजे. शास्त्रें, साहित्य, इतिहास, काव्य, कला, नवीन शोध, शरीरजोपासना, सुप्रजाजनन, वगैरे झाडून सर्व बाबींत अनेक व्यवसाय चालू ठेवून, नित्यश: सुधारणा करून, आपण

कोणत्याहि प्रकारें कमी नाहीं, असें सिद्ध केलें पाहिजे. यांपैकीं कोणतीहि एक बाब स्वराज्य देणार नाहीं, पण या व अशा इतर लहानसहान बाबी मेहनतीनें सिद्ध केल्या म्हणजे, त्या सर्वांच्या एकवटीनें स्वराज्याची सिद्धि निःसंशय होईल. आणि या अनेक बाबींपैकींच इतिहासाचें संशोधन, प्रकाशन व चिंतन ही एक होय. हिंदुस्थानांतल्या इतर कोणत्याहि प्रांताला न साधणारी ही इतिहासाची बाब महाराष्ट्राला आयतीच साधली आहे. या बाबीचा–इतिहासाचा– नीट अभ्यास केला असतां पारतंत्र्याच्या खोल दरींतून स्वातंत्र्याच्या पर्वतशिखरावर जाण्याचा मार्ग डोळ्यांना नीट दिसूं लागेल. हिच्या योगानें, या स्वातंत्र्यपर्वतावरील वाट चालतांना काय पाथेय बरोबर घेतलें पाहिजे, या प्रवासाला किती तयारी केली पाहिजे, कोणता सरंजाम बाळगला पाहिजे, शरीराला किती कष्ट घडविले पाहिजेत, हें नीट कळेल. अहंममता, जात्यभिमान, वृथाद्वेष हे धोंडे कंबरेला बांधून या वाटेवरील नदीनाले ओलांडणें अशक्य आहे, व हे सर्व दूर फेकून दिले पाहिजेत. शांततेच्या सुखाला लांचावलेल्या आयदी मनाला टोचून टोचून अनेक त्रास, अनेक कष्ट व अनेक संकटें सोसण्यास तयार करून मार्गक्षम केलें पाहिजे, हें चांगलें ध्यानांत येईल. अशी ही इतिहासाची दिव्य बाब आहे."[१]

अशा पुरुषार्थी प्रेरणांनीं भावे झपाटलेले होते. त्यांनीं स्वतः जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विजिगीषु वृत्तीनें अनेक विक्रम केले असल्यामुळें आपल्या बांधवांना उपदेश करण्याचा, त्यांच्या सुप्त आत्मशक्तीला हाक देण्याचा भावे यांना अधिकार होता. इतिहास हा त्यांच्या लेखीं विपरीत वर्तमानाचा विसर पाडणारा विरंगुळा नव्हता, तर वर्तमानाच्या विपत्तींवर मात करून उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठीं बल देणारा स्फूर्तीचा झरा होता. 'इतिहासाची दिव्य बाब' काय करूं शकते, हें स्पष्ट करतांना त्यांनीं म्हटलें आहे कीं, " हिच्या योगें, पूर्वीं ज्या चुका घडल्या असतील त्या टाळणें, जुन्या अनुभवसिद्ध ज्ञानापासून नवे मार्ग शोधून काढणें व मुलांमुलींच्या मनांत स्वाभिमान, स्वदेशप्रीति, संकटपरंपरा सहन करून अखेर सिद्धि मिळविण्याची उमेद ही जागृत करणें सोपें होईल. इतिहासाच्या योगें त्यांच्या दृष्टीला नवीन किरण दिसूं लागतील. महाराष्ट्रांतले डोंगर आणि नद्या, मैदानें आणि किल्ले त्यांच्याशीं बोलूं लागतील. आणि या अचेतन सृष्टीची भाषा त्यांच्यांत चैतन्य खेळवील, व परलोकांत गेलेले पूर्वज त्यांच्याशीं पुन्हा पुन्हा संभाषण करूं लागतील. चित्त उदास झालें असतां

१. मराठी दफ्तर, रुमाल दुसरा, प्रास्ताविक, पृ. २.

त्यांचे पूर्वज तें उल्हसित करतील. मन हताश झालें, तर ते त्यास धीर देतील आणि कार्यविन्मुख होऊन चिंताग्रस्त झालेल्यांना कार्यक्षम करून त्यांच्यांत पुन्हा नवी तरतरी आणतील, यांत संशय नाहीं. ही जादू, ही जागृतीची करामत महाराष्ट्राच्या इतिहासांत पूर्णपणें भरलेली आहे." [1]

इतिहासाचें हें प्रेरणादायित्व स्वीकारण्यालाहि एक पात्रता लागते; त्या प्रेरणास्रोताला सामोरें जाण्याची सिद्धता लागते. करंटा समाज नेहमीं सत्त्वाला गमावून बसतो आणि परक्यांनीं विटंबिलेला इतिहास लाचारीनें स्वीकारतो. हें सामाजिक करंटेपण राष्ट्रीय जीवनयात्रेला किती घातक आहे, याचा इशारा भावे यांनीं भावनोद्दीपक शब्दांत दिला आहे : "या इतिहासरसायनाचा हा चैतन्यगुण घालवून त्याचा निःसत्त्व, निर्जीव, शिथिल, निर्विकार व वेचव चोथा वनविण्याकरितां परकीयांनीं जे श्रम घेतले व जें द्रव्य खर्च केलें, त्याचे शतांश श्रम व द्रव्य आपण खर्ची घातलें, तर निःसंशय शक्तिवर्धक व स्वातंत्र्यदायक असें सुंदर ऐतिहासिक रसायन आपण निर्माण करूं शकूं. पण आपण कांही एक न करतां इतरांनीं वनविलेलीं औषधेंच ऐदीपणानें पोटांत कोंबूं लागलों व इतरांनीं घातलेल्या वाङमयाच्या पाणपोईचें मिळेल तसें गढूळ व मचूळ पाणी पिऊन मिटक्या मारीत वसलों, तर आपली राष्ट्रीय जीवनयात्रा आपण लौकरच संपवूं, यांत संशय नाहीं."

## मराठी दफ्तर संस्थेची स्थापना

'हें असें न व्हावें व महाराष्ट्रीयांना त्यांची स्वतःची जाणीव नीट व्हावी,' या हेतूनें भावे यांनीं ठाणें येथें शके १८३९ (इ. स. १९१७) मध्यें 'मराठी दफ्तर' या नांवाची संस्था स्थापन केली होती. इतिहाससंशोधकांच्या परिश्रमांनीं उपलब्ध झालेले ऐतिहासिक कागदपत्र निवडून यथामूल स्वरूपांत छापून प्रसिद्ध करणें, हें या संस्थेचें उद्दिष्ट होतें. [2] 'ऐतिहासिक कागदपत्र म्हणजे राजकीय उलाढालींसंबंधींचा, लढायांचा, तहनाम्यांचा वगैरे ज्यांत मजकूर आहे, असे कागदपत्र.'

संस्थेचे घटक सभासद आणि वर्गणीदार अशा दोन प्रकारचे असणार होते. एक हजार किंवा त्याहून जास्त रक्कम एकदम देणारे ते सभासद आणि प्रतिवर्षी दहा रुपये अथवा त्याहून अधिक रक्कम देणारे ते वर्गणीदार. प्रतिवर्षी पांचश पृष्ठें भरतील एवढी ऐतिहासिक सामग्री प्रकाशित करण्याचा संकल्प होता. स्वतः भावे

१. तत्रैव, प्रास्ताविक, पृ. २.
२. मराठी दफ्तर, रुमाल पहिला, प्रास्ताविक, पृ. ३.

यांनीं या संस्थेसाठीं दहा हजार रुपय घालायचें ठरविलें होतें. सरदार मुजुमदार, श्री. स. म. दिवेकर, श्री. विनायक हरि डोंगरे आणि श्री. ना. गो. चापेकर यांचीं देणग्यांचीं आश्वासनेंहि मिळालीं होतीं. इतर अनेकांचीं आश्वासन लाभलेलीं होतीं. 'त्यांपैकीं कांहींनीं बिलकुल विलंब न लावतां मोठ्या हौशीनें मदत दिल्यामुळें' भावे यांनीं पहिल्याच वर्षीं ( श. १८३९ ) 'श्रीमंत महाराज भोसले यांची बखर' आपल्या नवसंस्थापित संस्थेच्या 'मराठी दफ्तर' मालेंतील 'पहिला रुमाल' म्हणून प्रसिद्ध केली.

परंतु अनेकांनीं आपलीं आश्वासनें पूर्ण न केल्यामुळें 'मराठी दफ्तर' ही संस्था बुडाली. भावे यांच्या भावनाशील मनाला याचा अत्यंत खेद वाटला. इतक्या हौसेनें काढलेली संस्था महाराष्ट्रांत चालू नये किंवा ती आपल्याला चालवितां येऊं नये, हें केवळ दुर्दैव आहे, असें त्यांना वाटलें. आपला विषाद व्यक्त करतांना भावे यांनीं महाराष्ट्रांतील अशा सर्वच प्रयत्नांच्या दुरवस्थेचें भेसूर चित्र रेखाटलें आहे. ते म्हणतात :

"आपल्या पूर्वजांचे पराक्रम ऐकण्याची हौस महाराष्ट्राला थोडीफार आहे. पण त्यासाठीं कांहीं द्रव्य खर्चावें व पदराला चट्टा लावून घ्यावा, ही इच्छा महाराष्ट्राची दिसत नाहीं. 'इतिहास–ऐतिहासिका'सारख्या मासिकाला पुरे दोनशें वर्गणीदारहि मिळूं नयेत, 'रामदास–रामदासी' तोटा खाऊन चालविणें भाग पडावें, 'ऐतिहासिक लेखसंग्रहा'च्या संपादकाला माराकुटीनें तोंड मिळवणी करतां यावी व स्वतःच्या उदरनिर्वाहासाठीं नाटकें लिहिण्याची पाळी यावी, या गोष्टी शरमेच्या आहेत. चांगला जुना ऐतिहासिक महत्त्वाचा लेख किंवा एखादें काव्य प्रसिद्ध करण्याचें एकहि साधन महाराष्ट्रांत नसावें, ही गोष्ट खचित कमीपणा आणणारी आहे. . . तुकारामासारख्या सर्वमान्य कवीची जुन्यांत जुनी संहिता मिळवून छापली असतां तिच्या शंभर प्रतीहि संपूं नयेत; इतकेंच नव्हे तर शहाण्या म्हणविणाऱ्या ज्ञात्यांनाहि तिचें महत्त्व कळूं नये, हें काय जाणतेपणाचें लक्षण ? "

एवढा विषाद व्यक्त करूनहि भावे यांनीं आपलें काम थांबविलें नाहीं. संस्था बंद पडल्यावरहि त्यांनीं मराठी दफ्तराचें आणखी दोन रुमाल सिद्ध केले. त्यांपैकीं दुसऱ्या रुमालांत चार दीर्घ साधनें समाविष्ट आहेत आणि तिसऱ्या रुमालांत कांहीं शिवकालीन व कांहीं अलीबहादराचीं पत्रें समाविष्ट आहेत. तिसरा रुमाल भावे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चिरंजीवांनीं प्रकाशित केला. दुसऱ्या रुमालाला भावे यांनीं

विवेचक प्रस्तावना लिहिली असून, तींत मराठेशाहीच्या अखेरीची मीमांसा केली आहे. बाजीराव रघुनाथाला न्याय देणारी भावे यांची ही मीमांसा त्यांच्या समकालीनांना फारशी रुचलेली दिसत नाहीं. परंतु आज तशा प्रकारच्या मीमांसेला आधार करून एक ऐतिहासिक कादंबरीहि रचली गेली आहे. तिसऱ्या रुमालाच्या प्रारंभीं भावे यांनीं तयार केलेली शिवकालीन शकावली आहे. या शकावलीच्या प्रयत्नावरून भावे शिवचरित्राच्या बाबतींत किती साक्षेपानें प्रयत्न करीत होते, याची कल्पना येते.

### शिवचरित्रविषयक लेखन

शिवचरित्र हा विद्यार्थिदशेपासून त्यांच्या चिंतनाचा विषय बनला होता. त्यांनीं पूर्ववयांत लिहून ठेवलेल्या शिवचरित्राचें एक हस्तलिखित त्यांच्या मित्रांनीं पाहिलेलें होतें. शिवाजीमहाराजांचें प्रमाणभूत साधार चरित्र लिहावें, अशी त्यांची इच्छा होती आणि त्या दृष्टीनें ते प्रयत्नशीलहि होते. ते स्वत: साधनें गोळा करीत होते आणि उपयुक्त साधनें इतरांना उपलब्ध झाल्याचें कळतांच मागवून घेत होते. सर जदुनाथ सरकार यांचा भावे यांना या बाबतींत एकसारखा आग्रह चालू होता. सरकारांचें भावे यांना आलेलें पुढील पत्र या दृष्टीनें बोलकें आहे :

**Senate House,**
**CALCUTTA**
14 Aug. 1926

*Dear Vinayak Rao,*

I am happy to receive your letter of congratulation and happier still to learn that you are keeping good health. We have long expecting you to give a permanent form to your historical researches and opinions by printing a volume. Time flies. 'काल: क्रीडति गच्छ ति आप: ।' Don't delay any longer.

Wishing you many more years of life and health.

Yours truly
*J. Sarkar*

प्रस्तुत संग्रहांत इतिहास विभागांत समाविष्ट केलेल्या लेखांपैकीं बहुतेक लेख

श्रीशिवाजीमहाराजांसंबंधीं आहेत. विशेषत: अफजलखानाचा वध आणि शाहिस्ते-खानाचा फजीतवाडा हे दोन प्रसंग शिवचरित्रांत विलक्षण महत्त्वाचे असल्यामुळें त्या प्रसंगांतले सर्व बारकावे हेरणारे आणि शिवप्रभूंच्या मुत्सद्देगिरीच्या, चातुर्याच्या आणि विक्रमाच्या दृष्टीनें त्यांची वेधक मांडणी करणारे आहेत.

शिवाजी हें भावे यांचें दैवत होतें. देवाला सहजीं न मानणारा हा रसिक चिकित्सक शिवप्रभूंना शिरोधार्य मानतो; त्यांच्या विक्रमाचे पोवाडे अभिमानानें गातो; त्यांच्या संस्पर्शानें पुनीत झालेल्या वास्तूवस्तूंच्या दर्शनानें पुलकित होतो आणि त्यांच्या अनन्यसाधारण जीवनगाथेचें चिंतन करतां करतां स्वत:चें सर्वस्व विसरतो. शिवाजीमहाराजांचे समकालीन विरोधक आणि आजच्या काळांतील निंदक हे दोघेहि भावे यांच्या जळजळीत संतापाचे विषय ठरतात. शिवाजीमहाराज आणि त्यांचा स्वराज्यसंकल्प यांच्या नाशाला प्रवृत्त होणाऱ्या अथवा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें त्यांच्या शत्रूला सहाय्य करणाऱ्या स्वकीयांना त्यांनीं 'हरामखोर' म्हणून फटकारलें आहे. अफजलखानवधाच्या प्रकरणीं शिवाजीमहाराजांना दगलबाज ठरविणारांचा समाचार घेतांना तर भावे यांच्या लेखणीला भवानीची धार आलेली आहे.

इतिहास विभागाच्या अखेरीस जे दोन अप्रकाशित लेख मराठी वाचकांपुढें प्रथमच येत आहेत, ते पूर्ण उपलब्ध झाले असते, तर मराठ्यांच्या समग्र इतिहासासंबंधींचें भावे यांचें धावतें विवेचन अनुभवायला मिळालें असतें आणि त्या इतिहासाच्या अंत:प्रवाहाची त्यांनीं केलेली मीमांसा सामग्र्यानें पण संक्षेपानें हातीं आली असती. आहे एवढ्या भागांतहि त्यांच्या विचारपद्धतीची झलक पहायला मिळते. शिवप्रभूंच्या नंतर थोरल्या बाजीरावावर त्यांची विशेष भक्ति दिसते. 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मिळमिळीत अवघेंचि टाकावें ।' हा समर्थांचा संदेश भावे यांच्या प्रकृतींतच वास करीत असल्यामुळें जेथें विक्रमाचा उत्कर्ष दिसतो, तेथें त्यांचें चित्त रमतें, वाणी उमलते आणि ते मुक्तकंठानें गौरवगायनाला प्रवृत्त होतात. याउलट जेथें त्यांना करंटेपणाचा आढळ होतो, तेथें ते लेखणीची समशेर बनवून सपासप वार करूं लागतात.

चिकित्सकता आणि भावनाशीलता यांचा असा विचित्र संगम त्यांच्या स्वभावांत, वर्तनांत आणि लेखनांत सर्वत्र दिसून येतो.

## 'चक्रवर्ती नेपोलियन' आणि इतर

भावे यांच्या ग्रंथसंभारांत 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या खालोखाल त्यांच्या 'चक्रवर्ती नेपोलियन' या चरित्रग्रंथाचें महत्त्व आहे. मराठींतील चरित्रवाङ्मयाच्या

इतिहासांत एक उत्तम चरित्रग्रंथ म्हणून त्याची गणना करायला हवी, इतकें तें चांगलें उतरलें आहे. अस्सल मराठी वळणाच्या बखरीवजा भाषेंत लिहिलेल्या या चरित्रांत नेपोलियनचें व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व यांचा आलेख उठावदारपणानें रेखाटला आहे. नेपोलियनच्या समकालीनांच्या रोजनिशा आणि शोधपूर्वक लिहिलेले इंग्रजी चरित्रग्रंथ अभ्यासून त्यांतील सामग्रीची मांडणी अशा निवडक दृष्टीनें भावे यांनीं केली आहे कीं, चरित्राची एकात्मता ढळूं न देतां त्यांनीं तें वेल्हाळ बनविलें आहे.

जें हातीं घ्यावें, तें नेटकेपणानें तडीस न्यावें, हा भावे यांचा स्वभाव मोठ्या ग्रंथांतच नव्हे, तर 'फलज्योतिषा'सारख्या छोट्या निबंधाच्या मांडणींतहि दिसतो. या पुस्तिकेंत त्यांनीं फलज्योतिषविद्येचा उगम, त्याचीं जगभरचीं रूपें, त्याच्या प्रामाण्याचा प्रश्न आणि स्वतःच्या चिकित्सक निरीक्षणांतून जाणवलेलें त्याचें स्वरूप यांचा धावता परामर्श घेतला आहे.

या पुस्तिकेच्या उपसंहारांत त्यांनीं व्यक्त केलेले विचार त्यांच्या चिंतनाच्या भरारीची कल्पना देणारे आहेत : "आकाशांतील इतर ग्रह व आपण कोणत्या तरी रज्जूनें बद्ध आहों, हें पाहून केवढें कौतुक वाटतें ! ते आपले संबंधी आहेत, ते गोल व आपण एकाच कुटुंबांतले आहों व एकमेकांचा प्रत्यक्ष शरीरसंबंध आहे, हें पाहून केवढा अभिमान वाटतो ! तो सर्व विश्वाचा निर्माणकर्ता ब्रह्मांडनायक, ज्यानें एवढे प्रचंड गोल निर्माण केले व ज्यानें त्यांना क्रोडो वर्षें गरगरा फिरवीत ठेवलें, तो आपल्याला विसरला नाही. त्याचे 'केले' असे ते गोल व त्याचे 'केले' असे आपण मानवकोटींतील क्षुद्र कीटक, हे सर्व एक गोताचे व हीं सर्व एकाचींच लेकरें, हें मनांत येऊन मन प्रेमानें, आनंदानें व आदरानें भरून जातें व त्याच्या चरणीं लीन होतें. आणि ज्यानें आपणांस निर्माण केलें किंवा ज्याच्यापासून या सर्व विश्वासह आपण निर्माण झालों व आज अनंत वर्षें ज्याचा व आपला संबंध नियमितपणानें चालू आहे, त्याच्याच स्वरूपामध्यें आणि त्याच्याच तेजामध्यें कालांतरानें तरी आपण मिळून जाऊं व एकरूप होऊं, अशी भावना दृढ होते."[१]

परमार्थाविषयीं अनास्था बाळगणारे आणि अनेकदा परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंकता व्यक्त करणारे भावे इथें भाविकाच्या भावुकतेनें भारल्यासारखे वाटतात. त्यांच्या चिंतनाच्या प्रांजळपणाची यावरून स्पष्ट कल्पना येऊं शकते.

१. फलज्योतिष, पृ. २९.

## सारस्वतकारांचे सांगाती

भावे हे राजवाडे युगाचे एक प्रतिनिधि-संशोधक होते. त्यांच्या काळांतल्या बहुतेक प्रसिद्ध संशोधकांशीं त्यांचा स्नेहसंबंध होता; वैचारिक देवाणघेवाण चालू होती. राजवाडे त्यांच्या घरीं नेहमीं येत-रहात असत. ज्या फारच थोडचा लोकांशीं राजवाड यांचा अकृत्रिम स्नेहसंबंध टिकून राहिला, त्यांत भावे अग्रणी होते. आपल्याला परिचित असलेलीं राजवाडचांचीं बहुतेक छायाचित्रें भावे यांच्याबरोबरच काढलेलीं आहेत. राजवाडे इंग्रजींत लिहीत नसत. परंतु भावे यांना आलेलें त्यांचें एक इंग्रजी पत्र उपलब्ध आहे. त्याचें छायाचित्र मुद्दाम या पुस्तकांत छापलें आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाची गोडी महाराष्ट्राला लावणारे दुसरे रसाळ शैलीचे वाङ्मयेतिहासकार ह भ. प. ल. रा. पांगारकर हेहि भावे यांच्या घरचा पाहुणचार घेत असत. वास्तविक दोघांची प्रकृति अगदीं भिन्न. एक चिकित्सक वृत्तीचे रसिक, तर दुसरे भाविक भक्त. भावे पांगारकरांना खिजविण्यासाठीं पारमार्थिकांची भरपूर थट्टा करीत असत आणि पांगारकर अस्वस्थ होत असत. एकदां ही थट्टा असह्य होऊन पांगारकरांनीं भावे यांचें घर सोडलें. परंतु भावे यांनीं मात्र पांगारकरांना दुरावूं दिलें नाहीं. एकदां महाबळेश्वरयात्रेहून परत येतांना भावे पुण्यास पांगारकरांकडे गेले आणि त्यांच्याकडे त्यांनीं हक्कानें चहा मागितला. पांगारकर चिडलेलेच होते. त्यांनीं रागानेंच म्हटलें, " विनायकराव, चहा घेण्याची आमच्याकडे वहिवाट नाहीं." पण भावे असल्या उत्तरानें थोडेंच नमणार ! ते हजरजबाबीपणानें म्हणाले, " यजमान चहा घेत नसला, तरी त्यानें तो पाहुण्यांना नाकारून गृहस्थधर्म सोडावा काय ? " या प्रश्नानें पांगारकर ओशाळले. आपलें सत्त्वहरण करणारा हा प्रश्न ऐकून त्यांनी सपशेल माघार घेतली आणि मग चहाच्या कपांत मैत्रींतला कषायपणा विरघळून गेला.

धुळ्याचे समर्थभक्त शंकररावजी देव, कल्याणचे श्री. स. म. दिवेकर, तसेंच श्री. न. चिं. केळकर, श्री. वा. अ. भिडे, सरदार खं. चिं. मेहेंदळे, श्री. दत्तोपंत आपटे, श्री. गो. का. चांदोरकर, प्रो. द. वा. पोतदार, रावबहादुर द. ब. पारसनीस, सर जदुनाथ सरकार इत्यादि अनेक संशोधक भावे यांच्याशीं संबंधित होते. यांतले सरकारांसकट अनेक जण त्यांचा पाहुणचार उपभोगणारे होते. पारसनिसांच्या मुलाला विलायतेंत जाऊन शिक्षण घेण्यासाठीं भावे यांनीं आर्थिक सहाय्यहि केलें होतें. " महाराष्ट्रामध्यें आपल्यासारखे निष्ठावंत व कळकळीचे इतिहासभक्त फारच विरळ ! " असें पारसनिसांनीं भावे यांना एका पत्रांत लिहिलें आहे.

प्रखर राष्ट्रवादी भूमिकेमुळें भावे मिशनऱ्यांचा राग करीत. परंतु रे. जस्टिन ई. अॅबट आणि रे. जे. एफ्. एडवर्ड्स् या दोन मिशनऱ्यांशीं त्यांचा निकटचा संबंध होता. हे दोघेहि मराठी संतचरित्रांचे आणि संतवाङ्मयाचे अभ्यासक असल्यामुळ त्यांना भावे यांचें सहकार्य हवें असे. १९२० मध्यें भावे यांचा महाबळेश्वरीं तीन महिने मुक्काम होता, त्या काळांत रे. एडवर्ड्स् हे रोज सकाळीं ७ ते १२।। व दुपारीं २।। ते ५ भावे यांच्याजवळ वसून प्राचीन मराठी कवितेचा अभ्यास करीत होते. रे. अॅबट यांचेंहि भावे यांच्याकडे या वेळीं येणें-जाणें असे. त्यांनीं आपलें 'दासोपंत दिगंबर' हें पुस्तक भावे यांनाच अर्पण केलें आहे. ही अर्पणपत्रिका रे. अॅबट यांना सारस्वतकारांविषयीं वाटणाऱ्या कृतज्ञतेची निशाणी आहे.

DEDICATED TO THE MEMORY OF

VINAYAK LAKSHMAN BHAVE

The Author of Maharashtra Sarasvat

History of Marathi Literature

to whom I owe a great debt of gratitude for introducing me to the names and works of seven hundred Marathi Poet-Saints, and their two thousand three hundred works.

## सर्वस्पर्शी रसिकता

सारस्वतकार भावे यांचें लेखन आणि कार्य हें असें बहुविध आहे. विद्यार्थिदशेंतच त्यांनीं आपलें वाङ्मयीन कर्तृत्व सुरू केलें आणि विद्यार्थिदशा ओलांडल्यावर सतत तीन तपांहून अधिक काळ संस्थाचालन, संशोधन, लेखन, इत्यादि कार्यांचा व्याप चढत्या क्रमानें सांभाळून आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत आपलें स्थान अढळ बनविलें.

महाराष्ट्र-सारस्वताचें त्यांनीं आपल्या सौंदर्यवेधी लेखणीनें रेखाटलेलें चित्र तर अम्लान कमळाप्रमाणें आपल्या सहस्रदळांच्या लावण्यानें गेलीं पन्नास वर्षें मराठी रसिकांच्या हृदयपुष्करिणीवर आंदोळतें आहे; परंतु त्यांचें अन्य लेखनहि जाणकार वाचकांच्या स्मरणांत अखंड ठसलेलें आहे. त्यांत शिवप्रभूंच्या असाधारण कर्तृत्वाची ग्वाही देणाऱ्या रोमहर्षक घटनांचा साक्षेपी आलेख आहे; प्राचीन कवींच्या कृतींचीं अनेकानेक संपादनें आहेत; नेपोलियनसारख्या रणधुरंधराच्या विक्रमाची वेधवती गाथा आहे; फलज्योतिषाच्या उगमाची आणि प्रामाण्याची चर्चा आहे नि पांखरांच्या

जीवनक्रमाचा स्वानुभवसंपन्न परिचयहि आहे. एवढ्या वविध्यानें नटलेल्या संशोधन-लेखनाचा प्रपंच उभारण्याला ज्ञानाच्या नवनव्या प्रांतांविषयीं ओढ हवी असते, जीवन आणि जगत् यांविषयीं तरल आस्था हवी असते. भावे यांच्या ठायीं अशी सर्वस्पर्शी रसिकता वसत होती.

## सोयरीं वनचरें

भावे यांची रसिकता बहुमुखी होती. कविता त्यांची केवळ सहचारिणीच नव्हे, तर अन्तश्चारिणी होती, हें खरें; परंतु मानवानें निर्मिलेल्या वाङ्मयी कवितेहून परमेश्वरानें निर्मिलेल्या सृष्टीच्या कवितेंत ते मनोभावें मग्न होऊन जात असत. "परमेश्वराचें स्वहस्तानें लिहिलेलें सृष्टीचें हें उघडें पुस्तक वाचतांना जो आल्हाद होतो, तो कांहीं लोकोत्तर आहे," अशी त्या दिव्य कवितेची अनिर्वचनीयता त्यांनीं प्रकट केली आहे. "कांटेरी झाडांना कडू चीक नसावा; रुईसारख्या चिकाळ झाडाला कांटे नसावे; जनावरांचें तोंड पोंचेइतक्या अंतरापर्यंत मात्र कांटे यावे व झाड पुढें वाढलें, म्हणजे कांटे कमी व मृदु होत जावे; फुलांचे आकार, रंग, त्यांवरील बारीक-सारीक ठिपके यांचा भ्रमरांच्या आवडीनिवडींशीं निकट संबंध असावा व त्या दोघांच्या निकट संबंधाचा दोघांसहि उपयोग व्हावा; प्राण्यांना मधुर फळें देऊन त्यांकरवीं वृक्षवल्लींनीं आपलें काम अचानक करवून घ्यावें, व सुवासानें मदांध बनून सारा काळ आपली कामगिरी करणाऱ्या भ्रमराला – पोरीच्या नादीं लागून वेडावलेल्या मूर्ख छंदिष्टाच्या येरझारा पाहून हांसणाऱ्या आईप्रमाणें लतावेलींनीं चेष्टवावें आणि फुलझाडांनीं भ्रमराकडोन काबाडकष्ट करवून वर त्याला गालांतल्या गालांत हंसत सुटावें; फुलपांखरांनीं बहुरूप्यासारखीं अनेक पर्णकीटकांचीं सोंगें घेऊन आपले कार्य-भाग उरकीत राहावे, हें पाहून जो आनंद वाटतो, जो आल्हादाचा भर येतो, तो सर्व काव्यांच्या वाचनापेक्षां अनंत पटींनीं अधिक आहे,"[१] हें श्री. भावे यांनीं स्वानुभवानें सांगितलें आहे.

लहानपणीं चितुरांमागें धांवण्याच्या वेडापासून तों वयांत आल्यावर नाना आकारांचे, प्रकारांचे, रंगरूपांचे पक्षी पाळण्याच्या छंदापर्यंत भावे यांचा या स्वेच्छा-विहारी विहगांशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. चितूर धरतांना आपली होणारी तल्लीन वृत्ति पाहून हंसाला धरणाऱ्या दमयंतीची आठवण त्यांची त्यांनाच होत असे.

१. वारसा, पृ. १४८.

'वाजेचिना वलय, नूपुरनाद नोहे' असें शरीर तोलानें सांवरून, 'निष्कंपकंकण-करासि पुढें करीते' अशा वहारीच्या चित्रांतल्या दमयंतीची सावध गति राखून ते कितीक वेळां चितुरांच्या शोधांत राहिले होते. चितुरांप्रमाणेंच पिवळ्या, तांबड्या, कवऱ्या, पांढऱ्या अशा नाना रंगांच्या फुलपांखरांमागेंहि ते स्वैरपणें धावले होतें आणि त्यांच्यासमवेत 'सृष्टिसुखाचा धडा' घेऊन, 'विधात्यानें त्यांची आणि फुलांची जोड कां घालून दिली आहे', याचा शोधहि त्यांनीं घेतला होता.[१] "या सृष्टींतलें नानाविध चमत्कार नजरेस पडून, लहानसहान जीवजंतूंचा जीवनक्रम लक्षांत आला, त्यांचेकरितां विधात्यानें निर्माण केलेल्या सहस्रोसहस्र गोष्टी मनांत भरल्या कीं माझें मन आनंदानें उचंबळून येई,"[२] असें त्यांनीं आपल्या सृष्टिप्रेमाचें प्रकटीकरण केलें आहे.

कवितेचा प्रत्येक पदविन्यास त्यांना विलोभनीय वाटे, हें खरें; परंतु भ्रमरांचें गुंजन, कोकिळांचें कूजन, वायूचें वाहणें, तरुलतांचें डोलणें, हें त्यांना अधिक वेड लावीत असे. वाऱ्याच्या झुळकींवरोवर वेलीच्या फुलांचे लोंबलेले झुबके पाहून त्यांना असें वाटे कीं, "हिरव्यागार पानांचा बुट्टेदार शालू नेसून आपल्या सख्याचे–वृक्ष-राजाचें पुन्हा पुन्हा चुंबन घेतांना त्या वल्लरींच्या कानांतलीं कर्णफुलेंच हालत आहेत."[३]

## रसडोळस वृत्ति

अशा धुंद रसिकतेनें फुलपांखरांच्या पंखांचे रंग नि त्यांच्या ललित गतीबरोबर होणारीं चित्तवृत्तीचीं आंदोलनें निरखणारा, वृक्षवेलींच्या सवें प्रसन्नपणें डोलणारा, फुलांच्या रंगगंधानें अंतरीं सर्व कळांनी उमलणारा, गिरिशिखरांच्या उत्तुंगतेनें नि गिरिगव्हरांच्या भीषणरम्यतेनें भारला जाणारा हा जातिवंत रसिक जेव्हां कवींच्या सृष्टींत उतरत असे, तेव्हां त्याच्या रसडोळस वृत्तीचीं अंगप्रत्यंगें सौंदर्याच्या पुनर-नुभूतीनें पुलकित न झालीं तरच नवल ! "आपल्या विकारांशीं आपल्या वाचकाचे विकार मिळवून टाकावे, आपल्या मनाच्या सुरांच्या आघातानें तसलेच सूर वाचकाच्या मनांतून काढावे," हें उत्तम कवीचें सामर्थ्य अनुभवतांना त्यांना निरतिशय आनंद

१. पांखरांचा परिचय (अप्रकाशित).
२. या सृष्टीचा कोणी कर्ता आहे काय ? (अप्रकाशित).
३. होयसळेश्वर–प्रवासवर्णन (अप्रकाशित).

होत असे. "वाचकाचे मनांत नसलें, तरी कवीच्या क्षोभामुळें त्याला क्षोभ वाटावा; कवीच्या दु:खामुळें वाचकाच्या मनालाहि दु:ख वाटावें, कवीचें मन हांसूं लागलें कीं, यालाहि अनावर हांसूं कोसळावें; कवीच्या कामविकारांनीं याच्या मनांतहि तेच विकार सहज जागृत होऊन त्यांनीं त्याची गाळण उडवावी; किंबहुना कवीच्या विकारांच्या जोराच्या ओघापुढें वाचकाचें मन स्तब्ध होऊन लुलें बनावें आणि कवीच्या शब्दांच्या आज्ञेंत वागूं लागून तें त्याच्या इच्छेनुरूप वाहूं लागावें,"[1] हा चमत्कार ज्यांचें काव्य करूं शकेल, अशा कवींच्या वाङ्मयसहवासांत भावे यांची रसीली वृत्ति प्रियाच्या वक्षावर विसावणाऱ्या यौवनवेड्या युवतीप्रमाणें धुंद होऊन जात असे. काव्याच्या आस्वादनांत काव्यबाह्य मूल्यांचा संस्कार ते उमटूं देत नसत. 'अभक्त वाचकाच्या मनाला भक्तीचे पाझर फोडणारा' संत तुकाराम, 'नेभळ्या सात्त्विकाला चेव आणून हिंमतबहाद्दर बनविणारा' वीरकवि अज्ञानदास आणि 'शिष्ट म्हणविणाऱ्या संभावितालाला त्याचे कामविकार जागृत करून त्या वेळेपुरता तरी विषयासक्त बनविणारा' रामजोशी— हे सारे त्यांना 'कवि' म्हणून सारखेच प्रिय असत.

## प्रखर राष्ट्रवादी दृष्टि

परंतु काव्यास्वादनाची धुंदी उतरल्यावर ते जेव्हां सामाजिक परिणामांच्या दृष्टीनें वाङ्मयाचा विचार करूं लागत, तेव्हां त्यांच्या विचारांवर प्रखर राष्ट्रवादी दृष्टीचें प्रचंड आक्रमण होत असे. या बाबतींत ते राजवाड्यांचेच साथीदार होते. इंग्रजांच्या आगमनानंतर जें वैचारिक महामंथन घडलें, त्यांत अनेक एतद्देशीय विचारक राष्ट्रीय अस्मितेच्या पोषणाच्या दृष्टीनेंच 'पूर्वदिव्या'चा शोध घेऊं लागले. त्यांतल्या कित्येकांनीं नवयुगांत अभिप्रेत असलेली विजिगीषु प्रवृत्तिपरता भूतकाळावर लादण्याचा प्रयत्न केला, तर कित्येकांनीं सरसहा आत्मनिंदा चालू ठेवली. प्राचीन मराठी वाङ्मयापुरतेंच सांगायचें झालें, तर रानडे-पांगारकरांसारख्यानी राष्ट्रवादी दृष्टींतूनच समग्र संतसाहित्याचें समर्थन केलें, तर राजवाडे-भावे यांच्यासारख्यांनीं त्याच दृष्टिकोनांतून समर्थांचा अपवाद सगळून अन्य संतसाहित्याला राष्ट्रीय दौर्बल्याचें मूलकारण मानलें. भावे या बाबतींत राजवाड्यांच्याइतकेच आग्रही विचारांचे होते. राजवाड्यांप्रमाणेंच त्यांचे हे आग्रही विचार तीव्र भावनाशीलतेंत परिणत होत असत, आणि मग केव्हा केव्हां त्या तीव्र भावनाशीलतेच्या अनावर आवेगांत

१. वारसा, पृ. १५२.

अभ्यासकाला आवश्यक असणाऱ्या ताटस्थ्याचा भंगहि होत असे.

परंतु या ताटस्थ्यभंगामागें निखळ राष्ट्रवादी दृष्टि आहे, हें कोणीहि विसरूं नये. हें राष्ट्र रसरशीत प्रवृत्तिपरतेनें प्रेरित व्हावें, त्यानें उद्यमाची पराकाष्ठा करून सर्वांगांनीं समृद्ध व्हावें, पराक्रमाची शर्थ करून निष्कंटक वातावरणांत जीवन भोगावें, जीवनांतल्या सौंदर्याचे तरल रंग-तरंग रसिकतेनें अनुभवावे, अशी भावे यांची अपेक्षा होती— आकांक्षा होती आणि या आकांक्षेच्या पूर्तीच्या आड येणारें सारें करंटेपण झटकून टाकण्याची त्यांना ओढ होती. या कमालीच्या प्रवृत्तिपर जीवनदृष्टीमुळें परमार्थाविषयीं त्यांना फारशी आस्था उरली नव्हती; परमार्थविषयक अनास्थेमुळें तो विषय जाणून घेण्याचा त्यांनीं प्रयत्नहि केला नाहीं. आणि म्हणूनच एकीकडे पारमार्थिकांनीं निर्माण केलेल्या वाङमयाचे रंग-गंध अनुभवीत असतांना, दुसरीकडे त्याच्या अंतरंगांतील मकरंदाची त्यांनीं सौम्य चेष्टाहि केली. त्यांच्या प्रखर प्रवृत्तिपर दृष्टीमुळें हें असें घडणें स्वाभाविक होतें—अपरिहार्य होतें.

या प्रवृत्तिपरतेच्या पुरस्कारांतूनच त्यांनीं समर्थांचें समर्थन केलें आणि ज्ञानोबा-तुकोबांना दूषण दिलें. संतसाहित्यांत आणि संतचरित्रांत मातलेल्या चमत्कारांच्या बंडाचा धिक्कार करतांना त्यांनीं समर्थचरित्रांतल्या चमत्कारांचाहि उल्लेख केलेला आहे आणि समर्थांचा वारसा विसरणाऱ्या समर्थ-सांप्रदायिकांनाहि फटकारलें आहे. त्यांनीं केलेल्या या तौलनिक खंडन-मंडनांत जातिश्रेष्ठत्वाचा यत्किंचितहि गंध नाहीं, हें आपण प्रांजळपणें मान्य करायला हवें. " जातिभेदामुळें व जातिमत्सरामुळें आपणां मराठ्यांचें शतशः नुकसान झालें आहे, होत आहे व पुढेंहि होईल,"[1] असें निःसंदिग्ध शब्दांत बोलणारे आणि रोटी-बेटी-व्यवहाराच्या अवलंबावांचून ही जाति-भेदजनित विघटना दूर होणार नाहीं, असें सांगणारे भावे जातिश्रेष्ठतेच्या आहारीं जाऊन संतांच्या तुलनेला प्रवृत्त झाले होते, असें मानणें हा त्यांच्यावर अन्याय होत आहे. असें करणें म्हणजे अक्षम्य कृतघ्नतेला कवटाळणें आहे.

## दुर्मिळ प्रांजळपणा

निवृत्तिपरता आणि चमत्कारप्रचुरता यांना भावे यांचा कमालीचा विरोध असल्यामुळें, ते त्या विरोधाच्या तीक्ष्ण धारेनें संतसाहित्याची अणि संतचरित्रांची निष्करुण चीरफाड करीत, हें खरें आहे. अशा वेळीं त्यांच्या लेखणीचा संयम अनेकदा

१. वारसा, पृ. १३१.

ढळत असे. परंतु त्यांना विरक्त साधूंच्या थोरवीची जाणच नव्हती, त्यांच्या अंत रींच्या उमाळ्यांतून उमललेल्या भक्तिकवितेची सुंदरता आकळलीच नव्हती, असें म्हणतां येणार नाहीं. तुकोबांसारख्या महामहिम साधूच्या अलौकिकतेचें गुणगान त्यांनीं मुक्तकंठानें केलें आहे. त्यांनीं आपल्या वाचकांना आवाहन करून म्हटलें आहे कीं, "माझे लिहिण्याचा भलताच अभिप्राय घेऊन, तुकारामांत कांहीं अवगुण होते किंवा त्याचें साधुत्व कमी दर्जाचें होतें असें मला वाटतें, असा कोणीहि आपला समज करून घेऊं नये. तुकारामाची बुद्धि कुशाग्र होती, त्याची भक्ति व श्रद्धा अलौकिक होती, त्याचे वाणींत प्रसाद होता व तो निःसंशय श्रेष्ठ दर्जाचा कवि होता, आणि आपणां सर्वांपेक्षां तो सहस्र पटींनीं अनेक बाबींत वरच्या पायरीचा होता, याबद्दल मला लवमात्र शंका नव्हती व नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याच्या अनेक अलौकिक गुणां-बद्दल अत्यंत आदर वाटत असल्यामुळेंच त्याचीं प्रेमळ व गोड मुक्ताफळें मी शबरीप्रमाणें अत्यंत मेहनतीनें व प्रेमानें मिळवून महाराष्ट्राच्या आत्मारामापुढें ठेवीत आहें."[१]

ही एवढी सुस्पष्ट आदरभावना आणि चमत्कारांविषयींची नि प्रपंच-पर-मार्थाच्या संवादाविषयींची शंकाकुलता यांचें द्वंद्व त्यांच्या मनीं सरलें नाहीं. तरीहि "आपण यःकश्चित् सामान्य मानवी प्राणी या विभूतींच्या कृत्यांचें चिकित्सक बुद्धीनें नीटसें आकलन करण्याला केवळ अनधिकारी आहों, आपली दृष्टि यांच्या चरित्राकडे अशी लावणें हें अयोग्य आहे व साधारण कसोटीनें या विभूतींचें मापन करूं जाणें केवळ गैर आहे," असें आपल्याच मनाला फटकारण्याइतका दुर्मिळ प्रांजळपणा त्यांच्या ठायीं वसत होता. शंकाकुल विचारांनीं बुद्धि चळूं न देतां, वाङ्मयाभ्यासाच्या रूपांत शांतचित्तानें संतांची आपल्या हातून होईल तेवढी सेवाचाकरी करीत राहिल्यास "त्यांच्या चरित्राचें रहस्य त्यांच्याच कृपेनें हळूहळू नीट कळूं लागेल,"[२] असा विश्वासहि त्यांनीं व्यक्त केला आहे.

### फक्कड व्यक्तिमत्त्व

"पदवी भौतिकशास्त्राची, नाद पांखरें उडविण्याचा, धंदा मीठ विक-ण्याचा आणि संशोधन प्राचीन मराठी काव्याचें, असा फक्कड मेळ भावे यांच्या चरित्रांत दिसून येतो."

१. तुकारामबुवांचा अस्सल गाथा, प्रस्तावना, पृ. २०.
२. तत्रैव, प्रस्तावना, पृ. २१–२२.

—महामहोपाध्याय पोतदारांनीं वर्णिलेला सारस्वतकार भावे यांचा हा फक्कडपणा त्यांच्या रसरशीत जीवनदृष्टीचा द्योतक आहे. त्यांनीं विद्यार्थिदशेंत पुस्तकांबाहेरच्या जगाशीं जवळीक साधली, तरी पुस्तकांची महती डावलली नाहीं; सृष्टीच्या काव्यांत मनसोक्त अवगाहन केलें, तरी कवितेची कमनीयता नजरेआड होऊं दिली नाहीं; उत्तम व्यवहार करून विपुल धन जोडलें, तरी सत्पात्रीं दानाच्या बाबतींत चिकटपणा दाखवला नाहीं; परमार्थाविषयीं अनास्था दाखविली, तरी पारमार्थिकांच्या काव्यांची आणि चरित्र-साधनांची आबाळ होऊं दिली नाहीं; कबुतरें उडविण्याइतका नादीपणा केला, तरी सुजनतेनें रंगलेल्या गृहस्थधर्माचा तोल चळूं-ढळूं दिला नाहीं.

ते रसिक होते, पण रंगेल नव्हते. छांदिष्ट होते, पण उनाड नव्हते. चिकित्सक होते, पण भावनाशून्य नव्हते. त्यांचें संपूर्ण जीवन आणि लेखन या रसरशीत जीवन-दृष्टीनें आल्हादक बनलें होतें. कांहीं आग्रहांमुळें त्यांनीं कांहीं वेळां खुपणारे शब्द वापरले असले, तरी कटुतेला अढळ स्थान केव्हांहि लाभूं दिलें नाहीं. या त्यांच्या जीवन-लेखन-विशेषांचा 'वारसा' निःसंशय अविस्मरणीय आहे. अनुकरणीय आहे.

रामचंद्र चिंतामण ढेरे

## विभाग पहिला : इतिहासविषयक लेख

१. अफजलखानाचा वध
२. श्रीशिवाजीमहाराजांचें एक राजकारण
३. षाहिस्तेखानाची मोहीम
४. शिवाजीची वंशकुळी
५. श्रीशिवाजीमहाराजांचा होन, वाघनखें व भवानी तरवार
६. मराठ्यांच्या इतिहासाचीं दोन शतकें
७. मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें

# अफजलखानाचा वध

शालिवाहन शके १५७७ मध्यें मन्मथसंवत्सरीं पौष महिन्यांत श्रीमन्महाराज शिवाजीराजे भोसले यांनीं चंद्रराव मोरे यास जिंकून त्याचा जावळी हा प्रांत कावीज केला.

जावळी हस्तगत झाल्यावर शिवाजी महाराजांनीं त्या प्रांतांत आपला वचक वसविण्यासाठीं व मोऱ्यांचा कांटा समूळ उपटून टाकण्यासाठीं मोऱ्यांच्या घराण्यांतील अनेक पुरुषांस ठार मारलें. चंद्रराव तर पूर्वींच मारला होता. पण त्याचा भाऊ किंवा दिवाण हणमंतराव या नांवाचा होता. तो जावळीजवळ चतुर्वेट[1] येथें राहत असे. 'त्याजकडे संभाजी कावजी यांस पाठवून सोयरीकीचें नातें लावून, एकांतीं बोलीचालीस जाऊन, कटचारीचे वार चालवून जिवें[2] मारलें' व पुढें थोडेच दिवसांनीं बाजीराव मोरे व कृष्णराव मोरे या चंद्ररावाच्या भावांसही बोलावून आणून त्यांचा शिरच्छेद केला. इतकेंच नव्हे, तर मोऱ्यांच्या घराण्यांतले दूरदूरचे सर्व पुरुष मारून टाकले. या घराण्यांतलीं लहान लहान नेणतीं मुलेंही जीं जीं म्हणून महाराजांच्या हातीं लागलीं, त्या सर्वांस त्यांनीं ठार मारलें व हें कुटुंब धुळीस मिळविलें. शिवाजीच्या वेळच्या या कत्तलीचीं वर्णनें अजूनही जावळी प्रांतांतले लोक फार आवेशानें सांगतात. मोऱ्यांचा समूळ निर्वंश करावा, हाच हेतु शिवाजीच्या मनाचा होता. पण मोऱ्यांचे कांहीं पुरुष याही संकटांतून पळून निभावून जाऊन जीव बचावून राहिले, ते ज्यांच्याकडे जागीं जागीं लपून बसले त्यांचीच आडनांवें त्यांनीं घेतलीं व जिवाचा बचाव केला. बापाच्या अपराधाकरतां अजाण पुरुषांस व अज्ञान लेकरांस मारून त्यांचे प्राण हरण करावे, हें हल्लींच्या मनूंत कोणासही रुचणार नाहीं. त्यांतून बापाचे अपराध किती घोर

---

१. चतुर्वेट हें ठिकाण कोयनाकांठाला मकरंदगडाचे खालच्या बाजूला आहे. मकरंदगडाच्या पायथ्याशीं हातलगट व हातलगटाला लागूनच चतुर्वेट हें आहे. हल्लीं येथें शेंदोनशें उंबरठा आहे.

२. कृ. अ. सभासद, पृ. ८.

होते, हेंही उपलब्ध कागदांवरून आपणांस नीटसें अजमावतां येत नाहीं. जावळीकर मोरे हे आपणांस राजे म्हणवीत. त्यांस शिवाजीराजानें कळविलें कीं, "तुम्ही मुस्तफद राजे म्हणवितां. राजे आम्ही. आम्हांस श्रीशंभूनें राज्य दिधलें आहे, तर तुम्ही राजे न म्हणावें. आमचे नोकर होऊन, मुलूख खाऊन हामरहा चाकरी करावी .. जावली खालीं करून, राजे न म्हणून, मोरचेल दूर करून, हात रुमालें बांधून, भेटीस येऊन हुजूरची कांहीं चाकरी करणें. इतकियावर बदफैली केलिया मारले जाल." शिवाजीमहाराजांचें हें म्हणणें मोरे यांस न रुचून त्यांनीं उत्तर पाठविवेलें कीं, "तुम्ही काल राजे झाला. तुम्हांस राज्य कोणीं दिधलें? मुस्तफद राजा आपले घरीं म्हटलियावर कोण मानितो? येतां जावली; जातां गोंवली. पुढें एक मनुष्य जिवंत राहणार नाहीं. तुम्हांमध्ये पुरुषार्थ असला, तर उदईक याल तर आजच यावें. आम्हीं कोंकणचे राजे असून आमचा राजा महाबळेश्वर त्याचे कृपेनें राज्य करतों." इ. इ. हाच काय तो मोरे यांचा आपराध आणि तेवढ्याकरतांच त्याचे कुटुंबाचा विध्वंस केला, असें सांगण्याचा बहुतेक महाराष्ट्रीय बखरकारांचा रोख दिसतो.[१] पण या प्रकरणामागचा नीटसा ऊहापोह अजून झाला नाहीं व तो करण्यास पुरेइतकी माहितीहि आपणांस अजून उपलब्ध नाही.

याच वेळीं शिवतरखोऱ्यांत बाबाजीराव म्हणून कोणी पुंड होता, त्यासही कैद करून त्याचे डोळे काढले.[२] शके १५७८ मध्यें वैशाखांत रायरी हा किल्ला घेतला व त्याच सालीं अश्विनांत सुपे प्रांत घेतला. याच सुमारास रोहिडा किल्ला घेऊन तेथला वतनदार देशमुख ठार मारला[३] व मग तो प्रांतही शिवाजी महाराजांच्या हातीं आला.

याप्रमाणें शिवाजीला सर्वंभर यश येत गेलें व त्याचा मुलूखही वाढतच गेला. जावळीचें राज्य फार जुनें; तेव्हां कदाचित् तेथें पुन्हां कधीं गडबड होईल, असें जाणून जावळीच्या वरच्या आंगाला एक उंच 'ढोपऱ्या' नांवाचा डोंगर होता, त्यावर शिवाजीनें एक किल्ला बांधला. हा बांधण्याचें काम शिवाजीनें आपला इमानी व मेहनती नोकर मोरो त्रिमल पिंगळे यास सांगितलें. जावळीस पैसा,

१. गुप्ते यांनीं संपादलेली बखर, इ. सं. पहा

२. याच सुमारास व अफझुलखानाचे वधापूर्वीं शिवाजीनें सुर्वे यांचें राज्य घेतलें, असें कांहीं बखरकार व इतिहासकार सांगतात. पण ही चूक आहे. सुर्वे यांचें राज्य अफझलखानाचे वधानंतर शके १५८३ मध्यें त्यांनीं—शिर्क्यांनीं—कांहीं बेइमानी केल्यावरून त्यांस उधळून लावून आपले कबजांत घेतलें.

३ याच देशमुखाचे पदरीं बाजी-प्रभु हा दिवाण होता. हा शिवाजीकडे आला व शिवाजीनेंही त्यास पदरीं ठेवून घेऊन त्याचें पूर्वीचें उत्पन्न त्याजकडे चालविलें.

खजिना व सरंजामही मुबलक मिळाला होता. तेव्हां मोरोपंतानें हें काम फार मेहनतीनें व उत्कृष्ट केलें. किल्ल्यावर पुरातन काळचें श्रीकेदारेश्वराचें देऊळ होतें तेंही नीट बांधलें; व जवळच शिवाजी राजास राहण्यास योग्य असा टुमदार लहानसा एक वाडा बांधला. मोरोपंतानें बांधलेल्या या भव्य किल्ल्यास शिवाजीनें प्रतापगड असें नांव दिलें. यावर हजार-पंधराशें शिबंदी ठेवली व गस्तीकरतां ठिक-ठिकाणीं अनेक पहारेही ठेवले.

प्रतापगडचें काम पुरें झाल्यावर, हस्तगत केलेल्या प्रांतांचा नीट बंदोबस्त केला व मग प्रथम जुनराकडे आणि नंतर अहमदनगरकडे शिवाजीनें धुमाळी मांडली. या सर्व प्रांतांत औरंगजेबानें आपले सरदार ठेवले होते व त्यांस शिवाजीचे मुलखांत शिरून मुलूख बेचिराख करावा, गांवें लुटून जाळून फस्त करावीं, व मनांत दयेचा लेशही न येऊं देतां गावकऱ्यांना मारून टाकावें, असे सक्त हुकूम दिले होते. तेव्हां या सरदारांना ते आपले मुलखांत येण्यापूर्वीं तोंड देणें अवश्य होतें. शके १५७९ च्या ज्येष्ठांत शिवाजीनें अहमदनगरच्या नौसिरखान[1] नांवाच्या सुभेदाराशीं युद्ध मांडलें. पण हा डाव साधावा तसा साधला नाहीं. किल्लेदारानें बंदोवस्त चांगला ठेवला होता. यामुळें शिवाजीस तेथून माघार घेऊन परत फिरावें लागलें. या झटापटींत मराठ्यांचें बरेंच नुकसान होण्याचाही संभव होता. परंतु आषाढांत पावसाळा झपाट्यानें सुरू झाल्यामुळें अंगावर चालून आलेले मुसलमान अम्मलदार परत फिरले व शिवाजीस आपले मुलखांत निघून येण्यास चांगला अवसर सांपडला. परत देशीं आल्यावर शिवाजीनें रघुनाथ बल्लाळ[2] यास नौसिरखानाशीं तहाचें बोलणें लावण्यास पाठविलें व थोडे दिवसांनीं रघुनाथपंत वकील यास कृष्णाजी भास्कर पंडित[3] यांचे पत्रासुद्धां, औरंगजेबाकडे अर्ज देऊन रवाना केलें. हें पत्र पोंचलें तेव्हां औरंगजेबाचा बाप शहाजहान हा आजारी पडल्याची खबर आल्यामुळें औरंगजेब दिल्लीस परत जाण्याचे तयारींत होता. यामुळें त्यानें " तुमच्या पेशजीच्या गोष्टी यद्यपि विसरावया-

१. जेधे १८४

२. सरकार ६५

३. कृष्णाजी भास्कराचें पत्र अशासाठीं कीं, औरंगजेबाचे मनांत आंदेशा राहूं नये व इतबाराविषयीं खात्री पटावी. या पत्रावर छ १ माहे जमादिलाखर सन १०६८ हिजरी अशी तारीख आहे. या दिवशीं इंग्रजी तारीख २४ फब्रुवारी १६५८ येते. यानंतर सुमारें पांच महिन्यांनीं म्हणजे ता. २१ जुलै १६५८ रोजीं अवरंगजेब हा प्रथम तक्तावर बसला. ( यानंतर पुन्हां जवळ जवळ एक वर्षानें म्हणजे ता. ५ जून १६५९ रोजीं तो फिरून दुसऱ्यांदां तक्तावर बसला. ) या वेळीं शिवाजीनें सोनोजी पंडिताबरोबर एक अर्जदास्त राज्यारोहण-प्रसंगाकरतां धाडली होती. तिचें उत्तर व एक उंची पोपाक औरंगजेबानेंनें या वेळी सोनोजीपंताबरोबर शिवाजीकडे पाठविला. हें अस्सल पत्र भा. इ. सं. मंडळानें छापलें आहे.

जोग्या नाहींत, तथापि तुम्हीं आपले कृतकृत्यांचा पश्चात्ताप केला . . असें समजोन तुमचे पूर्वकृत्य मनांत आणीत नाहीं," असें धरसोडीचें उत्तर शिवाजीस पाठविलें व सोनोपंतास ५०० घोडेस्वार देऊन बादशाही नोकरींत तुमचे तर्फे हजर होण्यासाठीं पाठवून देण्याविषयीं शिवाजीकडे फर्मान लिहिला. शिवाजीच्या नम्र-अर्जदास्तीचा आणि त्यास धाडलेल्या औरंगजेबाच्या उत्तराचा बाहेरचा रंग तर ठीक उडाला. पण आंतला प्रकार अगदींच निराळा होता. नगरास पिछेहाट होऊन मागें परतावें लागल्यानंतर धाडलेल्या या पायघोळ अर्जाचा मतलब औरंगजेब नीट जाणून होता. तसेंच औरंगजेबाच्या या गुळगुळीत उत्तराची खोंचही शिवाजीच्या ध्यानांत पूर्णपणें आली होती. औरंगजेबाची पाठ फिरतांच शिवाजीनेंही आपल्या पूर्व क्रमास पुन्हां सुरवात केली व मोंगली प्रांत तूर्त जरा तसाच सोडून तो वाई, खानदेश वगैरे प्रांतांत दंगेधोपे करूं लागला. शिवाजी हा असें कांहीं करील, हें औरंगजेबानें मनाशीं ताडलेंच होतें व म्हणूनच औरंगजेबानें परत जातांना, मीर जुमला नांवाच्या आपल्या सरदारास या शिवाजीवर नीट नजर ठेवण्यास सांगितलें व अल्ली अदिलशहासही औरंगजेबानें बजावून लिहिलें कीं, "शिवाजीनें तुमचे प्रांतांत घुसून कांहीं किल्ले जबरीनें बळकावले आहेत. त्यास तुम्ही घालवून द्या. यदाकदाचित् त्याचे नोकरीची तुम्हांस अपेक्षाच असली, तर त्यास दूर कर्नाटकांत जहागीर द्या. म्हणजे तो तुमचे प्रांतापासून लांब जाईल व तुमचे प्रांतास तितका त्रास देणार नाहीं." अल्ली अदिलशहानें ही मोंगली मसलत कितपत मानली, हें नीट माहीत नाहीं. पण शके १५८० चे अश्विनांत शिवाजी कर्नाटकांत गेला होता, हें मात्र खरें आहे.[१] गेलीं एक-दोन वर्षें शिवाजीबद्दलची बोंब विजापूरच्या पादशहाकडे गेली होतीच. पण या सालांत तर शिवाजीच्या अनेक कृत्यांसंबंधें बऱ्याच कागाळ्या विजापूरच्या दरबारांत दाखल झाल्या व त्याचा बंदोबस्त, त्याचा बाप जो शहाजी त्याचेकडून परस्पर करवावा, अशा इच्छेनें शहाजीस धाडलेलें दरबारचें पत्रही शहाजीनें धुडकावूनच लावलें. कारण शहाजीचें अंग पूर्णपणें मुलास होतेंच आणि शहाजीच्या कृतीवरून तें उघडही झालें. तेव्हां आतां याउप्पर शिवाजीच्या कृत्यांकडे डोळेझांक करणें विजापूर दरबारचे इभ्रतीस कमीपणा आणणारें होतें. शिवाजीसंबंधें कागाळ्या करणारे लोकांत वाई प्रांताचा सुभेदार अफजलखान याचेकडून कागाळ्यांची ओरडाओरड फार होई. याचें एक कारण असें होतें कीं, वाई, मिरज, जमखिडी वगैरे प्रांतांत अफजलखानाची जहागीर पुष्कळ होती आणि या प्रांतांत शिवाजीच्या सैन्याचा त्रास अलि-

१. कृष्णाजी भास्कर देशाधिकारी यास राजश्री शिवाजी राजे यांनीं लिहिलेलें पत्र. (भा. इ. मं. चतुर्थ सं. वृत्त, पृ. ७९)

कडे विशेष असे. यामुळें अफजलखानाचें प्रत्यक्ष व्यक्तिशः नुकसान फार होई. शिवाय हळुहळू शिवाजीनें या प्रांतांतले गढी-किल्ल्यांचे वतनदार व देशमुख-देशपांडे अनेक तऱ्हेनें आपल्या बाजूस वळविल्यामुळें व त्यांना वेळीं-अवेळीं चांगलीच फूस दिल्यामुळें ते दरबारचा वसूलही नीट देत नसत. तेव्हां ती तक्रार सांगण्यासाठीं स्वतःच अफजलखान हा विजापुरास गेला.

अफजलखान हा विजापूर दरबारांतला एक चागला मुत्सद्दी आणि नामांकित सरदार होता. विजापूर दरबारांत शहाजी, रणदुल्लाखान वगैरेंची एक बाजू होती व याविरुद्ध बाजूच्या लोकांत अफजलखान हा पुढारी व प्रमुख होता. हा शरीरानें धिप्पाड व ताकतीनें बळकट होता. अकलेनें हुशार व पाताळयंत्री होता आणि धैर्यानें पुरा निधडा होता. याची सल्ला नेहमीं पोक्तपणाची असे व कांहीं दिवस तर तो विजापुर दरबारचा सूत्रचालकच असावा, असेंही वाटतें. दिल्लीपतीशीं वैरभाव न धरतां त्याच्याशीं सल्ल्यानें असावें, असें यास वाटत असे, पण हा रणदुल्लाखानाच्या विरुद्ध पक्षाचा व त्याचा कट्टा वैरी असल्यामुळें रणदुल्लाखानाच्या बाजूचा जो शहाजी त्याच्याशीं व त्याच्या मुलाशीं म्हणजे शिवाजीशीं याचें मनापासून फारा दिवसांचें वैर होतें. तशांत आतां शिवाजी हा तर अफजलाच्या डोळ्यांत फारच सलूं लागला होता. यामुळें विजापूर दरबारीं चांगली उठावणी करून दरबारचें सगळें बळ खर्चवून हा शिवाजीचा कांटा काढून टाकावा, असें त्यास पुन्हां पुन्हां वाटू लागलें व ही संपादणी करण्यास तो विजापुरीं स्वतः गेला. दरबारलाही अफजलाचें म्हणणें रुचलें, पण हें घडवून आणण्याचें कोणीही अंगावर घेईना. कारण शिवाजी कांहीं सामान्यांतला पुरुष नव्हता. तो शूर असून शिवाय मोठा हिकमती होता. त्यानें कैकांना वाटेस लावलें होतें व मी मी म्हणणाऱ्या सैन्यांच्या कैक वेळां पाठी पाहिल्या होत्या. वळवाचा पाऊस अचानक पडून जशीं गांवढेकऱ्यांची तारांबळ उडवतो आणि नासाडी करतो, त्याप्रमाणेंच हा आपले लोक घेऊन अचानक येऊन केव्हांच घाला घालून शत्रूला धुडकावून लावी आणि पाठलाग केला तर हातींही सांपडत नसे. यामुळें हें कठीण काम कोणीही पतकरण्यास तयार होईना. अखेर हें काम उरकण्याचें अफजलखानाच्याच माथ्यावर आलें व तें हातीं घेण्यास तो कबूलही झाला.

महाराष्ट्र-पवाडेकार म्हणतात कीं, अफजुल्ला हा कोणा भटियाराचा मुलगा होता. कोणी कोणी म्हणतात कीं, हा महंमद अदिलशहाचा दासीपुत्र होता. [१] हा कोणीही असला, तरी त्याचें विजापुर दरबारीं वजन फार होतें व तेथील मालकीण बडी साहेबा–पादशहाची आई–हिचेजवळ तर त्याची फारच प्रतिष्ठा होती, हें खरें

१. सरदेसाई ३४२.

आहे. तिनें या अफजलखानास सांगितलें होतें कीं, "वरपांगीं चांगली दोस्ती दाखवून व त्यास ( शिवाजीस ) अदिलशाहाकडून माफीची लालूच लावून तुम्ही कैद करून आणावा, किंवा जिवें मारून टाकावा." [१] प्रत्यक्ष वडी मालकीण, आपले यजमान पादशहाची आई, आपल्यावर ही कामगिरी मुद्दाम सोपविते, हें पाहून तर अफजलखान डोंगराएवढा झाला व त्या अमलांत त्यानें भरदरबारांत मोठ्या तोऱ्यानें सांगितलें कीं, "शिवाजी म्हणजे विशाद काय? चढे घोड्यानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों." हें ऐकून पातशाहजादी व जमलेले अमीर-उमराव सर्व खुष झाले; आणि त्यांनीं अफजलखानास उंची उंची पोषाख, अलंकार व अनेक तऱ्हेचे नजरनजराणे देऊन सैन्याचे सर्व अधिकार त्याजकडे सोंपवले. दरबारांतला रंग खूप उडाला, पण हें काम बोलण्याइतकें सोपें नव्हतें, हें अबदुल्ला जाणून होता. "बोल बोलतां वाटे सोपें, करणी करतां टीर कांपे," अशी गत त्याची होऊन गेली.

सेनापतीचे अधिकार व शिवाजीला मारून अथवा कैद करून आणण्याविषयींचें फर्मान हीं मिळाल्यावर थोडेच दिवसांत अफजलखान वांईकडे यावयास निघाला. विजापुराहून निघण्यापूर्वीं कोणी अवलिया फकीर त्याचा गुरु होता त्याच्या दर्शनास अफजलखान हा प्रथम गेला. त्या अवलियानें स्वारीस निघण्याविषयीं आशीर्वाद देतांना यांत तुझें अनिष्ट होईल, असें निक्षून सांगितलें. यामुळें अफजलखानाचा धीर बराच खचला. परंतु कांहीं झालें तरी या कामांत माघार घ्यावयाचीच नाहीं, हर उपाय करून वडे साहेबिणीनें आपणांवर सोपवलेलें हें काम तडीस न्यावयाचें, हाच विचार त्याचा कायम होता. किंबहुना हें काम आतां सोडणें त्याचे इभ्रतीस फार अपायकारक होतें. यामुळें तो बिलकुल कसूर न करतां निर्वाणीचे उपाय योजूं लागला. या स्वारीवर निघण्यापूर्वीं त्यानें आपल्या ( ब्रेसष्ट ) बिव्यांस एका उंच टेकाडावरून खालीं पाण्यांत लोटून देऊन ठार मारलें. मतलब असा कीं, आपलें कांहीं बरेंवाईट झाल्यास, यांपैकीं कोणीही बदमामला करून, कोणा परपुरुषास आपले सुखाचा वारीस करून आपले नांवास कलंक न लावावा.

............................................

१. तत्कालीन राजापुरी येथील इंग्रज वखारदारांनीं आपल्या सुरतेच्या पेढीस लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे (सरकारकृत शिवचरित्र, पृ. ६९)—


"Against Shivaji the Queen this year sent Abdullahkhan with an army of 10,000 horse & foot, and because she knew with that strength he was not able to resist Shivaji, she counselled him to *pretend friendship* with his enemy *which he did*. And the other ( i. e. Shivaji ) whether through intelligence or suspicion it is not known dissembled his love towards him." etc.

येथें एक मात्र शंका येते ती अशी कीं, या पत्रावर ता. १० आक्टोबर १६५९ अशी आहे व अफजलखानाच्या वधाची ता. ७ नवेंबर ही सर्वसंमत आहे. तेव्हां हें कसें ? ग्रेगोरियन क्यालेंडरची चूक धरली तरी ता. १८ येते. मग मूळ पत्रांतच चूक आहे, कीं जदुनाथ सरकारच्या अवतरणांत फरक आहे, हें कळत नाहीं.

या भेसूर व हिडशा कृत्याची ही जागा अजूनही गांवढेकरी लोक विजापुराजवळील अफजलपूर गांवीं दाखवितात. तेथें या सर्व बिव्यांचे शरीरांस मूठमाती देऊन त्या सर्वांच्या एकासारख्या एक अशा एकाच काळीं बांधलेल्या (त्रेसष्ट) कबरी अजूनही या गोष्टीची साक्ष देत आहेत. [१]

विजापुराहून निघाल्यावर अफजलखानानानें प्रथम तोरवे येथें डेरे दिले.[२] पहिल्याच मुक्कामावर त्याच्या निशाणाची काठी मोडली. त्या वेळींच हा मोठा अपशकून झाला, असें सर्वांस वाटलें. तोरव्याहून पुढें नेहमींच्या वाटेनें यावयाचें म्हणजे डोण नदी लागते. या नदीचा उतारा मोठा कठीण आहे व तींत हत्ती बुडेल इतका चिखल पावसाळयाच्या अखेर असतो. म्हणून नेहमींच्या मार्गानें न जातां डोण नदीला

१. ही गोष्ट आपणांस थोडी चमत्कारिक वाटते व वायांच्या कबरी प्रत्यक्ष पहातांनाही हिचे खरेपणाबद्दल कोणाकोणाचें मन साशंक होतें. पण अनेक बखरनविसांनीं ही सांगितली आहे; इतकेंच नव्हे, तर त्या वेळच्या क्यारे नावाच्या एका फ्रेंच प्रवाशानें अफजुलखानानें आपल्या त्रेसष्ट बायका मारल्याचा उल्लेखही आपले ग्रंथांत केला आहे. पूर्वीं अफजलखानाचा नांदता महाल होता तेथें हल्ली नुसता चौथरा असून सर्वभर जंगल झालें आहे. अफजलखानाचा त्रेसष्ट बिव्यांचीं थडगीं पुढीलप्रमाणें बांधलेलीं आहेत.




२. तोरवें हें खेडें विजापुराजवळ आहे.

डावें घालन अफजुलखान हा आपल्या सुभेदारीच्या हद्दींत म्हणजे वाई प्रांतीं निघाला व पंढरपूर,[१] माणकेश्वर, करकंवभोस, शंभुमहादेव, मलवडी, रहिमतपूर, वगैरे गांवांवरून वाई येथें आला. विजापुराहून निघते वेळीं अफजलखानाजवळ मुसलमानी वगैरे वरेच लोक होते[२] व पुढेंही तो आपलें सैन्य वाढवीतच होता. येवढें मोठें लष्कर ज्या गांवांवरून जाईल त्याची थोडीफार खरावी सहजच होत असली पाहिजे. पण यापेक्षां कांहीं आणखी विशेष क्रूर कृत्यें किंवा धर्मछल अफजलखानानें केला असेल, असें वाटत नाहीं. तुळजापूरची भवानी जात्यांत घालून भरडून तिचें पीठ केलें, व पंढरीस भीमातीरीं (श्रीपांडुरंग) देवास उपद्रव दिला, वगैरे गोष्टी वखरकार तिखटमीठ लावून सांगतात, पण त्यांस पुरावा नाहीं. एक तर विजापूर दरवारचें राजधोरण धर्माच्या दृष्टीनें सौम्यपणाचें होतें व दुसरें असें कीं, अफजुलखान हा वाईस गेलीं दहा-पंधरा वर्षे सुभेदार होता. त्या मुदतींत त्यानें इतक्या धर्मद्वेषाचें असें कांहीं कृत्य केल्याचें जाहीर नाहीं किंवा तसा गवगवाही नाहीं. उलट हिंदूंचीं इनाम वतनें व देवालयें व मठ वगैरेकडील वर्षासनें पूर्वापार पद्धतीप्रमाणेंच साल दरसाल चालू ठेवल्यावद्दलचे लेख अनेक आहेत. वाईचे 'नरसीभट वीन रंगभट चित्राऊ' यांस त्यांचे वडलांपासून दहा होन धर्मादाय चालत होता. तो एक साल न पोंचल्याची ओरड येतांच अफजुलखानानानें तो सुरू करून नवी सनद करून दिली. याच भिक्षुकाच्या पसर्णी, वगैरे ठिकाणच्या इनामांचेही जुने कागद पाहून त्याप्रमाणेंच नवीन सनदा सुरू केल्याचे अस्सल कागदपत्र हल्लीं उपलब्ध आहेत. याप्रमाणें इतरही अनेक भिक्षुकांचीं व गोसाव्यांचीं वतनें चालू करून दिल्याच्या सनदा हल्लीं उपलब्ध आहेत. यांपैकीं कांहीं कांहीं सनदा तर शके १५७९ व १५८० मधल्याही आहेत. या सनदांवरून व हा वाई येथें दहा-वारा वर्षे सुभेदारी करीत असून तेथील देवालयें व भिक्षुक यांचीं धर्मकृत्यें नीट सुरळीत चालत होतीं, यावरून अफजलखान हा, वखरकार वर्णन करतात त्याप्रमाणें कडवा व क्रूर नसावा. त्यानें दिलेली एक सनद येथें नमुन्यासाठीं देतों.

१५८० मार्गशीर्ष शुद्ध ९

## फारशी मजकूर

आज् रखत्खाने खोदायवंद खाने अलीशान खा अफजलखान माहमदशाही खुली दयाम दौलतहू वजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी पा

१. पंढरपुरास अफजुलखानाचा मुक्काम भीमातीरीं होता. भोसले वखर, म. द. पृ. २६.

२. मुसलमान वखरकार व सुरतेचे इंग्रज व्यापारी अफजुलखानाचें लष्कर १०००० होतें, असें म्हणतात; परंतु मराठे ग्रंथकार हा जमाव १२००० होता, असें लिहितात.

वाई विदानंद सुाा सन तिसा खमसैन अलफ दरीविले नारायणभट बिन गोपीनाथ-भट चिलाउ जुनारदार सेाा काा मजकूर हुजूर येउनु मालूम केले जे आपणासी इनाम जमीन बत्तीस बिघे ।२ दर सवाद मौजे एकसर साा मुऱ्हे पाा मजकूर देखील माहसूल नकदयाती वा वाजे उजुहाती बाा खुर्द खत मोकासाइयागी माजी वा खुर्दखत साबिकाप्रमाणें दुंबाला होउनु चालत आहे हाली हुजरून कुल इनाम अमानत फर्माविलें आहे म्हणूनु कारकुनानि इस्कील करून दुंबाला करीत नाहीं साहेबी नजर होय म्हणूनु मालूम जाहले मेबायतके सदरहू इनाम बिमोजीब खुर्दखत साबिकाप्रमाणें भोगवटा व तसरुफाती सालाबाद तागाईत साल गुदस्ता जसे चालिले असेल त्यानें प्रमाणें दुंबाला करून चालवीजे अनामत केलेचे उजूर न कीजे उचापती केले असेल ते परतुनु दीजे दर हर साला खुर्दखताचे उजूर न कीजे तालीक लेहून घेऊनु असल परतुनु दीजे पाा हुजर राा मुलाअली

तेरीख ७ रजु सुरू—

रबिलोवल निवीस

सुरू सूद

याखेरीज तुळजापूर व पंढरपूर येथील मूर्तीस अफजलखानें अपाय केला नाहीं, असें म्हणण्यास दुसरा पुरावा असा आहे कीं, त्या त्या क्षेत्रांत या गोष्टीचा दाखवा सांपडत नाहीं. पंढरपूरची मूर्ति तर फार प्राचीन आहे, हें कोणीही ती पाहून सांगूं शकेल. आणि तुळजापूरचीही तशीच जुनीच मूर्ति आहे. ती तशी नसती तर प्रतापगडावर मूर्ति बसवण्याचे वेळीं कारागीर तुळजापुरास पाठवून त्याप्रमाणेंच ध्यान करण्याचा हुकूम शिवाजीनें केला नसता. या व इतर अनेक प्रमाणांवरून अफजलखानानें मूर्ति फोडल्या, हें बखरकाराचें म्हणणें आपली बखर सजवण्यासाठीं अतिशयोक्तीनें लिहिलेलें दिसतें. या वेळीं हिंदूंच्या देवादिकांच्या मूर्तीस इजा न देण्यांत अफजलखानाचा एक मतलबही होता. त्याच्या सैन्यांत खोपडे, देशमुख, घाडगे, घोरपडे यांचेसारखे अनेक नामजाद हिंदु सरदार होते. त्यांचीं मनें दुखवून या वेळी त्यांना बेदिल करणें हें इष्ट-कार्याच्या सिद्धीला फार घातक व अनिष्ट होतें. आणि हें अफजलखान पूर्णपणें जाणून होता. कारण वाई येथें आल्यावर आपले बाजूचे सरदारांस संतुष्ट ठेवावें, व आणखीही मराठे आणि मावळे आपल्या बाजूस मिळवून घ्यावें, याविषयीं त्यानें अनेक यत्न केलेले दिसून येतात.

गुंजण मावळचा देशमुख विठोजी हैबतराव सिलीमकर वगैरे जमावदार लोकांस मोठ्या गौरवाचीं पत्रें लिहून त्यानें आपले बाजूस मिळवून घेतलें. तुम्ही मोठे कार्यकर्ते अहां व हा समय कार्य करून दाखविण्याचा आणि कीर्ति मिळविण्याचा आहे. तरी कोणताही अंदेशा मनांत न धरतां आपले हाताखालचे लोक घेऊन जावळीजवळ

कामगिरीवर यावें व हुकमाप्रमाणें वागून मसलत शेवटास न्यावी. तुम्हांस नांवालौकिकास चढवूं, अशा आशयाचीं पत्रें पाठवून फार मेहनतीनें अफजलखान मोठा पोक्त सरंजाम जमा करूं लागला.[१] मावळांतील खोपडे, पांढरे, इंगळे, वेदरे, बांदल, जेधे वगैरे देशमुख-देशपांड्यांस आपल्याकडे ओढण्याचा आपले हस्तकांमार्फत तो सारखा यत्न करीत होता. यांपैकीं बादल, जेधे यांसारखे कांहीं देशमुख तर पूर्वीपासूनचे विजापूरकरांच्या अन्नाचे शरमिंदे होते. सुमारें दहा वर्षांपूर्वीच जेधे यांनीं खानाचा स्नेह जोडला होता व १५७१ च्या भाद्रपदांत खानानें जोहरखोरें हें कान्होजी जेध्यास दिलें होतें. म्हणजे रणदुल्लाखानाची वाईची सुभेदारी अफजलखानास मिळाली, त्याच वेळेस प्रथम जे लोक त्यानें आपल्या लगामीं लावून घेतले, त्यांपैकींच कान्होजी जेधा हा एक होय. त्या वेळीं शहाजीवर म्हणजे शिवाजीच्या बापावर प्रसंग गुदरला होता. हल्लीं लेकावर म्हणजे शिवाजीवर प्रसंग गुदरावयाचा रंग होता. याकरतां खानानें हे असले हरामजादे आपल्या बगलेंत मारण्यास सुरवात केली.

वर विठोजी नाईक हैवतराव सिलीमकर देशमुख याचे नांवचें खानानें लिहिलेलें पत्र दिलें आहे. या सिलीमकराचे भाऊबंद बाळाजी बिन रुद्राजी नाईक आणि हबाजी नाईक सिलीमकर हे शिवाजीनें आपले बाजूस बांधले होते. या सिलीमकरांचा भाऊबंदकीचा तंटा दीड वर्षापूर्वीं म्हणजे १५७९ च्या चैत्रांत शिवाजीनें स्वत: तोडला होता. तेव्हांपासून या सिलीमकरांची एक पाती याचे बाजूत्री होतीच. पण या वेळीं पुन्हां त्यांस बोलावून आणून शपथ क्रिया दिली व मुक्रर केलें. मंबाजी भोसले यास खानानें मिळवून घेतलें, -हें पाहून बाबाजी भोसले यास शिवाजीनें एकदम चिठ्ठी लिहून आपणांकडे बोलवून घेतलें व त्यास नेमणूक करून देऊन कामगिरी सांगितली. एवंच अफजलखान व शिवाजी हे दोघेही लोकांस आपआपल्याकडे ओढीत होते. दोघेही हें पुढील भांडण फार पराकाष्ठेचें होईल, असें जाणून होते आणि आपआपल्या प्रकारें ते दोघे पुढील तयारीस कसून लागले होते. दोघेही एकमेकांस चांगले जाणत होते; यामुळें दोघांपैकीं कोणीही यत्नांत लवमात्र

१. विठोजी हैवतरावाला अफजलखानानानें पुढील पत्र लिहिलेलें आहे : "अज सरसुभे खान आलि शान एकवाल निशान सिपेह सालार दोरांनी बादजतारी फखान अफजलखान महमदशाही बुलंद दायाम दौलत हु त।। विठोजी हैवतराऊ देशमुख त।। गुंजन माऊल मालूम दाद सु।। सितैन अलफ दरींविले तुमचे बाबे र।। कृष्णाजी भास्कर द।। प।। वाई येही बहुत वजानें तारीफ करून मालम केलें त्यावरून खातिरेसी आलें तुम्ही लोक कामाचे नामोसी असां हा वख्त कामाचा आहे कोणे बाबें जरा अंदेशा न करितां खातीर जमा राखून जावली जवळी आपुले लोक दे।। येउनु जैसे कांहीं फर्मावितील ते व।। मसलहतेस दिल जाव सुशरिक होउनु नेकखोही जाहीर करणें पाहिजैसे मुजराव सरफराजी होईल ये कि।। जाणिजे."

ढिलाई केली नाहीं. साम, दाम, दंड, भेद हे सर्व उपाय जो तो आपआपल्या अकले-प्रमाणें योजीत होता.

अफजलखान हा विजापुराहून सैन्याच्या सरदारकीचीं वस्त्रें व शिवाजी-वरील मोहिमेचें फरमान घेऊन शके १५८० च्या पावसाळ्याअखेर निघाला असावा. तेथून देशीं आल्यावर त्यानें लागलीच या मोहिमेच्या तयारीस जारीनें सुरवात केली. हें साल बहुतेक तयारीत गेलें. कदाचित् उघडच्या मैदानांत गांठून शिवाजीचा समाचार घेण्याचा यत्नही त्यानें या सालीं केला असेल. पण अफझलखानाची पक्की खबर कळल्यावर शिवाजी हा वरघाटीं फार दिवस राहिला नाहीं. साताऱ्याकडचा नीट बंदोबस्त करून तो मावळांत निघून गेला असावा.

शिवाजी हा उघडच्या मैदानांत हातीं लागत नाहीं, असें पाहून अफझलखानानें त्यास मावळांतच गांठण्याचा विचार केला. 'शिवाजी हा बदमाप असून पुंडावे करीत आहे व त्याचें पारिपत्य करण्यासाठी आम्ही तयारी करीत आहों, तरी तुम्ही आम्हांस येऊन लौकर शामील व्हावें,' अशा आशयाचीं पत्रें त्यानें भोर प्रांतांतील नामजाद लोकांस लिहून त्यांस प्रथम वांईस बोलाविलें. पण नंतर तेथून खालीं मावळांत सैन्य उतरून तेथेंच शिवाजीस कोंडून गाठावा व त्याचा फडशा उडवावा, असें त्यानें योजलें. वर विठोजी हैबतरावाला खानानें लिहिलेलें पत्र दिलें आहे. हें पत्र शके १५८१ मधलें आहे. बहुतकरून तें चैत्रांतलें असावें. यानंतर आपले जुने परिचयाचे जेधे देशमुख यांचेकडे त्यानें पेगम बांधण्यास सुरवात केली. कान्होजी जेधा हा बाजी पासलकराचा जांवई असल्यामुळें जेधे आला म्हणजे पासलकरही येईल, असा खानाचा मतलब असेल. यासाठीं प्रथम त्यानें जेधे यास आपणांकडे येऊन मिळण्याविषयींचें पत्र आपला वांई प्रांताचा हवालदार त्रिंबक कान्हो याजकडून लिहविलें. हें पत्र चैत्र शु. ५ मीचें आहे. या पत्रांत "जेध्यांस लिहिलें आहे की, पत्र पाहतांच यावें व येतांना बरोबर स्वार घेऊन यावें. यापूर्वी तुम्हांस पत्र लिहिलें आहेच. तरी 'सिताबीनें' म्हणजे घाईनें स्वार होऊन यावें. खर्चाची तजवीज येथें होईल. ही मसलत तुम्ही येऊन फत्ते केलीत म्हणजे तुम्हांस चांगला नांवलौकिक मिळेल. मर्द माणसें घेऊन यावें. आम्ही तायघाट वलांडून पुढें गेलों," अशा अर्थाचा मजकूर आहे.[१] या पत्रा-

श्री

१ सौजन्यं राजमान्य राजश्री कानोजी नाईक देशमुख तपे भोर किले रोहिडा गोसावियासि त्रिंबक कान्हो हवालदार प।। वाई हर्ची दाद उपरि हजरतखान अजम उपरि हजरतखान अजम साहेबाचा कौल पाठविला असे तरी तुम्ही कोणेबाबे मुलाहिजा न करिता कागद देखताच बहुत सिताबीनें स्वार होऊन जमेन घेऊन एणे हे मसलत तुम्ही फत्ते केलियां तुमचें सरफराजी असे ए विसी पहिलेहि

पुढें चालू

वरून असें स्पष्ट दिसतें कीं, १५८१ च्या चैत्रांत अफजलखानाचें सैन्य तायघाट वलांडून जावळीचे आंगाला पाराकडे गेलें होतें. त्याचे सैन्यांत पायदळ, घोडेस्वार मिळून बराच मोठा जमाव होता व तो हें सैन्य घेऊन पाराकडे आला. वाईहून निघून कुसगांव, चिखली, तायघाट, गुऱ्हेघर, गुताड असे मुक्काम करीत खानाचें सैन्य लिंगमळ्यापर्यंत आलें. कदाचित् महाबळेश्वरच्या डोंगराच्या पठारावर त्यानें कांहीं दिवस मुक्कामही केला असेल. पण त्याचे मनाचा रोख जावळी प्रांतांत कोठें तरी लढाई देण्याचा होता. व याकरतांच वांई मागें टाकून त्यानें सैन्य पुढें आणलें होतें.

वर उल्लेखलेलें पत्र आपणांस आलें आहे, असें कान्होजी जेध्यानें शिवाजीस कळविलें व या कामांत त्याचा सल्ला विचारला. कदाचित् मतलब असा कीं, खानापेक्षां शिवाजी किती जास्त देतो हें पहावें, व खान माझे मदतीची अपेक्षा फार करतो, हें कळल्यानें आपणांस विशेष महत्त्व मिळावें. या पत्रास शिवाजीनें फार गळीं पडल्यासारखें न दाखवितां इतकेंच उत्तर लिहिलें कीं, * तुमचें पत्र आलें त्यावरून कळलें कीं, खानानें जावळीस युद्ध सुरू केलें आहे व आपले जमावानिशी तुम्ही मदतीस सत्वर यावें, असें तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुमचा व खानाचा घरोबा आहे. याकरितां तुम्हांस जाणें असल्यास किंवा आपल्या पुत्रास तिकडे पाठवावें याचा मनोदय असल्यास नीट बोलभाक-कौल घेऊन मग जावें. दगा होईल असें होऊं देऊं नये. किंवा वाटल्यास तुम्ही मागें राहून आपले पुत्रास सेना बरोबर देऊन तिकडे पाठवावें. दोन्ही बाजू लिहिल्या आहेत. वाटेल तसें करावें. तुम्ही शहाणेच आहां. जास्त लिहिणें नको.

..............................................

तुम्हास कागद लिहिला असे त्यावरून कळो आले असेल बहुत सिताबीनें स्वार होऊन एणे एथे माणसाचे खर्चाचेहि सरंजामी होईल मर्दाने खलक घेऊन एणे आम्ही तायघाटाहूनहि पुढें स्वार होऊन गेलो असो बहुत सिताबीने एणे हे कि॥ छ ३ रजबु रोटी आम्हापासी आहे ते एथे आलिवरी देऊन हे कि ॥

* श्रीशंकर

॥ श्रीमत सकलगुणअलंकरणअखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य राजश्री कान्होजी जेधे देशमुख तर्फ भोर किले रोहिडा प्रति राजश्री सिवाजीराजे जोहार येथील क्षेम जाणोनु स्वकीय कुशल लिहिणे तुम्ही पत्रिका पाठविली सकल अभिप्राउ कलो आला लि॥ की खान अलीशानखान अजम येही लिहिले आहे कीं जावलीवरी सुरू केले आहे तरी तुम्ही आपले जमेतीसी सीताब येणे म्हणौनु लिहिले आहे तरी तुमचा व त्यांचा पहिलेपासून घरोबा आहे गेले तरी पाहिजे आमा खासा अगर पुत्र पाठवावयाचे जाले तरी बोलभाक बरवे रिती घेउनु मग जाणे दगा हु ये ऐसे न करणे भले माणूस दरम्यान देउनु मग जाणे तुमचे नजरेसी

पुढें चालू

कान्होजी जेध्याला एकंदर सात मुलगे होते व ही जेधे मंडळी दोन्ही बाजूंला संधान राखून मतलबाला जागून राहणारी होती. तेव्हां याला झिडकारावा तर हा हातचा जातो, गौरवावा तर डोक्यावर चढतो, हें सर्व मनांत आणून शिवाजीनें वरील उत्तर खोल बुद्धीनें लिहिलें. यांत खान दगेबाज आहे, हेंही मोठ्या शिताफीनें हळूच सुचविलें आहे. पत्रावर पैवस्तीची तारीख छ २४ रजब म्हणजे चैत्र वद्य ११ ही आहे. यांत खानानें जावळीस युद्ध सुरू केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे शके १५८१ च्या चैत्रांत अफजलखानानें जावळीकडे जमाव जमवून लढाई सुरू केली होती, असें स्पष्ट झालें.

कान्होजी जेध्यानें शिवाजीचें उत्तर पाहून शपथक्रिया व कौल फरमान मागितलें. कदाचित् इतरांनींही असेच बादशाही कौल मागितले असतील. हे चैत्रांत मागितलेले कौल व पादशाही फर्मान अफजलखानास सामिल व्हावें म्हणून तातडीनें वैशाखात येऊन दाखल झालें.[1] कौल येतांच तो मावळच्या देशमुखाबरोबर कान्होजी-कडे रवाना केला. या वेळीं शिवाजी राजगडास होता. तेथेंच आलेला कौल व आपले पांचजण मुलगे घेऊन कान्होजी शिवाजीचे भेटीस गेला. कान्होजीचें सर्व बोलणें ऐकून घेऊन शिवाजीनें थोडें छद्मी भाषण करून त्यास सांगितलें कीं, हा 'बादशाही हुकूम मोडून तुम्ही राहिलेत म्हणज वतनास अपाय होईल; जिवावर संकट येऊन पडेल. याकरतां तुम्ही (तिकडे) जावें.' शिवाजीच्या शब्दांची खोंच लक्षांत आणून आणि मनांत शरमिंदा होऊन कान्होजीनें उत्तर दिलें कीं, 'आम्ही आपलें वतन साहेबांच्या (म्हणजे शिवाजीच्या) पायांवर ठेविलें आहे. पुढें जें होणें असेल तें होईल.' कान्होजीसारख्या दुटप्पी माणसाच्या या शब्दांनीं समाधान न पावतां शिवाजीनें त्यास सांगितलें कीं, 'तूं हातावर पाणी घेऊन वतनास घाल.' तें ऐकून कान्होजीनें लगेच हातांत पाणी घेऊन राजासमक्ष आपल्या वतनास तिलांजली दिली.

..............................................

**पडत आसिले की खासाच जावे जरी तुमचें मन बार देत नसिले तरी कौल बोल घेउनु पुत्राबराबरी लोक देउनु पाठविजे हरयेक करुन तुम्ही राहणे दोन्ही गोस्टी तुम्हास लिहिल्या आहेती यात तुम्ही स्याहाणे असा बहुत लिहिणे नलगे**

**( मर्यादेय विराजते )**

| मर्यादेयं विराजते | प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णु विश्ववंदिता ।। शाहसूनोःशिवस्येषा मुद्रभद्राय राजते |
|---|---|
| मर्या<br>देयं विरा<br>जते | प्रतिपच्चंद्र लेखेव<br>वर्धिष्णु विश्ववंदिता ।।<br>शाहसूनोःशिवस्येषा<br>मुद्रभद्राय राजते |

पो छ २४ रजब

१. जेधे शकावली, पृ. १८२

पण अफजलखानाचा आणि जेध्यांचा पुरातन घरोबा आहे. आणि खानाचें आलेलें पत्र ज्यांनीं आपणांस दाखविलें ते, न जाणो आपल्या गोष्टी खानास कळवून दुटप्पी तजविजींत असतील, असें शिवाजी समजून होता. आणि हा प्रसंग इतका आणीबाणीचा होता की, या वेळीं असल्या माणसांवर तर लवभरही विश्वास टाकण्याची सोय नव्हती. याकरितां त्यानें जेध्यांकडून त्यांचीं मुलें-माणसें आपल्या लोभांतला माणूस दादाजी कृष्ण लोहकरे याचे कबिल्याबरोबर ढमढेऱ्याचे तळेगांवीं पाठवून दिलीं. यांत दोन्ही साधलीं. कान्होजीच्या मुलाबाळांचे संरक्षणाची तजवीज केल्यासारखेंही झालें. आणि एक प्रकारें हीं मुलेंमाणसें ओलीस ठेवून घेतल्यासारखेंही झालें. व कान्होजीस यापुढें पगडी फिरविण्याची बिलकुल सोय राहिली नाहीं.

अफजलखान विजापुराहून निघाल्याची बातमी शिवाजीला होतीच.[१] त्या वेळीं तो साताऱ्यास होता. अफजलखान हा खास आपणांवरच येत आहे, असें समजल्यावर शिवाजी हा साताऱ्याकडचा नीट बंदोबस्त करून जावळीचे बाजूला आला आणि शिवाजी हा सातारा सोडून जावळी प्रांताकडे निघून गेल्याचें कळल्यावर अफजलखानही आपला मार्ग बदलून वाई येथें आला. उघडच्या मैदानांत शिवाजीला गांठावा, हें प्रथम अफजलखानाचे मनांत होतें. पण तें आतां साधतां येण्यासारखें नसल्यामुळें त्यानें आपला मोर्चा वळवून वांई गाठली, हें नीटच केलें. वांई प्रांताचा तो सुभेदार होता. तेथें त्याची ओळख व माहितीही चांगली होती. आणि पुष्कळ वर्षें तेथें अमल चालविलेला असल्यामुळें त्याला अनेक गोष्टी अनुकूल होत्या. शिवाय जावळी हा मोऱ्यांचा मुलूख मोऱ्यांस मारून शिवाजीनें नुकताच बळकावला असल्यामुळें मोऱ्यांच्या बाजूचे जुने सरदार व अभिमानी लोक यांचें त्याला चांगलेंच सहाय्य मिळण्यासारखें होतें. किंबहुना जावळी प्रांतांतले पुष्कळ लोक शिवाजीच्या कृत्यांच्या ताज्या आठवणी अजून विसरले नसल्यामुळें त्यांचा अफजलखानाला फार उपयोग होण्यासारखा होता. यामुळें ही मसलत जावळी प्रांतांतच उरकावी, असें त्याचे मनांत सहाजिकपणेंच आलें असल्यास

.............................................

१. शिवाजीला ही बातमी अनेक मार्गांनीं लागली असेल. पण कोणा एका रामदासी शिष्यानें ही बातमी पुढील पत्र देऊन गुप्त प्रकारें कळविली, असें एका पुस्तकांत लिहिलें आहे. पत्राची योग्यता व खरेपणा चिकित्सक ठरवतीलच- विवेकें करावें काय साधन । जाणार नरतनू हें जाणोन । पुढील भविष्यार्थी मन । रहाटोचि नये ।। चालों नये असन्मार्गीं । सत्यता बाणलिया आंगीं । रघुवीर कृपा ते प्रसंगीं । दासमहात्म्य वाढवी ।। रजनीनाथ आणि दिवाकर । नित्यनेमें करिती संचार । घालिताती येरझार । लाविलें भ्रमण जगदीशें ।। आदिमाया मूळभवानी । हेच जगताचि स्वामिणी । एकांतीं विवेक धरूनी । इष्टयोजना करावी ।।

नवल नाहीं. तो आपल्या फर्मानांत व पत्रांतही, हें युद्ध जावळीस होणार, असेंच वारंवार दर्शवितो.

यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, शिवाजीनें बोलाविलें म्हणून अफजलखान वांई प्रांत सोडून प्रतापगडाकडे म्हणजे जावळी प्रांतांत गेला, असें मुळींच नाहीं. जावळीस शिवाजीला गांठावें, असें खानानें पूर्वीपासून ठरवून त्या प्रांतांत लढाईची तयारीही चालू केली होती. आपला प्रांत मागें टाकून शत्रूच्या हद्दींत जाऊन लढाई करावी, हें कोणीही सरदार प्राय: फार सोयीचें समजतो. तशांत मावळांतले देशमुख वगैरे लोक खानाला मिळूं लागल्यामुळें तो प्रांत खानाला सोयीचा वाटला असावा. किंवा कदाचित् शिवाजीला मावळांतून हुसकावून बाहेर काढणें फार कठीण वाटल्यामुळें खानानें शिवाजीला मावळांतच शह देण्याच्या उद्देशानें जावळीकडे सैन्याचा तळ दिला असावा. पण खान शके १५८१ चे चैत्रांतच जावळीकडे तयारी करीत होता, हें निश्चित आहे.

शके १५८० चे अखेरचे सुमारास शिवाजी कदाचित् सातारा प्रांतीं असावा.[1] पण त्या प्रांतांतला बंदोबस्त करून शिवाजी लवकरच पुरंदरास आला[2] व पुरंदराहून पुढें राजगडास गेला. शिवाजी राजगडाकडे गेला, असें पाहून अफजलखानानेंही आपला मोर्चा त्या आंगाला १५८०च्या अखेर फिरविला असावा. शके १५८१ च्या प्रारंभीं चैत्रांतच जावळी प्रांतांत सैन्य रवाना केलें होतें किंवा करीत होता. खान या प्रांतांत सैन्य जमा करूं लागल्यावर शिवाजी ह्याही प्रांताच्या बंदोबस्ताची नीट तजवीज करूं लागला.

गुप्त कटाचा वास शिवाजीच्या नाकाला फार दुरून येत असे. दिल्लीस पांचशें कोसांवर काय खलवतें होतात, याचा कडका त्याच्या कानाला राजगडच्या किल्ल्यांत लागत असे आणि विजापूरच्या दरबारांतले प्रकार त्याला मावळांतून दिसत असत. अशा तीक्ष्ण माणसाला वांईस अफजलखान काय खलबतें करतो, याचा सुगावा स्पष्ट लागत असला पाहिजे, यांत संशय नाहीं. अफजलखानाच्या जंगी तयारीची बातमी शिवाजीला पूर्णपणें होती. आणि यास नीट तोंड देतां यावें म्हणून त्यानें सोनोपंत, निळोपंत, मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर सरनोबत, रघुनाथ बल्लाळ सबनीस, गोमाजी नाईक पानसंबळ, गंगाजी मंगाजी, अनाजी दत्तो, सुभानजी नाईक आदिकरून आपल्या पदरचीं मातबर व युक्तिवान माणसें जवळ बोलावलीं आणि त्यांच्याशीं खलबत करून पुढील तजविजीची वाटाघाट केली व आपले सैन्याचा जमाव त्या प्रांतीं नीट जमविला.

१. मराठी दप्तर, रु. १.
२. शिवदिग्विजय.

नेताजी पालकर सरनोवत घोडेस्वारांचा अधिकारी, यास आपले स्वार घेऊन घाटमाथ्यावर जावळी प्रांताकडे वोलावला. मोरोपंत पेशवे यांचे हाताखालीं त्रिंवक भास्कर व शामराजपंत पद्मनाभी हे सरदार ठेवून त्यांस कोकण प्रांतांत ठेविलें. असें केल्यानें आपल्या पाठीमागची वाजू निर्धास्त झाली व रायगड, प्रतापगड वगैरे किल्ल्यांस आणि महाड प्रांतास चांगला आधार झाला. त्या वाजूंनीं दाणा रसद येण्यास व हरतऱ्हेच्या तरतुदी राखण्यास सोयीचें झालें. याचप्रमाणें इतर हिंमतवान सरदारांसही नाक्यानाक्याचीं ठिकाणें नेमून दिलीं. यामुळें एक्यायशींच्या उन्हाळ्यांत खानास विशेष असें कांहींच करतां आलें नाही. पुढें लवकरच पावसाळा लागला. अर्थात् आपलें सैन्य हालवून परत नेणें किंवा तेथेंच त्या अडचणीच्या जागीं छावणी देऊन राहणें यांवांचून तिसरा मार्ग खानास राहिला नाहीं.

चढत्या घोड्यानिशी येऊन शिवाजीची एकदम खोड मोडण्याची प्रतिज्ञा करून आलेल्या खानाला आतां सवंध पावसाळा खिचडी खात वसणें प्राप्त झालें. महावळेश्वर-प्रतापगडाकडे वैशाखाचे वद्य पक्षांतच ( मेअखेर ) वरसात सुरू होते. तेव्हां वैशाखापर्यंत खानाचे हातून कांहीं झालें नाहीं व त्यानंतर त्याला कांहींही करतां येणें शक्य नव्हतें, हें उघड झालें.

वैशाखानंतर ज्येष्ठ व आषाढ हे दोन महिने वारा-पाऊस जोराचा असून नदी-नाले तुडुंव भरून जोरानें वाहत असतात. तेव्हां हे दोन महिने तसेच जाऊं देणें अवश्य होतें. या महिन्यांत शिवाजी कदाचित् राजगडीं असेल.

पण शके १५८१ च्या श्रावण शु. २ ला शिवाजी महावळेश्वराखालील जावळी प्रांतांत आला. ते पर्जन्यकाळचे दिवस व त्या दिवसांत प्रतापगडावर पाऊस सारखा मुसळधार पडत असून आठ आठ दिवस सूर्यदर्शनही होत नाहीं. यामुळें श्रावणांत महावळेश्वराचे खालचे खोऱ्यांत जावळी प्रांतांतच राहणें सोयीचें होतें, व शिवाजी तेथेंच राहिला होता. असें सांगतात कीं, या वेळीं श्रीसमर्थ रामदासस्वामी हे कांहीं दिवस महावळेश्वरास राहत होते व तेथें त्यांचीं कीर्तनेंही होत असत.[1] याच साली समर्थांच्या दासवोध ग्रंथाची रचना चालू होती, हें प्रसिद्ध आहे. मार्गशीर्षांत शिवाजीची स्त्री सईवाई ही फार आजारी होती. यामुळें तर गडावर राहणें गैरसोयीचें होतें. भाद्रपद वद्य १४ स म्हणजे सर्वपितरी अमावास्येचे आदले दिवशीं सईवाई मरण पावली. ही निंवाळकरांची लेक व संभाजीची आई होय. संभाजी या वेळीं अवघा दोन वर्षांचा होता. सईवाईची उत्तरक्रिया झाल्यावर कांहीं दिवसांनीं पाऊस कमी होतांच शिवाजी हा आपली आई जिजावाई व आपला मुलगा

१. धौममहावळेश्वरवर्णन पहा. या संवंधाचे कांहीं कागद महावळेश्वर येथील भटजीजवळ आहेत असें कळलें. हे कागद मला पाहण्यास मिळाले नाहीत.

संभाजी यांस घेऊन प्रतापगडावर राहण्यास गेला.[१] कार्तिकांत शिवाजी आपल्या कुटुंबासुद्धां प्रतापगडावर राहत होता व पुढील संकटाला तोंड देण्याची तयारी तो तेथूनच करीत होता. या समयास खानाचे सैन्य जावळी प्रांतात पुन्हां वावरूं लागलें असावें. व पोवाडेकार म्हणतो, 'गड वेढा दिला चवदा दिवस कोंडा केला.' यावरून किल्ल्यास वेढा देऊन शिवाजीस कोंडून टाकण्याचा खानानें यत्न केला असावा. मागें सांगितलेले कान्होजी जेध्याची शपथक्रिया वगैरे प्रकार प्रतापगडासच झाले. आणि त्यानंतर त्यानें जेध्यांचे कबिले ढमढेऱ्यांच्या तळेगांवास[२] सुरक्षितपणें नेऊन ठेवविले. यावरून पुणें प्रांतांत शिवाजीचा अंमल चांगला असून तिकडील दळणवळणाचे मार्ग शिवाजीनें शाबूत राखून ठेवले होते, हें उघड आहे. जेध्यांची बेलरोटीवर हात ठेवून शपथक्रिया झाल्यानंतर त्यांचेच विद्यमानें बांदल[३] देशमुखांचा जमाव व हैबतराव सिलीमकर व पासलकर

---

१. या गडबडीचे प्रसंगीं प्रतापगडास शिवाजी सहकुटुंब राहत असे, असें मानण्यास हरकत नाही. दंतकथा व कांहीं ग्रंथकार यांचेही म्हणणें असेंच आहे. शिवाजीची आई जिजाई ही कर्तबगारीची व खोल अकलेची बाई होती. शिवाजीच्या गैरहजिरींत ती कारभारही पाही व राजकारणी हुकूम सोडून न्यायमनसुब्याचें कामही ही करी. हिचे हुकूम, महजर, निवाडपत्रें हल्लीं उपलब्ध आहेत. मजजवळील पत्रावर जिजाईचा शिक्का हिंदवी आहे. या या प्रसंगांत कांहीं तरी कठीण व वेडावाकडा प्रसंग आला तर उमाजीला राज्य द्यावें, असें शिवाजीचे मनांत होतें, असें पवाडेकार सुचवितात. उमाजी हा शिवाजीचा वडील भाऊ जो संभाजी त्याचा—दत्तक नव्हे—औरस मुलगा. यास शके १५८१ च्या कार्तिकांत व. १२ स पांच सरून सहावें वर्ष लागलें होतें. उमाजीस पुढें मोठे वयांतही साधी सही देखील करतां येत नव्हती, असें दिसतें.

( जेधे श. पहा. )

२. दादो कृष्ण:—जेध्यांचे कबिले शिवाजीनें दादाजी कृष्णाचे कबिल्याबरोबर तळेगांव ( ढमढेरे ) येथें पाठविले. या दादाजीचें उपनांव लोहकरे. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. यांचे वंशज भोर येथें फडणिसीच्या कामावर असतात.

३. खोपडे देशमुखांत बबई खोपडी ही जहांबाज बाई होती, व ही खानास मिळाली होती. हिजप्रमाणें बांदल देशमुखांत दिपाबाई या नांवाची एक कर्तृत्ववान बाई होती. हिनें आपलेतर्फें दत्ताजीपंत म्हसवडे यास शिवाजीकडे हेजिबीस पाठवून ती आपल्या लोकांसह त्यास जाऊन मिळाली. याबद्दल म्हसवडे जोशी यांचे येथील महजरांत पुढील उल्लेख आहे : "कृष्णाजीपंत नाइकास दादोजी कोंडदेव गोचिवडे यांनीं मारलें. . . मग दिपाबाई ही शिवाजीमहाराजांकडे जावळीस अफजुलखान आला होता; त्याचे मोहिमेस चाकरी लोक नेले तेव्हां (तिचे तर्फें) दत्तोजीपंत म्हसवडा हेजिबास ठेवला." बखरकार दत्ताजीपंत हेजिबीस गेला असें चुकीनें लिहितात तो कदाचित् हाच असावा. यास या वेळीं चांगली कामगिरी केल्याबद्दल कांहीं वतनही बक्षिस मिळालें आहे. (हा महजर भोरास म्हसवडे यांचे वंशजांकडे आहे.)

व ढमाले[१] व मरळ[२] व ढोर[३] यांस बोलावून आणून अंतस्ते यांच्याही क्रिया महाराजांनीं घेतल्या व हशमाचा जमाव खरा केला.

दोन्ही बाजूंनी ही जय्यत तयारी चालू असतां वाईहून अफजलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर[४] हा खानाकडून प्रतापगडावर शिवाजीमहाराजांकडे आला. व त्यानें अफजलखानानें म्हणणें शिवाजीस कळविलें. त्यांतला मतलब इतकाच होता कीं, 'सरकारांतून मला तुमच्यावर मोहिमेस धाडलें आहे. पण तुमचा व माझा अकृत्रिमपणाचा घरोबा जाणून मी तुमच्या सर्व कृत्यांची विजापूर दरबाराकडून माफी करवून देईन. आणि तुमच्या वडिलांपेक्षां ( शहाजीपेक्षां ) तुम्हांला अधिक मरातब देववीन व तुम्ही सांगाल तसा तुमचा बंदोबस्त करून देईन. कृष्णाजी भास्कराचें हें दरबारी भाषण ऐकून यांतला बद आवाज कोणाच्याही कानाला कळण्याजोगा होता. इतक्या झोंकानें मिशील पीळ भरून आलेला हा सरदार, अशा जय्यत तयारींत असतां व अजून कच खाण्यासारखें कोणतेंही विशेष कारण घडलें नसतां, आपणहोऊन वकील पाठवून शिष्टाईचीं बोलणीं बोलतो, व आपणांस ( शिवाजीला ) फायदेशीर वाटतील तशाच अटी पहिल्याच भेटीला कळवितो, तेव्हा यांत कांहीं तरी काळेंबेरें आहे असें कोणाचेही मनांत यईल व तें शिवाजीच्याही मनांत आलें असल्यास नवल नाहीं. तरी याचा आणखी छडा लावण्याच्या उद्देशानें आलेल्या वकिलास त्या दिवशींच रजा न देतां मुद्दाम गडावर राहून घेतलें व तेथें त्याची सर्व तऱ्हेनें उत्तम सरबराई ठेवली.

दुसरे दिवशीं शिवाजीनें अशी मसलत योजिली कीं, आलेल्या वकिलाबरोबर म्हणजे कृष्णाजी भास्कराबरोबर आपल्यातर्फे आपला वकील पंताजी गोपिनाथ

---

१. ढमाले:—हे मूळ मद्रासकडील तिनेवेली प्रांतांतले राहणारे. मुळशी पेट्यांत पौड खोऱ्यांत यांची शेकडों वर्षांची वसाहत आहे. यांचा किताब 'राऊतराव' असा होता. याचें नांव रामाजी राऊतराव ढमाले. सिलीमकराच्या शके १५७९ मधील शिवाजीनें दिलेल्या एका महजरावर याची साक्ष आहे.

२. मरळ :— याचें नांव बाबाजी बिन कान्होजी मरळ. हे झुंजारराव असा किताब लावीत. हे कानद खोऱ्याचे देशमुख. यांचे वंशज पंतांचे हद्दींत पावें दापोडें येथें आहेत. यांचा मूळ पुरुष राघोजी. पुढें राघोजी–बाबाजी–कान्होजी–बाबाजी–कान्होजी–नारायणजी इ. इ. कान्होजीस छत्री व दिवटीचा मान होता. या बाबाजीस कांहीं कसुरीबद्दल शके १५७९ मध्यें चांगली तंबी दिली होती. तेव्हां त्यास या वेळीं जेध्यांचे मार्फत वळवून घेतलें.

३. ढोर :—हे वेळवण खोरे येथील देशमुख. मूळ उपनांव धुमाळ. यांचा भाऊबंदकीचा तंटा शिवाजीनें तोडून महजर करून दिलेला होता. यांचा वंश भोराजवळ पसुऱ्यांत आहे.

४. हा वाईचा कुळकर्णी. हल्लींचे वाईचे कुळकर्णी याचेच वंशज आहेत.

यास खानाकडे रवाना करावें, म्हणजे खानाचा काय घाट आहे हें नीट रितीनें कळून यईल. असें चित्तांत आणून त्यानें पंताजी[1] गोपिनाथास बोलवून आणून त्यास 'खानाची भट घेवन बोली चाली करणें, खानास क्रिया शपथ मागणें. ते शपथ मागतील तरी तुम्हीं देणें. अनमान न करणें' असें सांगून शिवाय असेंही सुचविलें कीं, 'याखेरीज सन्यामध्यें युक्तीप्रयुक्तीनें शोध मनास आणावा. व खानाचें चित्त आमच्या बऱ्यावर आहे कीं वाईटावर आहे याचाही शोध करावा.' असें पंताजीस सांगून त्यानें कृष्णाजी भास्करावरोवर अफजलखानास निरोप पाठविला कीं, "तुम्हीं जावळीस यावें. आम्ही भेटीस येऊं. आमच्या मनांत कपट नाहीं." व त्यावरोवर पंताजी गोपिनाथास खानाकडे पाठविला. व रीतीप्रमाणें वस्त्रें आणि नंतर नजराणे देऊन कृष्णाजी भास्कराची रवानगी केली. तेथें खानाकडे गेल्यावर कृष्णाजी भास्करानें अफजलखानास शिवाजीचें सर्व म्हणणें कळविलें व आपणां-वरोवर आलेल्या शिवाजीच्या वकिलाची आणि खानाची एकांतीं भेट घालून दिली. शिवाजीकडील उत्तर व पंताजी गोपिनाथाचें बोलणें ऐकून खान म्हणाला, 'शिवाजी राजा हरामजादा काफर आहे. जावळी ही जागा कुवल कठीण आहे. तेथें भेटीस यावें म्हणून बोलावतों.' खानाच्या मुलाकतीनंतर पंताजी गोपिनाथानें खानाच्या लोकांस लांचलुचपत देऊन व मुत्सद्दी वजीर याजजवळ शोध करून अंतःस्थ ठाव काढला. तेव्हां त्यास असें कळलें कीं, शिवाजी युद्ध करतां हातीं सापडणार नाहीं, यासाठीं राजकारण लावून भेट घ्यावी व भेटीच्या वेळीं दगा करावा, अशी तजवीज करण्याचें खानानें योजिलें आहे.

पंताजी गोपिनाथ हा शिवाजीच्या फार विश्वासांतला असा जुना कदीम नोकर होता व पंताजीला शिवाजीच्या बऱ्याविषयीं पोटतिडीकही फार होती एऱ्हवीं हें असलें नाजुक काम त्याच्याकडे आलें नसतें. वयानेंही तो चांगला पोक्त मुरलेला असून हा जिजाबाईच्या मायेंतला माणूस होता. या पंताजी काकाला खाना-कडून परत आल्यावर शिवाजीनें एकांतांत आपल्या भेटीस बोलाविलें व त्याच्या-पाशीं बरेंच खलबत करून, त्याचेजवळून खानाकडील सर्व हकिगत ऐकून घेतली. शिवाजीनें खानाचे सर्व मतलब आणि डावपेच याच्यापूर्वींच ताडले असतील. पण

---

१. पंताजी गोपिनाथ— याचें उपनांव बोकील. हा शहाजीचे वेळेपासून नांवालौकि-कास चढलेला होता. याजवर जिजाईची मर्जी विशेष असे. सुपें व बारामती येथील कुळकर्णीपण याचे पूर्वजांकडे होतें. या वतनाबद्दल कोणा बुचके उपनांवाच्या गृहस्थाचा व त्याचा तंटा होता. तो मलिकंबरचे व शहाजीचे वेळीं निवडला होता. पण पुन्हां तो शिवाजीनें भीड खर्चून मध्यस्ती करून मिटविला. सबा खमसैन अलफ (शके १५७८) चे एका सनदेंत यास चिटणवीस म्हटलें आहे. यावरून या सालीं चिटणविशी याजकडे असावी.

आतां तर खानाच्या कृत्यांबद्दल त्याला सर्व खुलासा स्पष्ट झाला. आणि यापुढें संशयाचें कारणच उरलें नाहीं. अर्थात् शिवाजी अधिक सावधगिरी बाळगून फार दक्षतेनें वागूं लागला असला पाहिजे, हें अगदीं उघड आहे.

खानाच्या गोटांतल्या प्रकारावरून शिवाजी हा पुष्कळ सावध राहिला होता. नंतर अनेक दिवस या दोघांचे निरोप व मध्यस्ती होऊन शेवटीं अफजलखानानें येऊन शिवाजीची प्रत्यक्ष भेट घ्यावी असें ठरलें व थोडेच दिवसांत या दोन्ही योद्धयांची प्रत्यक्ष भेट होण्याचे करार मुक्रर होऊन दोघेही या महत्त्वाच्या भेटीच्या तयारीस लागले. ही भेट वांई येथें व्हावी, असें प्रथम खानाच्या मनांत होतें. पण तें शिवाजीच्या मनांत नव्हतें. तेव्हां वकिलाकडून खानास कळविलें कीं, "राजा कचदिल आहे. वाईस येऊन भेट घेण्यास भितो." आतां हा डाव असा सोडणें बरें नाहीं व 'हातीं आला ससा । तो जाऊं द्यावा कसा?' असा विचार करून आपला वाईचा आग्रह सोडून उंबरघाट ओलांडून परक्या रानांत जाण्यास खान तयार झाला. माशाला गळाचें अमीष नीट लागलें.

अफजुलखानाची जिव्हा सलुखाचे गोड शब्द बोलत होती. तेव्हां त्याचें मन निराळेच बेत रचीत होते व त्याचे हात देशमुख-देशपांडयांना जमाव घेऊन लवकर येण्याविषयीं पत्रें लिहिण्यात गुंतले होते. अफजुलखानाचा हा निरोप केवळ बदकर्मी आणि लबाडीचा आहे, हें एखादें पोर देखील समजलें असतें. तें समजण्याला शिवाजी-सारख्या धूर्त आणि चाणाक्ष मनुष्याची गरज मुळींच नव्हती. विजापूर दरबारांत आपले जे दुष्मन आहेत, त्यांत अफजुलखान हा अग्रगण्य आहे, हें शिवाजी चांगलें जाणत होता. आणि शिवाय अफजुलखानाच्या कामगिरीची आणि बडे साहिबिणीच्या हुकमाची बातमीही त्याला लागलेली होती. इतकेंच नव्हे तर अफजुलखान मावळ खोऱ्यांतल्या देशमुखांना कशीं पत्रें लिही, हेंही शिवाजीला कळे व केव्हां केव्हां तर या पत्रांना कशीं उत्तरें लिहून पाठवावीं, हेंही शिवाजीच सुचवी. अशा वेळीं अफ-जुलखानाचा हा निरोप आला, त्याला त्याच सुरांत शिवाजीनेंही आपला वकील पंताजी गोपीनाथ बोकील याजबरोबर उत्तर पाठविलें कीं, "जसे शहाजीराजे तसे तुम्ही. आपण खानाचा भतीजा होय." मनांतले विचार शब्दांनीं बोलून दाख-वावे, याकरतां देवानें जिव्हा दिली आहे. पण पुष्कळ वेळां माणसें जिभेचा उपयोग मनांतले विचार बाहेर कळूं न देण्याकडे करतात. या वेळीही शिवाजी आणि अफ-जुलखान हे दोघेही आपल्या जिभेचा असाच उपयोग करीत होते व एकमेकाला शब्दाचें खेळणें दाखवून ते खेळवीत होते. पण दोघेही एकमेकांना चांगले ओळखीत होते आणि दोघेही एकमेकांचीं कृत्यें डोळयांत तेल घालून पाहात होते.

वांई येथून अफजलखानाचे तर्फे कृष्णाजी भास्कर व प्रतापगडावरून शिवाजी-तर्फे पंताजी गोपिनाथ हे एकमेकांच्या छावणींत जाऊन वकिली मसलतीचीं बोलणीं

वरपांगीं बोलत होते. आणि या दोन्ही सरदारांचे हेर एकमेकांच्या गोटांत निरनिराळ्या मिपानें जाऊन बातम्या काढीत होते. शिवाजीतर्फे कोणी विश्वासराव या नांवाचा मनुष्य दररोज फकिराचा वेष घेऊन खानाच्या लष्करांत भिक्षा मागण्याकरितां जाई व तेथून बातमी काढून आणी, असें म्हणतात. या हेरांच्या जातीचे प्राणी सर्व राजेलोक बाहेरून निंदतात व ते हातीं सापडले म्हणजे त्यांना देहान्त शासन देतात. पण हे असले प्राणी सर्व राजे लोक आपआपल्या दरबारीं हमेशा पाळतात. दिवसाच्या उजेडांत हे प्राणी नीट वावरत नाहींत. पण रात्रीच्या काळोखांत यांचा सुळसुळाट फार असतो. हे असे लोक जवळ पाळणें किंवा त्यांना शत्रूचे गोटांत चोरून पाठविणें यांत कोणतेही प्रकारचा कमीपणा कोणी समजत नाहीं. उलट वकिलाप्रमाणेंच हेर हा जितकें जितकें खोटें जास्त सफाईनें बोलेल आणि सोंगाची बतावणी अधिक करील, तितका तितका तो हुशार व सन्माननीय समजला जातो. अशा या हेरांकडून शिवाजी व अफजुलखान हे एकमेकांच्या छावणींतली वित्तम बातमी काढून पाळत राखीत.

अफझलखानाचे मनांत दगा असेल, असें मराठ्यांना वाटण्यास आणखीही एक कारण आहे. " मुसलमान बेइमान । खान राखीना तुम्हाला " असें जिजाई म्हणते. जिजाई ही जाधवांची मुलगी. रामदेवराव जाधवाचा इतिहास तिला चांगला माहीत असेल, हें सहज दिसतें. रामदेवाचा पराजय करणारा अल्लाउद्दिन हा परत दिल्लीकडे गेला तेव्हां प्रत्यक्ष दिल्लीस न जातां औधमध्यें कारा येथें राहिला व तेथून त्यानें आपला चुलता दिल्लीचा बादशहा जलालउद्दीन यास फार नम्रतेनें निरोप पाठवून कारा येथें भेटीस बोलाविलें. आणि आपला धाकटा भाऊ अलतमसबेग याजबरोबर पादशहास फार नम्रतापूर्वक विनवण्या करून व आपण भितों असा बहाणा करून, पादशहानें कारा येथें येऊन आपणांस भेट द्यावी व अभिवचन देऊन समजूत करावी, असें ठरविलें. आणि या भेटीस पादशहानें एकटेंच निःशस्त्र यावें, असा हट्ट धरून तेंही कबूल करविलें. अखेर पादशहा जलालउद्दिन हा असा एकटाच भेटीस आला असतां भेटीचे वेळीं अल्लाउद्दिनानें पादशहास जखम करून ठार मारिलें व त्याचें डोचकें छाटून टाकलें. ही पूर्वी घडलेली गोष्ट जिजाईस माहीत असणें साहजिक आहे व यावरून भेटीचे प्रसंगीं दगा होण्याची भीति मनांत येऊन तिनें शिवाजीस वारंवार सूचना दिल्या असल्याचाही संभव आहे. असो.

पार मुक्कामीं आल्यावर अफजुलखानानें शिवाजीकडे पुन्हां वकील पाठविला व भेटीचा दिवस आणि वेळ कायम ठरविण्यास सांगितलें. महाराजांकडे वकील आला ते दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध पंचमी होती. कृष्णाजी अनंत लिहितो कीं, " खानाचे वकील राजियासि जाऊन भेटले. लौकिक बोलणें जे बोलावयाचें तें बोलिले. एकांतीं मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं, आपण बोलल्याप्रमाणें खानास घेऊन आलों.

आतां तुमची त्यांची भेट एकांतीं खासे खासे यांची करवितों. तुम्हीं हरिफी करून कार्यभाग करणें तो करावा. म्हणोन सांगितलें. भेटीस एक दिवस आड करून दुसरे दिवशीं भेटावें असें केलें. राजे गडावरून उतरावे. खानांनीं गोटांतून पुढें यावें. उभयतांनीं दरम्यान डेरे देऊन खासे भेटावें. ऐसा निश्चय करून राजाचा निरोप घेऊन खानाजवळ गडाखालीं माचीस उतरून गेले. खानांस वर्तमान सांगितलें. खानानेंही तें मान्य केलें."

खलवताचे वेळीं भेटीचा दिवस एक दिवस आड करून ठरविला, याचें कारण दुसरे दिवशीं चंपाषष्ठी होती हें होय. दुसरें कारण असें दिसतें कीं, खानाचें सैन्य व त्याचे कांहीं सरदार जावळी प्रांताचे बाजूला असले तरी अफजलखान हा खुद्द खासा स्वारी वांईसच राहत असावा. तेथें निरोप पोहोंचून खान तेथून निघून प्रतापगडाकडे येण्यास वेळ मिळावा; आणि शिवाय खानालाही जावळी प्रांतांत त्यांचे लोक पसरलेले असतील त्यांना प्रतापगडाच्या भेटीची वर्दी पोहोंचून गडाखालीं पाराजवळ येण्यास अवसर सांपडावा. आतां मध्यें वेळ फार राहिला नव्हता. याकरतां खानाला येण्यास सर्व प्रकारें शिवाजीनें आपले लोकांकडून मदत दिली. व त्याचे गोटाखालून प्रतापगडचे बुरजाखालीं सदर तयार केली होती तेथपर्यंत, झाडें वगैरे तोडवून शिवाजीनें चांगली वाट तयार करून दिली. भेटीस एकच दिवस आड होता. तेव्हां इतक्या वेळांत वाट तयार करतां येईल इतक्या अंतरावरच खानाचा गोट असला पाहिजे, हें उघड आहे. भेटीस येण्याचें ठरवल्यानंतर खानान आपला मुक्काम मौजे पार येथें कोयनेच्या कांठीं केला. हेंच ठिकाण या वेळीं डेरे देण्याला उत्तम होतें. कारण तेथून भेटीसाठीं ठरलेली जागा अगदीं टप्प्यांत येते व नदीकांठ असल्यामुळें, तो पाठीशीं घालून किल्ल्याला चटकन शह देण्यालाही हें ठिकाण सोयीचें आहे. अफजलखान येथें, येऊन पोंचतांच शिवाजीचे कारकुनांनीं 'शतावधी वेगारी ओझीं नेऊन रुबरू हजीर केले. एक कारकून जवळ राहिला. येणेंप्रमाणें खानाच्या आदरसत्काराची सर्व तजवीज शिवाजी महाराजांनीं यथास्थित केली.'

दिवस नक्की ठरवून वकील निघून गेल्यावर शिवाजीही सावधपणानें तयारी करूं लागला. प्रथम गडाचे खालीं डोंगराच्या चढणीवर एक उत्तम सदर तयार करण्यास त्यानें अनाजी रंगनाथ मलकरे[1] यास सांगितलें. नंतर सैन्य दूर दूर ठेवलें होतें, तें जरा जवळ आणून सरदारांस ठिकाणें नेमून दिलीं. ढवळे घाटांत चंद्रगडावर लोक ठेवले. ही लहानशी जागा अशी आहे कीं, तेथून सभोंवतालचा प्रांत स्पष्ट दिसतो. पण येथें सैन्य घेऊन जाणें हें शत्रूस फारच अवघड आहे. अशाच इतर उंच

१. कांहीं ठिकाणीं 'मळेकर', 'माळेकर' असें आढळतें. हा पुढें विजापूरकरांच्या युद्धांत नांवाजला गेला. हा धनाजी जाधवाचे हाताखालीं असावा.

उंच पर्वतशिखरांचीही नाकेबंदी नीट केली व सैन्यास हुकूम दिले कीं, "कोसा-कोसावर कारकून, हवालदार, नाईक लोकांनीं बसावें. कोठें लोकांची किलकारी झाल्यास, एकमेकांचें साह्य करावें, व मसलतीचा इशारा प्रसिद्धतेचा, कचेरींतून उठतांच कर्णा व्हावा. त्यावरी तोफ किल्ल्यावरची करावी. तोफ ऐकून एकावच्छेदें अरि सबंध शस्त्रहत होतील ( असें करून ) शत्रूचा नाश कळेल तसा करावा." ठिकठिकाणीं सैन्याचा जमाना न दिसे अशा बेतानें झाडींतून व जाळ्यांतून लोक बसविण्याची तजवीज केली.

गडाजवळच किल्ल्याच्या बुरजाखालीं सदरेस जागा तयार केली. ही जागा अशा ठिकाणीं होती कीं, गडावरून तेथें चाललेला तमाशा सर्वांस सहज दिसावा गडाच्या तटावरील तोफांच्या भोंकांतूनही ही सदरेची जागा व तसेच अफजुल-खानाच्या लष्कराचा गोट हीं स्थळें अगदी सहज स्पष्ट दिसतात.

सदर तयार केली होती ती फार उंची व अफजुलखानाचे इतमामास शोभेल अशीच केली होती. ' डेरे, बिछाने व अस्मानगिरी ( छत ), गिर्द्या, तक्के ठेवून जागा सजवली होती. त्या डेऱ्यास चंदाराई[1] कळस सोन्याचे लावले होते व मोत्याच्या झालरी सोडल्या होत्या. सर्वभर उंची मखमली पडदे लावले होते. या तंबूत एक चौत्रा पूर्व-पश्चिम ३३ फूट रुंद व दक्षिणोत्तर ४० फूट लांब इतका होता.[2]

सदरेची जागा तयार झाल्यावर शिवाजीनें खानाचे वकिलास चिठी लिहून कळविलें व त्याप्रमाणें कळविल्यावरून भेटीची जागा कशी आहे, हें पाहण्यास आपलेकडील विश्वासू मनुष्य पाठवून खानाने चौकशी केली. त्यांनीं जाऊन पाहून जागा चांगली आहे, असें खानास कळविलें.[3]

सदरेच्या बैठकीची आणि तेथल्या मजलसीची तयारी सढळ हातानें, आपल्या-कडे येणाऱ्या पाहुण्याच्या ऐश्वर्याला साजेल, अशीच केली होती. व हिकडे, ही तयारी चालू असतां, इतर सावधगिरीच्या बाबीही शिवाजी विसरला नाहीं. सभो-वतालीं ठेवलेल्या सरदारांचा गराडा त्यानें आतां आणखी आंवळता धरला व

...............................................

१. चंद्रराव मोऱ्याचे आणलेले ?

२. शके १८४१ मध्यें मी गेलों तेव्हां या चौथ्याचे सर्व दगड ठिकाणच्या ठिकाणीं होते. त्या वेळीं त्यांची लांबी-रुंदी माझे मित्र भाईसाहेब गोरेगांवकर सालिसिटर यांनीं व मीं मोजून टिपण केलें. हल्लीं हे सर्व दगड उपटून फेकून देऊन ही जागा सुमारें कंबरभर खणून काढली आहे. जागा तेव्हां अगदीं अरुंद होती. याचें महत्त्व असें की, तेथें खानानें पुष्कळ लोक आणावयाचें मनांत आणलें असतें तरीही तें अशक्य होतें. तिन्ही बाजूंला डोंगराचे कडे तुटलेले होते. हल्लीं माती व दगड खणून टाकून ही जागा पुष्कळ रुंद केली आहे. ह्या जाग्यावर ती पुराणवस्तु संरक्षक कायद्याखाली राखून ठेवल्याबद्दलची पाटी तेव्हांही होती व हल्लींही आहेच.

३. मल्हारराव चिटणीस.

सैन्याचा घेर लहान करून लोक जरा जवळ आणले. भेटीची जागा हा मध्यबिंदु धरून त्याचे सभोंवार चौफेर लोक ठेवले. जेधे लिहितात कीं, " राजश्री स्वामींनीं विचार केला कीं, मुसलमान वेइमान आहे. . कदाचित् भेटीचे समयीं त्यानें वेइमानी केली तरी त्याचे लष्कर पारांत आहे तें डोंगरांत चढूं न देणें, आणि निवडक माणूस घेऊन आपली मदत करणें " म्हणून हैवतराव व बाळाजी सिलीमकर यांना त्यांच्या जमावानिशीं बाचेघोलीचे घाटीं ठेविलें. हा घाट कारनाक पाईंटवरून जरा खालीं उतरलें कीं, अगदीं स्पष्ट दिसतो. हा अशा ठिकाणीं आहे कीं, येथून थोडया माणसांनाही पाराहून प्रतापगडावर जाऊं पाहणाऱ्या लष्कराला सहज अडवतां येईल. येथें आपले लोक नीट तजविजीनें ठेवल्यामुळें, अफजुलखानाच्या सैन्याला हा उत्तम शह झाला व तें सैन्य पारावरून वर प्रतापगडाकडे चढूं न देण्याचा बंदोवस्त पक्का झाला. म्हणजे आतां सैन्याच्या पलीकडे जावळीचे अंगाला हा सरदार जमावानिशीं असून पलीकडे सिलीमकरांचें लष्कर तळ देऊन राहिलें आणि अफजुलखानाचें सैन्य चांगलेंच कोंडलें गेलें. त्याला वरही येतां येण्यासारखें नव्हतें व मागें फिरून परत जाण्याचीही सवड त्याला आतां राहिली नाहीं. पवाडेकार म्हणतो, 'जाऊं जाणें येंऊ नेणें । ही गत अवदल्याची झाली ।।' चक्रव्यूहांतल्या अभिमन्यूप्रमाणें तो कोंडला गेला.

पारापासून वर सर्वभर प्रतापगडाच्या डोंगराच्या सभोंवार शिवाजीनें आपले लोक झाडाआड, जाळयाजाळयांत ठेवून दिले. प्रतापगडाभोंवतीं जंगल इतकें दाट आहे कीं. असे हजारों लोक सहज जाळयांचे आड होऊन लपून वसतील. हें सर्व जंगल शिवाजीनें आपल्या सैन्यानें भरून दिलें.

खुद्द प्रतापगडावरही कडेकोट बंदोबस्त केला होता. दर बुरजास पन्नास माणूस मागील बाजूस, व पुढील तोंडांस शंभर, असें ठेवून, केवळ सन्निध त्या जाग्यावरी, जास्ती शें-पन्नास ठेविलें. ते उमदे, मर्द, विश्वासू चांगले पाहून, त्यांस बहुत तऱ्हेनें रुवरू खातर करून हुशारी राखविली. आणि जनानखान्यांतील मातुश्रीचे चौकी-पहाऱ्यांचीं, सर्व विश्वासूकपणाचीं अशींच माणसें योजिलीं. याप्रमाणें किल्ल्यांतील बेत ठेवून, दरवाजा मजबूतपणें राखला. चौकशीस कारकून, हवालदार, किल्लेदार, कारखानीस आदीकरून जातीनें राहून चौकशी करावी; राखावी; यावें, जावें, वाड्यापर्यंत दरवाज्याचे आंत ठायीं ठायीं चौकी-पहारे उभे सर्वदा असावे. तसेंच दरवाजावरी व पुढें कचेरीचे नजीक तोफा ठेविल्या. त्यांचा बार होतांच सर्वांनीं हुशार व्हावें. इशाराच करून लोकांस सांगून पाठविलें.[1] तसेंच आपल्या पदरचे मोठमोठे लोक, उमदे, हजारांत एक असे शूर शिपाई गडी, नामजाद, त्यांस

१. शिवदिग्विजय १६५.

शागिर्द व खिजमदगार करून हलकीं कामें सांगून त्या मिषानें जवळ ठेवलें. कोणी विडे देणारे हडपेकरी, कोणी चवरी-मोर्चेल वारणारे, कोणी जोडा उचलणारे, म्हणून सन्निधच असावे, अशी योजना केली. भेटीसाठीं किनखापी मंडप उभारला होता. त्याचे मागचे आंगाला एका खोल दरडींत[1] किंवा गर्तेत हिरोजी फर्जंद[2] वगैरे चाळीस माणूस धारकरी ठेवले.

शके १५८१ मध्यें मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीचे दिवशीं म्हणजे चंपाषष्ठीचे दुसरे दिवशीं भेटीचा संकल्प ठरवला होता. ते दिवशीं महाराजांनीं सकाळींच स्नान करून केदारेश्वराची पूजा व प्रार्थना केली. 'ब्राह्मण बोलावून द्रव्य दिधलें व सांगितलें कीं, काशीस व गयेस जाऊन उत्तर कार्य करणें. धर्महस्तकें व गोदानें देखील दिधलीं. दाढी लांब होती ती वाल छाटून लहान केली.' हा निर्वाणीचा प्रसंग पाहून त्या वीरमाता जिजाईचेंही मन कालवून गेलें व ती जिजाई आई रडों लागली. तीस समीप येऊं न दिधलें.

जेवणखाण झाल्यावर दुपारीं दोन प्रहरचे सुमारास शिवाजीराजे सदरेस जाण्याचे तयारीस लागले. राजे यांनीं आंगांत चिलखत व वर जरीची कुडती घातली. डोक्यास बखतर टोप घातला. डावे हातीं विचवा व अस्तनींत नवटाकी पट्टा[3] घातला. व पायांत चोलणा घालून कास कसली. आणि अशा मजबुतीनें राजे गडाखालीं उतरून येण्यास तयार झाले.

.........................................................

१. ही दरड म्हणजे गडाचे दरवाजाजवळच वरून येतांना उजवे आंगाला जी आहे, ती असावी. दरडीचें तोंड हल्लीं माती व दगड पडून बुजलेलें आहे. पण थोडे वर्षांपूर्वीं तेथें किल्ल्यावरचीं गुरें उभीं रहात असत, असें प्रतापगडचे मुरे म्हातारे लोक सांगतात व त्यांनींच ही जागा आम्हांस दाखविली. हातीं विजेची बत्ती ( टार्च ) घेऊन एक मुलगा सरपटत थोडासा आंत शिरवला होता. आंत उजेड पाडतांच ही जागा खोल व मोठी असून शें-दोनशें लोक राहण्यास पुरेशी आहे असें दिसलें. येथें आंतील इसमाला अफजलच्या वधाची जागा स्पष्ट दिसते व सुमारें चार मिनिटांत घळींतून निघून त्या जागेवर येतां येतें.

२. हा शहाजीच्या राखेचा मुलगा. याच्या आईचें नांव ठाऊक नाहीं, परंतु शहाजीनें कोणी मता नांवाच्या नाइकिणीस जमीन दिल्याचा तपशील उपलब्ध आहे. पुढें आग्रा येथून महाराज निसटून आले ते वेळी त्यांचे वदलीं पलंगावर निजला तो हाच.

३. शिवाजीच्या हातीं वाघनख होतें व त्यानें वाघनखाच्या तडाख्यानें अफझलखानाचीं आंतडीं बाहेर काढलीं, असा अनेक बखरकारांचा सांगण्याचा रोख आहे. पण राजगडच्या (९१ कलमी) बखरींत हातीं वाघनख असल्याचा उल्लेख नाहीं. तसेंच जेधे शकावलींतही त्याचा कांहींच उल्लेख नाहीं. वाघनख हें हत्यार त्या काळीं सर्वांच्या परिचयाचें होतें. तें हातांत घातलें असतां बोटावरील कड्या सहज

पुढें चालू

गडावरून निघतांना महाराजांनीं आपली कुलस्वामिनी श्रीअंबामाता भवानी हिचें स्मरण केलें. व मग सौ. मातोश्री जिजाई हिचे पायावर डोई ठेवून नमस्कार केला. तिनें आशीर्वाद दिल्यावर लोक जमले होते त्यांचे मुजरे झाले. त्या वेळीं राजे यांनीं आपले मातुश्रीस व संभाजीस त्यांचे हवालीं केलें, व त्यांस सांगितलें कीं, 'कांहीं वांकडें पडल्यास घाबरे न होतां गर्दी करून शत्रूस बुडवावें. राज्य रक्षावें.' नंतर पुन्हां एकवार सभोवतालच्या लोकांस नांवाजून, दिलासा देऊन राजे म्हणाले कीं, 'तुम्ही सर्व शूर पराक्रमीच आहां. आमची मदार तुमचेवर आहे. . . सर्वांनी आपली शर्थ करावी. राज्य वृद्धीस पावेल तें तुमचेंच आहे.'[१]

भेटीचा समय जवळ येत चालला, व शिवाजीची तयारी झाली. तेव्हां अफजलखानही भेटीस यावयास आपले गोटांतून सिद्ध होऊन निघाले. बरोबर लष्कर हजार दीड हजार बंदुकवाले घेऊन चालले. मोठे मोठे धारकरी लोक त्यांसमागमें निघाले, तेही चालले. इतक्यांत शिवाजीचा वकील पंताजी गोपीनाथ यांनीं पुढें होऊन खानास अर्ज केला कीं, 'इतका जमाव कशाला ? इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. माघारा गडावरती जाईल. भेट होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय ! यास इतका सामान काय करावा ! राजा दोघा माणसांनिशी तिकडोन येईल. तुम्ही दोघा माणसांनिशी इकडोन चलावे. दोघे बैसोन भेटावे. तेथें तजवीज करणें ते करा.' पंताजी गोपिनाथाचें हें म्हणणें अफजलखानास पटलें व अशा जमावानिशीं गेल्यास शिवाजी कदाचित् भिऊन भेटीस न आला तर योजलेला सगळा डाव फुकट जाईल, असा पोक्त विचार करून खानानें आपला अवघा जमाव दूर बाणाचे टप्प्यावर ठेवून खान खासास्वारी पुढें निघाला. खानाची पालखी व बरोबर दोन हुद्देकरी सशस्त्र, आणि कृष्णाजीपंत असे पुढें चालले. बरोबर सैदबंडा नांवाचा खानाचा एक[२] मर्दाना पटाईत सरदार होता. अशी ही मंडळी प्रतापगडची चढण चढूं लागली.[३]

.............................................

दिसूं शकतात. अशा स्थितींत वाघनखाचा नुसता संशय सामनेवाल्यास आला तर कांहीं तरी दगा आहे, असा सहज तर्क होऊं शकेल. तेव्हां अशा वेळीं शिवाजीसारखा धूर्त मनुष्य वाघनख हातांत घालील असें वाटत नाहीं. लंडन येथें पदार्थसंग्रहालयांत जीं वाघनखें ठेवलीं आहेत तीं शिवाजीचीं नाहींत, हें मीं मागेंच सिद्ध केलें आहे (भा. इ. सं. अहवाल). मला वाटतें कीं, पवाडेकरानें कवनाला रंग येण्यासाठीं हीं वाघनखांची योजना केली. आणि मग ही काव्यमय कल्पना फारशी चौकशी न करतां बखरकारांनी उचलली असावी.

१ मल्हार रामराव, पृष्ठ ६०.

२. प्रतापगडावर झटापटीच्या ठिकाणीं तीन कबरी आहेत. एक अफजलखानाची, एक सैदबंडयाची व एक कमालशा मुर्शदची. यावरून सैदबंडाशिवाय आणखी एक सरदार खानाबरोबर असावा, असें वाटतें.

३. कृ. अ. सभासद.

खान वर चढून सदरेकडे येतो, हें वरून पाहून शिवाजीनेंही सर्वांस सावधगिरीनें राहणेस इशारत दिली. खानाचे मनांत दगा आहे, हें शिवाजी जाणून होता. व भेटीचे वेळीं काय प्रसंग गुदरेल व गोष्ट कोणते थरावर जाईल, ही चिंता त्याचे मनाला होतीच. त्यान सदरेच्या व म्हणूनच मागच्या आंगाला गर्तेत चाळीस इसम निवडक पाहून ठेवले होते. प्रतापगडापलिकडे नेताजी पालकर[1] व दुसरे आंगाला मोरोपंत पिंगळे हे लष्कर घेऊन ठेवले होते. त्यांसही 'कांहीं दगा वाटल्यास एकच आवाज (तोफेचा) गडावर करतों. तेव्हां तुम्ही खालीं उतरोन खानाच्या लष्करांत चालोन येऊन मारामारी करणें' असें सांगितलें होतें. गडाच्या भोंवतीं रानभर मावळे वसवून सदरेच्या दरवाजापाशीं एक शिंगवाला उभा केला होता व त्यास सांगितलें होतें कीं, 'मी हत्यार चालू केल्याबरोबर माझें काय होतें, याचा बिलकुल विचार न करतां तूं शिंग वाजवून सैन्यास इशारा दे.' शिंगवाल्याचा इशारा मिळतांच गडावरील गोलंदाजानें तोफ डागावी; व तोफेच्या खुणेबरोबर मराठ्यांनीं खानाच्या सैन्यावर हल्ला करावा. अशी ही व्यवस्था योजलेली दिसते. मग आंतल्या खाशांच्या झटापटीचा शेवट कसाही होवो. तो नीट झाला तर ठीकच, पण कांहीं विपरीत परिणाम झाला तरी बाहेरच्या सैन्यानें यश संपादावें, आणि मग संभाजीच्या किंवा पुतण्या उमाजीच्या नांवानें राज्य चालवावें, अशी ही मसलत होती. असो. अफजुलखान सदरेजवळ आला तेव्हां ती उत्तम प्रकारें शृंगारलेली सदर पाहून त्याच्या मनाला मोठा हेवा वाटला. आपल्या सन्मानासाठीं केलेल्या तयारीबद्दल आनंद वाटावा, पण तो न वाटतां विजापूरच्या पादशहालाच शोभेल अशी ही मालमत्ता शिवाजीजवळ आहे, हें पाहून खानास जरा वैषम्य वाटलें, हें त्याच्या मुद्रेवरून त्यानें जाणून थोड्या आदबीनें वकिलांनीं त्यास म्हटलें कीं, 'हा पादशाही माल (आहे. लौकरच) हा पादशाहाचे घरीं जाईल. त्याची येवढी तजवीज कशाला!' सदरेंत खान येतांच 'राजियास जलदी आणवणें' म्हणून जासूद रवाना केले. राजे गडाच्या पायथ्याशीं आलेच होते व तेथून हळूहळू चालत होते. खानाबरोबर सैदबंडा हा सरदार आहे तोही साधल्यास दूर करवावा, अशा मसलतीनें राजांनीं खानास पंताजी पंताबरोबर. निरोप पाठविला कीं, 'जैसे महाराज[2] तैसे खान. आपण खानाचे पुतणे. ते वडील सैदबंडा जवळ आहे. त्याकरितां शंका वाटते. हा सैदबंडा दूर पाठविणें.' त्यावरून पंताजी पंतांनीं कृष्णाजी भास्करामार्फत खानास सांगून सैदबंडाही दूर पाठविला.

---

१. हा सैन्यांत सरनोवत होता. न्यायमनसुब्याचीं कामेंही याच्यावर सोपविलीं जात. यास पुढें मुसलमानांनीं बाटविलें व त्याचें नांव मुर्शिदकुलिखान असें ठेविलें. हा परत दक्षिणेंत आल्यावर मातोश्री जिजाबाईनें कऱ्हाड क्षेत्रांतील ब्राह्मणांकडून यास शुद्ध करून हिंदु केलें व शिवाजीच्या मुलीशीं याचें लग्न करून दिलें.

२. म्हणजे शहाजी महाराज.

आणि मग खानाबरोबरचे दोघे धारकरी जवळ राहिले. पालखीचे बत्तीस जण भोई होते ते व सैदवंडा हे सदरेचे बाहेरच्या अंगाला होते.

आपल्या मनाप्रमाणें सर्व जुळणी जुळवून आणल्यावर शिवाजी राजेही जिऊ[1] महाला व संभाजी कावजी यांसह सदरेस गेले. राजे येतांच खानही भेटीसाठीं उठून उभा राहिला. खान धिप्पाड धटिंगण असून शरीरानें फारच बळकट असा होता. महाराजांची सुरत उंच सडपातळ होती. प्रथम परस्पर लोकांच्या भेटी दहा-पांचांच्या कार्याकारण आगत्या आगत्य करविल्या. नांवें सांगण्यांत कृष्णाजीपंत खानांकडून महाराजांकडे आले होते व महाराजांकडून पंताजीपंत व विठ्ठलपंत व मरढेकर हे खानाकडे होते. लोकांच्या भेटी होतांच खानाची व महाराजांची भेट व्हावी ते समयीं खानांनीं पंताजींस 'शिवाजीराजे हेच काय' असें विचारून खरें करून घेतलें व शिवाजीनेंही खान हेच काय म्हणून विचारून घेतलें. नंतर दोघेही समारोसमोर उभे राहून भेटी देतांच "खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालीं धरिली.[2] राजास थोडी घेरी आल्यासारखें झालें.[3] या वेळीं महाराजांचे मनांत रामदासस्वामींची आठवण आली. महाराजांचें मन जरा ठिकाणावर येतें न येतें इतक्यांत खानाचे कंबरेस भली मोठी जमदाड होती, तिचें म्यान टाकून ती खानानें राजियाचे कुशीस चालविली. पण शिवाजीच्या अंगांत जरीची कुडती होती त्यावर ती खरखरली. आंगास लागली नाहीं. खानानें दगा केला हें पाहून, मोठे हिमतीनें सर्व बळ एकवटून चपळाई करून शिवाजीनें डावे हातीं विचवा होता तो खानाच्या हृदयाखालीं पोटीं मारला.[4] व 'एकांगी करून'[5] खानावर तडाक्याचा वार केला. त्या जोराच्या एकाच तडाख्यासरशीं पोटांतलीं आंतडीं बाहेर आलीं व खान ओरडन कृष्णाजीपंतांस म्हणाले, जे "आपणांस मारिले'. त्या समयीं कृष्णाजीपंताजवळ फिरंग तलवार होती. ती काढून त्यानें शिवाजीराजे यांजवर वार टाकला. परंतु तो कारिगार झाला नाहीं, व लागू पडला नाहीं. इतक्यांत राजे यांनीं दुसऱ्यानें पट्ट्याचा वार खानावर टाकिला. त्याबरोबर जानव्याच्या दोऱ्याप्रमाणें खानाच्या शरिराचे दोन भाग होऊन, खान पुरा झाला व खालीं पडला. खान पडतो, हें पाहून

..............................................

१. जिवा महाला याचें उपनांव सकपाळ. हा जावळी प्रांतांत मौजे कोंडवली येथील राहणारा. वरील प्रसंगीं यानें बजावलेल्या कामगिरीवरून 'होता जिवा म्हणून वांचला शिवा' अशी पडलेली म्हण या प्रांतांत चोंहीकडे ऐकूं येते. याची जात न्हावी; पण याचे वंशज हा धंदा करीत नाहींत. यांस कोंडवली गांवीं कांहीं जमीन इनाम आहे.

२. सभासद, शिवदिग्विजय, मल्हार रामराव चिटणीस वगैरे.

३. हनुमंतस्वामीची बखर.

४. रायगडची बखर.

५. एकांगी म्हणजे बगलेकडून बाजूला सरून त्या बाजूनें जोर करणें. हा कुस्तींतील एक पेंच आहे.

कृष्णाजीपंतानें पुन्हां शिवाजीवर लगट केली. पण तिकडे लक्ष न देतां शिवाजीनें कृष्णाजीपंतास दूर होऊन निघून जाण्यास सांगितलें. पण कृष्णाजीपंतानें निघून न जातां भोयांस आंत बोलाविलें. भोई व धारकरी आंत येऊन खानाचा मुडदा पालखींत घालून नेऊं लागले. तों संभाजी कावजी बांदे व जिऊ महाल्या न्हावी हे तेथें होते, यांनीं हातांतल्या तरवारींनीं भोयांचे पाय तोडले व खानाचा खटारा धरणीवर लोळवला. आंतली ही गडबड चालली असतां सैदबंडा धावून आंत आला. त्यानें राजे जवळ केले. पट्ट्याचे हात राजियावर चालविले. तों राजानें जिऊ महाल्याजवळून आपला पट्टा घेऊन, पट्टा व बिचवा यांचे कातरीनें[1] सैदबंडा याचेवर वार ओढले. सैदबंडाही फार हुशार पट्टेवाला होता. त्यानें ते चुकवून राजावर जोराचा वार टाकला. जिऊ महाल्या जवळच होता. त्यानें हातच्या फिरंगेनें सैदबंडयास खांद्यावर वार मारला आणि एकच घावासरसा सैदाचा हात हत्यारासमेत तोडून टाकला. या झटापटींत पंताजी गोपिनाथासही वार झाले. लोकांनीं त्यांस ओळखले नाहींत. कृष्णाजी भास्कर तर मेलाच असता. पण शिवाजीनें त्यास तो ब्राह्मण म्हणून मारूं दिलें नाहीं. मार्ग देऊन लष्करांत बातमी सांगावयासी माघारी जीव घेऊन त्यास जाऊं दिलें.

कृष्णाजीपंत हे आपले जिवानिशीं लष्करांत येण्यास निघाले असतील खरे. पण खानाचे लष्करचा ठिकाणा कोठें उरला होता ? झटापटीबरोबरच फौजेस आवाजाची इशारत झाली. गडावर भांड्याचा आवाज काढला. त्या आवाजाचा प्रतिध्वनीही पुरा उठला नसेल, तोंच खानाच्या गोटाभोंवतालीं नवी सृष्टि निर्माण झाली. जाळयाझुडपांतून, झाडाआडून, खडकामागून, असे जिकडून तिकडून चोहों बाजूनें शिवाजीचे लोक पुढें सरसावले. थोडे वेळापूर्वी जें रान अचेतन झाडापानांनीं हिरवेंगार दिसत होतें, तेंच रान एका क्षणांत प्रत्यक्ष काळासही न जुमानणाऱ्यां शूर शिपायांच्या धिंगाण्यांनीं गजबजून गेलें. मागें, पुढें, बाजूला, जिकडे तिकडे आता मराठे मावळे दिसूं लागले व त्यांनी युद्धाची कचाकचीही थोर केली. बाजी सर्जेराव वगैरेंनीं तर जिवाची शर्थ केली. कान्होजी जेधे व बांदल वगैरेंनीं पारघाटाच्या लष्करावर चालोन जाऊन थोर मारामारी केली. मोरोपंत कोकणांतून ससैन्य आले होते. त्यांनींही एकदम चालोन येऊन खानाचे गोटावर हल्ला केला आणि त्याची राळ उडवून दिली.

गडावर तोफेचा आवाज कां झाला, हें प्रथम खानाचे लोकांस नीट कळलेंच नाहीं. त्यांस वाटलें कीं, 'भेटीच्या सलामीची तोफ झाली. मग पुढील प्रकार पाहून ते जरा गोंधळून गेले. पण इतक्यांत खानाचे सरदारांनीं हुशारी करून लढाई सुरू केली. तोफेस सरबत्ती दिली. आणि एकदम शिवाजीच्या लोकांवर जोराचे हल्ले

---

१. म्हणजे महाराजांच्या दोन्ही हातांत दोन हत्यारें आलीं. अर्थात्‌वाघनख हातांत असतें, तर हीं दोन्ही हत्यारें दोन हातांत धरितां आलीं नसतीं.

केले व तरवार चालविली. कचाकची फार झाली. दोहीं बाजूंचें भांडतें माणूस एकमेकांवर तुटून पडलें व सर्व रानभर एकच गोंधळ माजला. शामराज पद्मनाभी व त्रिंबक भास्कर हे शिवाजीचे दोन मोठे सरदार कामास आले व आणखीही पुष्कळ लोक मारले गेले.

इतक्या धांदलींत संध्याकाळ होत चालली. भालाभर सूर्य वर राहिला. ते शाळू दिवस, तेव्हांच तिनिसांजच्या झाल्या. तोंच 'शिवाजीचे लोकांनीं झाडें तोडून लहानमोठ्या वाटा होत्या तितक्या सर्व बुजवून टाकल्या. कांहीं रान होतांच घायाळें दातीं तृण धरून शरण गेलीं.' अफजलखानाच्या लष्करच्या लोकांस खानास मारल्याचें वृत्त जेव्हां कळोन आलें तेव्हां तर सर्वांचे धीर सुटले. नंतर ते भ्याड पळावयास लागले. तों महाराजांचे सेनांनीं व गांववाले लोकांनीं झाडागणीक माणूस रानांत होऊन एकच किलकारी करून दिली. चोहोंकडून मार्ग बंद केलेच होते. वाट नाहीं. कंगाल गरीब धेडांनीं येऊन, शिपायाचें हत्यार, घोडें घ्यावें. कोणी हत्यार धरील त्यास जीवें मारावें. प्राणानिशीं ठेवूं नये. अशा रितींनीं हत्यारें, घोडीं, उंट, तट्टें, हत्ती, खजिना, जवाहीर आदिकरून सर्व घेऊन वस्त्रपात्र अंगावरील जें असेल तें माल लोकांस माफ केलें. अशी दुर्दशा 'अल्लिशान अफजलखान माहमदशाही' या विजापूरच्या सरदाराची शिवाजीच्या मराठ्यांनीं केली. त्याचे ते कर्नाटकी व ते विजापुरी योद्धे धुळीस मिळविले. त्याचे महदीन पठाण, उजदीन पठाण व रोहिले आणि अरबी मुसलमान मारून पाडून भुईस रगडून टाकले. झुंजारराव घाटगे, जगदळे वगैरे मराठे पाडाव झाले. अफजलखानाचा फर्जंद फाजलखान हा लष्करांत होता. तो मोठ्या संकटानें कोयना नदीच्या आंगून कांठाकांठानें कऱ्हाडकडे जात होता. कऱ्हाडकडे जाण्याचें कारण उघड आहे. याचे आदलेच सालीं त्या प्रांताचा मोकासा अफजलखानास मिळालेला असल्यामुळे फाजलखानास त्या प्रांतीं चांगला आधार मिळण्यासारखा होता. तो प्रथम कोयना कांठांनीं निसटून जात असतां खंडोजी काकडे [1] या सरदाराचे हाती सांपडला, पण खंडोजीनें पैशाच्या मोहास पडून त्यास सोडून दिलें. व मग तो पायास चिरगुटें गुंडाळून पळून गेला. या वर्तणुकीबद्दल शिवाजी महाराजांनीं खंडोजीस धरून आणून तात्काळ त्याचें डोकें उडविलें.

ते दिवशी मराठ्यांनीं पाठलाग करून बांईस सरंजाम तोफखाना वगैरे होता तो सर्व महाराजांचे सरकारांत घेतला. तो पाठलाग कशाचा !! मार्गशीर्षांतल्या चांदण्यांतली ती लांडगेतोडच झाली. हजार-बाराशे उंट, चार हजार घोडे राजाच्या पागेंत आले. तीन लाखांचे जवाहीर व सात-आठ लाख रोकड राजाच्या खजिन्यांत

१. हें नांव सूर्याजी काकडे असावें किंवा खंडोजी खोपडे असावें, असें एक गृहस्थ सुचवितात.

जमा झाली. कापड, हत्यारें वगैरे लूट मिळाली ती आणखी निराळीच. मंबाजी भोसले व जगताप हेही पाडाव झाले. जगदळे पळाले त्यांस शिवाजीनें धरून आणून त्यांची गर्दन मारली. अशी दुर्दशा उडाली. ही अफजलखानाच्या वधाची गोष्ट शके १५८१ विकारी नाम संवछरीं मार्गशीर्ष शु. ७ गुरुवारीं घडली.[१]

मारामारी झाल्यावर अफजलखानाचें शीर कापून आणलें व त्यांत लोखंडाची मेख ताऊन, शिवाजी राजे यांनीं तें शीर प्रतापगडच्या दरवाजावर बांधलें. नंतर युद्ध आटोपल्यावर गडावरून उतरून आपले लोक व खानाचे लोक व भांडतें माणूस होतें तितक्यांस भेटून, पोटाशीं धरून दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते, त्यांचा परामर्ष घेतला. त्यांच्या लेकांस चालविलें. पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमें वेतन करून चालवावें असें केलें. जखमी जहाले होते त्यांस दोनशे होन, व शंभर होन, कोणास पन्नास होन, कोणास पंचवीस होन असे दर असामीस जखम पाहून दिले. मोठे मोठे धारकरी होते त्यांस हत्ती, घोडे वक्षीस दिले. कोणास कडीं, कोणास माळा, तुरे, पदकें, चौकडे असें इनाम फार दिलें. लोक नांवाजले. पंताजी गोपिनाथ यास त्याचें राहतें गांव मौजे हिंवरें हें वंशपरंपरेनें इनाम करून दिलें. व एक लक्ष होन रोख बक्षीस दिले. पुढें थोडेच वेळांत शिवाजीचा जुना वादी व अफझलखानाचा मदतगार खंडोजी खोपडा हाही धरला गेला. त्यास आणवून, शिवाजीनें जिवें मारलें. झुंझारराव घाडग्याप्रमाणें यालाही जीवदान दिलें असतें, तर तें फार कौतुकास्पद झालें असतें. पण असो; जें झालें तें वरेंच झालें.

थोडे दिवसांनीं शिवाजी राजे यांनीं प्रतापगडावर मोठा उत्साह केला. श्रीदेवी भवानीचे कृपेनें आपणांस यश आलें असें समजून, व आपली ती कुलस्वामिनी तिचें दर्शन रंवार घडावें. याकरतां, गंडकी शिळा चांगली आणवून, हुशार कारागीर तुळजापुरास पाठवून तेथील देवीचे ध्यानाप्रमाणेंच सुंदर ध्यान करवून श्रीची मूर्ति घडविली, व समर्थ[२] रामदासस्वामी वगैरे थोर विद्वान ब्राह्मणांचे संमतीनें, राजेश्री

१. शिवाजीमहाराजांचीं जीं थोडीं अर्वाचीन चरित्रें आहेत, त्यांत श्रीयुत जदुनाथ सरकार यांनीं लिहिलेलें चरित्र वरच्या दर्जाचें आहे. त्या ग्रंथांत अफजलखानाच्या झुंजाची हकीगत संगतवार जुळवून लिहिली आहे. पण परशियन भाषेचें मराठी-पेक्षां चांगलें ज्ञान असल्यामुळें मुसलमानी तवारिखांची छाननी श्री. सरकारनीं केली तशी मराठी बखरींची आणि कागदांची छाननी त्यांचे हातून झाली नाहीं. कदाचित् यामुळेंच या अद्‌भुत प्रसंगाचा नक्की दिवस त्यांनीं आपले ग्रंथांत दिला नाहीं. एके ठिकाणीं सहज जातां जातां महिना मात्र सप्तंबर म्हणून दिला आहे. पण तो हस्तदोष दिसतो. तेथें नोव्हेंबर असें पाहिजे.

२. देवीच्या स्थापनेच्या वेळी श्रीसमर्थ रामदासस्वामी तेथें होते, असें मला रा. ब. पारसनीस यांनीं सांगितलें. इतर कांहीं लोकही असेंच सांगतात.

पुढें चालू

मोरोपंत पिंगळे यांच्या व त्यांच्या वायकोच्या हस्तें देवीची स्थापना प्रतापगडीं केली.[१] देवीचे समोर डोंगराचें एक टोंक होतें त्यावर अफजलखानाचें शीर नेऊन पुरविलें, व त्याभोंवतीं बुरूज बांधून तें टोंक प्रतापगडच्या कोटांत सामील केलें. तेव्हांपासून अजूनपर्यंत या बुरजास अवदुल्ला बुरूज असें म्हणतात. तसेंच जेथें अफजलखानाचें शरीर पडलें, तेथें त्यावर कबर बांधली आणि त्या कबरीस चुना वगैरे लावण्याच्या व चिराकदानाच्या म्हणजे दिवावत्तीच्या खर्चाची नेमणूक करून दिली. आणि हा खर्च देवीचे संस्थानाकडून चालावा असें ठरविलें. अजूनही हा खर्च देवीचे संस्थानांतून चालतो; व दिवापंती लावली जाते. आणि कबरीपुढें उरसांत पहिला नारळ फोडण्याचा मान देवीच्या संस्थानास मिळतो. प्रतिवर्षी दसऱ्याचे दिवशीं सीमोल्लंघनाचे समारंभांत देवीची पालखी गडावरून खालीं या सदरेच्या जागेवर आणतात व येथें पूजाअर्चा होऊन मग पालखी परत फिरते.

अफजलखानाचा वध झाला ही गोष्ट त्या वेळीं सर्वांस साहाजिकपणेंच अत्यंत महत्त्वाची वाटली व शिवाजीचा लौकिक आणि दरारा सर्वभर पसरला. डोंगरांतल्या उंदरानें या विजापूरच्या वाघास चीत केलें, मराठ्याच्या पोरानें पादशहा सरदाराला सबंध गिळून टाकला, ही खबर ऐकून दिल्लींत धडकी भरली व विजापूरचें सिंहासन डळमळूं लागलें. बखरकार सांगतात कीं, ही बातमी चवथे दिवशीं विजापुरास पादशहास जाहीर झाली. ती ऐकतांच अल्ली अदिलशहा तक्तावरून उठून महालांत जाऊन खेद करूं लागला व बडी साहेबीण, 'अल्ला! अल्ला!! खुदा खुदा!!' करून अंग पलंगावरी टाकून रडत पडली व तिनें तीन दिवस अन्न-उदक घेतलें नाहीं.

इकडे जिजाईस इतका आनंद झाला कीं, तिचा तो हर्ष त्रैलोक्यांत मावेना.

---

श्रीरामदासस्वामींनीं देवीस दिलेलीं जडावाचीं कर्णफुलें अजूनही पुजारी दाखवितात. प्रत्यक्ष अफजलखान बुडविण्याच्या मसलतींत समर्थ होते, असें गिरिधराच्या पुढील उल्लेखावरून दिसतें—

समर्थें अकारपूर्वक यवनासी मारविलें । मग चापळ क्षेत्र उभें केलें ।
श्रीतुळजामाऊलीसी संस्थापिलें । जावली पर्वतीं प्रतापगडीं ॥

१. श्री देवीस कुलाबा जिल्ह्यांत दोन व साताऱ्यांत अकरा मिळून एकंदर तेरा गांव साताऱचे महाराजांकडन इनाम आहेत. याशिवाय श्रीमंत पेशवे सरकारकडूनही एक दोनशेची व दुसरी तीनशेची मिळून पांचशे रुपयांची साडीचोळीकरतां सालिना नक्त नेमणूक असल्याची पत्रें संस्थानचे कागदांत आहेत. शिवाजीनें देवीची जी मूर्ति स्थापिली तीच अजूनही तेथें आहे. मध्यंतरीं औरंगजेबाचे 'दुष्ट संसर्गा'चे प्रसंगीं ही मूर्ति काढून दूर नेली होती व हिचे जागीं दुसरी मूर्ति ठेविली होती. पुन्हां स्थिरस्थावर झाल्यावर या जुन्या मूर्तीची 'स्थापना केली', असा उल्लेख आढळतो. अफजलखानाचे संसर्गाचे भयानें त्या काळींही तुळजापूर वगैरे ठिकाणच्या मूर्ति काढून दूर ठेवणें व त्यांचे जागीं दुसऱ्या मूर्ति बसविणें संभवनीय वाटतें.

तिनें अनेक प्रकारचे धर्म केले; व आपल्या या मुलाच्या अद्भुत पराक्रमाचें आणि अंबेनें दिलेल्या त्याच्या यशाचें वर्णन सर्वांच्या कानावर पडावें व तें पुढील पिढ्यांच्याही तोंडीं राहावें म्हणून त्या वेळचे शाहीर बोलावून आणले. आणि भरल्या सदरेमधें ज्यांनीं हा अलौकिक प्रसंग घडवून आणला त्यांच्या समक्ष, व ज्यांनीं हा अतुल पराक्रम प्रत्यक्ष पाहिला त्यांच्या देखत या प्रसंगाचें कवन रचून गाण्यास आज्ञा केली आणि तेथें आलेल्या त्या अज्ञानदास शाहिरानें हातीं डफ व तुणतुणें घेऊन, व आपल्या एकतारीची खुंटी पिळगटून हें पादशाही वजिराचें भांडण, हें शिवाजी सर्जाचें दलभंजन, खडया आवाजानें गाइलें. आणि सर्व श्रोत्यांना त्या वीररसाचें यथेच्छ पान करवून. आपलें तुणतुणें खालीं ठेवलें. इतक्या तडाक्यानें 'आपल्या मतं अग्निदासानं । विरमाल राजाचा गाईला ।' हें पाहून शिवाजी सरजानें इनाम घोडा बक्षिस दिला. शेरभर सोन्याचा तोडा हातांत घातला."

अफजलखानाच्या व शिवाजीच्या संग्रामाचा हा प्रकार निवेदन करतांना आधुनिक इतिहासकार अनेक तऱ्हेच्या चर्चा करीत असतात व यांत दोषी कोण व निरापराधी कोण, याचा ऊहापोह करून शिवाजी महाराजांस वारंवार दोष देतांना आढळतात. पण यांत अपराधी आणि बिनअपराधी हा वाद कां उपस्थित व्हावा हें कळत नाहीं. मराठ्यांच्या मुलखावर स्वामित्व संपादून त्यांना जिकावें, त्यांच्या पायांत पारतंत्र्याची वेडी अडकवावी, त्यांना आपले गुलाम करून टाकावे, त्यांचा धर्म, त्यांची भाषा, त्यांची सत्ता, त्यांची संस्कृति वगैरे जें जें कांहीं त्यांना प्रिय त्या सर्वांचा समूळ नाश करावा, हा मुसलमानांचा ठरलेला बाणा होता व यापासून महाराष्ट्राचें सर्वथा रक्षण करावें, मराठ्यांच्या कपाळची गुलामगिरी चुकवावी, त्यांना सुखासमाधानांनीं नांदूं द्यावें व त्यांना स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषा यांची जोड मिळवून द्यावी, हा महाराष्ट्रांतील नेणत्या पुरुषांचा हेतु होता. आणि तो साध्य करण्यासाठीं नाना यत्न, नाना युक्त्या, नाना साहसें करणें हें शिवाजी महाराजांस प्राप्त व अवश्य होतें. वरकर्मी विजापूरचे मुसलमान मुत्सद्दी कितीही गोड बोलले किंवा त्यांनीं कसलेंही अमीष दाखविलें, तरी आपले उद्देश, व ते साधण्यासाठीं आपण करीत असलेलीं कृत्यें त्यांना केव्हांही रुचणार नाहींत, हें त्यांस पक्कें ठाऊक होतें. इतकेंच नव्हे, तर याहीपेक्षां दुसरी गोष्ट अशी कीं, विजापूर दरबाराचेही हात या बाबींत बांधले गेले होते. विजापूर, गोवळकोंडे, वगैरे शहांचा शहा जो दिल्लीचा मोंगल पादशहा, त्याच्याही डोळ्यांत आपण खड्याप्रमाणें खुपूं लागलों आहों व आपला उत्कर्ष त्यांच्यानें सहन होणार नाहीं, हें शिवाजी जाणत होता. व आपल्या नाशासाठीं मोगलांचे कसे खोल प्रयत्न चालू आहेत, हेंही तो पहात होता. बापाच्या आजारीपणामुळें औरंगजेबाला महाराष्ट्रांतून दिल्लीस जाणें भाग पडलें त्या वेळीं त्यानें विजापूरकरांशीं तह करून तो परत गेला. या तहाच्या बोलण्यांतली एक मुख्य अट अशी होती कीं, औरंगजेबाच्या मागें,

विजापूरकरांनीं शिवाजीचा नाश करून मराठ्यांची सत्ता खणून टाकली पाहिजे. वास्तविक पाहतां मोंगलांच्या आणि विजापूरकरांच्या तहांत ही तिसऱ्या संबंधाची अट घालण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण औरंगजेबाचा मुख्य हेतु शिवाजीला धुळीस मिळवून मराठ्यांची सत्ता नेस्तनाबूद करण्याचा होता. यामुळें त्यानें ही अट घालून तिजसंबंधानें हट्ट धरला. विजापूरच्या दरबारांत या तहाची वाटाघाटी सुरू झाली तेव्हां त्या वेळीं खानमहमद हा सर्व सूत्रें हालवीत असून त्याचा पक्ष प्रबळ होता. त्याच्या मनांत ही जोखमाची कामगिरी आपल्या आंगावर घेण्याचें नव्हतें. कारण शहाजीनें अडचणीच्या प्रसंगीं बजावलेली विजापूर दरबारची सेवाचाकरी त्याच्या लक्षांत होती. शिवाय मोंगलांस वाटल्यास शिवाजीचा बंदोबस्त त्यांचा त्यांनीं वाटेल तसा करावा, तें जोखीम आपण उचलण्याचें कारण नाहीं, असें त्याला वाटत होतें. म्हणून तहाचें हें कलम विजापूर दरबारनें मान्य करूं नये, अशी त्याची सल्ला होती. पण या खानमहमदाच्या विरुद्ध दुसरा एक पक्ष विजापूर दरबारीं जोर करीत होता. त्या पक्षाचें पुढारीपण अफजलखानानें आपल्याकडे घेतलें होतें व तहाचें हें कलम आपण कबूल करावें आणि मराठ्यांचा नायनाट करून मोंगलांचा स्नेह संपादन करावा, असा अफजलखानाचा फार आग्रह होता. पण मोठ्या वजिराच्या पुढें अफजलखानाचें तेज नीटसें पडेना. त्यानें आपली मावळण म्हणजे विजापूरची बडी साहेबीण हिचें मन वळवून तिच्याही मनांत आपलाच बेत भरवून दिला. पुढें वजिराचा खून होऊन तो मारला गेल्यामुळें त्याचा पक्ष कमजोर होऊन अफजलखानाचा पक्ष जोरावर आला व मग अफजलखानानें आपल्या आग्रहानें आपल्या मनाप्रमाणें शिवाजीचा बीमोड करण्याची अट कबूल करून मोंगलांचा तह कायम व मुक्रर केला. याप्रमाणें तह केल्यानंतर शिवाजीची सत्ता खणून काढण्याचें काम तडीस नेणें विजापूर दरबाराला अवश्य झालें आणि दरबारांतला कोणीही सरदार हें काम करण्यास हिंमत बांधीना, तेव्हां हें काम स्वतः अंगावर घेणें अफजलखानाला भाग पडलें व त्याप्रमाणें त्यानें तें अंगावर घेतलें. भरदरबारांत आणि बडे साहेबिणीपुढें अनेक तऱ्हेची बालिश बडबड करून शिवाजीला ठार मारण्याची किंवा त्याला लोखंडी पिंजऱ्यांत कैद करून दरबारांत आणून हजर करण्याची प्रतिज्ञा करून निघालेल्या अफजलखानाला समेटाचीं बोलणीं लावणें, व त्याप्रमाणें शेवटपर्यंत वागणें केव्हांही शक्य नव्हतें. त्यानें शिवाजीला ठार मारला असता, तर सगळाच बाजार संपला असता; आणि शिवाजीस दिलेल्या वचनांतून पार पडण्याची अफजलखानाची जबाबदारी आपोआपच टळली असती. पण असें न होतां, युक्तीप्रयुक्तीनें बोलणीं करून फसवून त्याला विजापुरास नेला असता, तर त्याचे पुढें काय करावें हें ठरविणें विजापूर दरबारचें काम होतें; अफजुलाच्या हातचें नव्हतें. इतकेंच नव्हे, तर तें ठरविणें अफजुलखान किंवा त्याचें मालिक विजापुरचे आदिलशहा यांच्याही हातीं राहिलें

नसून तें दिल्ली दरबारनें ठरवावयाचें होतें किंवा ठरविलेंच होतें. या वेळीं औरंगजेब काय करता ! किंवा अफजुलखानानें दिलेलीं वचनें तो कशा रितीनें पाळता ? याचा अदमास नंतर सहा-सात वर्षांनीं शिवाजी आपल्या मुलासह आग्र्यास गेला तेव्हां अवरंगजेबानें काय केलें यावरून निःसंशय बांधतां येईल. तेव्हां अफजुलखानाच्या बोलण्यावर शिवाजीनें विश्वास ठेवून स्वस्थ राहणें अयोग्य होतें, हें कोणीही कबूल करील. विजापूर दरबारांतल्या या सर्व हकीगतींवर शिवाजी आयदीपणानें अफजुल-खानाच्या वकिलाच्या शब्दांवर अवलंबून राहता व नाश पावता, तर त्याची गणना कोणीही बावळचांत केली असती. पण यापढें अफजुलखान वांई शहर सोडून प्रताप-गडची अर्धी-अधिक वाट चालून तायघाटापुढें आल्यानंतरही नवी फौज ठेवीत होता, नवें सैन्य जमवीत होता आणि मराठे देशमुखांना आमिषाचीं आणि आग्रहाचीं पत्रें लिहून, त्यांच्याकडून आपणांस मदत सामुग्री बोलवीत होता, हें शिवाजीला दरहमेश कळत होतें. जुनी जवळ असलेली फौज बरोबर आणणें निराळें, आणि नवी नवी फौज ठेवून आणखी आणखी जमाव वाढवीत जाणें हें निराळें. या दोहोंतलें जमीन-अस्मानाचें अंतर शिवाजीला काय कळत नव्हतें ! अफजुलखानाची शक्ति काय त्याला माहीत नव्हती ! त्यानें जमविलेलें व वाढवीत असलेलें सैन्यबळ तो काय जाणत नव्हता ! तसेंच खोपडे, घाडगे, इंगळे वगैरेसारखे मराठे खानाला मदत करीत आहेत व ते वेळीं डाव साधण्यास चुकणार नाहींत, हें काय तो समजत नव्हता ! हें सर्व त्याला कळत होतें व या सर्व बाजू ध्यानांत धरून वागणें हें त्याचें अवश्य कर्तव्य होतें. हे सर्व मराठे शिवाजीचा द्वेष करीत आणि मुसलमानांना मनापासून साहाय्य करीत. तेव्हां आपली सर्व मजबुती, आपलें धोरण व आपली वागणूक ही या गोष्टीकडे लक्ष पुरवून शिवाजीमहाराजांनीं ठेवली, हें त्यांच्यासारख्यास शोभेल असेंच झालें. आतां प्रत्यक्ष भेटीच्या वेळचा प्रकार लक्षांत घेतला असतांही शिवाजीस दोष ठेवण्यास जागा रहात नाहीं. अफजुलखानासारख्या रेड्याचें बळ आंगीं असलेल्या शत्रूनें आपली मान पहिल्याच सलामीला बगलेंत आवळून धरली असतां शिवाजीनें स्वस्थ बसावें, किंवा आंगच्या चपळाईनें त्याच्या मगरमिठींतून निसटून गेल्यावर पुढें कांहीं एक न करतां त्याचेपाशीं त्याच्या वकिलानें कबूल केलेल्या शर्तींच्या आधारा-वर वाद घालीत राहावें, या दुबळेपणाला कोणीही हांसला असता. या वेळीं शिवाजीच्या जागीं त्याला दोष देणारा कोणताही इतिहासकार असता, तर त्यानें काय केलें असतें ? इतिहासकार मनुष्यप्राणी तरी आहे. पण अशा कचाटींत सांपडल्यावर गरीब साधें मांजर काय करतें, हें तर आपण नित्य पाहतों. मांजरच काय, पण बारीक किरडूकाटूंही उलटून जाऊन आपल्यावर हात टाकणाराचा प्राण घेण्याचा यत्न करतें. मग काय शिवाजीनें मांजरापेक्षांही मऊपणा धरावयाचा होता ! किंवा किरडापेक्षांही अजागळपणा करून स्वस्थ रहावयाचें होतें ! नाहीं. हें

करणें कोणीही मान्य करणार नाहीं. शिवाजीनें केलें तेंच योग्य केलें. व आपले आंगचें सर्व बळ एकवटून जवळच्या, हातीं असलेल्या साधनांचा उपयोग करून शत्रूचा धुव्वा उडवला, हेंच योग्य केलें, यांत संशय नाहीं. किंवा यांत नवल वाटण्याचेंही कारण नाहीं. नवल वाटलेंच तर असें वाटतें कीं, इतक्या अवघड जागीं व जेथें पुरे शंभर लोकही नीट वसूं शकणार नाहींत, अशा लहानशा उंचवटयावर असतांही अफजलखानाचे मनांत शिवाजीला वगलेंत धरून दावून मारण्याची वुद्धीच झाली कशी? स्वतःच्या शक्तीविपयीं त्याची प्रौढी किती होती व हें कृत्य करणें त्याला किती सुलभ होतें, हें पाहून मात्र नवल वाटतें. आपण कोणत्या ठिकाणीं आहों व आपल्याभोंवतालचें जाळें कसें विणलें आहे, हें जाणण्याइतकाही पोंच त्याच्या वुद्धीला राहिला नाहीं. केवळ स्वतःच्या आंगच्या वळावर सर्व भिस्त ठेवून भोंवतालच्या पिंजऱ्याचे गज न जुमानतां एखाद्या वाघानें गरीव गाईच्या नरडयावर एकदम अविचारानें उडी टाकावी, त्याप्रमाणेंच त्यानें केलें आणि या अविचाराच्या धाडसांत तो फसला गेला.

आतां अशा अडचणीच्या जागीं शिवाजीनें खानाला वोलावलाच कां म्हणून? व मग तेथें खान आल्यावर त्यानें कांहीं केलें असलें तरी त्याला जिवें मारला कां म्हणून? असा प्रश्न कांहीं दीडशहाणे करतात. त्यांना उत्तर कशाचें? शिवाजीनें खानाला कांहीं जाफत दिली नव्हती, कीं कांहीं मेजवानीचें आमंत्रण दिलें नव्हतें; कीं कांहीं मेहेमानीच्या शराबांत विप कालवून त्यानें खानास मारलें नाहीं. खान आपला दर्जा विसरून जाऊन पायरीस पाय लावूं लागला, तेव्हां त्याला ठिकेठाक करणें प्राप्तच झालें. आपण दुसऱ्याच्या घरीं गेल्यावर तेथें वागावें कसें? वोलावें कसें? घरवाल्याची आदव राखून वर्तावें कसें? हें तो खान साफच विसरला. तेथें दुसऱ्याच्या सदरेंत जाऊन अतिप्रसंग करावा, आणि हातघाईवर यावें, हा कोठला रिवाज? तेथें आंगेजणीचें प्रयोजनच काय? तेथें जें काय वोलणें तें खान आपला दर्जा संभाळून निमूटपणें वोलता, तर शिवाजीनें उठून एकदम उगाच हातघाई करावी, अशी काय त्याची प्राज्ञा होती? वेळेस वोलण्यांत दोघांचें न पटतें तरीही पानावर पान ठेवून वोलणें तितकेंच आटोपतें घेऊन खानाला गोटांत सहज परत येतां आलें असतें. पण इतका धीर खानाला कोठून निघणार? तो अगदींच ताटकळला होता व महाराजांची नरडी दावावयाला त्याचे हात अधीर झाले होते. आणि याचें प्रायश्चित्त त्याला मिळालें.

क्षणभर असेंही मानूं–हें मानणें अगदीं अप्रयोजक आहे, पण तरी देखील इतिहासकारांचे कोड पुरवण्याकरतां आपण क्षणभर असेंही मानूं–कीं, शिवाजीनें या वेळीं दगा केला. तरी काय झालें!! वुद्धिमानानें सामर्थ्यवानाशीं गांठ पडली असतां कसें वागावें, याचे दाखले महाभारतांत अनेक ठिकाणीं आहेत. दुर्योधना-सारख्या वलिष्ठ पण दुरात्म्याशीं मल्लयुद्ध करण्याचा प्रसंगच आला, तर त्यावर

कसा प्रहार करावा, हें प्रत्यक्ष श्रीकृष्णानें पढवल्याचा इतिहास कोणत्या इतिहासकाराला माहीत नाहीं ? पण महाभारत म्हणजे एक पौराणिक भाकडकथा आहे, असें जरी मानलें तरी शिवाजीच्या पूर्वीं चारशें वर्षांच्या इतिहासांत अनेक वेळां, राक्षसतागडीच्या लढाईसारख्या प्रसंगांत देखील, मुसलमानांनीं कोणत्या नीतीचें अवलंबन केलें, हें कोणता इतिहासकार जाणत नाहीं? आणि त्या जुन्या काळींच कशाला ! आजच्या या नीतिमत्तेचे नगारे वडविण्याच्या काळांत, अंतरराष्ट्रीय कायद्यांच्या घोकंपट्टीचा महाघोप चालू असलेल्या राष्ट्रांच्या युद्धप्रसंगांत देखील कोणती नीति वारंवार अवलंविली जाते, हें गेल्या महायुद्धांतही कोणत्या इतिहासकारानें पाहिलें नाहीं ? विहिरींत पोलादी सूळ उभे करून ठेवावे व वरून विहिरीचें तोंड असें साफसूफ करून टाकावें कीं, तें कोणाच्याही लक्षांत न येतां त्यावर पाऊल ठेवतांच मनुष्यें आंत पडून सुळानें भोंसकलीं जावीं, किंवा जाण्यायेण्याच्या वाटेवर दर्यांत सुरुंग भरून ठेवावे आणि गरीव व निःशस्त्र कुटुंववत्सलांची वायकामुलांसह त्यांचे योगानें समुद्रास आहुति द्यावी, असलीं कृत्यें करणें जेथें अजूनही खपतें, तेथें शिवाजीच्या कृत्यावद्दलचा प्रश्न तरी कसा निघूं शकतो, हें कळणें कठीण आहे. या कृत्यांचा विचार केला व आपल्याभोंवतीं नित्यशः घडणाऱ्या गोष्टी मनांत आणल्या, म्हणजे तर शिवाजीच्या कृत्याचा नुसता निषेध करण्याचेंही कारण उरत नाहीं. मग त्याचा ऊहापोह करणें आणि त्यावद्दल दोप देणें तें कोठें उरलें?

आतां अफजलखानाला मारल्यानंतरच्या शिवाजीच्या कृत्यांवद्दलही एकदोन शब्द सांगणें गैर होणार नाहीं. शिवाजीनें अफजलखानाचें डोचकें उडविलें व तें भाल्याच्या टोंकावर नेऊन मिरविलें, यांत विजापूर दरवारनें विजयानगरच्या रामराजाचा जो सोहळा केला तोच सोहळा, वरोवर तसाच शिवाजीनें अफझलखानाचा केला.[१]

शिवाजीनें आपल्या विजयाच्या लौकिकासाठीं शिर उडवलें हें खरें. पण यानंतर त्यानें कोणाही थोर मनाच्या योद्धयास साजेल असेंच वर्तन करून अफजलखानाचे शरीरास मूठमाती देववून त्यावर थडगें वांधलें. आणि त्याचे दुरुस्तीचे आणि चिराकदानाचे खर्चाची सालोसालची सर्व नेमणक आपण करून दिली, हें त्याच्या थोर अंतःकरणास आणि उच्च दर्जास शोभेल असेंच झालें.

लढाईत पाडाव झालेल्या इसमांपैकीं जेवढे वळण्यासारखे वाटले, त्यांस वळवून मानमरातवानें ठेवून घेतलें. परंतु खंडोजी खोपड्यासारख्यांना देहांत प्रायःश्चित्त दिलें. हें करण्याचें कारण असें दिसतें कीं, हे मराठे सरदार वारंवार शिवाजीच्या विरुद्ध वर्तन करीत आणि मुसलमानांना जाऊन मिळत. मराठमोळ्यांत हे नामजाद व वजनदार असल्यामुळें यांचेपासून शिवाजीला हमेशा पुष्कळ नुकसान पोहोचे.

१. रामराजाचें शिर कापून तें भाल्याच्या टोंकावर धरून चोंहीकडे फिरविलें होतें.

या देशमुखांच्यामुळें विजापूर दरबाराला कांटक व शूर असे मराठे शिपाई सहज मिळूं शकत, आणि त्यामुळें विजापूरकरांचें बळ साहजिकच वाढे व ते फार शिरजोर होत. कोणतीही परकी सत्ता आंतील लोकांच्या मदतीशिवाय शिरजोर होणें किंवा नुसती नांदणें केवळ अशक्य आहे. तेव्हां अशा आपल्याच घरांतल्या मदतीचें द्वार बंद व्हावें, अशा देशद्रोही लोकांस दहशत बसावी, आणि यापुढें कोणीही असलीं कृत्यें करूं नयेत, हाच या देहांत प्रायश्चित्ताचा मुख्य हेतु असावा, हें उघड आहे. हे असले लोक मारल्यानें व जावळी-शृंगारपूरसारखीं राज्यें बुडवून तेथें आपला अम्मल केल्यानें शिवाजीनें विजापुरकरांचा कांटक शिपाई मिळविण्याचा मळाच मोडून टाकला; व ही शत्रूस मदत मिळणें बंद केलें. आतां यावर कोणी असेंही म्हणेल कीं, असें जिवें मारण्यापेक्षां अशा लोकांची स्वदेशप्रीति जागवून आणि त्यांचीं मनें वळवून शिवाजीनें लोकांस आपले बाजूस मिळवून घ्यावयास पाहिजे होतें. पण हें म्हणणें व्यवहार्य नाहीं, असा शिवाजीचा अनुभव होता. ज्यांचे मनांत कांहीं तरी सात्त्विक बुद्धि असेल, त्यांस वळविणें इष्ट व शक्य होईल. पण जे नीच स्वार्थापलीकडे कांहींच जाणत नाहींत, किंवहुना स्वार्थाचीही ओळख न ठेवतां जे केवळ द्वेषबुद्धीनेंच शत्रूस जाऊन मिळतात, त्यांच्यापुढें उपदेश काय रडेल ? परिस झाला तरी लोखंडाचें सोनें करील, पण खापराचें त्याच्याच्यानेंही कांहीं होणार नाहीं. आणि ही गोष्ट स्वानुभवानें शिवाजीला कळलेली होती. लहानपणीं प्रथम आपल्याच विचारांची आणि जोमाचीं माणसें जमवून, त्यांचीं मनें भव्य हेतूनीं व थोर विचारांनीं भरून देऊन व त्यांच्याकडून रोहिडेश्वराच्या पायाची शपथ घेववून शिवाजीनें एक मोठा कारभार आरंभला होता. पण सर्व तयारी होऊन कार्यास सुरवात केल्यावर मध्येंच फसगत झाली. 'जे जे शिवाजीला सोडून घरीं जाऊन स्वस्थ बसतील त्यांस पूर्ण माफी दिली जाईल,' असा जाहीरनामा बादशहानें प्रसिद्ध करतांच पुष्कळ लोक सोडून गेले. त्यांच्या स्वदेशप्रीतीची ज्योत विझून गेली. त्यांच्या त्या आणाशपथा ते विसरून गेले, आणि रोहिडेश्वरासमक्ष योजिलेल्या बेतांची त्यांस आठवणही राहिली नाहीं. शिवाजीमहाराजांचें मन जितकें भाविक वा बाणेदार आणि करारी होतें, तितकें इतर सर्वत्रांचें असत नाहीं, या गोष्टीचा त्यांना चांगला अनुभव आला व मनुष्यांच्या क्रियेवर दाब ठेवण्याला व तीस आपणांस अवश्य वाटेल असें वळण लावण्याला, दहशत किंवा लोभ या दोहोंचाच उत्तम उपयोग होतो, हें त्यांच्या लक्षांत आलें. आणि शिक्षा व बक्षिस यांचा उपयोग ते जोरानें करूं लागले. खानाच्या झटापटींत शेवट लावल्यानंतर कांहींस इनाम बक्षिसें दिलीं, आणि कांहींस शिक्षा व देहांत प्रायश्चित्तें दिलीं, याचा उलगडा यांतच आहे.

यदुनाथ सरकार यांनीं या प्रसंगासंबंधीं असें एक विधान केलें आहे कीं, "अफजलखानाच्या मृत्यूचा खरा प्रकार बाहेर येणें शक्य दिसत नाहीं. दोन पुढारी अशा रितीनें भेटून जेव्हां घात होतो तेव्हां खरा प्रकार बाहेर येणें शक्य नसतें." सरकारांच्या

या लेखाचें अवतरण इतरही कांहीं इतिहासकारांनीं घेऊन, त्यांचे म्हणण्यास आपली संमति दिल्यासारखें केलें आहे. हल्लीं उपलब्ध असलेली हकीगत अविश्वसनीय व खोटी आहे, असा या विधानांतून एक ध्वनि निघतो. इतकेंच नव्हे तर शिवाजी-महाराजांचें वर्तन संशयास्पद होतें, असेंही यांत म्हटल्यासारखें होतें व केवळ पुराव्याच्या अभावीं संशयाचा फायदा देऊन शिवाजीला या प्रकरणांत दोपमुक्त केल्यासारखें दिसतें. कांहीं नांवाजलेले अगदीं अलिकडले इंग्रज इतिहासवेत्ते तर इतकेंही करण्यास कबूल नाहींत. ते याहीपेक्षां पुढें जाऊन म्हणतात कीं, प्रत्यक्ष पुरावा राहिला नाहीं त्या अर्थीं शिवाजी हा निःसंशय खुनी ठरतो व याबद्दल वादच उरत नाहीं. यासाठीं या विधानाचा खुलासा करणें अवश्य आहे.[१] इतर कोणे ठिकाणीं हें असलें विधान कदाचित् खरें होऊं शकेल. पण या अफजलखानाचे प्रकरणीं तरी हें विधान पटण्यासारखें नाहीं. कारण असें कीं, एक तर तेव्हांपासून आतांपर्यंतचे निरनिराळे अनेक बखरकार, पोवाडेकार, टाचणें लिहिणारे, टिपणें-यादी करणारे, कैफियती सांगणारे हे सर्व महाराष्ट्रलेखक ही एक गोष्ट एकमतानें सांगत आहेत. व हे सगळे खानालाच दोप देत आहेत. हे सर्व लेखक अस्सल लवाड आणि हे सर्व जाणून बोजून बजिन्नस खोटेंच लिहितात, असें कोणीही म्हणणार नाहीं. तसेंच यांपैकीं कोणासही खरी हकीगत कळलीच नाहीं व ती समजणें शक्य नाहीं, हेंही मानतां येण्यासारखें नाहीं. जी गोष्ट पट्कर्णीं होते ती केव्हांही गुप्त राहूं शकत नाहीं. आणि या झटापटीचे वेळीं तर गुप्तता राहण्याची बिलकुल सोय नव्हती. कारण भेटीची सदर अगदीं उघड्या ठिकाणावर होती. आणि त्या सदरेचे दरवाजे कांहीं बंद करून घेतलेले नव्हते. किंवा गोषाच्या

१. सुप्रसिद्ध इतिहासज्ञ मि. बेव्हरिज हे ग्रेट ब्रिटनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जुल १९२१ च्या ताज्या अंकांत श्री. सेनच्या सभासदी बखरीच्या भाषांतरावर टीका करतांना लिहितात :— Sivaji's favourite goddess was Bhavani that is the goddess of the thugs & he claimed that she appeared to him in a dream the night before the murder & promised to stand by him. ..I am sorry that Y. N. Sarkar accepts the story that Afzal was the oppressor and thinks that Sivaji acted in self-defence. There is no evidence for this, for no one was present except the two men Afzal and Sivaji; Sivaji destroyed the evidence against himself by stabbing Afzal....All the probabilities are against Afzal's being the assailant. He was an elderly man & so feeble that he had to move about in a litter......there is no reason to suppose that Afzal was accompanied by a force of 12000 cavalry. बेव्हरिज साहेब हे हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधीं तज्ज्ञ समजले जातात. यांच्या सर्व विधानांस उत्तर आलेंच आहे. महाराष्ट्राच्या मुलांना वाचण्याकरितां महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्रीयांनींच आंग मोडून मेहनतीनें लिहिला पाहिजे, हें वरील उताऱ्याचें तात्पर्य आहे.

जनानखान्याप्रमाणें त्याभोंवतीं कांहीं उंच उंच भिंती घातलेल्या नव्हत्या, कीं तो समयही कांहीं काळोख्या रात्रीचा नव्हता. तेथें स्वच्छ उजेड होता. वरून श्रीसूर्य-नारायण प्रकाशत होता. गडावरून लोक बघत होते. सदरेभोंवतालच्या सर्व लोकांचे कान आणि डोळे तिकडेच लागलेले होते. सदरेबाहेर शिवाजी महाराजांचे लोक तर होतेच, पण शिवाय आणखी अफजलखानाचे लोकही तेथें होते. पालखीचे बत्तीस भोई आणखी इतरही लोक सदरेजवळ होते. या तंबूबाहेरील लोकांशिवाय, सदरेंत प्रत्यक्ष जवळ, अगदीं आंतले आंगाला, ज्यांच्या प्रथम कार्याकारण भेटी करविल्य ते लोक हजर होते व ते सर्व हा प्रकार नीट न्याहाळीत होते. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर, वाईचा देशपांड्या, हा तर अगदीं अव्वलपासून अखेरपर्यंत तेथें उभाच ठाकला होता. आणि कृष्णाजी भास्कर हा अगदीं शेवटपर्यंत आपल्या अन्न-दात्याचें हित चिंतीत असून आपल्या इमानाला जागून होता. तो इतका कीं, त्यानें शिवाजीवर हत्यार चालविण्यासही कमी केलें नाहीं. इतकेंच काय, पण लोक मारीत असतां शिवाजीनें त्यांस सोडवून जाऊं दिलें, तरीही तो तेथून गेला नाहीं. त्यानें बाहेरचे लोकांस आंत बोलविलें. आणि शक्य ती सर्व कामगिरी बजाविली. आंत कांहीं दग्याचा प्रकार शिवाजीनें केला असता, तर कृष्णाजीनें ही गोष्ट विजापूर दरबाराला केवढी मोठी करून सांगितली असती. आणि त्याच्या आधारावर मुसलमान अखबार-नविसांनीं आणि इतर परकी इतिहासकारांनीं केवढालीं गंजिफांचीं गोपुरें उभीं केलीं असतीं. पण अशा हवेंतल्या हवेल्या रचण्यास त्यांस पिसाचाही आधार मिळाला नाहीं. परांचे कावळे हे इतिहासकार करते किंवा नाहीं हें कळण्यास कांहीं दूर जावयाला नको. कांहीं काडीचाही आधार नसतां त्यांनीं मनाचेच मजले उठवलेले आपल्यापुढें आहेत. काफीखान हा तेथून फार दूरचा राहणारा होता व तो या वधाला खून म्हणून म्हणतो, तें एक आपण सोडूं. पण बुसातिने सलातीनकार तर अगदींच जवळचा. आणि त्याच्यावर पुष्कळ मंडळींची भिस्त. हा सत्यास सदैव जागणारा इतिहासकार म्हणतो कीं, " शिवाजीनें अफजलखानाच्या डेऱ्यास जाऊन त्यास मेजवानीस बोलाविलें. नंतर अफजलखान विश्वासानें शिवाजीकडे मेजवानीस गेला. त्याच्याबरोबर बारा लोक होते. पण अफजलखान हा एकटाच गडावर आंत संकेतस्थलीं पोंचतांच शिवा-जीच्या हुकमावरून गडकऱ्यांनीं किल्ल्याचे दरवाजे बंद केलें व मग शिवाजीनें त्यास मारलें. " ही हकीगत आमच्या अनेक इतिहासलेखकांनीं या ग्रंथाधारें अशीच नुसती दिली आहे. त्यासंबंधें आणखी टीका त्यांनीं केली नाहीं. आणि मलाही वाटतें कीं, या हकीगतीवर निराळी टीका करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. ही अशी नुसतीच देणें इतकीच टीका यावर भरपूर पुरेशी आहे. आतां सर्वांत मोठे इतिहासकार ग्रांट डफ-साहेब, ज्यांना शिवाजीच्या वंशजांचे दप्तरखाने खुले होते, जे प्रतापसिंह महाराजांच्या पदरीं खुद्द साताऱ्यास राहिलेले होते, ज्यांना फॅक्टरी रेकार्ड्सची आणि इतर अस्सल

कागदपत्रांची किल्ली सहज मिळण्यासरखी होती, तेंच या प्रकरणांत शिवाजीमहाराजांना दोष देतात व खुनाचे आरोपी ठरवितात, याला मात्र काय म्हणावें हें कळत नाहीं. पण आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, डफसाहेबांना या खान प्रकरणासंबंधाचे अनेक कागदपत्र प्रतापसिंह महाराजांनीं दिले होते. आणि शेवटीं डफ साहेबांनीं त्यांच्या वैभवशाली पूर्वजांबद्दल या प्रकरणांत काय म्हटलें आहे हें जेव्हां प्रतापसिंह महाराजांचे कानावर गेलें, तेव्हां ते फार नाराज झाले. व मग पुन्हां ऐतिहासिक माहिती कोणासही पुरवण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. डफसाहेबांचे लेखनानंतर आजपर्यंत यावद्दल अनेक लेख लिहिले गेले; पण आश्चर्य असें कीं, डफसाहेबांच्या ग्रंथाची नवीन आवृत्ति तयार करण्याचें काम ज्या संपादकांनीं केलें, ते आमचे वयोवृद्ध इतिहासकार राजमान्य राजेश्री भाईसाहेब गुप्ते हेही यासंबंधें ब्र न काढतां, मूग गिळून बसले आहेत. नुसती दुसरी बाजू पुढें मांडणें हेंही त्यांस अवश्य किंवा इष्ट वाटलें नाहीं.

पण ही गोष्ट आतां फार जुनी झाली. हिजला अडीचशें वर्षांवर वर्षें लोटून गेलीं. आतां हा रिकामा ऊहापोह कशाला? अफजलखानाच्या वधाच्या ऊहापोहाबद्दल आजपर्यंत कैकांना प्रायश्चित्तें भोगावीं लागलीं आहेत. तेव्हां आतां आपण फिरून त्यांत फारसें न पडतां इतकेंच म्हणूं कीं, शिवाजी व अफजलखान हे एकमेकांना खाण्यासाठीं टपले असतांना त्या डावांत शिवाजीनें खानावर मात केली व प्रतापगडावर आपली सत्ता कायम केली. त्या वेळेपूर्वीं तर हा किल्ला केव्हांही कोणच्याही अविधाच्या ताब्यांत नव्हताच, पण अजूनपर्यंत, या घटकेपर्यंत देखील, हा किल्ला हिंदूंच्याच ताब्यांत आहे.[1] हिंदूंच्या मनाला आणि धर्माला ओंगळ वाटेल असें कोणतेही प्रकार या किल्ल्याच्या आवारांत कधींही घडले गेले नाहींत. हा येथल्या मृत्तिकेचा पुण्यप्रभाव आहे. अशा या किल्ल्याच्या आवारांत कांहीं काळ तरी गेलें असतां आणि तेथल्या श्रीअंबाभवानीच्या समोर जेथें शिवाजीमहाराज उभे राहून त्या मातेची पूजा करीत व तिला हात जोडीत असत, तेथें उभें राहून क्षणभर शांत चित्तानें या जगन्मातेचे पाय चिंतिले असतां कोणाही मराठ्याला आपण आज धन्य झालों, असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं. तेथेंच आणखी थोडा वेळ खर्चून देवीसमोर ज्या दगडी चिऱ्यावर वसून महाराज देवीपुढें पुराणश्रवण करीत, त्या चौकोनी पाषाणशिलेवर उभें राहून आपल्या कृतकर्मांचें मनाशींच परीक्षण केलें व कृतापराधा-

१. शके १७५२ चैत्र शु. ८ ( ३१–३–१८३० ) रोजीं सरकार दौलतमदार कंपनी इंग्रजबहादूर व छत्रपती महाराज सातारकर या दरमियान तहनामा ठरला, त्यां अन्वयें हा प्रांत साताराचे महाराजांकडून इंग्रज सरकारकडे आला. पण त्या तहनाम्यांत ‘ किल्ले प्रतापगड व त्या किल्ल्याचे घेराची जमीन खेरीज करता बाकी जमीन मौजे पारची घेणें ’ असे पहिलेच कलमांत मुक्रर केलें आहे.

बद्दल त्या मातेची क्षमा याचली, तर पापमुक्त होऊन, पंढरीस गेल्याशिवाय येथेंही चारी मुक्ति सहज साधतां येतील, याचा अनुभव प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनाला पटेल; या किल्ल्याच्या आंतली कोठलीही चिमूटभर मृत्तिका आपल्या भंडाऱ्यांत ठेविली, तर त्यापासून सदैव बरखत येईल, आणि या मृत्तिकेचे ताईत करून आपल्या मुलांच्या गळयांत बांधले असतां भूतपिशाच्चांची बाधा दूर होऊन त्यांच्या अनेक कामना पूर्ण होतील याचा पडताळा कोणाही हिंदूस अनुभवाअंतीं खास पटेल. जिवंत-पणीं तर याची साक्ष पटेलच, पण आसन्नमरणकालींही, सदैव जवळ ठेवलेली या मातोश्रीच्या आंगणांतली मृत्तिका, खालीं ठेवून त्यावर प्राणोत्क्रमण झालें असतां, पांढऱ्या घोंगडीपेक्षां आणि गंगाजलपेक्षांही चित्ताला प्रसन्नता जास्त वाटून पुनर्जन्मांत देखील याचा लाभ घडल्यावांचून राहणार नाहीं. ।। शुभं भवतु ।।

# श्रीशिवाजीमहाराजांचें एक राजकारण

क्षत्रियकुलावतंस श्रीशिवाजी महाराज भोसले यांच्या पराक्रमास शके १५६२चे सुमारास प्रारंभ झाला. प्रारंभींच शके १५६२ मध्यें त्यांनीं मुरुंबदेव डोंगर घेऊन त्यावर राजगड हा किल्ला बांधला. या पहिल्या किल्ल्याच्या पायास मुहूर्त तेथील पुरोहित कृष्णभट बिन गोविंदभट यानें दिला होता.[१] यानंतर सुमारें पांच वर्षांनीं ( शके १५६७ मध्यें ) सुपे प्रांत शिवाजीस अर्जानी जाहला.[२] सुपे प्रांत मिळाल्यानंतर दोन वर्षांतच शिवाजीनें चाकण घेतलें व शिवापूरकर देशपांडे बापुजीपंत यांनीं मोठ्या करामतीनें कोंढाणा ( उर्फ सिंहगड ) हाही किल्ला शिवाजीस शके १५६९त घेऊन दिला.[३] बापुजीपंतानें हा किल्ला मिळविण्यापूर्वींच तेथील नामजाद व सुभेदार आणि शिवाजीचा गुरु दादाजी कोंडदेव गोचिवडे हा मृत्यु पावला होता. दादाजी हा शके १५६९ चे ज्येष्ठ किंवा आषाढांत वारला.[४] दादाजी वारल्यानंतर एक-दोन वर्षांतच ( १५७१ त ) शिवाजीची व रामदासस्वामींची गाठ पडली.[५] या वेळेपासूनच मोठी हिंमत बांधून शिवाजीनें अनेक कारस्थानें आरंभिलीं. त्यांतच पुरंदर किल्ल्याचें कारस्थानास सुरवात केली. सुपे प्रांत श्रीसिंहगडासारखा किल्ला हातीं आल्यावर पुरंदरासारखा किल्ला सुप्याच्या वाटेवर असल्यामुळें ताब्यांत घेणें त्यास अवश्य वाटलें व त्यासाठीं शिवाजीनें यत्न करण्यास प्रारंभ केला.

१. हरणसकर व असणीकर जोशी व बोरावळेकर पुरोहित जोशी यांचे वतनी तंट्याचे कागद व महजर.
२. राजवाडे खंड २०, पृ. १०.
३. शिवापुरकर देशपांडे बापुजीपंतीं सिंहगड किल्ला घेऊन दिला. सासवड शकावली.
४. श्री. आबासाहेब मुजुमदार यांचे संग्रहांतील पुरंदरे यांची सनद. हिची नक्कल सनदापत्रें, पृ. १११ वर आहे.
५. शके १५७१ हनुमंतस्वामींची बखर. पण कोणी म्हणतात, रामदास त्रिंबकनाशिककडे पुरश्चरण करीत असतांच त्याची व शहाजीची गांठ पडली असावी व तेव्हांपासून त्याचा या वंशावर लोभ असावा.

पुरंदर हा किल्ला पूर्वी वेदर येथील पातशहाच्या अंमलांत होता. या प्रांतावर नीट अम्मल बसावा म्हणून पातशहानें चंद्रस नांवाच्या आपल्या एका अंमलदाराकडून बांधवून तेथेंच त्यास सरनाईक करून ठेविला होता व त्याचे हाताखालीं जाधवराव कनोजा व भटार कोळी आणि महणे कोळी यांस नाईक म्हणून ठेविलें होतें.[१] अनेक पिढ्यांपर्यंत ही सरनाइकी चंद्रसांकडेच होती. मूळ सरनाइकी मिळवणाराचें नांव मकरंदपंत होतें. हा गौतम गोत्री अश्वलायन सूत्री देशस्थ ब्राह्मण. यासच चंद्रसपंत असें कांहीं बखरकार म्हणतात, पण चंद्रस हें याचें उपनांव होय. या मकरंदपंत चंद्रसाचा नातू निळोपंत हा सरनाइकी करीत असतां तेथील लोकांनीं बखेडा केला व किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला. ते वेळीं निळोपंत व त्याचा पुत्र महादाजीपंत यांस फौज व दौलत देऊन किल्ला काबीज करण्यासाठीं हुकुम देऊन पादशहानें रवाना केलें व या बापलेकांनीं झुंजून किल्ला ताब्यांत घेऊन तेथें पादशाही अम्मल सुरू केला. थोडे दिवसांत निळोपंताचा काळ झाला व किल्याचें सर्व काम त्याचा पुत्र महादाजीपंत हा पाहूं लागला. निळोपंताचें व शहाजीराजे भोंसले यांचें फार सख्य होतें. निळकंठपंत हे पादशाहीतर्फे सरनाईक होते. तेव्हां शहाजीराजे पादशाही चाकर व हेही पादशाही चाकर. पादशाहीमध्यें गडबड होऊं लागली. ते समयीं ते त्यांचें साहित्य करीत. पुढें शहाजीराजे चंदीस गेले. तेव्हां शिवाजीराजे कोळी-महार मिळवून वाटा पाडूं लागले. किल्ल्यास जाऊं देईनात. तेव्हां महादाजी निळकंठरायानीं तजवीज करून कोळी किल्ल्यास आणून त्यांचा गौरव करून वस्त्रें देऊन बंदोबस्त केला.[२] यानंतर शहाजीस शके १५७०मध्यें मुसलमानांनीं कैद केलें. या वेळीं दादाजी कोंडदेव मृत्यु पावला होता व शहाजी हा कैदेंत होता. पुढें कांहीं काळानें महादजी निळकंठ हाही मृत्यु पावला.

महादाजीपंत वारल्यावर शहाजी महाराजांनीं त्याचे मुलास एक दुखवटयाचें पत्र लिहिलें तें असें—

श्री

मशरूर हजरत राजमान्य राजश्री निलोपंत तथा शंकराजी पंडित व विसाजीपंत तथा त्रिंबक पंडित प्रती महाराज राजश्री शहाजी राजे दंडवत उपरी राजेश्री

१. गणेश शंकाजीची तक्रीर.
२. कोळयांच्या तंटयांत सखाराम बापू यांनीं केलेल्या चौकशीचे कागद. या वेळीं महादाजीपंत पागेचें घोडे व गडकरी बरोबर घेऊन पंधरा दिवसीं खालीं उतरून दोचौ दिवसांचे स्वारीस पाठवून येखादा गांव काफला करून मागती किल्यावर जावें असें करीत होते. शिवाजी राजानी फलटणकर निंबाळकर यांचे हातून राजकारण किल्ला घ्यावा येविसीं फार केलें. परंतु उपाय चालेना. —द्वारकाबाई कोम नारो नरसिंगराव हिचे तंटयाचे कागद.

निलकंठरायास[1] देवाज्ञा जाहली म्हणून चिरंजीवाने लिहीले तरी वहूत अनुचीत जाहले श्रीच्या करणीस कांहीं चालत नाही विवेकी आहां आपले समाधान आसो देणे चिरंजीवे तुमच्या सरंजामीचे बाव लिहीले होते तरी तुमच्या कंठाली पाठविल्या आहेती त्या घेणे व लुगडीही पाठविली आहेत ते घेणे राजश्री राऊ गोसावी जैसे कांहीं समाधाने व स्नेहे करून चालत होते तेच रीती तुम्ही वर्तणे तेणे करून तुमचे उत्तरोत्तर उर्जीत आहे कोण्हे विपई चिंता न करणे सकलाचे समाधान करणे राजश्री भट गोसावी व रघुनाथ वहुता रिती तुमचे विपई सांगितले तरी तुम्ही सूज्ञ आहा भले आहा कोण्हे विषई तुम्हापासून आंतर पडणार नाही तुम्ही सकळ विषई आपले समा(धा)न असो दीजे मोर्तब सुद रा. छ १६ रजब.

महादाजीपंतामागें त्याचे तीन मुलगे व एक कन्या अशीं चार अपत्यें होतीं. महादाजीपंतास दोन वायका होत्या. थोरलीचें नांव मनूबाई व धाकटीचें नांव येसूबाई. हीस पुत्र दोन, एक त्र्यंवकपंत व एक विसाजीपंत. विसाजीपंत महादाजीपंताच्या हयातींतच झुंझास कामास आले. त्र्यंवकपंत मागें हयात होते. निळोपंतास शामजी नाईक पुंडे यांची कन्या दिली होती, आणि त्याची वहीण म्हणजे महादाजीपंताची कन्या चिंचवडकर देवांकडे दिली होती.

महादाजीपंताचे वडील पुत्र निळोपंत हे कांहीसे भावार्थी, सांगितल्या वुद्धीचे होते. पण यांची वायको मोठी धूर्त व जरा जहांवाज होती. शंकराजीपंत हे अक्कलवंत व कामसू होते. पण भावजयीपुढें त्यांचें कांहीं चालत नसे. महादाजीपंतांची माया दुसऱ्या वायकोच्या मोठ्या मुलावर विशेष होती व ते त्यांस लाडाने पिलाजी असें म्हणत असत.

महादाजीपंताचा काळ झाल्यावर शंकराजीपंत हे किल्ल्याची येखत्यारी करीत होते. उभयता वंधू एकत्र होते. तेव्हां शंकराजीपंत हे धाकटे वंधु असतां सर्व कारभार तेच करितात हें उत्तम नाहीं, असें समजून निळोपंतांचे स्त्रीनें घरचे लोक व गडकरी वगैरे यांस फितवून मथितार्थ केला कीं, शंकराजीपंतांस धरावें अथवा मारावें. त्यास लाले ( उपाध्ये ? ) यांनीं अनुमोदन दिलें. परंतु शंकराजीपंत हे हस्तगत होईनात. कर्ते पुरुष पागा लोक होते त्याजला स्वारीस पाठवावयासी लागले. त्यांजपैकीं निळोपंताचे स्त्रीनें फितावले. त्यांनीं सिवंदीचा गवगवा करून वरते राहिले व बाकीचे लोक व पागा खालते स्वारीस पाठविले. शंकराजीपंत किल्ल्यावर दहापांच लोकांनिसी होते. निळोपंताचे (स्त्रीचे) मिळताऊ लोक किल्ल्यावर होते, त्यांनीं मजकूर केला हें शंकराजीपंतांस ठाऊक नाहीं. प्रात:काळीं शंकराजीपंत सदरेस तोंड धूत वसलेत तों निळोपंतांनीं चाळीस-पन्नास माणूस सुद्धां सदरेस हत्यारवंद चालून येऊन शंकराजी-

१. निलकंठराय म्हणजे महादाजी. येथें निलकंठराव हा किताव आहे. विशेष नांव नाहीं.

पंतापासीं दोन-चार माणसें होतीं त्यांसी मारमार केली. शंकराजीपंतांचें झुंज जाहलें. निळोपंताकडील दोन-चार माणसें ठार, कांहीं जखमी ऐसी जाहली. शंकराजीपंतापासी जमायत नव्हती. खासा जखमी जाहले. दहा-पंधरा जखमा अंगावर होऊन घायाळ जाहले. माणसें होतीं तीं कांहीं मेलीं, कांहीं पळालीं. ऐसे असतां निळोपंत वडील बंधू दया न येतां शंकराजीपंत घायाळ पडले होते त्याचें डोकें कापावयास तयार झाले. तेथें कोणी मायेचे होते त्याणी निषेध केला; व सोडविले. तेव्हां शंकराजीपंतांची स्त्री होती, तिने उचलून घरांत नेले. यापुढें या भावांचें नीट न पटतां मनांत वैषम्य उभें राहिलें.

याच सुमारास शिवाजी महाराजांचे मनांत हा किल्ला घेण्याचें पुन्हां आलें व त्यांनीं पैगम सुरू केला. शिवाजी महाराजांनीं त्यांस पत्र लिहिलें 'जे दादाजीपंत वडिलासमान होते. त्यांस मृत्यु जाहला. आतां आपणास आसरा नाहीं. गडाच्या माचीस खालीं येऊनु त्याणीं उत्तर दिधले जे दुसरा विचार नाहीं. तुह्मी अगत्य यावें.' उत्तर येतांच गडाखालीं पागा व मावळे देखील जाऊन माचीस राहिले. निळकंठरावाचा पुतण्या, म्हणजे शंकराजीपंताचा पुत्र, एका कागदांत लिहितो कीं, नंतर 'शिवाजी महाराज किल्ल्याचे आश्रयास छावणीस येऊन राहिले.' शिवाजी महाराजांबरोबर जिजाऊही होती. मुक्काम बरेच दिवस होता. त्याउपरी दिपवाळीचा सण आला. वाकेनवीस लिहितात, 'त्या वेळीं सणाबद्दल जिजाऊस व सीववास आंवतणे सांगावे म्हणून भावास धाडिले. आंवतणे घेतलें नाहीं. मागतीं शिवाजीराजे यांनीं अनमान केला. उत्तर दिधलें जे 'आपणास उभयेतांस, लोकांस टाकून येतां नये. येथें तुमचेंच आहे.' भावांस फिराऊन फिरावून धाडिलें. आंवतणें घेतले नाहीं. मागतीं तिघां भावांनीं विचार केला जे, शहाजी राजे यांचा शब्द लागेल. भाऊपणा पुरातन. त्यांची स्त्री जिजाऊ, व पुत्र सिऊवास व समेत लोक बारगीर व मावळे, कुल लोकांस येकंदर परवानगी देऊन गडावरी समस्तांस आणिलें पाहिजे. ऐसा विचार करूच भाऊ येऊन समस्तांस गडावर घेऊन गेले. तीन दिवस न्हाणें व भोजनें व उत्तम वस्त्रें उभयतांस व लोकांस देऊन, भाऊबीज करून बोळवण करावी, असें केलें. प्रतिपदेस भोजनें जाहलीं. रात्रीं जागरण जहालें. निळकंठराऊ स्त्रीसह वर्तमान निद्रा केली. प्रातःकाल चार घटिका रात्र असतां निळकंठराऊ त्यांचे पलंगाखालें काढण्या घालून, स्त्रीस येकीकडे काढून पलंगावर बांधिलें. पायीं बिडी घातली. तेच समयीं त्यांचे भाऊ दोघेजण त्यांचेही पायीं शृंखला घालोन खोलीमध्यें ठेवून, गडाचे दरवाजावर मावळे लोक पाठवून गडावर जागां जागां चौकी पाठविली. त्यांचे लोक तमाम बायका देखील गडाखालें घातली. गडावरील घरची चीजवस्त्र दौलत सारी लुटली. गड फत्ते केला. द्रव्य व खजीना व जवाहीर सर्व नेलें. निळकंठरायाची मुले माणसे उतरून पुणियास नेलीं. बाजी घोलप बरे अक्कलवंत शहाणे माणूस

सीवाजीपासी होते; जाणून त्यास किलेदारी सांगितली. नेताजी पालकर यास सरनोवत सांगितली. राजे खालीं उतरोन पुणियास गेले.' निळकंठरावाचे पुत्र व पुतणे आपल्या कागदांत लिहितात कीं, 'आपले आजे महादाजीपंत मृत्यु पावले. त्यावरी पुत्र भांडों लागले. त्यामुळें गड शिवाजीचे हातास आला.' शंकराजीचा मुलगा गणेश शंकराजी व त्याचा भाऊबंद नारो चिंतामण हेही असेंच म्हणतात. नारो चिंतामण लिहितो, 'शिवाजी महाराज किल्ल्याचे आश्रयास छावणी येऊन राहिले. दिपवाळीचा सण आला. स्नेहामुळें किल्ल्यावर मेजवानीस नेले. मेजवानी झाली. रात्रीस किल्ल्यावर राहिले. विश्वासघात करून दोघां भावांस राजानीं कैद केले. किल्ला घेतला. भावांस किल्ला खालीं उतरून दिल्हे. किल्ल्यावरचे घरांची चीज वस्त दौलत सारी लुटली,' इ. इ. असें दिसतें कीं, या वेळीं कांहींतरी झटापट झाली असावी. कारण नंतरची हकीगत देतांना पुढें एके कागदांत दादो गंगाधर लिहितो कीं, 'शिवाजी महाराजानीं वाड्यांतील वस्तवाणी वटकी चाकर सर्व मोजदाद करून सरकारांत ठेविलें. शंकराजीपंत जखमी पालखींत घालून, व त्याची स्त्री व निळोपंत स्त्री सुद्धां राजानीं आपले हातें खाली उतरली तो पुरात[1] शंकराजीपंतीं पागा चाकरीस पाठविली ती येऊन राहिली होती ती राजानी अगदी आपले सरकारांत लाविली. तेथून निळोपंत शंकराजीपंत यांस बरोबर पुणियास आणले. लाल महालांत अटकेस कविले सुद्धां ठेविले. तवीव आणवून शंकराजीपंताचे जखमांची बरदास्त करविली. शंकराजीपंतास व निळोपंतास राजियानीं रूबरू सांगितले जे तुम्ही चाकर होऊन आपले बरे करून घेऊन चाकरी करावी. शंकराजी पंतीं जावसाल केला कीं आम्ही पुरातन बादशाही चाकर. त्यासी हलामखोरी करून तुमचे चाकर म्हणवीत नाहीं.' शिवाजीमहाराजांनीं दयावंत होऊन त्यांस चाकरी सांगून पाहिली. पण या पाजींचे डोळे उघडले नाहींत. स्वराज्यस्थापनेची कल्पना त्यांस यत्किंचितही होती, असें दिसत नाहीं. ते असे मगरूरीचे जवाब देऊं लागले तेव्हां अशांस योग्य तेंच बक्षीस शिवाजीमहाराजांनीं त्यांस दिलें. त्यांस पुण्यास अटकेंत ठेविले. आपल्या हट्टाचा आणि दुराग्रहाचा नतीजा हे हरामखोर पावले. पोटांत मूल आडवें आलें तर तेंही कापून काढावें लागतें. तों यांचा हिशोब काय ? हें राजकारण आहे. हा कांहीं भातुकलीचा खेळ नव्हे, कीं सोंगट्यांचा डाव नव्हे. आणिक असता तर ठारच मारता. पण श्रीशिवाजी महाराज फार थोर कृपावंत, शत्रूंवरही दया करणारे. त्यांनीं त्यांस आपले जवळच अटकेंत ठेविलें. व त्यांच्या खाण्यापिण्याची आणि जखमांची बरदास्त उत्तम प्रकारची केली. 'जखमा लौकरच बऱ्या झाल्या. पुढें शंकराजीपंत मर्द माणूस, मातबर, कर्ते, पुरंदर कुमक नसतां बहुत दिवस रक्षिला. हें चित्तास आणून, त्यास घोडें बसावयास देऊन बरावर बाळगूं लागले. मुहूर्त करून (एके वेळीं)

१. हा गांव पुरंदर किल्ल्याखालीं आगदीं नजीक आहे.

राजे कामगिरीस जात होते. पाठीमागें शंकराजीपंत घोड्यावर बसून होते. याचे मागें नगारियाचा उंट येत होता; त्यास घोडा बुजून भोयाच्या अंगावर गेला. त्यानीं घोड्यास काठी मारली. शंकराजीपंतीं नगारची यास सांगितले तो मागे चालेना. तेव्हां रागास येऊन नगारची यास मारिलें. हें राजानीं पाहून अपशकून जाणून माघारे आले. शंकराजीपंतास बराबर वाळगितो, हे आपणासच अदावतीनें मारतील, हें जाणून मागती शंकराजीपंतांस बेडी घालून ठेविले. वर्ष सहा महिने लोटले. पुढें शंकराजीपंताची वहीण ती देव चिंचवडचे यांची सून, त्या नात्यामुळें देवानीं शिवाजी महाराजांस सांगितलें जे शंकराजीपंतांस अटकेस ठेवूं नये, किल्ल्यास व महाराजांस दगाधोपा करणार नाही. यास आम्ही जामीन असों. ऐसे बोलोन त्याचे भिडेवर मोकळे केले. सरनाइकी व वतनें दुमाला करीनात. तेव्हां मागती देवानीं रदबदल करून चांवळी व सुप्याची पाटिलकी देविली.' शंकराजीपंत बेगुमान स्वराज्याच्या वाटेंतले कंटक म्हणनच त्यांस आपले वतनास आणि पुरंदरच्या सरनाइकीस मुकावें लागलें, हें उघड आहे. कारण थोडेच दिवसांत त्या पुण्यप्रताप, थोर अंतःकरणाच्या प्रजावत्सल श्रीशिवाजी महाराजांनीं निळोजीपंताची विनंती मान्य करून त्यास सरनाइकी दिली, निळोपंतानें शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें होतें त्यास महाराजांनीं पुढील उत्तर शके १५७६ च्या अधिक भाद्रपद शु. ७ मीस बुधवारीं पाठविलें आहे—

श्री

मसरूल हजरत अखंडित लक्ष्मी राजमान्य राजेश्री निळकंठराऊ प्रति सीवाजी राजे दंडवत उपरी तुम्ही राजेश्री बाबाजी नाइकास[1] बराबरी पत्र पाठविले तें पावोन लिहीले प्रमाणें सविस्तर वर्तमान कळों आले व कितेक मुखवचनें नाईक मा।। इले हाती सांगोन पाठविले तेही तीही सविस्तर सांगितले व नाईक बोलिले की आम्ही त्यांसी तह केला आहे की जैसे काही राऊगोसावी साहेबासी वर्तत होते तैसेच हेही साहेबासी वर्ततील व साहेब जैसे राजश्री राऊगोसावी यांचें चालवीत होते तैसेच याचेही चालवावे ऐसा निश्चय करून आपण आलो असो म्हणऊन बोलिले तरी जें काहीं राजेश्री बाबाजी नाईक तुम्हासी निश्चय केला तोच आमचा निश्चय असे जैसे काही राऊ गोसावी आम्हासी वर्तत होते तैसेच तुम्हीही आम्हासी वर्तत जाणे व आम्ही जैसे काही राजश्री राऊ गोसावी याचे चालवीत होतो तैसेच तुमचेही चालऊन ए विशई आम्हास श्री ची व राजश्री महाराज साहेबाच्या पायांची व सौभाग्यवती मातुश्री साहेबांच्या पायांची आण असे व ये विषई श्री चा दवणा पाठविला असे तो

१. बाबाजी नाईक पुंडे हा फार हुशार असून भोसल्यांच्या कुटुंबाचा एक ऋणानुबंधी, महाराजांच्या विश्वासांतला होता. हा श्रीशिवाजी महाराजांतर्फे परदरबारांत वकिली करी. पर्णालाख्यान, अ. ३, श्लो. १५ मध्यें याचा उल्लेख आला आहे.

घेणे व जोपर्यंत तुम्ही आम्हासी इमानें वर्ताल तोपर्यंत आम्हीही तुम्हासी इमान वर्तोन तुम्हापासोन इमानास अंतर पडिलिया आमचाही इमान नाही. छ ६ सौवाल सु।। खमस खमसैन अलफ.

यानंतर निळोपंतही सरकारकामें करूं लागले. सर्वांत धाकटे पुत्र पिलाजी हे तर पूर्वीच वळले होते. पुढें यांस प्रभानवल्लीकडे अंमल सांगितला होता, तो त्यांनीं फार चांगल्या रितीनें चालविला. चांवलीकर सरनाइकांच्या कुटुंबाची पुढील हकीकत कशी काय झाली, हें त्यांच्या येथील दप्तरांतील एका जुन्या कागदावरून उतरून घेतों:–

शंकराजीपंतास वडील पुत्र मनाजीपंत त्यांचें यांचें वनेना. सवव वांईस शिरवली रोजगार करून होता. गणेशपंत धाकटे पांच सात वर्षांचे होते. मनाजीपंताची स्त्री याजपासी होती. शंकराजीपंताची धाकटी मुले गणेशपंताहून एक कन्या व एक पुत्र एसी होती. शाहादीखान याची धामधूम जाली. घर लुटून नेले. संभाळून पळून जाण्यास आवसर मिळाला नाही. मोंगलाने गणेशपंत व मनाजी स्त्री लहानच होती, ती व दुसरी दोघी धाकटी मुले ऐसी चार मुलें नेली. त्यांत लेक व धाकटी मुले या दोघांची काय गत झाली ही कळली नाही. गणेशपंत मनाजीपंताची स्त्री एका शिपायास सांपडली ती रात्रीची राहुटीचे खांवापाशी बांधून ठेविली. त्यांनी रात्री एकमेकाचे हात सोडून पळून गेली. ती खांवगावास उजाडावयास गेली. तेथील पाटलास भेटली. त्यानी पुरसीस करता आमक्याकडे कळला तेव्हां महार चांवलीस पाठविला. शंकराजीपंत वायकोसुद्धा अगोदर घरास आले होते. शंकराजीपंतास महाराने वर्तमान सांगितल्यानंतर खामगावास जाऊन मुलें आणली. मागे शिवाजी महाराजास किल्ला निळोपंती दिल्हा ते वेळेस घरदार अगदी गेले होते. कांहीं थोडेसे उरले होते, ते शाहाजीखानाचे पळणीत गेले. इनामाचे वगैरे कागदपत्र काही नाहीत. चांवळीचा इनाम व सुभ्याची पाटिलकी चालतच होती. तेव्हां चांवली शंकराजीपंताचा कौल झाला. गणेशपंत वतन आनभऊन होते. त्या काळी पातशहा औरंगजेब या प्रांतास येऊन किल्ले गड घेतले. सिंहगडास येऊन सिंहगड घेतला. ते वेळेस घारोजी कामथा चांवळींकर याने चुगली पातशाही कारभाऱ्यांपासी केली की, गणेशपंतापासी काही कागदपत्र नसता इनाम खातात. त्यावर इनाम आमानत जाहले. उपाय नाही, भक्षावयास नाही. ऐसे असतां गणेशपंत पातशाही लष्करांत खेळण्यास गेले. वाटेने नदीनाल्याचे थंडीने हाल फार जाहाले. पातशाही मनसबदार बापुजी महादेव याची भेट घेऊन वर्तमान सांगितलें. त्यांनी पुर्वील मातवरी ऐकली होती. त्याजवरून कृपा करून सहा महिने ठेऊन घेऊन पातशाही सनद दिवाणी मोहरेची करून देविली. दरबार खर्च पडला. त्याच्या वराता घरी वायकोवर केल्या. त्या कालांत दोन सेर धारण. घरी एकली वायको. द्यावयास नाही. ऐसे असतां जी वरात आली ती माघारे न टाकितां

ह्यणमार सोसून, एक गाय साता जागा विकली, हे सर्वांस ठाऊक आहे. ऐसे सोसून कर्ज काम घेऊन वरातीचा पैका भरिला. कांहीं राहिला तो गणेशपंत सनदा घेऊन आले, त्याणी दिल्हा. त्यावर पातशाहाने शाहूराजे धरोन नेले होते, ते सुटोन खानदेशांत आले. तेव्हां चिमणाजी दामोदर यांजबरोबर दादोबा निळकंठराव व गणेशपंत होते. या उभयतांस चिमणाजीपंती स्वारीस पाठविले होते. तेथे कुसुंबीचे मुक्कामी शाहूमहाराजांची भेट झाली. राजापासी एक तट्टू मात्र होते. दादोबाने आपली पालखी बसावयास दिली. आपले वतनाची हकीगत सांगितली. तेव्हां महाराजानी अश्वासन दिलें कीं, स्वस्थलास गेल्यावर तुमचे वतन तुम्हांस देऊं. पुढें चिमणाजीपंताना राजाची भेट जाहली. राजे पुण्यास आले, तेथे कोणासी झुंज जाले ते स्मरणांत नाही. तेथे गोळी लागोन दादोबा निळकंठ मृत्यु पावले. त्याजला सासवडास नेऊन अग्नि दिला. बायकोने सहगमन केले. गणेशपंती कर्मांतर केले. राजे सातान्याकडे गेले तेव्हां बरोबर गणेशपंत गेले. चाकरी चुकरी कष्ट मेहनत शरीरें करून फार केली. राजे स्वराजी बसल्यावर विनंती वतनाविषयी केली. तेव्हा महादजी यमाजी बोकील, यास राजे काका म्हणत होते, त्यास दाखला पुसिला. त्यानी आमीन गोष्टी माहितगारीची सांगितली त्यावर सनद द्यावयाची परवानगी जाली व सनद [1] मिळाली. नानासाहेब पेशव्यांच्या कारगिर्दीत या सरनाइकाचा चांगला बोलबाला होता. पुढें थोरले माधवरावांचे आमलांत या सरनाइकीची त्यांचे कडे असलेला किल्ला लांच लुचपत घेऊन अमित्रांचे स्वाधीन करण्याचा यत्न केला. यावरून यांचें वतन दूर करण्यांत आलें. यांचे पैकीं एका पुरुपानें अलिकडे श्रीक्षेत्र काशीस जाऊन वास केला व तेथे श्री गोविंदधाम मठ या नांवाचा मठ स्थापला. या मठांत चांगला ग्रंथसंग्रह असल्याचें सांगतात. असो, हे पुरंदरचे कारस्थान सुमारे पांचसात वर्षे चाललें आणि इतकें चालवून तें संपवावें, असें त्याचें महत्त्वही होतें. १५७० मध्यें किल्ल्याचा पेगम प्रथम सुरू झाला. पुण्याच्या अगदीं शेजारी व सुप्याच्या तोंडावर हा असला मजबूत किल्ला सरनाइकांसारख्याच्या हाताखालीं मुसलमानांच्या अमलांत असणें फार धोक्याचें होतें. उंबरठ्यांतल्या दगडाप्रमाणें त्याची ठेच केव्हां लागेल, याचा भरंवसा नव्हता. किल्ल्याचें कारस्थान सुरू केलें तें कदाचित् अफजलखानाच्या शहामुळें सुरू असावें. कारण याच सालांत श्रावणांत शहाजीला अफजलखानानें धरलें व लगेच दुसरेच वर्षी अफजलखान वांईस सुभेदार आला व येतांच त्यानें शिवाजीला बुडवण्याचे जोराचे यत्न सुरू केले. शके १५७१ मध्येंच अफजलखानानें शिवाजीवर पहिली स्वारी केली. अफजलखानाच्या या पहिल्या स्वारीची देशी व इंग्रजी इतिहासलेखकांना कल्पनाही झालेली दिसत नाही. पहिल्या स्वारीची व्यवस्था

१. परिशिष्ट पहा.

अफजलखानानें तिमाजी पंडिताच्या मार्फत सुरू केली.[1] या मोहिमेंत कोंकणांतून पांचसातशे गलबतें आणून दर्याची वाजू रोखून धरावी[2] आणि वरघाटाकडून आपण जोर करून शिवाजीला कोंडमारा करून त्यास चेंगरून भरडून टाकावा, असा खानाचा डाव होता. पण हा डाव साधला नाहीं व ही मोहीम सपशेल फसली.[3] व अरिष्ट त्या वेळेपुरतें टळलें. पण या अनुभवानें सावध होऊन शिवाजीनें विजापुरकरांचे व मोंगलांचे इकडे असलेले हस्तक नाहींसे करण्यास सुरवात केली. मोंगलांस मदत केली म्हणून सुर्वे वुडवले. विजापूरकरांस मदत करतात म्हणून मोऱ्यांचा नायनाट केला व फर्मान काढून सर्वांकडे पाठवून त्यांस कळविलें कीं, जो मुसलमानांस मदत करील तो कोणीही असो, त्याचा असाच बीमोड करूं. इतक्यांत अफजलखानानें पुन्हां वर डोकें काढलें. पण या वेळींच दिल्लीहून शाहिस्तेखान आपल्यावर सुटत असल्याची किंवा सुटल्याची खबर शिवाजीला कळली. तेव्हां अफजलखान आणि शाहिस्तेखान यादोघांस एकदम एकाच वेळीं तोंड देण्याची पाळी येऊं नये म्हणून स्वत: आंगेजणी करून अफजलखान ठार केला. अफजलखानाची अपोष्णी घेऊन शिवाजी महाराज शाहिस्तेखानाचें जेवण उरकण्यास सुरवात करूं लागले. या अपोष्णीच्या आणि जेवण्याच्या मध्यें पन्हाळा, वासोटा, चंदनवंदन, उमरखिंड, तळकोंकळण वगैरेच्या चित्रावती झाल्या; व रूस्तीमजमान, कहारतलवखान, शिद्दी जोहर, जामदारखान वगैरेंच्या प्राणाहुती झाल्या. शिद्दी जोहरच्या घासाच्या वेळीं जरा ठसका लागतो कीं काय, असें वाटलें. कारण शिवाजी पन्हाळा चढत असतांना शिद्दी जोहरानें वेढा घातला. पण शिद्दी जोहर हा विजापुर प्रांतांतला एक दांडगा बंडखोर बनला होता व तो त्या प्रांतांत नेहमीं लुटालूट करी. अनेक वेळां विजापुर दरबारानें याला पकडण्याचे यत्न केले. पण तो वस्ताद हातीं लागला नाहीं. पण अफजलखान ठार

..............................................

१. या वेळीं कान्होजी जेध्यास खानानें तिमाजीपंतामार्फत वळविलें. एका पत्रांत तो म्हणतो, तुमचे वावें तिमाजी पंडीत व त्रियंवक पंडीत लिहिलें होतें तरी तुम्हापासीं जमायत असले ती घेऊन येणे सरवारगी तुम्हास दिधली असे. बरलेख पाहुन सरंजामी करूं देऊं. या खेरीज पायीचे खलक आणाल त्याची चाकर ठेऊं. . . तुम्ही सिताव स्वार होऊनु पंडीतापासीं जाणें इ. इ. राजवाडे खं. १८, पृ. ३८४.

२. हरी कृष्ण कुळकर्णी, ता. चिपळोण, आपल्या करीण्यांत लिहितो, "विजापुराहुन अफजलखानास राजेश्री शिवाजी राजे यावरी नामजाद केले. अफजलखान हमत वजीर त्याही वरावरी व पादशाहाची फर्मानाची डौळें करून घेतली होती याही तिनशें नावा विजापुरास पोंचवाव्या ऐसा करार दाद करून फर्मानाची डौळ होतीं त्यापैकीं आपल्या नावें फर्मान करून घेतला." भा. इ. सं. मं., पु. ८.

३. या मसलतींत जमातींनसी एकतारी केल्यावद्दल शिवाजीनें चिंचले गांव दिऊजी व हवाजी हैवतराव व वाळाजी सिलीमकर यांस इनाम दिला. (रा. खं. १७, पृ. १७) व जेध्यास जोशेर खोरे दिलें. खं. १५.

मारला गेल्यावर विजापुरांत हाहाकार उडून तेथला पादशहा मोठ्या प्रसंगांत व अडचणींत पडल्यावर ही संधि आपलें गोमटें उर्जित करून घेण्यास ठीक आहे, असें पाहून हा दरबारांत गेला व त्यास तेथें असें सांगितलें कीं, तुम्ही माझे सर्व अपराध मला माफ करून, किताव व सरदारकी द्याल, तर मी जाऊन शिवाजीची राळ उडवून येतों. त्या तशा अडचणींत दरबारानें तेंही मान्य केलें; व त्याला 'सलावतीखान' असा किताव देऊन आणि त्याच्याबरोबर अफजलखानाच्या मुलाला देऊन त्याला शिवाजीवर रवाना केलें. याचें दरबारांतलें भापण आणि प्रतिज्ञा म्हणजे केवळ शिलंगाणाचें सोनें होतें, हें शिवाजीनें तेव्हांच पारखलें होतें व तो आल्यावर पन्हाळ्यास चार महिने वेढा घालून बसला असतां त्याच्याकडे शिवाजीनें बोलणें लावण्यास मनुष्यही पाठविला. त्यालाही तेंच हवें होतें. त्यानें शिवाजीला कळविलें, 'माझे मनांत तुम्हांस थोडेंच नाहींसें करावयाचें आहे !! तुम्ही नाहींसे झाल्यावर विजापुरच्या पातशहाचे शत हात मोकळे झाले म्हणजे मग तो माझ्या मानेवर घाव घालणारच, इतकें मला कळतें.' एकमेकांची इतकी खूणगांठ पटल्यावर दोघांचा अंत:स्थ तह झाला. पण अफजलखानाचा फरजंद बरोबर सैन्यांत होता, त्याच्या आणि दरबारच्या डोळ्यांना सर्व रंग बरोबर दाखवण्यासाठीं लहानसहान चकामकी आणि किल्ल्यांना वेढे देऊन बसणें, हे प्रकार जोहरानें आपले सैन्याकडून चालू ठेविले.[१] पण या असल्या वेढ्यानें काय होणार, हें शिवाजी जाणून होता. त्यानें विजापुर सैन्याला हे खेळ खेळत ठेवून, आपण स्वत: कोकणांत जाऊन शृंगारपूर लुटलें. कहारतलब-खानाशीं उंबरखिंडींत मोरोपंतांमार्फत युद्ध केलें व तळकोंकण मोकळे केलें. खालीं कोंकणांत हे प्रकार चालू असतां वरून शाहिस्तेखान येऊन त्यानें पुण्यास आपली छावणी दिली होती.

शाहिस्तेखान हा वरून यापूर्वी कसा आला व पुण्यास येऊन बसल्यावर पुढें त्याचा घास शिवाजीनें कसा केला, हा प्रकार पुढें एकादे वेळीं आपण जरा सावकाशीनें पाहूं.

## परिशिष्ट

श्री

राजश्री सुभानजी थोरात हवालदार कारकून किले पुरंधर गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री।। बालाजी बाजिराऊ प्रधान आसिर्वाद


---

१. अखेर हा संशय विजापुर दरबारास येऊन जोहरावर आपलें सैन्य घेऊन अली इदिलशहा बादशहा स्वत: त्याचा पाठलाग करण्याकरतां आला व शेवटीं जीव घेऊन पळत असतां तो इलिचपुराजवळ मरण पावला.

व नमस्कार सु।। ईसने आर्बेन मया व अलफ गणेश शंकर सरनाईक किले मजकुर यांची सरनाईकी पुरातन किले मजकूरची आहे त्यास ते श्री माहायात्रेस गेले ते समई त्याचे पुत्र सखो गणेश यांस सरनाईकी सांगोन किले मजकुरास पाठविले त्यास सखो गणेश निलकंठराव यास वसईस गोला लागोन

..............................................

## चांबळीकर सरनाईक यांची वंशावळ




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
मराठी ग्रंथ संग्रहालय
9.94

देवाज्ञा जाहाली त्याचे पुत्र निलो सखाजी सरनाइकी सांगोन पाठविले आहेत हे किले मजकुरी सरनाइकीची सेवा करितील याचे हातून सेवा चाकरी घेऊन याचे चालवीत जाणे वेतन पेशजी प्रमाणे करार केले आसे त्याप्रमाणें देत जाणे आणि सरनाइकीची सेवा चाकरी यांचे हातून घेत जाणे जाणिजे छ ६ रजव् पाा हुजूर.

लेखन
सीमा

---

# पाहिस्तेखानाची मोहीम

अवरंगझेब बादशहा तख्तीं बसल्यावर त्याचीं एक-दोन वर्षें दिल्लीकडील बंदोबस्त करण्यांत गेलीं. त्या सुमारास शिवाजीनें बराच पुंडावा आरंभिल्याची व अनेक गड-किल्ले बांधल्याची खबर त्याला लागली. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं अवरंगझेबानें अवरंगाबाद येथील मोहकमसिंग या रजपूत सरदारास शिवाजीवर मोहीम करण्यास हुकूम केला. हुकुमाप्रमाणें मोहकमसिंग हा दहा हजार फौज घेऊन शिवाजीवर मोहीम करण्यासाठीं नगराअलीकडे आला. तेव्हां त्याच्या तोंडावर शिवाजीनें कडतोजी उर्फ प्रतापराव गुजर याजबरोबर २० हजार फौज देऊन पाठविलें. प्रतापरावानें मोहकमसिंगास गांठून त्याचेबरोबर चांगली लढाई केली, व त्याची सर्व फौज बुडवून टाकली. खुद्द मोहमकसिंग हाही त्या लढाईत मरण पावला.

दिल्लीपतीचा सरदार शिवाजीनें लढाई देऊन ठार मारला, ही गोष्ट केव्हांही दुर्लक्ष करण्याजोगी नव्हती. कारण हा आतां इशमीचा प्रश्न आला व या वेळीं उपेक्षा न करतां शिवाजीची खोड मोडणें फारच अवश्य झालें. मोंगलांचें तर्फे दक्षिणच्या सुभेदारीवर सुलतान मुआझम हा होता. परंतु मुआझमपेक्षां कोणी जास्त हुशार व जास्त विश्वासांतला असा सुभेदार पाठवून शिवाजीचा बंदोबस्त करावा, असें अवरंगझेबानें योजिलें. आणि अशा विश्वासांतला व चांगला कर्तृत्ववान् पुरुष म्हटला म्हणजे पाहिस्तेखान हा होता. पाहिस्तेखान हा राणी मुमताजमहालचा सख्खा भाऊ म्हणजे अवरंगझेबाचा सख्खा मामा होय. या नात्याशिवाय पाहिस्तेखानाचें व अवरंगझेबाचें विशेष प्रेम असण्याजोगें असें दुसरेंही एक नाजुक कारण होतें. पाहिस्तेखानाच्या बिबीला आपल्या बेगमेमार्फत जेवावयाला बोलावून तिजवर शाहाजहान बादशहानें जुलूम केला होता.[1] आणि यामुळें शहाजहानचे विषयीं त्याचे मनांत

१. मनुची लिहितो कीं, शहाजहानानें असा बदमामला केल्यावर ती साध्वी बाई घरीं गेली व अन्न वर्ज करून तिनें प्राणत्याग केला. त्या वेळचे आपले अंगावरील कपडेही तिनें बदलले नाहींत. ( मनुची, भाग १, पृष्ठ १९४ ).

अत्यंत वैर होतें. पुढें अवरंगझेबानें बंड केलें व शहाजहानला कैदेंत टाकला. त्या मसलतींत षाहिस्तेखानाचें व अवरंगझेबाचें विशेष सख्य जमलें, आणि पाहिस्तेखानाच्या अंगीं कर्तबगारीही विशेष असल्यामुळें अवरंगझेबाचें त्याच्याशीं सख्य झालें होतें. नाहींपेक्षां सख्ख्या बापाशीं ज्यानें दगाबाजी करण्यास कमी केलें नाहीं, तो मामाला कसला विचारणार! परंतु शहाजहानाला कैदेंत टाकण्यांत व राज्यावरून दूर करण्यांत षाहिस्तेखानानें त्याला फार मदत केली होती. म्हणून या वेळीं त्यानें पाहिस्तेखानाची शिवाजीवर योजना केली व दक्षिणेंत जाऊन शिवाजीची खोड मोडावी व त्यास (शिवाजीस) आपण पूर्वीं इनाम दिलेल्या प्रांताचा वसूल करूं देऊं नये, आणि उलट त्याजकडून खंडणीही वसूल करावी, असा त्यानें त्यास हुकूम दिला. या दक्षिणेच्या नेमणुकीबरोबरच सर्व राज्यांतला श्रेष्ठ असा "अमीर उल उमराव" हा किताबही त्यानें पाहिस्तेखानास दिला व त्याचेबरोबर पुष्कळसें सैन्य देऊन त्याला दक्षिणेंत रवाना केलें. पूर्वीं शहाजहान बादशहाविरुद्ध खटपट करीत असतां कठीण प्रसंग पडल्यास आपणांस शिवाजीची मदत मिळावी, या हेतूनें अवरंगझेबानें शिवाजीस महाराष्ट्रांतील कांहीं (चाकण, सुपें, इंदापूर वगैरे) प्रांतांची जहागीर दिली होती. व त्याबद्दल एक ताम्रपट[1] करून दिला होता. तेव्हां या वेळीं या ताम्रपटाची अडचण येऊं नये, म्हणून त्या जहागिरीकडे आणि ताम्रपटाकडे साफ दुर्लक्ष करण्याचाही त्यानें षाहिस्तेखानास लेखी हुकूम दिला. आणि शिवाय पाहिस्तेखानाला योग्य ती मदत करण्याविषयीं विजापूर दरबारास फर्मानही लिहिलें. याप्रमाणें सर्व तऱ्हेची तयारी करून दिल्यावर पाहिस्तेखान दक्षिणेंत येण्यासाठीं निघाला. तो अवरंगाबाद येथें शके १५८१ च्या पौषांत (१८ जानेवारी १६६०) येऊन पोहोंचला. कांहीं दिवस तेथें मुक्काम करून सुमारें पंधरा दिवसांनीं माघ महिन्याचे प्रारंभीं अहमदनगर येथें तो आला व अहमदनगरहून शके १५७१ च्या माघ कृष्ण अष्टमीस बुधवारीं निघून तो सरळ दक्षिणेंत उतरला. जेधे म्हणतात, १५८२ च्या[2] संवत्सर प्रतिपदेच्या दिवशीं पाहिस्तेखान भिवरा नदी उतरून अलीकडे आला. बहुतकरून पाहिस्तेखानानें दौंडाजवळील सोनवडी या गांवाजवळ भिवरा नदी उतरली असावी. सोनवडी-वरून सुपें काबीज करून पाहिस्तेखान वैशाख शुद्ध ६ गुरुवारीं कऱ्हा नदीचे तीरीं बारामती येथें आला. बारामतीहून तसाच खालीं उतरून तो वैशाख वद्य ३ शके १५८२ ला होळ येथें, व तसाच पुढें निराकांठानें शिरवळ येथें आला. या वेळीं शिवाजी शिद्दी जोहारानें घातलेल्या पन्हाळचाच्या वेढ्यांत गुंतला होता. शिवाजी तिकडे गुंतलेला आहे, हें पाहून पाहिस्तेखानानें शिवाजीचें रहाण्याचें मुख्य ठिकाण जें राजगड त्याचे भोंवतील प्रांत काबीज करण्यास आपल्या हाताखालील कांहीं सरदारांस

१. मनुची म्हणतो कीं, हें इनामपत्र सोन्याच्या पत्र्यावर केलें होतें.
२. श. १५८२ चे कार्तिक शुद्ध १ स बुधवार येतो. ही मित्ती चुकीची दिसते.

पाठविलें; व तिकडील बरींच खेडीं लुटलीं. व आपण स्वतः खेडशिवापूर (अधिक ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा सोमवार) करून गराड्यावरून सासवड येथें आला, व नंतर पुरंदर किल्ला मारून षाहिस्तेखान अधिक ज्येष्ठ शुद्ध १० बुधवार रोजीं पुणें येथें येऊन दाखल झाला.

षाहिस्तेखान दक्षिणेंत आल्यावर त्याला तोंड देण्याची तयारी मराठ्यांनीं फारशी केलेली दिसत नाहीं, परंतु साधेल तेथपर्यंत मराठे सरदार व पाटील, देशमुख हे त्यास जाऊन मिळूं नयेत, व त्यांपैकीं जे मनानें केव्हां तरी दुखावले गेले असतील त्यांची समाजविशी करावी, त्यांचे पोटांतली मळमळ काढून टाकावी, व त्यांस आपले मायेंत गुंतवून लोभांत धरावें, असा यत्न शिवाजी महाराजांनीं फार धोरणानें केलेला दिसतो. कानद खोऱ्यांतील मरळ देशमुख झुंझारराव यांना शिवाजीचे लोकांकडून त्रास पोचत असे. यामुळें ते उठून प्रांत सोडून षाहिस्तेखानाकडे ज़ातील, ही रुखरुख होतीच, व ते देशमुखही जाण्याचीं बोलणीं बोलत. तेव्हां त्यांस मिळवून आपलेकडे राहून घेण्याचे इच्छेनें त्यांचे एका पत्रास शिवाजी महाराजांनीं पुढील उत्तर लिहिलें आहे.

श्री

राजश्री राजजी झुंजारराउ गोसावी यांसी

छ सकलगुणसंपन्न अखंडित लक्ष्मी प्रसन्न राजमान्य. प्रति राजश्री शिवाजीराजे जोहार उपरी तुम्ही पत्र पाठविले तें उत्तमसमयीं पावलें. तुमचा कुशल समाचार परिसोन संतोप वाटला. त्या उपरी अभिप्राय कीं "तुमचे लोक उपद्रव बहुत करितात. जरी निरोपद्रव होईल तरी राहों. तुम्ही आपण न राहावे ये स्थलीं तरी तैसेच उत्तर पाठविलें पाहिजे म्हणून" तरी इतके लिहिणें काय निमित्य लागले? तुम्ही आमचे लोकांचे उपद्रवाकरितां श्रमी होउनु स्थल सोडुनु जावें हे आमची वासना होईल कीं काय? हे तुम्ही आपले अंतःकरणीं विचारोन पाहोन मग ऐशा उदासीन गोष्टी लिहिणे उचित होते. राज्यक्रांती तुम्ही जाणतां, त्यामुळें सहजच उपसर्ग लागतो तथापि ताकिदी करीत आहों. पुढेंहीं करूं. सांप्रत राजश्री व्यंकोजी रुद्र मुख्य देशाधिकारी ते प्रांते आहेत त्याला पत्र दिलें आहे. ते तुम्हास निरोपद्रव राहिजेसे करतील. अंतर कांही पडणार नाही. तुम्ही आपलें समाधान असों देणें. निरंतर आपले कुशल वर्तमान लेहून पाठवीत जाणे. विशेप लिहिणे तरी (शिक्का) सूज्ञ असा (मोर्तब).

औरंगाबादेहून निघाल्या वेळेपासून षाहिस्तेखानाच्या मोंगली सैन्यास मराठ्यांनीं कोठेंच नीटसें तोंड दिलें नाहीं. षाहिस्तेखानाबरोबर सैन्याचा जमाव फार मोठा असल्यामुळें, तसेंच तोफखानाही चांगला असल्यामुळें उघडया मैदानामध्यें मोंगल सैन्याशीं सामना करणें हें फार धोक्याचें होतें. यामुळें बारीकसारीक छापे घालून त्रास देण्यापलीकडे व त्याची रसद मारून त्याचें थोडेंफार सामान लुटण्या-

पलीकडे मराठ्यांनीं कांहीं फारसें केलें नाहीं. किंबहुना मोंगली सैन्य जसजसें एकेक घर पुढें येत चाललें, तसतसें मराठे एक एक घर मागें हटत चालले व त्यांनीं मोंगलांस खालीं दक्षिणेंत नीट उतरूं दिलें. पाहिस्तेखानाबरोबर असलेल्या सैन्याचें वर्णन करितांना कृष्णाजी अनंत लिहितो कीं, पाहिस्तेखानाबरोबर "पाऊण लाख घोडा व हत्ती याखेरीज तिरंदाज, बरखेंदाज, रजपूत, सैंतीवाले ( ? ), तसेंच हत्तीवरील तोफखाना व घोड्यांवरील तोफखाना व वर्चीवाले, व आडहत्यारी होते. पहिल्यांची तर गणतीच नाहीं. फरासखाना, त्यास शंभर हत्ती, तसेंच भांडते हत्ती ४०० असे पांचसहाशें हत्ती बरोबर होते, तसेंच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारूगोळा, बाणांच्या गाड्या अराबा असें अमर्याद सैन्य दिलें होतें. स्वारी म्हणजे कलियुगींचा रावणच जैसा. बरोबरी खजिना बेमोहीम (=अगण्य) होता . . . ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशीं दक्षिणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मक्काम करी तेव्हां दोन गांवें लांब व गांव दीड गांव रुंद लष्कर रहात असे." येवढें मोठें लष्कर घेऊन पाहिस्तेखानानें बुधवार अधिक ज्येष्ठ शुद्ध दशमी शके १५८२ रोजीं पुणें येथें येऊन तळ दिला व तेथेंच त्यानें आपलें ठाणें केलें. या वेळीं ज्येष्ठाचा महिना असल्यामुळें वरसात अंगावर आली होती, म्हणून पुणें येथेंच मुख्य ठाणें करून पाहिस्तेखानानें निरनिराळ्या ठिकाणांवर हल्ले करण्यास आपले सरदार रवाना केले. पुणें येथें येण्यापूर्वींच पुरंदर किल्ल्यावर मोंगलांनीं हल्ला केला होता, व तेथील किल्लेदाराशीं बरीच झटापट करून त्यांनीं तो किल्ला आपल्या स्वाधीन करून घेऊन तेथें आपलें ठाणें बसविलें होतें.

पुणें येथें असतांना पाहिस्तेखानास बरेच मराठे सरदार जाऊन मिळाले होते. बाबाजी भोंसले आणि रघोजी भोंसले हे या वेळीं मोंगलांस जाऊन मिळाल्याचें मोंगल इतिहासकार लिहितात.[1] संभाजी कावजी बांदा व बाबाजी राम होनप हेही दोघे पाहिस्तेखानास मिळाल्याचें मराठी बखरकार सांगतात. यांपैकीं बाबाजी राम होनप हा पुण्याचा देशपांड्या होता. त्याचें व नामाजी लांडा याचें या वतनाबद्दल बरेच दिवसांचें भांडण होतें व या वेळीं नामाजी हा या मोंगली अम्मलदाराशीं पेगम बांधण्याच्या खटपटींत होता. याकरतां बाबाजी होनप हा पाहिस्तेखानास आधींच जाऊन भेटला व त्यानें आपलें वतन त्याचेजवळून कायम करून घेतलें. संभाजी कावजी बांदा हा फार जोरदार गडी मोठा ताकदवान, घोडे चौपायीं धरून उचलावे अशा शक्तीचा होता. ही त्याची शक्ति पाहून पाहिस्तेखानानें त्यास आपले नोकरींत

१. हे भोंसले कुळांतले असल्यामुळें यांची हजीरी पातशहापर्यंत जाऊन पोंचली. यांचीं नांवें अलमगीरनाम्यांत आहेत. पण अशा संकटसमयीं प्रत्यक्ष भोंसल्यांनीं शत्रूस जाऊन मिळावें, हें केव्हांही लज्जास्पद असल्यामुळें मराठी बखरकार हीं नांवें देत नाहींत, हें रास्तच आहे.

घेऊन मौजे मलकरे येथील ठाण्यावर ठेविलें. हें ऐकून शिवाजीस फार राग आला व त्यानें प्रतापराव गुजरास संभाजी कावजीवर धाडून त्याचा मोड केला. त्या झटापटींत संभाजी कावजी[1] हा मरण पावला.

पाहिस्तेखान हा पुणें येथें येणार, असें पक्कें समजल्या वेळेपासूनच मराठ्यांनीं त्या गांवाची आशा सोडून दिली होती आणि तेव्हांपासून त्यांनीं त्या गांवांत व गांवांभोवतीं जाळपोळ लावली होती. सुपे देशपांडे लिहितात कीं, "अमीर अल उमराऊ शास्ताखान आला ते समई मुलुख तमाम वोस झाला." इतरत्रही असेंच वर्णन केलेलें आढळतें.[2] या नासधुसीमुळें षाहिस्तेखानाचे लष्करास दाणावैरणाची फारच अडचण भासूं लागली. ते ऐन पावसाळ्याचे दिवस. या दिवसांत नदीनाले तुडुंब भरून जोरानें वाहत असल्यामुळें वाहेरून लांवून सामुग्री आणण्याचा इलाज चालेना. व अशांतही केव्हां आणलीच, तर मराठे रात्रीवेरात्रीं छापा घालून ती लुटून नेत किंवा नासाडी करून टाकीत. यामुळें खान अगदीं संतापून गेला व कांहीं दिवस त्यानें जेजुरीस मुभा केला. आणि शेवटीं चाकणचा किल्ला घेऊन तेथें आपली छावणी करावी, असा त्यानें निश्चय केला. चाकंण हें शहर वरघाटीं असल्यामुळें तें विशेष सोयीचें होतें. शिवाय तें अहमदनगरच्या वाटेवर असल्यामुळें मूळ सैन्याच्या तुकडीशीं संवंध ठेवण्यास उपयोगी असून, ठिकठिकाणीं ठेवलेल्या सैन्यावर नजर पोंचवतां येण्याजोगें होतें. तसेंच तेथला किल्लाही चांगला मजबुतीचा असल्यामुळें तो शत्रूच्या हातांत राहूं देणें धोक्याचें होतें. याकरतां त्यानें चाकणचा किल्ला काविज करण्याचें योजलें.

चाकण किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा हवालदार होता. त्यानें किल्ल्याचा वंदोवस्त उत्तम प्रकारें ठेवून किल्ला फार जोरानें लढविला. षाहिस्तेखान हा सुमारें तीन महिने म्हणजे ज्येष्ठ ते श्रावण यांत चाकणचे किल्ल्याला मोर्चे लावून वसला होता. वरून पाऊस पडे व सर्व तऱ्हेची खरावी होई. तरीही इतक्या अडचणींत षाहिस्तेखानानें किल्ल्याचे वुरुजाखालीं सुरुंग खणून ते दारू भरून उडविण्याचें ठरविलें. अनेक वेळां हे यत्न फुकट गेले, पण अखेर किल्ल्याच्या ईशान्य वाजूचे वुरुजाखालचा सुरुंग नीट उडून भगदाड पडलें व वाट झाली. पण त्या अवधींत आंतले वाजूस दुसरा ताजा कोट मराठ्यांनीं उभा केला होता व त्यावरून ते मारामारी करूं लागले. तीही सर्व सोसून मोंगली सैन्यानें चढाई करून आंत प्रवेश केला. या वेळीं शिवाजी पन्हाळ्याच्या वेढ्यांत गुंतला होता. यामुळें त्याला येथें येतां आलें नाहीं. त्यानें कांहीं थोडी फौज मदतीकरतां पाठविली होती, पण ती येऊन पोंचण्यापूर्वींच किल्ला

१. हें नांव 'कोंडजी' असेंही आढळतें. पण ती चूक असावी.
२. अमीर अल उमराउ शासरमान काले, त्याचे दहशतीनें कुल मुलक आपलीं घरें टाकून परागंदा जाहला (महजर, शके १५९०).

हातचा गेला होता व फिरंगोजीही पाहिस्तेखानाचे हातीं सांपडला होता. फिरंगोजीचा पाडाव झाल्यावर त्याची मर्दुमकी पाहून त्यास पाहिस्तेखानानें आपले नोकरींत राहाण्याचा फार आग्रह केला. पण प्रथम तो राहिला नाहीं. परंतु पुढें लवकरच त्यानें पाहिस्तेखानाची सरदारकी पत्करली. हें शिवाजीस समजल्यावर त्यानें नेताजी पालकरामार्फत बोलणें लावून त्यास परत आपल्याकडे आणविलें व त्यास भूपाळगडावर हवालदारी सांगून आपले चाकरींत ठेविलें. चाकण सर केल्यावर त्या ठिकाणीं रहावयास जाण्याचा बेत रहित करून अखेर पाहिस्तेखान हा पुण्यास जाऊन राहिला.[१]

शके १५८२ च्या पावसाळयानंतर पाहिस्तेखान हा पुणें येथें राहावयास आला तेव्हांपासन त्यानें आपला मुक्काम दादोजी कोंडदेवानें शिवाजीस राहण्याकरत बांधलेल्या लालमहाल नांवाच्या वाडयांत ठेवला होता. वाडा जरा लहान असल्यामुळें सभोंवती डेरे देऊन पागा उतरण्याची सोय केली होती व आंत कनातीचे पडदे लावून सोयीवार दालनें पाडलीं होतीं. पाहिस्तेखानाचा दुय्यम अधिकारी राजा जसवंतसिंग यानें आपला मुक्काम पुण्याबाहेर थोडया अंतरावर सिंहगडच्या बाजूला ठेवला होता.

पुण्यास येऊन राहिल्यानंतर पाहिस्तेखानानें तो सर्व प्रांत आपण कबजांत घेतल्याचें जाहीर केलें व शहाजीनें आणि शिवाजीनें त्या प्रांतांतील लोकांस दिलेलीं वतनें, इनामें व धर्मादाय त्यानें सर्व खालसा करून जप्त केलीं. पुण्यास राहूनच तो लष्करी आणि मुलकी कामें पाहूं लागला व न्यायमनसुबेही करूं लागला. या वेळीं शिवाजीचे कामदारही त्यानें दूर केले व आपले पुढ्यांतली मंडळी त्यानें निरनिराळ्या प्रांतांवर नेमून टाकलीं.

पाहिस्तेखानानें या अशा नेमणुकी केल्या व आपला अम्मल चालू केला, तरी शिवाजीनें तिकडे लक्ष दिलें नाहीं व तो आपले हुकूम आणि आज्ञापत्रें अगदीं स्वतंत्रपणें काढी. त्यानें सुपें, इंदापूर, बारामती वगैरे प्रांतांतही जमीनबाबीसंबंधें आज्ञापत्रें काढून असें फर्माविलें होतें कीं, अफजलखानापूर्वी हिंदू व मुसलमान यांस सुपें, चाकण, बारामती वगैरें प्रांतीं इनामें आहेत त्यांस जेणेंप्रमाणें अफजलखानापूर्वी आपणांस

१. औरंगजेबनाम्यांत (शके १५८२) भाद्रपद शुद्ध ९ मी ला चाकण किल्ला अमीरुल उमरावानें सर केला, असें लिहिलें आहे. जदुनाथ सरकार म्हणतात, श्रावण वद्य ५ मी (१५ आगष्ट १६६०) १५८२ ला चाकण सर केला. जेधे शकावलींत 'अश्विन मासी चाकण घेतला' असा उल्लेख आहे. एकाचा मेळ दुसऱ्याशीं नाहीं. पण अदमासानें सरकार म्हणतात ती मित्ती खरी दिसते. कारण औरंगजबनाम्यांत बातमी दिल्लीला पोंचली त्या दिवशी ती गोष्ट घडली, म्हणून जमा दिली जाते. जसें पैसे पोंचल्याचे दिवशीं सावकार ती रक्कम जमा धरतात, तसेंच बातमी पोंचल्याचे दिवशीं ती गोष्ट घडली, असें तवारिखकार लिहून ती तारीख पुरी करतो.

मुकासा असतां जेणेंप्रमाणें तलमती ज्यांस जें पावत असेल, त्यांस तेणेंप्रमाणें देणें. शिवाजीच्या अशा हुकमामुळें लोकांचीं मनें ह्याचेकडे साहजिक वळलीं व हाच आपला हितकर्ता असून याला आपली पोटतिडीक आहे, असें सर्वांना साहजिक वाटलें.

कांहीं दिवसांनीं पाहिस्तेखानही थोडा नरम पडला व तो जप्त केलेलीं इनामें किंवा त्यांचे कांहीं भाग मालकांस परत देऊं लागला. पण कांहीं थोडया मतलबी लोकांखेरीज व इनामदारांखेरीज याचा उपयोग फारसा झाला असेल, असें वाटत नाहीं.

असें दिसतें कीं, पाहिस्तेखान हा पुण्यास असतांना किंवा कदाचित् पुण्यास येण्यापूर्वीच शिवाजीनें त्याचेकडे कांहीं राजकारणी बोलणें लावलें होतें. हें बोलण्याचें काम त्यानें आपला हुशार व विश्वासू कामगार सोनाजी पंडित याजकडे सोंपविलें होतें. सोनाजी पंडित काय बोलणें करावयास गेला होता, हें कळत नाहीं. पण सोनाजीचें राजकारण नीट साधलें नाहीं व तो शके १५८२ च्या 'कार्तिकमासीं षाहिस्तेखानाचा निरोप घेऊन राजगडास राजियापासी आला.' कदाचित् हें बोलणें 'आम्ही आदिलशाही किल्ले तुम्हांस देतों व तुम्ही सल्ला करावा' अशा आशयाचें असण्याचा संभव दिसतो. कारण यानंतर कांहीं किल्ले षाहिस्तेखानामार्फत शिवाजीनें मोंगलांस दिले. पण इतकें होऊनही अखेर तह जमला नाहीं व सलुख झाला नाहीं. पाहिस्तेखानाचें प्रकरण असें रोज जोरावत असतांच सिद्दी जोहारचें प्रकरण उद्भवलें. तेव्हां दोन शत्रूंस एकदम तोंड देण्याची पाळी आली. याकरतां कांहीं अंतःस्थ बोलणीं करून शिवाजीनें जोहारास आपल्या खिशांत उतरला व तें प्रकरण मोठ्या युक्तीनें मिटवून टाकलें.

शके १५८३ व १५८४ या दोन सालांत लहानसहान अनेक प्रकरणें उद्भवलीं. तीं सर्व संभाळून शिवाजी आपला मावळांतला मुलूख नीट राखण्याची तजवीज करीत होता व त्या प्रांतांत त्यानें सैन्याची चांगली जमवाजमव चालविली होती.

जेधे देशमुख हे चांगले लढवय्ये होते, व यांचेपाशीं सरंजामही चांगला पोक्त असे. पण त्यांचें वागणें नेहमीं दुटप्पीपणाचें असे. साधेल तितकी टाळाटाळ करावी व शेवटी जी बाजू खंबीर असेल आणि यशस्वी होण्याचा रंग दिसेल तिकडे जाऊन मिळावें, हा त्यांचा डाव असे.[1] या पाहिस्तेखानाचे गडबडींत शके १५८४चे श्रावणांत

---

१. जेध्यांचा हरामखोरपणा शिवाजी महाराजांचे लक्षांत आलाच होता; तसाच संभाजी महाराजांचे व राजाराम महाराजांचेही लक्षांत वारंवार आला होता. या दोघांनींही त्यांचे कान अनेक वेळां उपटले होते. त्यांतले त्यांत संभाजी महाराजांची मर्जी फार गरम व आंगांत तडफही मोठी, यामुळें त्यांनीं तर जेध्यांची झाडणी चांगलीच केलेली दिसते. शके १६०७ चे एके पत्रांत संभाजी महाराज सर्जेराउ

पुढें चालू

राजश्री वाजी सर्जाराऊ जेध्यास शिवाजीनें सैन्य जमविण्यास व चाकरीवर हजर होण्यास आज्ञा केली. पण जेधे मजकूर हजर झाले नाहींत. पुन्हां दोन महिन्यांनीं अश्विनांत जेध्यांस जरा जरबेचें पत्र लिहिलें कीं, ' वहुतरोज जाले, आणि तुम्ही आले नाहींत; तरी हाली रोखा पावतांच हुजुर येणें. ' पण या लिहिण्यालाही जेध्यांनीं पानेंच पुसलीं आणि घरांत आजारीपण असल्याची सवव अश्विन वद्य २ स पत्र लिहून कळविली. हें पत्र अश्विन वद्य ५ मीस सोमवारीं शिवाजीस मिळालें. त्याचें उत्तर म्हणून शिवाजीनें जरा रागानेंच अश्विन वद्य ११ शीस शनिवारीं हुकूम लिहिला " जे, तुम्हास हुकुम लिहिला होता कीं, दोघे भाऊ चाकरीस हुजुर येणें. यावरी ' दोघे भाऊ स्वार होऊनी येत होतो. या वरी घरामध्यें दुखापती जाली यावदल खोळवेला ' म्हणौन लिहिले. तरी वेथा हाली बरी जाली असेल. या उपरी स्वार होऊनु येणें. तुमचे तर्फे कुवल जागा असेल तेथें माणसें ठेवणें. बाळाजी गुजर हाली साहेबाची नोकरी करावयाची उमेद धरितों म्हणौन लिहीले तरी त्याची आम्हास चाकरीची गरज नाहीं. " इ. इ. एवंच सारांश कीं, आणखी नवीन कामें व सबवी न काढतां तावडतोब येऊन जेध्यांनीं चाकरीवर हजर व्हावें.

यावर जेधे हे केव्हां आले हें परमेश्वर जाणे. पण त्यांस शके १५८४ चे कार्तिक वद्य ७ मीस गुरुवारीं लोकांना नीट ताकीद देऊन फार सावधगिरीनें राहण्याविषयीं पुढील पत्र लिहिलें आहे --

म।। अनाम सर्जाराऊ जेधे देशमुख त।। रोहिडखोरे. राजश्री सिवाजी राजे म।। सलास सितैन. मोंगल प्रस्तुत तुमच्या तापियात धावगीस येतातो म्हणौन जासुदानी समाचार आणिला आहे. तरी तुम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तापियात गावाचा गाव ताकीद करून माणसें, लेकरेबाळे समत तमाम रयेती लोकांना घाटाखाले वांका जागा असेल तेथें पाठविणें. जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागियासी त्यासी पाठवणें. ये कामास हैगै न करणें. रोखा अहडताच सदरहु लिहिलेप्रमाणें अमल करणें. ऐसीयासी तुम्हांपासून अंतर पडिलियावर मोंगल जे वांद धरून नेतील त्याचें पाप तुमच्या माथा वैसेल. ऐसे समजोन गांवचा गांव हिंडोनु रात्रीचा दिवस करून लोकांचीं माणसें घाटाखाले जागा असेल तेथें पाठवणें. या कामास एक घडीचा दिरंग न करणें. तुम्ही आपली जागा हुशार असणें. गांवगना-

........................................

जेध्यांस लिहितात कीं, ' तुमचा मुद्दा कळोन आला .आधीं तुम्हीच सरासरी हरामखोरी केली कीं वतनदार होऊन इमानें इतवारें वर्तावे ते गोष्ट न करतां स्वामीचें अन्न वहुत दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत कीं स्वामीच्या पायासी दुर्बुद्धि धरून दोन दिवसांचे मोंगल त्यांकडे जाऊनु राहिलेस . . . या उपेरीही गनीमाकडे राहणेंच असेल तरी सुखेच राहणें तुमचा हिसाव तो काय आहे एक्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनीमा देखील तुम्हास कापून काढवीतच आहेत हें वरे समजणें . . . ' इ. इ.

हि सडेकडील सेतपाले जतन करावयाचे असतील त्यांसही तुम्हीं सांगणें कीं, डोंगरवर असिरा कुवल जागा आसरे ऐस. त्यांसी सांगणें व गनीम दृष्टीस पडतांच त्याचे धावणीची वाट चुकवून जाणें. तुम्ही आपले जागा हुशार असणें. मोर्तब सुद.

तेरीख २० माहे रविलोवल रविलोवल — रुजुसुरनिवीस सुरुसुद

अमीर उल उमराव उमदे तुलमुलुख पाहिस्तेखान हा मोंगली अम्मल वरघाटीं वसवीत होता, त्या वेळेस शिवाजी हा आपला कोंकण प्रांतांतला अम्मल नीट बसवून तो प्रांत निष्कंटक करीत होता. तिकडे मोंगलांकडील एक सरदारीण रायबागीण, ही समुद्राजवळ आसपास धुमाकूळ घालीत होती. तिच्याप्रमाणेंच जामदारखान हाही पेणेच्या आसपास लुटालूट करून त्रास देत होता व साधल्यास तिकडून मोंगली अम्मल वसवीत वर यावें, असा त्याचा बेत होता. म्हणजे दर्याकडून जामदारखानाचे लोक व वरून पाहिस्तेखानाचे लोक असे मुलूख उद्ध्वस्त करीत सुटले होते. हा दुहेरी त्रास टळावा म्हणून शिवाजीनें मोरोपंतामार्फत प्रथम मिरे डोंगरावर जामदारखानाचा मोड केला व ती खिंडीची वाट बंद करून त्या अंगाला मुसलमानी पुंडाव्याला चांगलाच रेच दिला आणि मग पाहिस्तेखानाला शास्त कशी लावावी या विचारास तो लागला.

पाहिस्तेखान हा पुण्यास लालमहालांत राहत असतां शिवाजीनें एक पोक्त मनसुवा केला. हा बेत त्यानें केव्हां योजला व व त्याचे सिद्धीची केव्हां आणि कशी योजना केली, हें नीटसें कळत नाहीं. पण त्यानें आपले विश्वासांतील लोकांची जमवाजमव करण्यास शके १५८५ च्या अधिक चैत्रांत सुरवात केली असावी. शके १५८५ चे सुरवातीस सिंहगडास कांहीं फितवा झाला असल्याची खबर शिवाजीस लागली. कदाचित् हा किल्ला फितवा करून दगाबाजीनें घ्यावा, असाही खानाचा बेत असेल. पण ही वातमी कळल्यावर प्रथम तिकडे लक्ष पुरवणें अवश्य झालें व त्यानें प्रथम तेथील बंदोबस्त करावा आणि साधल्यास पाहिस्तेखानाचा कांटाच काढून टाकावा, असा विचार केला. पाहिस्तेखानानें थोडे दिवसांपूर्वीं शिवापुरास बराच धुमाकूळ उडवला होता. व तेथील लोकही त्याचे विरुद्ध फार होते. त्या गांवचे वतनी देशपांडे दादाजी बापुजी व चिमणाजी बापुजी हे शिवाजीचे मेहेरबानींतले होते. याकरितां त्यांस शिवाजीनें या मसलतींत घेतलें. या वेळीं शिवाजी राजगडास राहत होता. पण सिंहगड हा किल्ला त्याचे ताब्यांत होता व तो अधून मधून तेथें जात असे. पण नव्या सालचे ( म्हणजे शके १५८५ चे ) चैत्र शु. ६ चे नंतर एक-दोन दिवसांतच शिवाजी राजगडाहून सिंहगडास गेला. चैत्र

शु. ६ स शिवाजीनें मोरो त्रिंबक पेशवे व निळो सोनदेव मुजुमदार यांस पत्र पाठविलें कीं, 'तूर्त कोकणांत जाण्याचा तह (बेत) राहिला. सिंहगडावर कांहीं फितवा जाला आहे. तरी तुम्हीं लष्करी लोकानिशीं व खासखेली इशमानसी कागद देखतांच स्वार होऊन किल्ले सिंहगडास जाणें; आणि किल्ल्यावर हुशार खबरदार असणें.' याप्रमाणें लिहून तान्हाजी नाईक, कोंडाणे नाईक वगैरे घेऊन सिंहगडास जाण्याची आज्ञा त्यांस फार निकडीची केली होती. अशा रीतीनें सरदार व लष्कर व हशम वगैरेंचा जमाव शिवाजीनें सिंहगडीं उत्तम प्रकारचा केला.

लोकांचा नीट जमाव केल्यावर शिवाजीनें पुण्याजवळील कात्रजच्या घाटांत ठिकठिकाणीं झाडांस पोत बांधले आणि बैलांचे शिंगांस (फडकीं तेल लावून) पोत बांधावे म्हणून तजवीज केली व त्यांचेबरोबर मावळे लोक नीट तजविजीस ठेविले. या लोकांस सांगून ठेविलें होतें कीं, आम्ही सिंहगडाकडून तुम्हांस कर्ण्याच्या बारीक आवाजाचा इशारा करूं. ती खूण जाणून तुम्हीं लगेच पोत पेटवून उजाळे करावे व वाद्यें वाजवीत पलिकडील वाटेनें निघून जावें. घाटांत अशी तजवीज करून सिंहगडावरही पक्का बंदोबस्त करविला. घाटांत व सिंहगडाकडे इतकी व्यवस्था केल्यावर शिवाजीनें पावलोकांचा जमाव केला व त्यांतून निवड करून तीनशें माणूस नांवाजून त्यांस बकसिसें सोनियाचीं कडीं, व मोहनमाळा व शिरपाव दिल्हे. आपण मुस्तेद होऊन राज्य सरकारकुनास व सरदारास निरऊन निदान समय समजोन कोंडाणें (ऊर्फ सिंहगड) येथें आले व शामराजपंतास पाठीवर ठेवून निघाले. आणि नंतर लगेच, चैत्र शु. ८ मीस पुण्यास जाऊन पाहिस्तेखानावर छापा घालून विजापूरचा मोठा सरदार अफजलखान याची जी वाट लावली तीच पाहिस्तेखानाची लावावी, असा निश्चय केला. चैत्र शु. ८ मीस रमजानचा ६ वा चंद्र येतो. म्हणजे एक तर ते दिवशीं रमजानचे उपास असल्यामुळें सर्व दिवस उपास करून सूर्यास्तानंतर यथेच्छ भोजनें करून पहाटचे सुमारास मुसलमान लोक गाढ निद्रेंत मग्न असतात. शिवाय या दिवशीं औरंगजेब बादशहाच्या राज्यारोहणाचा वार्षिक उत्सव असल्यामुळें आतषबाजी, रंगखुशाली वगैरेस ऊत आला होता. व अमिर उल-उमराव पाहिस्तेखानाचे खाशा डेऱ्यांत तर हा ख्यालीखुशालीचा प्रकार फारच जारीनें चालू होता. या वार्षिक उत्सवाचे दिवशीं सकाळसंध्याकाळ म्हणजे सहा वाजतां, नऊ वाजतां आणि बारा वाजतां व पुन्हां तीन वाजतां अशीं अहोरात्रींत एकंदर आठ वेळां वाद्यें वाजवून मोठा वाजा करण्याचा रिवाज होता. ही गोष्ट फायद्याची होती. शिवाय या दिवशीं शुद्ध अष्टमीच चांदणें प्रथम वाट चालण्याच्या सोयीचें असून तेथें पोचल्यावर चंद्रास्त होऊन अंधेरा पडणार, हें तेथील कामगिरीला व परत फिरण्याला सोयीचें होतें. यामुळें हाच दिवस मुक्रर करण्यांत आला.

पाहिस्तेखानाचे डेऱ्यांत एक पुणेकर माळी नित्य फुलें देत असे. त्याचा मेहुणा शिवाजीजवळ होता. त्यास बरेच होन वक्षीस देऊन व भेद करून वश करून घेतलें. लालमहालाची वागेकडील खिडकी होती तिजजवळ लागूनच त्या माळ्याचें घर होतें. यामुळें ती जागाही विशेष सोयीची झाली. आधीं माळ्याकडून सर्व माहिती काढून घेतली होती व ठरलेले दिवशीं मोरोपंत पिंगळे, चंद्रराव[1] जेधे व दादाजी बापुजी[2] व चिमणाजी बापुजी हे द्विवर्ग, तसेच नेताजी पालकर, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, गोंदाजी पांढरा, रूमाजी अहिरा, कोंडोजी[3] फर्जद वगैरे सरदार आणि पुष्कळसें सैन्य घेऊन शिवाजी पुण्याच्या वाटेनें आंबिल ओढ्याजवळ आला. तेथें लोकांच्या दोन टोळ्या करून एकीकडे नेताजी पालकर व एकीकडे मोरोपंतास देऊन नीट ठेवलें व आंबिल ओढ्यावर घोडीं व कांहीं स्वार ठेवून कांहीं निवडक लोक घेऊन तो आंवराईत निघाला. व पुढें राईत जागोजागीं मावळे बसवून मावळ्यास बरोबर घेऊन तो गांवाजवळ आला. गांवांत वाद्यें वाजूं लागलीं आणि ताशे व मरफे व पडघम झडूं लागले. व लोक आनंदांत गर्क आहेत अशी संधि पाहून शिवाजी आपले लोकांसह आंत शिरला. वाटेंत 'तुम्ही कोण' म्हणून हटकलें तेव्हां 'आम्ही खानाचे कटकाचे लोक. चौकी पाहऱ्यांस गेलों होतों' असें देशपांडे मजकुरांनीं सांगितलें व पहारेकऱ्यांनीं कां आला विचारल्यावर 'आम्हांस हजिरी लावून वाद्यें वाजविण्यास

---

१. पाहिस्तेखानावरील छापा भाद्रपदांत . . . मारला, असें चिटणवीस म्हणतात, हें खरें दिसत नाहीं. चिटणिशी बखर फार निष्काळजीपणानें लिहिली आहे. जवळ अस्सल कागदपत्र असूनही त्यांचा उपयोग चिटणिसांनीं नीट करून घेतला नाही, हें दुर्दैव आहे.

२. पाहिस्तेखान पुणियास आला ते समयीं राजेश्री स्वामी चालोन गेले तेव्हां आपले वाप व चुलते समागमें होते, असें सर्जेराव जेधे म्हणतो. चिटणीस सुर्व्यांचें नांव देतात. शिवापूरकर देशपांड्यांच्या घराण्यांतले शेंदोनशें कागद मीं पाहिले आहेत. त्यांवरून चिमणाजी बापुजी व दादाजी बापुजी यांनीं या वेळीं फार हिमतीची कामगिरी केली व ऐन गडबडीचे वेळीं त्यांनीं तरवार चालवली, असें दिसतें. हे देशपांडे मोठे कारस्थानी व झोंड दिसतात. शिवाजीबरोबर अनेक मसलतींत ते हजर होते

३. कोंडोजी फर्जद हा लेकावळा, शहाजीचा दासीपुत्र होता. याचा उल्लेख पर्णालाख्यानांत आला आहे.

४. लग्नाच्या वरातीबरोबर शिवाजी लोक घेऊन आंत शिरला, हें ग्रांट डफचें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. चैत्रांत ( किंवा भाद्रपदांत देखील ) लग्नें आणि वराती कोठच्या ? डफला काफीखानानें फसविलेलें दिसतें. काफीखानाचा हात धरून डोळे मिटून चालणें निर्धास्त नाहीं. तो आपणांस वारंवार खड्ड्यांत पाडतो.

मुद्दाम बोलाविलें आहे,' असें उत्तर देऊन यांनींही वाजविण्यास व नाचून गिल्ला करण्यास प्रारंभ केला. हें अशा करतां कीं, दुसरे बाजूस लोक खणतील, पोखरतील, त्याचा कडका कोणास नीट लागूं नये.

याप्रमाणें आंत शिरल्यावर लालमहालाची एक खिडकी चिखलानें बुजवून बंद केली होती, ती उकरून खुली करून शिवाजी निवडक लोकांसह आंत शिरला. शिवाजीबरोबर या वेळीं दादाजी बापुजी व चिमणाजी देशपांडे शिवापूरकर हे असून, शिवाय एक-दोन मराठे सरदारही होते. खिडकीवाटे आंत शिरल्यावर महालांत चौकीचे खोजे पहारेकरी शराबाचे धुंदींत होते. त्यांना उभ्या जागींच गलबला होऊं न देतां मराठ्यांनीं शांत केलें. महालाचे दरवाज्यावर एक खोजा जागा होता, त्याचे मानेवर तरवार ठेवून जवळ एक जणास बसवून ठेवला. यामुळें त्यानें ओरड केली नाहीं. जीव बाहेर जाऊं नये म्हणून त्यानें आवाज आंत कोंडून धरला. महालाला कनातीचे पडदे लावून दालनें केलीं होतीं. त्या कनाती चिमणाजी बापुजीनें कट्यारीनें फाडून टाकल्या व वाट केली. या वाटेनें खानाच्या जनानखान्यांत शिवाजी आणि त्याचे लोक शिरले. 'तो डेरियांत बायका व खान असे होते. त्यामध्ये कित्येक समया व मोमबत्या लावून जागत होते. हे परके पुरुप पाहून त्यांनी थोडा गिल्ला केला. इतक्यांत चिमणाजी बापुजी यानें खोजे पुढें पांच जण होते त्यांस मारलें. बरकड बायका पळविल्या.' इतक्यांत शेजेच्या बिल्यांनीं खानास जागें केलें. पण मनुची लिहितो कीं, 'त्याच्या आंगावर शराबाची धुंद चढली होती. यामुळें बायकांच्या म्हणण्याकडे लक्ष न पुरवतां तो म्हणाला, 'घोड्याला नीट दोर बांधण्यासाठीं शिपाईलोक मेखा ठोकीत असतील.' असें म्हणून तो पुन्हा निजला.' पण आंत शिरलेल्या लोकांची गडबड ऐकून खानाचा लेक अबुल फत्तेखान जागा झाला व हातांत तरवार घेऊन पुढें धांवला. त्यास मराठ्यांनीं एका घावानिशीं तोडून टाकला. हें पाहून 'दगा झाला', 'खान मारला', 'खान मारला' असें बायका एकदम मोठ्यानें ओरडूं लागल्या व त्यांनीं दिवे जळत होते ते मालवून टाकले. दिवे मालवल्यामुळें गोंधळ अधिकच उडाला. आंत गोंधळ उडालेला पाहून बाबाजी देशपांडे बरोबर शे-दोनशें लोक घेऊन दरवाज्यानें नीट आंत शिरले व मग त्या अंधारांत स्त्री किंवा पुरुप हा भेदाभेद न पाहतां मराठे जे कोणी पुढें सापडेल त्याची कत्तल करूं लागले. या धांदलींत तेथें एक पाण्याचा हौद होता त्यांत दोघे तिघे मराठे पडले व मग सगळाच गोंधळ झाला. जनानखान्यांत लोक मोठ्यामोठ्यानें ओरडत होते. पण बाहेरचे लोक वाद्यें इतक्या कडाक्यानें वाजवूं लागले कीं, त्यामुळें कोणाचा शब्द ऐकूं येईनासा झाला. या गलबल्यानें अमीर-उल-उमराव

पाहिस्तेखान सरदार हेही जागे झाले व एखाद्या शूर लढवय्याप्रमाणें हातांत भाला घेऊन मराठे शिपायांच्या आंगावर धांवून गेले. कोणी म्हणतात, ते खिडकीच्या अंगाकडे धावून गेले. हें कसेंही असो. पण थोडयाच वेळांत एका सर्ज्या शिपायानें तरवारीचा वार त्यांचेवर केला. थोडक्यांत चुकलें. खानाचा खटाराच जमिनीवर लोळायचा. पण तितकें न होतां खानाचा आंगठा छाटला गेला व मग आपला आंगठा आणि भाला तेथेंच टाकून खान त्या महालांतून निसटून गेले.[१]

दिवे मालवले असल्यामुळें खान निसटून गेले, ही गोष्ट मराठ्यांच्या ध्यानांत आली नाहीं. 'खान मारला', 'खान मारला' असें म्हणून बायका आक्रांत करीत होत्या. त्यानें फसले जाऊन आपला कार्यभाग उरकला असेंच त्यांस वाटलें व दिशा उजळून पहांटेची प्रभाही फांकत चालली होती. तेव्हां आतां आणखी वेळ तेथें रेंगाळत न बसतां शिवाजी आपले लोक घेऊन बाहेर पडला तो नीट सिंहगडच्या रोखानें निघाला. गडाशीं पोचतांच ठरल्याप्रमाणें खुणेकरतां कर्ण्याचा आवाज काढला. तो आवाज ऐकून कात्रजच्या घाटांत मावळे लोक ठेवलेले होते त्यांनीं पोत पाजळले व वाद्यें वाजवीत वाजवीत ते पलिकडले डोंगरांत निघून गेले.

शिवाजी आणि त्याचे लोक निघून गेल्यावर पाहिस्तेखानानें आपले कामगार लोक जमा केले व दुरून पोताचे उजाळे दिसत होते त्या रोखानें मराठे गेले असावेत, असें समजून त्यांचा पाठलाग करण्यासाठीं त्या आंगाला लष्कर एकदम रवाना केलें. ही सरकारचे नोकरीची कामगिरी बजावल्याबद्दल स्वत:ची काळजी घेण्याकरतां कोणी तबीब बोलावून तुटलेल्या पंजास इलाज करावा व जखम नीट बांधवावी, असें खानाच्या मनांत आलें. पण आपल्या डेऱ्यांत सर्वभर दगा भरल्याचा ताजा अनुभव त्याला आला असल्यामुळें न जाणें विश्वासघातानें शस्त्रवैद्याऐवजीं भलताच कोणी येईल, असें वाटून त्यानें कोणालाच बोलावलें नाहीं.

दुसरे दिवशीं दरबारचे दरबारी लोक व पातशाही अंमलदार दुखवट्याकरतां खानाचे भेटीस आले. त्यांत महाराज जसवंतसिंगही होता. त्याचेकडे वळून खान त्यास म्हणाला, 'जेव्हां आमचेवर धाड आली तेव्हां आम्हांस तर असें वाटलें

---

१. "औरंगजेबनामा" या तवारिखेंत पाहिस्तेखानावरील हकीगत पुढीलप्रमाणें दिली आहे: छ ३ शव्वाल ( वैशाख सुदि ४ ) को कुच हुआ, इन दिनोंमे सेनाने अमीर उल उमराके डेरेपर छापा मारा. उसका बेटा अबुल फत्तह मारा गया. अमीर उल उमराकी उंगली कट गई. यह बारात अमीर उल उमराके गफलतसे हुइ थी इसलिये बादशहाने खफा होकर दखिनकी सुबेदारी उससे छिनकर शाहजादे मोहमद मोअज्जम को दी और अमीर उल उमरा बंगाले की सुबेदारीपर भेजा गया जो मोअज्जम खांके मर जानेसे खालि थी.

होतें कीं, तुम्ही लढतां लढतां मरून गेले असाल.' खानाच्या मनाच्या त्या गांगरलेल्या स्थितींत असें म्हणणें साहजिकच होतें. या घालमेलींत खानाच्या सहा सात बायका व एक मुलगा, एक नामजाद सरदार व पुष्कळसे इसम कामास आले. इतर नाशही बराच झाला. व सर्वांत मुख्य गोष्ट अशी कीं, खानाच्या इभ्रतीस धक्का पोंचला आणि त्याचा वचक उडाला. हेंही एक वेळ पुरवलें; पण यामुळें शिवाजीचा वचक वाढला आणि त्याची दहशत बसली, हें शल्य फार असह्य झालें.

या वेळीं औरंगजेब पातशहा काश्मीरांत होता. तेथें सुमारें एक महिन्यानें ही खबर कळली तेव्हां तो संतापून गेला व त्यानें षाहिस्तेखानाचे दक्षिण सुभ्याचे अधिकार रद्द करून त्यास बंगाल प्रांतावर नेमलें. हें असें करूं नये म्हणून षाहिस्तेखानानें पातशहाशीं अनेक तऱ्हेनें विनवण्या व रदबदल्या केल्या. पण त्यांपैकीं एकही कामास न येतां खानास दक्षिण प्रांत सोडून बंगाल्यांत जावें लागलें.

षाहिस्तेखानाला वाटलें होतें कीं, आपण शिवाजीमहाराजांवर मात करूं व त्यांना शासन लावूं. त्याला वाटलें होतें कीं, औरंगजेबाचा हुकूम म्हणजे ऋद्धिसिद्धीच आहेत, व त्या मंत्राच्या बळानें आपल्यांत कर्तुमकर्तु अन्यथा कर्तुम् शक्ति आली आहे. या भावनेच्या फुगोटीनें फुगून जाऊन त्यानें सर्व मर्यादा पायाखालीं तुडवल्या. आला तो थेट राजमहालांत येऊन उतरला, आणि रंगविलासांत गर्क होऊन राहिला. पण येथें सत्याचा सर्वनाश झाला. आणि तो होणारच. एखाद्या टिटवीनें उठावें आणि म्हणावें कीं, समुद्राला पिऊन टाकीन. एखाद्या काजव्यानें उठावें आणि म्हणावें कीं, मी आपल्या ढुंगणाजवळच्या प्रकाशानें सूर्याला दिपवून फिका पाडीन. पण हें घडेल कसें! असें भलत्याच्यानें भलतेंच कुठें झालें आहे!! असें करूं पाहील तो सपशेल पडेल व आहे तें गमवून जगाचें हासें मात्र करून घेईल. आणि अखेर षाहिस्तेखानाचें हें असेंच झालें.

षाहिस्तेखानाचा मोड केला त्या वेळीं त्याचे कांहीं कागदपत्र शिवाजीचे हातीं लागले असें दिसतें. यांपैकीं एका पत्राचा उल्लेख शिवाजीनें पुढें जयसिंगास लिहिलेल्या पत्रांत केला आहे. ज्या लालमहालांत हा अद्भुत पराक्रम शिवाजी महाराजांनीं घडवून आणला, ज्या ठिकाणावर दक्षणच्या मराठी माणसांकडून महाराजांनीं दिल्लीपतीच्या नामजाद सरदाराला चित करून पळवून लावला, तें ठिकाण—तें पुणें गांव सगळ्या हिंदुस्थानाला पुण्यस्थान होऊन राहिलें. या भूमीचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा संखपाळासारख्या कुटुंबांनीं नियम केला. ज्या पुण्यनगरीत महाराजांनीं व त्यांच्या सेवकांनीं पराक्रमांच्या या कोटी केल्या व ज्या पुण्यक्षेत्रांत त्या कथा आज तुम्हीं मन लावून ऐकल्यात, त्या

पुण्यभूमींत श्रीशिवाजीमहाराजांच्या या पाषाणमय मूर्तीच्या दर्शनानें आपण शुचिष्मंत होऊं व येथून परत गेल्यावर या पवित्र कथा आठवून त्यांचें नित्य मनन व चिंतन करूं. आणि आज असा निश्चय करून या आपणां सर्वांच्या डोळ्यांसमोर दिसणाऱ्या मूर्तीच्या स्वच्छ आणि शुभ्र कांतीच्या गंगानदींत, स्वराज्य गमावून बसलेल्या महाराष्ट्राच्या कांहींशा शामवर्ण नदी यमुनेच्या चंचल पाण्याचा संगम झाल्यामुळें आणि तेथेंच माझी वालुकामय सरस्वती कांहीं वेळ गुप्तपणा टाकून येऊन मिळाल्यामुळें हा त्रिवेणी संगम झाला आहे. आणि आतां वरून चंद्र आणि सूर्य दोघेही पहात असतां आज या वेळीं —

येथ भलतेणें नहावें । शुद्ध स्वराज्यस्वरूप पहावें ।
आणि पारतंत्र्याशीं द्यावें । तिलोदक ।। १ ।।
हा दुर्गम डोंगर येवढा । उतरोनी पैलीकडा ।
निष्कपट कीर्तिध्वजेचा झेंडा । नाचवा तुम्ही ।। २ ।।

# शिवाजीची वंशावळी

क्षत्रियकुलावतंस श्रीशिवाजीमहाराज यांचा जन्म ज्या भोसले कुळांत झाला, त्या भोसले कुळाच्या पूर्वपरंपरेसंबंधें पुढीलप्रमाणें पक्ष केलेले आढळतात :

( १ ) भोसले हे रजपूत राणे जे शिसोदे त्यांचे दासीपुत्र होते.

( २ ) शिवाजी हा युरेजियन म्हणजे ल्युसो इंडियन होता.

( ३ ) तो बारोद मेंझिस नांवाच्या पोर्तुगीज सरदाराचा मुलगा होता.

( ४ ) शिवाजीमहाराजांचें घराणें हें अस्सल रजपूत असून त्याचा पूर्वसंबंध शिसोदे वंशाशीं लागतो व आपण रजपूत आहों, हें हे भोसले अभिमानानें म्हणत.

( ५ ) श्रीशिवाजीराजे भोसले हे अस्सल जातिवंत मराठे असून क्षत्रिय होते.

वरीलपैकीं पहिला पक्ष म्हणजे शिवाजीचे पूर्वज हे रजपूत राजांचे लेकावळे होत, हें दलपतराय म्हणतो. दलपतराय हा मुसलमानांच्या अन्नावर पोसलेला असल्यामुळें, तो मुसलमानांना काय लिहिलेलें आवडेल, हें मनांत आणून लिहितो. अधिकारसंपन्न सत्ताधाऱ्यांना आपल्याला त्रास देणाऱ्या इसमासंबंधें वाटेल तें लिहिणें व लिहिलेलें ऐकणें हें आनंददायक असतें. हा नित्य व्यवहार आहे आणि याला अनुसरूनच दलपतरायाचें लिहिणें आहे. तो म्हणतो, भीमसिंग या राण्याच्या सुतार जातीच्या राखेपासून एक पुत्र झाला. त्याचें नांव बागसिंग. अशा प्रकारें हीन कुळांत जन्म पावल्यामुळें तो शरमिंदा होऊन तो प्रांत सोडून दक्षिणेंत उतरला व तेथें पुढें त्याचा वंशविस्तार झाला. मुसलमान ग्रंथलेखक शिवाजीला वाटतील तीं वाईट नांवें देतात. त्याचा नुसता निधनकाल सांगणें तर तो देखील वर्णलिपीनें ' शिवाजी व जहानम रक्त ' म्हणजे ' शिवाजी नरकांत गेला, ' अशी वर्णवटिका योजून सांगतात. तेव्हां असल्या लेखकांचे व त्यांच्या अनुयायांचे लेख इतर पुराव्याच्या अभावीं वजिन्नस खोटे समजणें अवश्य आहे. आपल्या लेखाला कोणताही आधार दलपतराय देत नाहीं.

वरीलपैकीं २ व ३ म्हणजे शिवाजी हा पाश्चात्य पुरुषांचा वंशज किंवा पुत्र होय, हींही विधानें दलपतरायप्रमाणेंच चारगट आहेत. तींही शिवाजीचे दुसरे शत्रु

जे गोव्याचे पोर्तुगीज लोक, त्यांनीं केलीं आहेत. हीं करणाऱ्या लेखकाचें नांव कास्मा द गार्दा हें होय. यानें आपला ' शिवाजीचें चरित्र ' हा ग्रंथ इ. स. १७३० मध्यें लिहिला तो म्हणतो कीं, वसईजवळील विरार या गांवच्या दांव मनवेल मेंझिस या नांवाच्या कोणा एका इनामदाराचा शिवाजी हा पुत्र होय.

असलीं चारगट विधानें कांहीं कांहीं परकी ग्रंथकार करतात, हें पाहून आश्चर्य वाटतें. पण जेव्हां एतद्देशीय, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष महाराष्ट्र-लोक असत्य खोडसाळ विधानांना तर्काच्या कापडाचा कुबुद्धीनें शिवलेला शक्यतेचा झगा चढवूं पाहतात, तेव्हां मात्र फारच नवल वाटतें. हे लोक म्हणतात कीं, " भोसल्यांचें घराणें हें मराठमोळयांत अस्सल दर्जाचें मानलें जात नसे व जातिवंत मराठे त्यांच्याशीं बेटीव्यवहार करण्यास कबूल नसत. शिवाजी हा जिंकलेल्या मराठ्या शत्रूशीं शरीरसंबंधाचें बोलणें नेहमीं लावी व त्यांना तरवारीच्या जोरावर आपणांशीं शरीरसंबंध करण्यास भाग पाडी. " शरीरसंबंध करण्यासंबंधें भानगडी पडून गोष्ट विकोपास जाई, ही बाब जरी खरी असली, तरी याचें कारण कुळीचा कमीपणा हें असे, हें खरें दिसत नाहीं व हें म्हणणें ग्राह्य वाटत नाहीं.

एवंच, शिवाजी किंवा त्याचे कोणी पूर्वज दासीपुत्र होते, हें म्हणणें खरें नाहीं; साफ खोटें आहे.

आतां चौथा पक्ष म्हणजे शिवाजीमहाराज शिसोद्यांचे वंशज असून, ते व त्यांचे वडील आपणांस रजपूत म्हणण्यांत व म्हणविण्यांत अभिमान मानीत, याचा विचार करूं. शिसोद्यांच्या कुळाशीं भोसल्यांचा धागा नेऊन चिकटविण्याचें काम प्रथम बाळाजी आवजींनीं केलें. शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकसमयीं कांहीं लोकांनीं भानगड उपस्थित केल्यामुळें तिच्या निवारणार्थ राज्याभिषेकापूर्वी बाळाजी आवजी चिटणवीस यांनीं श्रमसाहस करून शिवाजीमहाराजांचें क्षत्रियत्व सिद्ध करण्याच्या मिषानें ही तरतूद करून ठेविली, असें म्हणणें आहे. पण हें म्हणणें खरें दिसत नाहीं. महाराजांचे वडील शहाजीराजे यांच्या वेळेपासून अनेक विद्वान् महाराष्ट्र-ब्राह्मण त्यांच्या पदरीं असत व ते शहाजीमहाराजांचीं सर्व नित्यनैमित्यिकें यथासांग चालवीत, हें माझे मित्र प्रसिद्ध संशोधक रा. राजवाडे यांस नवीन प्राप्त झालेल्या जयरामकवीच्या ग्रंथावरून दिसतें. या ग्रंथावरून शहाजी व शिवाजी यांची विद्वत्ता आणि मान्यता महाराष्ट्रांत फार मोठी गणली जात असे, हें स्पष्ट दिसतें, असें मला रा. राजवाडे यांनीं थोडे दिवसांपूर्वीं सांगितलें. या जयराम पिंडे कवीची तत्कालीन रचिलेली आणखी रचनाही प्रसिद्ध इतिहास-संशोधक व्यापारी रा. दिवेकर यांस उपलब्ध झाली आहे, ह्यावरूनही हेंच खरें दिसतें. रा. दिवेकर यांनीं मिळविलेल्या परमानंद गोविंदभट नेवासेकरकृत शिवभारतावरूनही हेंच स्पष्ट दिसतें. महाराष्ट्र-ब्राह्मण शहाजी, संभाजी व शिवाजी वगैरेंना योग्य तें महत्त्व नेहमीं देत. बाळाजी आवजींनीं उत्तरेस

श्रीक्षेत्र काशी येथें जाऊन मोठ्या मिनतवारीनें गागाभट्टाची समजूत काढून केवळ राज्याभिषेकसमारंभासाठीं त्यास दक्षिणेंत आणलें, हें म्हणणेंही बरोबर नाहीं. राज्याभिषेकापूर्वीं सुमारें दहा वर्षें श्येनवी जातिधर्माचाराविषयीं निवाडा करण्याकरितां भरलेल्या विद्वान् भिक्षुकांच्या सभेंत गागाभट्ट हा होता. म्हणजे गागा हा शिवाजीमहाराजांच्या जुन्याच परिचयाचा होता. वरील सभेंत ' राजनिकटवासी ' व ' एतद्देशीय भूधर्माधिकारी ' वैदिकांचा भरणा होता व त्यांतच गागाभट्टही होता. म्हणजे गागाला आणण्यांत बाळाजी आवजीच्या दगदगीची व श्रमसाहसाची अपेक्षा नसून, तो महाराष्ट्राच्या जुन्या परिचयाचा होता. शिवाजीमहाराज धर्मनिर्णयांत अधिकारी म्हणून त्यास मान देत असत.

तसेंच नेवासें येथील गोविंदभटजींचा पुत्र कवींद्र परमानंद हाही वर उल्लेखिलेल्या शके १५८६ मध्यें भरलेल्या सभेंत होता. त्यानें रचलेल्या शिवभारतांत पुढील श्लोक आहे :

**दक्षिणस्यां दिशि श्रीमान् मालवर्मा नरेश्वरः ।**
**बभूव वंशे सूर्यस्य स्वयं सूर्य इवौजसा ।।**

अ. १, श्लोक ४२

यावरून शिवाजीमहाराज सूर्यवंशी क्षत्रिय होते, असें कवींद्र परमानंद स्पष्ट म्हणतो. शिवभारत हा ग्रंथ शाहिस्तेखानाच्या धामधुमीचे सुमारास रचलेला आहे. त्या अर्थी राज्याभिषेकापूर्वी अनेक वर्षें महाराष्ट्रांतील विद्वान् वैदिक ब्राह्मणांस महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें, हें उघड आहे. याच शिवभारत ग्रंथांत पहिल्या अध्यायांत मालोजीराजे हे ब्राह्मणांकरवीं आपले घरांत अग्निहोत्र चालवीत व ब्राह्मण तो विधि यथासांग संपादीत असत, असें म्हटलें आहे.

महाराष्ट्र विद्वान् भिक्षुकांना महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें, हें झालें. तसेंच तें इतर महाराष्ट्र-ब्राह्मणांनाही मान्य व मंजूर होतें. इतर ब्राह्मणांना त्याचा प्रत्यक्ष पुरावा रोजच्या रोज दिसत होता. शिवाजीराजांनीं आपल्या तरवारीनें तें उत्तम प्रकारें शाबित केलें होतें व तशांतूनही कोणास शंका असल्यास ते वाटेल तेव्हां तें सिद्ध करण्यास आपली तरवार घेऊन तयार असत. हें शाबित करण्यास कोणाही मध्यस्थाच्या लटपटीची गरज नव्हती. आतां भोसल्यांचा पूर्वधागा शिसोदे यांच्या कुळाशीं जोडण्याची किंवा तो जोडतां येईल किंवा नाहीं हें पाहण्याची मातब्बरी मुळींच उरली नव्हती.

शिसोद्यांचें गोत्र वाजसेनी किंवा वाजपेयी होतें व भोसले आपलें गोत्र कौशिक म्हणतात. ही बाब पाहतां चितोडच्यांचा संबंध नीट जमत नाहीं. तसेंच रजपूत राजे मौंजीबंधनविधि लहानपणींच नेहमी करतात, व शिवाजीराजांचें मौंजीबंधन राज्याभिषेकापर्यंत केलें गेलें नव्हतें. वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत मौंजीबंधन न होणें ही बाब

जरा नवलाची असली, तरी एकंदरीनें गौण आहे. असल्या सबबींचा दरकार महाराष्ट्रानें केव्हांच केला नाहीं व शिवाजीचे क्षत्रियत्वाबद्दल संशय दाखवून राज्याभिषेकास अडचणही उभी केली नाहीं. त्या उत्सवास समर्थ रामदासस्वामींनीं पूर्ण सहाय्य केलें, मोरोपंतांनीं अभिषेक केला, हणमंत्यांनीं पवित्र जलसिंचन केलें, गागाभटजींनीं मंत्र म्हटले व हजारों ब्राह्मणांनीं आशीर्वाद देऊन आपली पूर्ण संमति जाहीर केली. पण या प्रकरणांत ज्यांस आपला हेतु कांहीं साधला नाहीं, ते मात्र तोंडानें नसती बटबट करीत हात चोळीत बसले व राज्याभिषेकाच्या ज्येष्ठ महिन्याचा त्यांनीं फाल्गुनमास केला.

आतां या पक्षाचें दुसरें पोटम्हणणें असें आहे कीं, शिवाजी व त्याचे पूर्वज स्वत:स रजपूत असें मोठ्या अभिमानानें म्हणवीत. या म्हणण्यास अगदीं अव्वल दर्जाचा अस्सल पुरावा म्हणून शहाजीमहाराजांचें वाक्य दिलें जातें. तें वाक्य असें :

" आमा . . .नाहक गैरहिसाबी पादशाह खलेल करविताती. तरी आपण रजपूत लोक अजी तलग . . . .दोघा चौ पादशाहींत खिदमत केली आमा गैरहिसाबी जाजती सोसुनु कमइजतीन व गैरमेहरबानीन पेशजी ही खिदमत केली नाही व पुढेही न करूं. . .इ. इ. "

या वाक्यांत आलेल्या ' आपण रजपूत लोक ' या शब्दांनीं थोडासा घोटाळा उत्पन्न केला आहे. भरत लहानपणीं जसा ' शकुन्त ' या शब्दाचा अर्थ न समजून फसला, तशीच आमची कांहीं संशोधक मंडळी मोठेपणीं ' रजपूत ' या शब्दाचा बरोबर अर्थ ध्यानांत न आल्यामुळें फसली. येथें ' रजपूत ' या शब्दाचा अर्थ जातिवाचक नसून केवळ ' शिपाईगडी ' असा आहे. ' रजपूत ' हा शब्द ' शिपाई ' याच अर्थानें शिवकालीं योजीत असत.

राजवाडे खंड १५, ले. १५९, पृ. १७५ मध्यें एक हुकूम छापला आहे, त्यांत म्हटलें आहे कीं, "गोसावी याचे इनाम गांवासी कोणी रजपूत येऊन तोसीस देत आहती, तरी त्यास तोसीस न लगे ते करणें. "

तसेंच खंड १८, ले. १९ मध्यें " विसाजी बावजी मुठे खोरियांत राहत होता तेथें सुभाहुनु चौघजण रजपूत पाठऊन दिले. त्यास मसाला खुद्द नि ।। विसाजी टके २० वीस ठरवून दिला आहे. " धाडलेल्या चारी रजपुतांचीं नांवे ( १ ) सोनजी, ( २ ) एसु काकडा, ( ३ ) केरोजी व ( ४ ) सोनजी लोहारी म्हणजे लोहार अशीं दिलीं आहेत. येथें सोनजीची जात लोहार दिली असल्यामुळें धंदा रजपूत किंवा शिपाईगिरी हा अर्थ उघड आहे.

श्रीसांप्रदायिक कागदपत्रें, ले. १५, पृ. २५ वर पुढील वाक्य आहे : "श्रीच्या कार्यभागास हरकारा व रजपूत पाहिजेत ते प्रयोजनानुसार येक दोनी सुभेमजकूरचे देत जाणें. "

राजवाडे खंड १६, लेखांक २२ हा महजर आहे. यांत बावाजी मरळ रजपूत व मार्लिंग रजपूत अशा दोन साक्षी आहेत. मार्लिंग या नांवावरून रजपूत ही याची जात नसून धंदा होय, हें स्पष्ट आहे.

आणखीही अनेक उतारे देतां येतील. पण इतके पुरे आहेत. वरील वाक्यांत शहाजी आपली जात सांगत नसून, आपली खणखणीत शिपाईगिरी मोठ्या अभिमानानें सांगत आहे.

हें झालें शहाजीच्या वाक्यासंबधें. शिवाजीमहाराजांचें तर असेंही वाक्य अजून उपलब्ध नाहीं. ते नेहमीं आपणांस ‘ मराठा ’ म्हणवीत व ‘ मराठा ’ म्हणण्यांत अभिमान मानीत.

आतां उरलेला पक्ष ५ याचें उत्तर वरील मजकुरांत आलेलें आहेच. तें पुन्हा देणेचें प्रयोजन नाहीं.

आतां भोसले शब्दाची उत्पत्ति पाहूं.

भोसले या शब्दाच्या दोन-तीन व्युत्पत्त्या सांगण्यांत येतात. कर्नाटक-विद्वान म्हणतात, हा शब्द . . . [1] या शब्दापासून निघाला असावा. म्हणजे याचा अर्थ नौकर असा होतो. गोवें प्रांतांत हा शब्द बोंसले असा उच्चारतात, याचाही अर्थ तोच होय. रा. राजवाडे म्हणतात, भोजपासून ला प्रत्यय लागून भोजला हा शब्द आला व त्यापासून पुढ भोसला किंवा भोसले हा शब्द झाला.

तिसरी एक व्युत्पत्ति अशी कीं, भोस या गांवचे रहिवासी ते भोसले. या किंवा दुसऱ्या कोणत्याही व्युत्पत्तींत त्यांच्या कुळाचा अस्सलपणा कमी करणारा ध्वनीही नाहीं. तेव्हां हें भोसल्यांचें कुळ निर्भेळ क्षत्रियच होय.

सिद्धान्त : श्रीशिवाजीमहाराज भोसले हे अस्सल मराठे क्षत्रिय होते व सर्व महाराष्ट्र त्यांस तसेंच मानी व आजही मानतें.

---

१. येथें मूळ कानडी शब्द दिलेला नसून त्यासाठीं जागा सोडलेली आहे.

# श्रीशिवाजीमहाराजांचा होन, वाघनखें व भवानी तरवार

श्रीशिवाजी राजे भोंसले यांनीं स्वराज्याच्या स्थापनेबरोबर राजछत्राला योग्य व अवश्य अशा ज्या अनेक गोष्टी केल्या, त्यांपैकीं स्वतःचें नाणें पाडणें, ही एक होय. शिवाजीच्या नाण्यांपैकीं 'शिवराई' हें नाणें तांब्याचें असून तें सुमारें पंचवीस-तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं चालू होतें. परंतु 'होन' हें नाणें बंद झाल्याला पुष्कळच वर्षें होऊन गेलीं. वास्तविक पहातां 'होन' नाणें महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडावें असें प्रथम वाटतें. पण वस्तुस्थिति अशी नसून हें नाणें फारच दुर्मिळ आहे. विशेष नवलाची गोष्ट अशी कीं, मुंबईंतल्या 'रायल एशियाटिक सोसायटी'च्या अजबखान्यांतील नाण्यांच्या संग्रहांत या होन नाण्याचा नमुनाहि नाहीं ! आज सभेपुढें दाखविलेला होन मला सुमारें वीस वर्षांपूर्वी अहमदनगरचे प्रसिद्ध व्यापारी शेट प्रेमराज पन्हालाल यांचेकडोन मिळाला व तेव्हांपासून तो माझे संग्रहांत आहे.

या नाण्याचा आकार वाटोळा असून व्यास सुमारें पाव इंच आहे, व वजन तीन मासे एक वाल आहे.

याचे एके आंगाला 'शिव भवानी' चें चित्र असून पाठीवर म्हणजे नाण्याचे दुसरे आंगाला मराठी बालबोध लिपींत अक्षरें काढलेल्या तीन ओळी आहेत. ओळींत अक्षरें पुढीलप्रमाणें आहेत.

ओळ १ सीव

ओळ २ रा ( मोडी वळणाचा ) ज छ ( त्र )

ओळ ३ पती ( अक्षरांचे वर व खालीं रेघा आहेत. )

नाण्यावरील चित्र म्हणजे दोन मूर्ति, एक देव व शेजारींच चिकटून एक देवी असें आहे. मूर्ति उभ्या नसून बसलेल्या आहेत. यावरून ह्या अनुक्रमें शिव व पार्वतीच्या असाव्यात असें वाटतें. पण ह्या मूर्ति शिवाजीचा कुलस्वामी शिंगणापूरचा

शिव, व कुलस्वामिनी कोल्हापूरची[१] भवानी किंवा अंबाबाई यांच्या असतील असें वाटत नाहीं. कारण हें होन नाणें शिवाजीनें स्वतंत्र कल्पनेनें कल्पून पाडलेलें दिसत नाहीं. विजयानगराचा सदाशिवराय ( १५४३ ते १५७३ ) यानें पाडलेला होन अगदीं असाच आहे. त्याचे एके अंगाला असेंच शिव-पार्वतीचें चित्र असून दुसरे आंगाला या होनाप्रमाणेंच बालबोध अक्षरांच्या तीन ओळी ( १ ) श्री ( २ ) सदाशि ( ३ ) वराय याप्रमाणें आहेत. दिसण्यांत विजयानगराचा हा सदाशिवरायाचा होन व हा शिवाजीचा होन अगदीं सारखे दिसतात. इतकेंच नव्हे तर विजयानगरीच्या शेवटच्या हकीकतीची जी खबर प्रसिद्ध आहे, तींत नाण्यांची यादी दिली आहे, त्यांत ' शिवराई होन ' असें म्हटलें आहे आणि त्यावरूनच असें म्हणतां येतें कीं, शिवराई किंवा शिवरायी होन याचा अर्थ शिवाजीचा होन असा नसून ज्यावर शिवा ( शंकरा ) चें चित्र किंवा मूर्ती आहे तो होन, असा आहे.

शिवाजीच्या तांब्याच्या शिवराईवर ' मूर्ती ' चें चित्र नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. श्री सिव छेत्रपति अशीं अक्षरें जाड पत्र्यावर उठवून त्याचे शिवराई पाडीत असावे, असें दिसतें. ढबू पैसा म्हणजे दोन पैसे शिवाजीचे, पाहण्यांत नाहींत.

यासंबंधें आणखी एक बाब अशी दिसते कीं, शिवाजीचा बालबोध लिपीतला रुपायाहि कोठें आढळत नाहीं. माझे लहानपणीं क. गोविंद बाबाजी जोशी यांनीं जरीपटका ' रुपाया ' असें नाणें दाखवलेलें आठवतें. पण त्यासंबंधीं विशेष कांहींच आठवत नाहीं. संशोधकांच्या कानावर ही गोष्ट असावी, म्हणून येथें नमूद केली आहे.

या स्वराज्यांतल्या नाण्यांचा आकार अगदीं ओबडधोबड आहे. पण त्या काळीं एतद्देशीय व परदेशीय अशा सर्व नाण्यांचा आकार असाच ओबडधोबड होता. ईस्ट इंडिया कंपनीचे पैसे, अर्धे पैसे व सन १७३७ मधील इंग्रजी रुपाया हीं नाणीं यासोबत पुढें ठेवितों म्हणजे हीं सर्व नाणीं एकसारखींच आहेत, असें आढळून येईल. हीं नाणीं श्रीकौपीनेश्वराचे देवालयाजवळील मासुंदे तलावांत इ. स. १८९६ चे सुमारास सांपडलेलीं आहेत.

ह्या सदरहू चार नाण्यांचे फोटो मंडळाच्या संग्रहीं आहेत.

श्रीशिवाजीमहाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार हीं ब्रिटिश म्युझियम्, लंडन, येथें असल्याचा समज आहे. परंतु तो साफ खोटा आहे. या बाबतींत मी लिहिलेल्या पत्राला पुढील उत्तर आलें आहे :—

..........................................

१. तुळजापूरची. चिटणीस.

Department of British and Medieval Antiquities and Ethnology, British Museum, London W. C. 1

V. L. Bhawe Esq.
THANA,
near Bombay, India.

March 24th 1915.

Dear Sir,

We do not possess the original 'tiger's claw' or sword of Sivaji in the British Museum.

You have quoted[१] the label accurately.

Yours faithfully
( Signed ) C. HERCULES
Record Keeper

१. "A waghnakh like the one used by Shivaji" अशी चिठी ब्रि. म्यु. मधील वाघनखावर आहे.

# मराठ्यांच्या इतिहासाचीं दोन शतकें

वखरी[1] वाचून झाल्या म्हणजे मनामध्यें अनेक विचार घोळूं लागतात; चित्त अस्वस्थ होतें; हृदय उचंबळून जातें; व मनामध्यें नानाविध कल्पनांचें काहूर उभें राहतें. गेले सहासातशें वर्षांत मराठ्यांच्या स्थितीचीं जीं जीं स्थित्यंतरें होऊन गेलीं, तीं सर्व एके क्षणांत आपले डोळ्यांसमोर उभीं राहतात व मन वेडावून जातें.

शके तेराशेपासून पंधराशेपर्यंत तर मराठ्यांचा कोठें मागमूसही नीट लागत नाहीं. पंधराशेंनंतर उत्तर हिंदुस्थानांतून इकडे येऊन राहिलेल्या व मराठ्यांत मिसळून गेलेल्या एका कुटुंबानें थोडें वर डोकें काढलेलें जरा दिसतें व मराठे आणि त्यांचा महाराष्ट्रदेश पडद्याआडून बाहेर आल्यासारखा वाटतो. यानंतर अर्ध्या शतकानें म्हणजे शके १५५० नंतर मराठ्यांच्या हालचाली हिंदुस्थान देशाच्या रंगभूमीवर स्पष्टपणें दृष्टीस पडूं लागतात व यापुढील तीन शतकांतलीं तीन चित्रें ऐतिहासिक पडद्यावर टांगलेली ज्ञानचक्षूंना दिसूं लागतात.

शके १५४० ते शके १६४० चे एक, शके १६४० ते १७४० चें दुसरें व शके १७४० ते १८४० चें तिसरें अशीं हीं तीन चित्रें[2] एकदा दिसूं लागलीं, म्हणजे त्या त्या चित्रांतील लहानमोठे सर्व देखावे, त्यांतील रंगांच्या अनेक छटा पाहतां पाहतां मन अगदीं गढून जातें व जों जों एक एक चित्र पाहावें आणि दुसऱ्या दोहोंशीं तें तोलावें, तों तों तें वेडावून नादावलेलें मन तेथेंच चिकटून वसतें. क्षणांत अभिमान, क्षणांत आनंद, क्षणांत त्वेष, क्षणांत राग, क्षणांत निराशा अशा वृत्तींच्या ऊर्मि पाहणाराच्या चेहऱ्यावर उमटूं लागतात.

पहिल्या चित्रांत म्हणजे शके १५४० ते १६४० पर्यंतचे शतकांत आगेंमागें भयाण देखावा असून मध्येंच श्रीशिवाजी महाराजांच्या दैदीप्यमान सूर्याच्या प्रकाशानें तेजोमय

..............................................

१. 'या तीन वखरी' असा प्रारंभ मूळ हस्तलिखितांत आहे. कोणत्या तीन वखरी अभिप्रेत आहेत, तें सांगतां येत नाहीं. ––संपादक

२. या तीन चित्रांपैकीं दुसऱ्या चित्राचें वर्णन चालू असतांनाच उपलब्ध हस्तलिखित संपलें आहे. पुढील भाग उपलब्ध होऊं शकला नाहीं. ––संपादक

झालेला महाराष्ट्र फार सुंदर दिसतो. या सूर्यानें महाराष्ट्रसागराला चोहोंकडे भरतीचें उधाण आलेलें दिसतें व चोहोंकडे आनंदवृष्टि होतांना आपण पाहतों व आतां लौकरच स्वराज्याच्या गोड फळांनीं हें आनंदवनभुवन भरून जाईल, असें वाटतें. पण या देखाव्याकडे क्षणभर नजर लावावी, तोंच ती भरती ओसरून ओहोट वळल्याचा देखावा नजरेस येतो व ते आनंददायक ढग पार नाहींसे झालेले दिसतात. चोहोंकडे खडखडाट होतो व सर्वभर भयाण देखावा नजरेस पडून तो पाहत असतां मन अगदी विटून जातें. संभाजीचीं तीं क्रूर कृत्यें, मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी, वगैरेंना बंदिवास भोगतांना पाहून आणि प्रत्यक्ष आपल्या आईला भिंतींत जिवंत कोंबलेली पाहून तर अंगावर शहारेच उठतात. मन एक वेळ हेंही सहन करतें. हीं घरचींच भांडणें आज नाहीं उद्यां मिटतील व अंशत: तरी त्यांचें परिमार्जन करतां येईल, अशा विचारानें तें आलेला उमासा आवरून धरतें; पण मग लगेच सर्व महाराष्ट्राचा धनी, ज्याला महाराष्ट्रानें परम पूज्य मानला त्या शिवरायाचा प्रत्यक्ष पुत्र, औरंगजेबानें धरून त्याचे डोळे काढून, त्याची जीभ कापून एखाद्या रांडलेकाप्रमाणें, एखाद्या खुनी बदमाशा-प्रमाणें त्याचें डोचकें उडवावें आणि त्याच्या बायकोला व मुलाला बंदिवान करावें, हें पाहून तर त्वेष आणि राग यांनीं मनुष्य वेडावून जातो. यानंतर, राजाचें दुष्कर्म राजाला भवावें आणि प्रजेलाही भवावें, असें झाल्याचा देखावा दिसतो. इतक्या परि-श्रमानें उभें केलेलें स्वराज्य जमीनदोस्त होतें, भक्तिभावानें बांधलेलीं देवळें मोडलीं जाऊन त्यांतले देवही नाहींसे होतात आणि सर्वभर राक्षसी वृत्तीचें थैमान चाललेलें दिसूं लागतें. हा अपमानकारक, भयानक हिडीस आणि किळसवाणा देखावा पाहतांना, हा पहाण्यापेक्षां डोळे मिटलेले बरे, असेंच वाटतें. किंबहुना ते फुटले तरीही चालतील, पण आतां हा देखावा पाहणें नको, असें मन म्हणूं लागतें.

या पहिल्या चित्राच्या पडद्याकडून दुसऱ्या चित्राकडे नजर फिरवली असतां मनाला थोडा पालट वाटूं लागतो. कोंकणांतलें एक लहानसें कुटुंब घाटावर येऊन त्यानें, या उत्तर हिंदुस्थानांतून आलेल्या कुटुंबानें कष्टानें लावलेल्या स्वराज्यवृक्षाच्या करपून गेलेल्या झाडापानांना टवटवी आणलेली दिसते व पुत्रप्रेमानें त्याची जोपासना करून त्याला प्रफुल्लित करीत असल्याचा गोड देखावा डोळे पाहूं लागतात.

संभाजीराजे मारले गेल्यामुळें व राजाराम महाराज जीव घेऊन निघून कर्नाटकीं स्वारीस गेल्यामुळें महाराष्ट्राला पोरक्या पोराची कळा आली होती. अविंधांच्या धुडकुसामुळें त्याचा देह तुडवला गेला. लोक हताश झाले. त्यांनीं घरें सोडून वनवास पत्करला. गांवें ओस पडलीं होतीं. प्रांत उजाड झाले होते. जमिनींनीं पिकें टाकलीं होतीं आणि शेतांचे माळ व कुरणांचीं रानें होऊन गेली होतीं. अशा स्थितींत शाहूनें आपल्या राज्याचा भार बाळाजी विश्वनाथवर टाकला. बाळाजीपंतानें दिवे-

लावणीचे कौल[१] दिले. राज्यांत वसाहत करविली. नवीन शिस्ती बांधून दिल्या आणि या जंगल बनून गेलेल्या महाराष्ट्रांत जिकडे तिकडे स्वराज्याचे रोपे लावून सुंदर बगीचे बनवण्यास सुरवात केली. बाळाजीपंतनाना शरिरानें कृश होता व त्यास नीटसें घोड्यावरही बसतां येत नव्हतें, असें सांगतात. पण त्या मेहनती वृद्ध नोकरानें आंग मोडून मेहनत केली व ज्यानें आपल्यावर येवढा राज्यकारभार टाकला, त्याची सर्व सेवा मनोभावें एकनिष्ठपणें केली.

बाळाजीपंताच्या मुलानें तर बापाचा धडा उत्तमच गिरवला. बाप हयात असतांच तो थोडाफार कारभार पाहूं लागला होता. पण बापाच्या मरणानंतर त्याच्या दोन्ही मुलांनीं केवळ शिकस्तीचे यत्न केले आणि गहजब उडवून दिला. उपाशी-तापाशी, केव्हां शेतांतल्या हिरव्या कणसांचेच फाके मारीत यांनीं स्वाऱ्या-मसलती केल्या. सैन्य ठेवायला पदरीं पैका नाहीं, तरी हताश न होतां आपल्या स्वतःच्या पतीवर, स्वतःच्या सहीनें खातीं पाडून देऊन बारा-बारा, वीस-वीस टक्क्यांच्या व्याजानें सावकारांचे, उंबरठे झिजवून पैसे आणावे, व सैन्याची भरती करून छत्र-पतींचें राज्य वाढवावें, ग्रस्त झालेला महाराष्ट्र सोडवावा, काळोख नाहींसा करून त्याचा चेहरा सतेज व दैदीप्यमान करावा, हीं कृत्यें या दोन भावांनीं आजन्म केलीं. उत्तरेकडून मुसलमान येऊन त्यांनीं जसा हा देश खाऊन टाकला, त्याप्रमाणेंच पूर्व-पश्चिमेकडून पोर्तुगीज वगैरे लोक येऊन त्यांनीं ही पुण्यभूमि, हें आनंदवनभुवन गिळण्यास प्रारंभ केला होता. गांवचे गांव बाटवावें, देवळें उठवावीं, ग्रं। नष्ट करावे, भापाही नाहींशी होईल असे यत्न आरंभावे, असा या लोकांचा क्रम सुरू झाला होता. पण या वेळीं डोईला केस थोडे इतक्या सावकारांचीं कर्जें काढून, आपल्या हाडांचीं काडें करून हे भाऊ महाराष्ट्राच्या हाकेला धावून आले आणि त्याला अनाथसें वाटूं न देतां त्याचे पाठीराखे झाले व पोर्तुगीजांच्या राज्यसमुद्राची वाढती भरती त्यांनीं आपल्या तलवारींनीं जागचे जागींच थोपवून धरली. ते या महाराष्ट्राला गिळूं पाहत असतां हे भाऊ त्यांच्या घशांत जाऊन असे बसले कीं, त्यांचा जीव गुदमरून गेला व गिळ-लेलाही घांस त्यांना ओकून टाकणें भाग पडलें. मग पुढें आणखी जेवण कशाचें ? पुढलें ताट टाकून ते एकदां येथून पळाले,. ते पुन्हा कैक वर्षे परत वळलेही नाहीत.

घरीं कुटुंबाची माणसें आजारी पडलीं तरीही त्यांच्या भेटीला देशीं येऊं देखील नये, प्रत्यक्ष पोटच्या मुलांचीं मुंजीकारणें निघून आग्रहानें घरून बोलावणें गेलें असतांही यांनीं उत्तर लिहावें कीं, ( मूळ पत्रांतील उताऱ्यासाठीं मोकळी जागा सोडलेली ) अशा एकनिष्ठेनें यांनीं आपल्या धन्याची सेवा चाकरी केली. हे स्वारीवर गेले म्हणजे शाहूमहाराजांनीं लिहावें, ( उताऱ्यासाठीं मोकळी जागा सोडलेली ) पण यांनीं

१. खेड-चाकणकडे हे कौल सर्वभर पहावयास मिळतात

जीवाचीही पर्वा न बाळगतां पुढें पुढेंच जावें व मसलत फत्ते करून छत्रपतींचें राज्य वाढवीत राहावें आणि महाराष्ट्राच्या नांवाचा डंका जगाला ऐकवावा. जणूं महाराष्ट्राकरतां यांनीं फकीरीच घेतली होती. बाजीरावाची हातोटी एक दृष्टीनें नेपोलियनला किंवा केसरलाही साधली नाहीं. स्वराज्याची सीमा एकसारखी वाढवीत जावी आणि ती जोराजोरानें वाढवीत असतांना किंवा वाढवल्यावरही स्वजनांना संतुष्ट ठेवावें, हें या दोघांनाही साधलें नाहीं. सावकारांचे घरें पाडणारे शब्द ऐकून घेऊन केवळ धन्याच्या हितावर नजर ठेवून तेंच साधीत राहावें, ही तर वरील जोडीपैकीं कोणाला कल्पनाही आली नाही. उलट धन्याचा नायनाट करावा, हेंच त्यांना योग्य वाटलें.

बाजीरावाचे कष्ट पाहून त्याचा धनी संतुष्ट झालाच, पण परमेश्वरही त्याला पावला. अशा एकनिष्ठ सेवकाला, अशा थोर महात्म्याला, संगरदेवतेचें केवळ सौभाग्य अशा या योद्धयाला, सर्वांत श्रेष्ठ असेंच मरण त्यानें दिलें. स्वारींत महाराष्ट्राकरतां हातावर जीव घेऊन लढत असतां तिकडेच मरण यावें, याहून यश तें कोणतें ! आणि हें यश यानें साधलें.

बाजीराव दिवंगत झाल्यावर शाहू महाराजांना एक नवी काळजी येऊन पुढें उभी राहिली. आपल्या विश्वासांतला कष्टाळू नोकर वारला म्हणजे धन्याला काय वाटतें, याची कल्पना ज्यांना तो अनुभव थोडाफार तरी आला असेल अशावांचून इतरांस होणार नाहीं. मनाच्या अशा स्थितींत शाहू महाराज असतांना अनेकांनीं त्यांचेभोंवतीं कलकलाट सुरू केला व जो तो ही पंतप्रधानकीची सेवा मागूं लागला. ती आतां या पेशव्यांच्या मुलाला न मिळतां आपल्याला मिळावी, असें या मागतेकऱ्यांना वाटूं लागलें. पण शाहूनें दर एकाला जवळ बोलावून ‘ तूं हें पेशवाईपदाचें जड ओझें पेलशील कां ? ’ असें विचारल्यावर जो तो आंग चोरूं लागला. सीतेच्या स्वयंवराला गेलेल्या रावणाची जी गत, तीच गत त्यांची झाली. द्रौपदीच्या स्वयंवराला जमलेल्या आशाळभुतांची तो मत्स्याक्षभेदाचा पण ऐकून जी दशा उडाली, तीच दशा या मागतेकऱ्यांची झाली व अखेर ही प्रधानपदाची माळ नानासाहेबाच्या गळ्यांत पडली. आणि माळ गळ्यांत घातल्याबरोबर नानानें लागलेच कावाडकष्ट सुरू केले.

वडिलाचें उत्तरकार्य आटोपल्यापासून या नानानें जे श्रम सुरू केले, ते तहाहयातपर्यंत एकसारखे तसेच चालू होते. तो, त्याचा धाकटा भाऊ राघोबा व चुलतभाऊ सदोबा हे सर्व सारखे झुंजत होते. शिवाजीमहाराजांना दिल्लीपतींनीं बंदिवान करून महाराष्ट्राचा उपमर्द केला होता, त्या दिल्ली-आग्र्यावर आपल्या तोफांचे भडिमार करून त्यांनीं तीं शहरें आपल्या कबजांत घेतलीं. पेशव्यांनीं दिल्ली-आग्रा ज्या दिवशीं घेतलें, त्या दिवशीं शिवाजी महाराजांच्या आत्म्याला विष्णुपदावर

पिंड दिल्यापेक्षांही जास्त आनंद झाला असेल व त्यांनीं आकाशांत टाळयांचा कडकडाट केला असेल. ज्या तक्तापुढें आपल्याला कमीपणा घेऊन दूरदूरच्या सरदारांच्या रांगेंत उभें राहावें लागलें व हें कृत्य वरून पाहून ज्या रुपेरी छतानें तोंड हंसरें केलें होतें, तें तक्त दूर सारावें, व तें वेडावणारें छत्र फोडून आटवून टाकावें, आणि आपल्या या अलौकिक कृत्याची आठवण सर्वांना राखतां यावी म्हणून त्याचे रुपये पाडून वाटावे, हें पाहून शिवाजीमहाराजांनाच काय, पण स्वर्गांतल्या देव-देवतांना देखील धन्यता वाटली असेल. ( अपूर्ण )

# मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें

मराठ्यांचें राज्य नाहींसें होण्यास कोणतीं कारणें झालीं, हा प्रश्न पुन्हां पुन्हां मनापुढें उभा राहतोच. राज्य जाण्याच्या प्रमुख कारणांत जातिभेद, वगैरे कारणें नेहमीं ऐकिवांत येतात. जातिभेदामुळें व जातिमत्सरामुळें आपणां मराठ्यांचें शतशः नुकसान झालें आहे, होत आहे व पुढेंही होईल, असें मला नेहमीं वाटतें. पण नवीन काल्पनिक जग निर्माण करणें आपल्या हातचें नाहीं. तें विश्वामित्रालाही नीटसें साधलें नाहीं. मग आपल्याला तें एकदम कसें साधेल. बेटीव्यवहारानें नातेसंबंध उत्पन्न झाल्याशिवाय जातिभेदाचा पुरा मोड होणार नाहीं. बेटीव्यवहार सुरू केल्यानें देखील तो अगदीं निर्मूळ होईल, असें नाहीं. युरोपांत बेटीव्यवहार सर्वत्र आहे. पण तिकडे भेद व मत्सर दोन्ही आहेत, हें आपण नेहमीं ऐकतों. तरी यांमुळें तो पुष्कळ कमी होईल, असें वाटतें. रोटीव्यवहारानेंही जातिभेदाची तीव्रता कांही कमी पडेल. पण अन्नपेयांत जोंपर्यंत फरक आहे, तोंपर्यंत रोटीव्यवहारही नीटसा सुरू होणार नाहीं. तेव्हां जातिभेदांचें अस्तित्व एकदम नाहींसें करण्याच्या असंभाव्य भानगडींत न पडतां, आहे अशाच वस्तुस्थितींत शक्य तेवढा मार्ग काढला पाहिजे. राजकारणांत व राष्ट्राच्या हिताहिताच्या संबंधांत जातिभेदाला बिलकुल थारा देतां कामा नये. कोणतीही एक जात दुसरीहून श्रेष्ठ नसून सर्व जाती आपापल्या परीनें राष्ट्राच्या उपयोगी अतएव सारख्याच श्रेष्ठ आहेत, हें नित्य मनांत ठसवलें पाहिजे. हें पेशव्यांनीं सदैव मनांत ठेवलें होतें आणि ते राजकारणांत जातिभेदास वाव मिळूं देत नसत.

आपल्या राज्याचा नाश होण्यास जीं कारणें झालीं, त्या सर्वांत मुख्य व महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे शास्त्रीय ज्ञानाची उणीव, हें होय. युद्धकलेंतल्या शस्त्रास्त्रांच्या ज्या अनेक सुधारणा युरोपियन राष्ट्रें करीत होतीं, त्या सुधारणा महाराष्ट्रानें उचलल्या नाहींत व आमच्या कारागिरांनीं अधिक कल्पना लढवून त्यांच्यावर ताण करण्याचें कृत्य केलें नाहीं. पुणें व इतर ठिकाणीं तोफांचे कारखाने पेशव्यांनीं काढवले होते, पण त्यांतील कारागिरांनीं युरोपांतील तोफांची नक्कल

मात्र केली. आणि पुढें पुढें तीही त्यांस नीटशी साधली नाहीं. गेल्या महायुद्धांत जर्मनीच्या ओताऱ्यांच्या तोफांनीं सर्वांत जशी आघाडी मारली, तशीच गेल्या शतकांत आपल्या शत्रूंच्या तोफांनीं आपल्या तोफांवर ताण केली व आपलीं सैन्यें आणि आपले सरदार अनेक वेळां हिमतीनें लढून जरी संकटांतून निसटून गेले, तरी त्यांना वारंवार थोडीफार हार खावी लागली. तोफांप्रमाणेंच बंदुकादेखील आमचे लोहार तयार करीत असत. पण चांगल्या बंदुकांसाठी आणि तरवारींसाठीं आपल्या शिपायांस परकीयांच्या तोंडाकडे पाहावें लागे. आपले कारागीर ही उणीव भरून काढते, तर आपले शिपाई कोणालाही दाद देते ना. हीच दशा इतर कलांसंबंधानेंही होती. पुण्यांत चित्रशाळा काढली होती. पण तींत शिक्षण देण्याकरितां परकीयांना ठेवावें लागे. आणि परकीय लोक आपल्या कला इतरांना कशा शिकवितात, याचा दाखला प्रो. गज्जरांच्या कलाभुवनांत आणि घाटकोपरच्या छापखान्यांत आपणांसही मिळाला आहे.

दुसरें कारण किंवा या पहिल्याच कारणाचें मूळ कारण प्राचीन पुरुषांविषयीं फाजील आदर हें होय. पूर्वजांनीं जें जें केलें, जें जें लिहिलें, जें जें सांगितलें, तें सर्व पूर्ण व वेदतुल्य मानण्याची वुद्धि हीही आपणांस फार नडली व नडत आहे. जोतिपासारख्या दृक्प्रत्ययानें कसास लावतां येणाऱ्या गोष्टीबद्दलही पूर्वाचार्यांचें लिहिणें बदलावें किंवा नीट तपासून पाहावें, हें व तें चूक वाटल्यास टाकून द्यावें, हें स्वराज्यांत कोणास पटलें नाहीं व अजूनही पटत नाहीं, हें एक आपलें दुर्दैव असून आपल्या समूळ नाशाचें खास कारण आहे.

हेंच थोड्या पर्यायानें म्हणावयाचें म्हणजे आपली भोळसर सात्त्विक बुद्धि हें एक नाशाचें कारण मानावें लागतें. आपणांस प्रवृत्तिमार्गापासून दूर करावें, मनाचा नेभळेपणा वाढवावा, भाविक विश्वास उत्पन्न करावा, चौकसपणा नाहींसा करावा, वडिलांपेक्षां कर्तृत्वपरायण होणें हें मुलांचे मनांत येऊंच नये, हें मात्र आमच्या साधुपुरुषांनीं, कवींनीं आणि धर्मगुरूंनीं केलें. एका रामदासाशिवाय राजकारणाचे व स्वराष्ट्र, स्वदेश, स्वभाषा यांचे धडे शिकविण्याचें काम एकानेंही केलें नाहीं. रामदासामागें त्याच्या प्रत्यक्ष शिष्यांनींही ती परंपरा चालवली नाहीं, मग इतरांची काय कथा ! ! किंबहुना असेंही म्हणणें प्राप्त पडतें कीं, आमच्या साधुपुरुषांपैकीं समर्थांशिवाय एकालाही राष्ट्रीयत्वाची कल्पना केव्हांही नीटशी नव्हती व ती कल्पना समजून तिची इतरांचे मनांत उभारणी करण्याची ऐपत व जोम त्यांच्यांत फारसा नव्हता. झाशी येथील कामदार जोतिपंत दादा भागवत, दक्षिणेंतल्या राजकारणांत पडलेले निरंजन माधव, रमावल्लभदास वगैरेंसारख्या राजकारणांत वावरणाऱ्या एकाही लेखकाचा राष्ट्रभावना व चैतन्य उत्पन्न करण्यासारखा एकही ग्रंथ अजूनही आपणांस आढळत नाहीं. कोणी एखाद-दोन श्लोक किंवा पांच-चार ओव्या मुसलमानांना शिव्याशाप देऊन लिहिल्या असल्या, तर तें कांहीं राष्ट्रीय चैतन्य निर्माण

करणारें लिखाण म्हणून केव्हांही समजतां येणार नाहीं. ज्ञानेश्वरानें भिंत चालविली, जनाबाईनें पाठीवर पोळ्या भाजल्या, तुकाराम टाळ-गोधडी बगलेंत मारून सदेह स्वर्गास गेला, रामदासानें मेलेली घार उठविली, शाहूनें हात लावल्याबरोबर दुधांतलें विष निरुपद्रवी झालें, असलीं खुळचट थोतांडें निर्लज्जपणानें शिकवून या साधूंच्या चाहत्यांनीं महाराष्ट्राला अगदीं दुबळें बनविलें व राष्ट्रावर आपत्ति आणण्याचे पापास मात्र ते अंशतः तरी वाटेकरी झाले.

असें दिसतें कीं, बौद्धधर्माच्या पूर्ण अभावानंतर आर्यावर्तातील अनेक धर्मांवर त्याचा पगडा बसून त्यायोगें हा निवृत्तिपर भागवत धर्म प्रचारांत आला. हा धर्म उत्तर हिंदुस्थानांत फैलावून नंतर अकरावे-बारावे शतकाचे सुमारास तो महाराष्ट्रांत शिरला. मच्छिंद्र, गोरख वगैरे पुरुषांमार्फत ज्ञानेश्वराचे हातानें तो इकडे फैलावला गेला व तेव्हांपासून आतांपर्यंत तो इकडे नांदत आहे. ज्ञानेश्वरादि भावडांनीं महाराष्ट्राला हा धर्म पढवला ते वेळीं येथें योग्य अशी जनमनाची भूमिका तयार झाली होती, असें हेमाद्रीच्या व्रतखंडांतली वर्षाच्या दर एक दिवसाला सांगितलेलीं निरनिराळीं व्रतें पाहून वाटतें. आधीं सर्व तऱ्हेच्या समृद्धीमुळें बाराव्या शतकाचे प्रारंभीं महाराष्ट्र सुखविलासनिमग्न होऊन देशाचें मन उद्योगपराङ्मुख बनत चाललें होतें. त्यांत हा भागवतधर्म ज्ञानेश्वरासारख्या अलौकिक बुद्धिसामर्थ्याच्या माणसानें उपदेशिल्यावर उदासीन मनाला धर्माची जोड मिळाली व महाराष्ट्र दुबळें होण्यास सुरुवात झाली. याची प्रचीतही लौकरच आली. जाधवांचें राज्य बुडालें व महाराष्ट्र दास्यत्वाचें सुख अनुभवूं लागला. या मात्रेनें डोळे उघडावे, पण ते उघडले नाहींत. सहिष्णुतेच्या नांवाखालीं महाराष्ट्र समाधानच मानून राहिला. दोनतीनशे वर्षांनंतर थोडीशी जागृति झाली व रामदासानें आपल्या अलौकिक सामर्थ्यानें या निवृत्तीस थोडासा आळा घालण्याचा यत्न केला. त्यासाठीं त्याला आटोकाट यत्न करणें भाग पडलें व त्याच्या यत्नाचें फळही कांहीं काळ चांगलें आलें. रामदासानंतर निवृत्तिमार्गापासून दूर करून प्रवृत्तिमार्गाकडे वळवणारा नांव घेण्यासारखा दुसरा साधुपुरुष महाराष्ट्रांत झाला नाहीं.

साधुपुरुषांच्या ग्रंथांत राष्ट्रजागृति व स्वातंत्र्यप्रेम आहे, असें दाखवण्याचा आधुनिक ग्रंथकार केव्हां केव्हां यत्न करतात व त्यांच्या उपदेशानें राष्ट्रास सतेजता आली व येईल, असें ते प्रतिपादतात. पण हें अगदीं व्यर्थ होय. निवृत्तीचीं झाडें जमिनीत लावून त्यांपासून प्रवृत्तीच्या फळांची इच्छा करणें हें केवळ बालिश होय मिचमिचीत पाण्याच्या खुराकानें आटीव दुधाची ताकद कशी येणार ? कुंभाराच्या गर्दभापासून शर्यतीच्या घोड्याची उत्पत्ति कोठें बोलली आहे ? निस्तेज भागवतधर्मापासून सतेज राष्ट्रधर्माच्या फळाची अपेक्षा करणारांना श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या शब्दांनी उत्तर दिलें पाहिजे. श्रीमंत म्हणतात, ‘ चुटक्यांनीं पोरें होतीं, तर स्त्रियांना पुरुषांची गरज राहाती ना. ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि ....................

# विभाग दुसरा : वाङ्मयविषयक लेख

१. महाराष्ट्राच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा व किंमत
२. काव्य : परमेश्वराचें आणि मानवाचें
३. काव्य आणि त्याचा प्रभाव
४. अनंतसुत त्र्यंबक
५. दासो दिगंबरकृत संतविजय

# महाराष्ट्राच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा आणि किंमत

आजच्या माझ्या व्याख्यानाच्या विषयाचें नांव दिलें, त्या वेळीं त्यांत वाङमयाच्या ऐवजीं 'सारस्वत' असा शब्द घातला होता. परंतु मी तो आतां वदलून 'वाङमयाचा दर्जा' असा विषय ठरवतों. जगाच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङमयाची किंमत काय तें सांगा, असें मला माझ्या एका स्नेह्यानें सुचविलें होतें. पण तें मीं साफ नाकारलें. पृथ्वीवरील इतर राष्ट्रांच्या पेठेंत आमच्या लिखाणाची किंमत काय किंवा दर्जा कोणता, हें ठरविण्याचें लाजिरवाणें काम करावें आणि मग पेठेंतली आपली किंमत आपल्या लोकांत आपल्याच तोंडानें सांगावी, याची मला मोठी शरम वाटते. हिंदुस्थानांत देखील आमच्या लिखाणाची किंमत काय किंवा योग्यता किती, याचीही चौकशी करण्याच्या भानगडींत आज मितीस पडण्याची सोय नाहीं. पंजाबांत आमचा वचक होता आणि सिंधुनदाच्या कांठीं मराठयांच्या डेरेराहुटचा पडत असत किंवा वंगाल्यांत शिवभटासारखीं माणसें वावरत होतीं, गुजराथेंत खंडण्या वसूल होत होत्या, खालीं तंजावरांत ग्रंथरचना सारखी चालू होती, म्हैसुरांत आणि श्रीरंगपट्टणांत हैदरनाईक व टिपू सुलतान कानानें रामायण-महाभारतासारख्या कथा ऐकत होते आणि छत्रपतींच्या पंतप्रधानाजवळ बिघाड होऊं नये म्हणून त्यांच्या सरदारांशीं तोंडानें केविलवाणे शब्द बोलत होते, तेव्हांची गोष्ट अगदीं निराळी होती. पण आज या काळांत आपल्या वाताहतीची कहाणी आपल्याच तोंडानें सांगत न बसतां आपल्या स्वतःच्या राहात्या घरांत आपली किंमत काय आहे व योग्यता किती आहे, येवढेंच पाहूं म्हणजे झालें. मला वाटतें, इतक्यानेंच कळून येणारा आपला अपमान आपल्याला पुरा आहे.

भाषेसंबंधानें बोलतांना शब्दांच्या व्याख्या करून त्यांच्या बंधनानें आपण व्याख्यान करावें, हा विद्वानांचा मार्ग फार उत्तम आहे. परंतु मला तो निरुपयोगी आहे. कारण 'काव्य', 'कवि', 'सारस्वत', 'वाङमय' या शब्दांच्या, लहानांनीं आणि


थोरांनीं आजपर्यंत अनेक व्याख्या केल्या आहेत. परंतु त्यांपैकीं प्रत्येकींत कांहीं ना कांहींतरी व्यंग आहेच. तेव्हां त्यांतून व्याख्या निवडण्याच्या उठाठेवींत न पडतां आजच्या व्याख्यानापुरेशा सारस्वत आणि वाङमय ह्या दोन्ही शब्दांच्या व्याख्या करून घेतों म्हणजे झालें.

वाङमय म्हणजे त्यांत जें जें बोललें गेलें किंवा लिहिलें गेलें तें सर्व आलें. सारस्वत म्हटलें म्हणजे भाषेंतील लिखाणांत ज्या ज्यापासून रसोत्पादन होईल, जें जें कांहीं जनतेचें मन आकर्षण करूं शकेल, त्या सर्वांचा समावेश होईल. शून्यलब्धीपर्यंतचे गणित विषयांतले ग्रंथ आणि लीलावतीसारखे ग्रंथ गणितज्ञाचें मन वेळेस आकर्षण करतील. सारण्यांसारखे ग्रंथ ज्योतिष्याच्या मनांत रस उत्पन्न करतील. फार काय शकुनवंत्या आणि पंचांगें हीं जोशीबुवांच्या मनाला आनंदाच्या उकळ्या आणतील. पण यांना भाषेंतील ' सारस्वत ' असें आपण म्हणणार नाहीं. आगगाडीचें वेळापत्रक हें उतारूंना फार सोयिस्कर व आनंददायक वाटेल, पण तें ' सारस्वत ' खास नव्हे. मी आपल्या ' महाराष्ट्र-सारस्वत ' ग्रंथांत दिलेली सारस्वताची व्याख्या आणि आजच्या ह्या निबंधापुरती मीं बनवून घेतलेली आजची ही व्याख्या या दोहोंत फरक आहे, हें मी जाणतों. यांतली कोणती खरी, याची विचक्षणा न करतां आजच्या कामापुरती आजची ही व्याख्या खरी, असें मी ठरवतों. सारस्वताची ही अशी व्याख्या केल्यावर वाङमयाचीही व्याख्या करून घेणें अवश्य आहे. म्हणजे वाङमयाच्या पोटांत सारस्वत येतें. म्हणजे याचाच अर्थ असा कीं, सारस्वत हें आंतले कडें कल्पिलें म्हणजे सर्व तऱ्हेचें लिखाण, बोलणें किंवा इतर तऱ्हेचें विचारप्रदर्शन या सर्वांचा समावेश वाङमयांत होतो.

महाराष्ट्र-वाङमय हें तोंडीं व लेखी अशा दोन्ही प्रकारचें आहे. कहाण्या, पोवाडे, उखाणे, झोपाळ्यावरचीं गाणीं, मुलांचीं खेळवणीं, पाळण्यांतलीं गाणीं, हातगे, म्हणी, वगैरे अनेक प्रकारचें सतेज वाङमय शके १००० पासून आजपर्यंत तोंडी म्हटलें जात आहे. तें किंवा त्यापैकीं निदान मोठा भाग केव्हांही लेखनिविष्ट झाला नाहीं. त्यापैकीं बराचसा भाग आतां तर जवळ जवळ लुप्त झाला आहे. म्हणजे आतां तो लेखनिविष्ट होण्याची आशाही राहिली नाहीं.

वाङमयाच्या लेखी भागाचे साधारणपणें दोन विभाग करतां येतील : ऐहिक व पारलौकिक. पारलौकिक विभागांत जादूटोण्यापासून ज्योतिषापलीकडे जाऊन वेदांतापर्यंत सर्व विषयांवरील ग्रंथ येतील. याच भागानें महाराष्ट्र-वाङमयाचा बराच प्रांत व्यापला आहे. याचें कारण उघड आहे कीं, महाराष्ट्राचें मन व डोळे पृथ्वीपेक्षां स्वर्गाकडे नेहमींच जास्त वेधेलेले असतात. ऐहिक भागांत ( १ ) शास्त्र, ( २ ) कला, ( ३ ) ज्ञान, ( ४ ) रस या ग्रंथांचा समावेश होतो. यापैकीं, शास्त्रीय विषयावरील आणि कलाकौशल्यावरील ग्रंथ अत्यंत थोडे आहेत, हें आपणांस माहीत आहेच. ज्ञानवर्धक ग्रंथ किंचित् जास्त आहेत. पण ते बालोपयोगी किंवा फार तर शालोपयोगी

पडतील इतक्याच दर्जाचे आहेत. रसोत्पादकांमध्यें पौराणिक व काल्पनिक असे दोन तऱ्हेचे ग्रंथ आहेत. काल्पनिक ग्रंथांत वीररसात्मक आणि शृंगारात्मक असे दोन प्रकार आहेत. वीररसात्मकांत पोवाडे वगैरेंचा समावेश होईल. शृंगारिक ग्रंथांत कांहीं ऐतिहासिक, कांहीं काल्पनिक आहेत. बहुतेक लावण्या आणि विचकट सवाल हे याच भागांत येतील. हे वर पाडलेले विभाग नीट समजतां यावे, म्हणून यांचा पट काढून दाखवतों.[1]




या वर दिलेल्या तक्त्यावरून कूपखनन, अश्वपरीक्षा, लीलावती, गजपरीक्षा वगैरे कलिक ग्रंथ, तसेंच नारायणशिक्षा, पंचीकरण वगैरे बालोपयोगी ग्रंथ हे सर्व वाङ्मयांत येतात आणि भारती कथा, पौराणिक चरित्रें वगैरे ग्रंथ, ज्यांना वरील व्याख्येनें सारस्वत म्हणतां येईल, अशा ग्रंथांचाही वाङ्मयांत समावेश होतो. तेव्हां वाङ्मयाबद्दल संकीर्तन करावयाचें त्यानें या सर्वांचा परामर्ष घेतला पाहिजे. आणि या सर्वांचा विचार मनांत आणून आपलीं विधानें केलीं पाहिजेत.

महाराष्ट्र-वाङ्मय निःसंशय हजार वर्षांपूर्वीचें आहे, याबद्दल आतां कोणालाही भ्रांति वाटण्याचें कारण नाहीं. पण अकराशेंपासून अठराशें सत्तेचाळीसपर्यंत त्याचा पत्ता आपल्याला आतां पुष्कळच लागला आहे. अनुपलब्ध असून छापलें गेलें नाहीं असें

१. मूळ हस्तलिखितांत तक्त्यासाठी कोरी जागा सोडली आहे. तक्ता संपादकाचा.

वाङमय सोडून दिलें, तर आजपर्यंत छापलें गेलेलें वाङमय किती आहे, याचा ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि पुस्तकविक्रयांच्या जाहिराती यांजवरून निश्चयात्मक आंकडा ठरवतां येतो. आजपर्यंत छापून झालेल्या सर्व ग्रंथांची संख्या सात हजारांच्या आंत आहे. या आंकडयांत डिकमेरी दादा, रेशमी रुमाल, छेलवटाऊ, मोहनाराणीचा फार्स, राघोजी भांगऱ्याचा पोवाडा वगैरेसारख्या सटर-फटर पुस्तकांचाही समावेश होतो. किंवहुना या आंकडयांतील एक-तृतीयांश भाग अशाच पाचकळ आणि किरकोळ चोपडयांनीं व्यापला आहे. ज्याला ग्रंथ किंवा पुस्तक म्हणतां येईल, अशांचा आंकडा पांच हजारांवर नाहीं. ही काय ती मराठी भाषेंतील ग्रंथसंपत्ति होय. आणि आजपर्यंत धडपड करून, आपल्या जिवाचे हाल हाल करून या सर्वांचा समावेश करणाऱ्या खासगी किंवा सार्वजनिक अशा पुऱ्या तीन संस्थाही हयात नाहींत. किमतीच्या दृष्टीनें या सर्वांमिळून किंमत सात-आठ हजार रुपयांपर्यंत जेमतेम आहे. आणि इतके हे ग्रंथ एके ठिकाणीं ठेवण्यासाठीं नाटकें-व्याख्यानें करून मिळवलेले पैसे, थोरामोठयांच्या गळयांत माळा घालून, पायांवर लोळण घेऊन, तोंडें वेंगाडून मिळवलेल्या वर्गण्या आणि मनापासून लोकांनीं दिलेलें द्रव्यसहाय्य हीं सर्व मिळून अजून एकही चांगलें गृह निर्माण केलें गेलें नाहीं. आणि इतकेसे ग्रंथ ठेवण्यासाठीं जें केलें गेलें, त्याची वेळींअवेळीं आम्ही इतकी फुशारकी मारतों, अशी वडेजाव करतों आणि शेवटी बोंबाबोंब उडवून देतों कीं, जणूं खडर्याची लढाईच आम्हीं जिंकली आहे. आतां या ग्रंथांचें मोल पाहूं गेलें, तर त्यांतही इतर देशांत जाऊन फुशारकी मारण्यासारखें विशेष असें कांहीं नाहीं, असेंच आढळून येईल. आम्ही जित आणि ते जेते, म्हणून इंग्रज लोक आमच्याकडे तुच्छतेनें पाहातात व आपल्या मालाची किंमत कमी लेखतात, हें एक वेळ खरें असलें, तरी देखील ज्यांचा आमचा असा संबंध नाहीं, त्या देशांतील लोकांनीं मोठी वाहवा करून ज्याचें आपल्या भाषांत भाषांतर केलें आहे. असा एकही ग्रंथ गेल्या पांचसातशें वर्षांत महाराष्ट्रानें आपल्या भाषेंत निर्माण केला नाहीं.

आम्ही वेदांताच्या आणि ज्योतिषाच्या बाता झोंकतों, परंतु कोणाही मराठ्यानें मराठी भाषेंत वेदांत, ज्योतिष वगैरे विषयांसारख्या विषयांवर लिहिलेल्या ग्रंथाचें कोणत्याही स्वतंत्र देशानें भाषांतर करून त्यास आपल्या ग्रंथसंग्रहालयांत उच्च स्थान दिलें असल्याचें अजून ऐकिवांत नाहीं. आम्ही मोठे राजकारणी आहों आणि आमचें खोल राजकारण अगदीं बिनतोड आहे, अशी आम्ही कितीही बगबग केली, तरी आमच्यांतील कोणीही राजकारणी पुरुषानें राजकारणावर असा एकही ग्रंथ निर्माण केला नाहीं कीं, राजकारणी विद्यार्थ्यांनीं त्याचें स्वभाषांत भाषांतर करून अभ्यास व चिंतन करावें. आणि हीच गोष्ट मोठया गूढ विषयांपासून तों नाटक-कादंबऱ्यांपर्यंतही अशीच दिसून येईल. पोटभरू ग्रंथकार, शाळेंतील पोरांसाठीं आणि

इतर वाचकांसाठीं ग्रंथ लिहिणारे धंदेवाईक लोक आणि ज्ञानार्जन व अध्यापन करण्यांत ज्यांची सवंध हयात खर्च होत आहे अशीं मास्तरें यांची गोष्ट सोडून दिली, तरी इतर शिष्टांचीही ग्रंथ-लेखनाची कथा अशाच मासल्याची आहे. परकीयांनीं मांडून दिलेल्या अधिकाराच्या सिंहासनावर बसून आपल्या उसन्या जोरावर ज्यांनीं सिंहाच्या गर्जना केल्या आणि त्यांना त्यांच्यासमोरील मतलबी द्विपादांनीं माना तुकवल्या, अशांना आपण कोणीतरी मोठे अद्वितीय पुरुष आहों असा भास होऊन, ते ग्रंथरचनेच्या खटाटोपांत पडल्याचीं उदाहरणें आपल्याकडे आहेत. व सरकारनें आतां कुचकामाचें ठरवून पेन्सिल दिल्यावर आपण मोठा चमत्कार करून दाखवूं अशा प्रौढीनें लेखनव्यवसायाला चिकटून धरणारीं रावबाहदुरेंही अधून मधून आढळतात. त्यांचें हें करणें थोडेंसें कौतुकास्पद आहे, यांत संशय नाहीं; परंतु त्यांच्या हातून निर्माण होणारे ग्रंथांची किंमत मात्र फारशी मोठी आढळत नाहीं. अशांपैकीं एकानेंही आपल्या बुद्धीच्या जोरावर असा एकही ग्रंथ निर्माण केला नाहीं की, ज्याचें इतर भाषांनीं भाषांतर करावें, किंवा त्यांच्या परिचयाच्या पलीकडील लोकांनीं ज्याचा सतत अभ्यास करावा. त्यांचे ग्रंथ वाचले-ऐकले म्हणजे त्यांच्या त्या सिंहाच्या गर्जना जाऊन आतां कुत्र्याच्या पिलांच्या केंकवण्याचा आवाज मात्र कानीं येतो.

महाराष्ट्र-समाज हा दुभाषी आहे. उच्च विचारांचें व उच्च सिद्धांतांचें भाषेच्या द्वारें ग्रंथ लिहून प्रदर्शन करणें तर तें तो प्राय: संस्कृत भाषेच्या द्वारें करतो. परंतु कांहीं थोडचाफार उच्च विचारांचें प्रदर्शन साधारण प्रतीच्या लोकांकरितां करणें असेल, तर तें अगदी सोप्या संस्कृतांत किंवा एखादे वेळेस मराठी भाषेच्या द्वारेंही तो करतो. परंतु साधारण लोक तसेंच शूद्रवर्ग आणि उच्च वर्गांच्या स्त्रिया आणि लहान मुलें यांच्याकरितां ग्रंथ लिहिण्याची वेळ येते तेव्हां महाराष्ट्र-ग्रंथकार संस्कृत भाषेला फाटा देऊन निव्वळ मराठीमध्यें आपले ग्रंथ लिहितो. व अशा ग्रंथांनाच महाराष्ट्र-ग्रंथ ही संज्ञा योग्य आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रंथरचनेचे दोन प्रकार आहेत. एक महाराष्ट्रीय ग्रंथ व दुसरा महाराष्ट्र ऊर्फ मराठी ग्रंथ. महाराष्ट्रीय ग्रंथांत संस्कृत ग्रंथांचा समावेश होऊं शकतो, पण महाराष्ट्र ऊर्फ मराठी ग्रंथांत निव्वळ मराठी भाषेंतलेच ग्रंथ येऊं शकतात. याचप्रमाणें महाराष्ट्र-वाङ्मय म्हणजे मराठी भाषेंत निर्माण झालेलें वाङ्मय, असा बोध स्पष्ट झाला.

महाराष्ट्र-वाङ्मयाचे कालानुरोधानें तीन विभाग पाडतां येतील : शके तेराशें म्हणजे मुसलमानांशीं संबंध येण्यापूर्वीचें, असा पहिला विभाग; शके तेराशेंपासून सतराशेंपर्यंतचा म्हणजे इंग्रजी अंमलाची छाया पूर्णपणें पडण्यापूर्वीचा असा दुसरा विभाग व सतराशें चाळीसपासून आजपर्यंतच्या गेल्या शंभर वर्षांचा असा हा तिसरा विभाग. यांपैकीं पहिल्या दोन भागांतले ग्रंथांपैकीं कांहीं स्वतंत्र व कांहीं संस्कृततंत्र असे दोन प्रकारचे ग्रंथ आहेत. दुसऱ्या भागांत फारशीतंत्र ग्रंथ निर्माण

होणें सहाजिक होतें. पण तसे ग्रंथ महाराष्ट्रांत निर्माण झालेले दिसत नाहींत. शपथे-पासून मोकळे राहण्यापुरते कांहीं दहापांच ग्रंथ आहेत. पण ते अगदींच किरकोळ असून एकंदर विचारांत जमेस धरण्यासारखे नाहींत. ही वाब थोडीशी विचार करण्यासारखी आहे. पारमार्थिक विचाराला महाराष्ट्राचें मन फार हळुवार आहे. व संस्कृत भाषा, ही देवभाषा समजून त्यासंबंधें ग्रंथरचनेंत ते त्याच म्हणजे संस्कृत भाषेंत रचले जात. आपले ग्रंथ ईश्वरप्रणीत आहेत, असा आव घालण्यासाठीं जोतिष, किंवा व्यवहारादि ग्रंथ, व्रतें-वैकल्यांच्या कथा यांनाही संस्कृत भाषेचाच उपयोग करण्याकडे महाराष्ट्राची प्रवृत्ति दिसते. केवळ विशेष शिष्टाईसाठीं म्हणून देखील लीलावतीसारख्या ग्रंथांत संस्कृताची कास धरल्याचें दिसून येतें. संस्कृत ग्रंथरचनेचें हेंही एक महत्त्वाचें कारण आहे. परंतु असली ग्रंथरचना सोडून दिली, तर रसोत्पादक, चित्ताकर्षक आणि शृंगारिक रचना दुसऱ्या भागाच्या अवधींत म्हणजे सुमारें पांचशें वर्षांत महाराष्ट्रानें कां केली नाहीं, याचा उलगडा नीटसा होत नाहीं. ' शशिसेना ' काव्यासारखें अगदीं एखादेंच काव्य किंवा पोवाडे, लावण्या, फटके वगैरे कीं, ज्यांची रचना प्राय: असंस्कृतज्ञ लोकांसाठींच केली गेली, असे ग्रंथ मराठींत आहेत, येवढयाच वावीनें वरील कोडयाचा उलगडा नीटसा होत नाहीं. उत्तम कादंबऱ्या किंवा नाटकें हीं तर मराठींत केलीं गेलीं नाहींतच, पण संस्कृतांतील अशा ग्रंथांचीं भाषांतरेंही महाराष्ट्रानें केलीं नाहींत. वाणभट्टाची कादंबरी, कालिदासाचें शाकुंतल, भवभूतीचें उत्तररामचरित वगैरेसारखे ग्रंथ महाराष्ट्रांत हमेशा वाचले जात, पण त्यांचें नीटसें भाषांतर कोणीही मराठींत केलेलें दिसत नाहीं. पेशवाईच्या उत्तरकालांत दशावतारी खेळ, ललितें वगैरेंचे प्रयोग होत. परंतु या वेळींही संस्कृतांतील नाटकांचीं भाषांतरें करून त्यांचे प्रयोग करावे, हें महाराष्ट्रांत घडलें नाहीं. नाटकांचे प्रयोग करण्याचे विचारही किंवा कल्पनाही महाराष्ट्राला नव्हती, असें म्हणतां येत नाहीं. मोरोपंतांच्या भागवतांतील आर्या वाचल्या म्हणजे आजचीं नाटकेंच पंतांच्या डोळ्यांपुढें असावीं, असा भास होतो.

संस्कृताप्रमाणेंच फारशी भाषेंतलेही उत्तम पंडित त्या अवधींत महाराष्ट्रांत होते. उत्तम फारशी लेखकानें तोंडांत वोट घालावें, अशा तऱ्हेची भाषा हे विद्वान् लिहूं शकत. परंतु फर्दुसीसारख्या फारशी कवींच्या ग्रंथांचीं भाषांतरें यांनीं केलेलीं दिसत नाहींत. ' अरवी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी ' या ग्रंथाचें भाषांतर किंवा त्याच्या अनुरोधानें त्यांत सांगितलेल्या कथा देखील महाराष्ट्रांत लिहिल्या गेलेल्या दिसत नाहींत, याचें तर फारच आश्चर्य वाटतें. म्हणजे महाराष्ट्र-ग्रंथकार किंवा त्यांचे ग्रंथ फारशीतंत्र झाले नाहींत, असा निष्कर्ष स्पष्ट दिसतो व महंमदी राज्यकर्त्यांची छाप महाराष्ट्राच्या इतर वावींवर कितीही पडली असली, तरी महाराष्ट्रग्रंथकारांवर आणि त्यांच्या ग्रंथरचनेवर ती विलकुल पडलेली दिसत नाहीं. तिसऱ्या विभागांत म्हणजे १७४० पासून गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्राचे ग्रंथ संस्कृत-तंत्र, इंग्रजी-तंत्र,

व क्वचित् महंमदी-तंत्र असे झाले. म्हणजे या तिन्ही विभागांत संस्कृताची पकड महाराष्ट्रानें सोडलेली दिसत नाहीं. भारत-रामायणांतील कथांचे गोपवारे आणि त्यांचीं शब्दशः भाषांतरें, तसेंच शाकुंतलादि नाटकांचीं निरनिराळीं शब्दशः भाषांतरें, वेद-उपनिषदादि ग्रंथांचीं भाषांतरें इत्यादि प्रचार महाराष्ट्रांत आजमितीला सडकून चालू आहेत व दिवसांदिवस हा ओघ असाच वाढत जाऊन संस्कृतांतलें बहुतेक भांडार मराठींत थोडेफार वर्षांत उतरलें जाईल, असा भरवंसा वाटतो. संस्कृताप्रमाणेंच किंवा त्यापेक्षांही जास्त प्रमाणांत इंग्रजीचीं भाषांतरें करण्याचा प्रघात महाराष्ट्रांत सर्रास सुरू झाला आहे. भाषांतरापलीकडे जाऊन स्वतंत्र रचनेच्या कल्पनेकडे पाहिलें, तर संस्कृत लेखकांपेक्षां इंग्रजी लेखकांचीच छाप महाराष्ट्र-ग्रंथकारांच्या मनावर अत्यंत पडलेली दिसते. एक नुसती नाटकांचीच बाब घेतली, तर असें दिसून येईल कीं, संस्कृत ग्रंथकारांनीं नाटकासंबंधें घालून दिलेले सर्व दंडक व बांधलेले सर्व नियम अलीकडील ग्रंथकारांनीं पार झुगारून दिले आहेत. नुसती भाषा देखील संस्कृताच्या धर्तीवर न लिहितां इंग्रजी ग्रंथकारांच्या मुशींत ओतून काढलेली दिसते. इंग्रजींतून देखील वरच्या दर्जाच्या शास्त्रीय ग्रंथांचें किंवा इतर उत्तम लेखांचें भाषांतर करण्यास हात न घालतां इंग्रजी ग्रंथांचें भाषांतर करणें यांतच एक मोठी प्रौढी कल्पून वाटेल त्या सटरफटर ग्रंथांचीं भाषांतरें होत चाललीं आहेत. नवीन ग्रंथ निर्माण करणें आणि निव्वळ भाषांतरें करणें या दोन दर्जांतला मोठा थोरला फरक मनांतून साफ निघून गेल्यामुळें वाटेल त्या भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरें महाराष्ट्र-लोक करूं लागले आहेत. म्यां मराठ्यानें आणि गुजराथसारख्या शामळभटी पोषाख करावा, हें महाराष्ट्राच्या मनाला गैर वाटतें. परंतु गुजराथी ग्रंथांचीं भाषांतरें मराठा मनुष्य हौशीनें करतो. बंगाली ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची हौस तर अगदीं अनिवार झालेली दिसते. आपण केलेल्या किती ग्रंथांचीं भाषांतरें बंगाल्यांनीं केलीं आहेत आणि बंगाली ग्रंथकर्त्यांनीं केलेल्या किती ग्रंथांचीं भाषांतरें करण्यांत आपण आपला काळ खर्चीं घातला आहे, यांचे दोन आंकडे दोन डोळ्यांसमोर ठेवले असतां या धंदेवाईक भाषांतरकर्त्यांच्या मनांत कांहीं निराळा प्रकाश पडेल, अशी उमेद वाटते. कोणत्याही भाषेंतील ग्रंथ पाहून ते पचनीं पाडून, पार जिरवून टाकून त्या धर्तीवर कां होईना, पण त्यांच्यापेक्षां सवाई ग्रंथ निर्माण करणें ही गोष्ट अगदीं निराळी. दुसऱ्याच्या ग्रंथांचें भाषांतर करणें म्हणजे एक तऱ्हेनें त्याची शागीर्द पतकरणें आहे, त्याची गुलामगिरी कबूल करणें आहे, हें या पोटभरूंस नीटसें समजलेलें दिसत नाहीं.

आपल्याकडे इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर मराठी ग्रंथांना एक नवें वळण लागलें. ग्रंथकर्तृत्व व विद्याप्रसार यांची बहुतेक जबाबदारी इंग्रज सरकारनें आपल्या अंगावर घेतली. ही जबाबदारी घेण्यांत आपल्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार हिंदुस्थानांत व्हावा आणि आपल्या राज्याची छाप महाराष्ट्राच्या मनावर उत्तम प्रकारें पडावी, हे दोन

हेतु मुख्य होते; आणि हे दोन्ही हेतु साधण्यासाठीं मराठी ग्रंथकर्तृत्वास इंग्रजी राज्यकर्त्यांनीं अतिशय मदत केली.

मराठी भाषेंतील बहुतेक सर्व जुने ग्रंथकार आपण मराठी भाषेंत रचना कां करतो, याचें निरसन करून त्याचीं कारणें आपल्या ग्रंथांत देतात. यावरूनच मराठी भाषा कमी दर्जाची आहे व त्यांत रचण्यांत कमीपणा आहे असा त्यांचा ग्रह होता, हें उघड आहे. काशीनाथबुवा पाध्ये, काशीनाथशास्त्री थत्ते हे तर मराठीचें नांवही काढीत नसत. चिंतामणराव आप्पा सांगलीकर हे कीर्तनास येत नसत, पण रामजोशांनीं त्यांना माडीवरून खालती उतरविलें व कीर्तन ऐकविलें, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. वर सांगितलेल्या कालानुरोधानें केलेल्या तीन विभागांतील दुसऱ्या भागांत मराठी वाङ्मयाबद्दल काय अभिप्राय होता व मराठी म्हटली म्हणजे त्यांच्या कपाळाला कशा आठ्या पडत, हें प्रसिद्धच आहे. घगवे शास्त्री, काशिनाथ बापू छत्ते, बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर, बाळकृष्णशास्त्री सोहोनी, माधवशास्त्री कोल्हटकर, विष्णुशास्त्री फडके, नाना पुराणिक वगैरे मंडळी अव्वल इंग्रजींत होऊन गेली. यांनीं माउन्ट स्टयूअर्ट एल्फिन्स्टन, कर्नल जार्व्हिस, मेजर कँडी, कॅप्टन कूपर वगैरे साहेबलोकांच्या उत्तेजनांत व कांहींसें पैशाच्या लालचीनें मराठी वाङ्मयास मदत केली, ही गोष्ट निराळी. बाकी या भाषेसंबंधीं त्यांचें काय मत होतें, हें त्यांच्या ग्रंथांतील अधून मधून आढळणाऱ्या विचारांवरून दृष्टीस येतें. यांपैकीं बहुतेक सर्वांचे अभिप्राय देण्यास आज अवकाश असता, तर बरें होतें. पण तितकी सवड नसल्यामुळें यांपैकीं एकदोघांचाच अभिप्राय देतों. बाळशास्त्री जांभेकर हे काशीनाथ बापू छत्र्यांचे शिष्य होते. काशीनाथशास्त्री बापू छत्र्यांचा अभिप्राय दिला म्हणजे त्यांत या दोघां गुरुशिष्यांचा अभिप्राय आलाच. 'बाळमित्रा'च्या पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत छत्रेशास्त्री म्हणतात : "ज्या भाषेस आज दिवसपर्यंत व्याकरण, कोश कोणी केलेच नाहींत, जींत विद्वान् लोकांचें चित्त रमलेंच नाहीं, जींत शब्दसंग्रह थोडा, जिची बोलायची शैली प्रौढ नव्हे," अशा मराठी भाषेंत रस उत्पन्न कसा होणार ? याच्याच खालीं कॅप्टन ॲर्थर वेलस्लीचा अभिप्राय देतों. म्हणजे दोघांची तुलना करण्यास सहज सांपडेल. "It (Marathi) must possess powerful recomendations in the transaction of business with the Hindus from its copiousness, from its colloquial use, and from its analogy to their sacred writings."

तेव्हां भरभक्कम मुशाहिरा घेऊन मराठी वाङ्मयाच्या परिशीलनांत काळ घालविणाऱ्या या पंडितमंडळाच्या मराठी वाङ्मयावरील खऱ्या प्रेमाबद्दल थोडासा संशय वाटूं लागतो. त्या वेळचे हे प्रोफेसर हल्लींच्या अध्यापकांपेक्षां कांहीं विशेष दर्जाचे होते, असें वाटत नाहीं. कोणी केळकर या नांवाच्या प्रोफेसरांनीं 'गद्यविलास' व 'पद्यविलास' अशी दोन चोपडीं प्रसिद्ध केलीं आहेत. तीं हल्लीं शाळेंतल्या मुलांना

पढवलीं जातात. याच दोन्ही पुस्तकांतली एकेक गंमत देतों. या राजश्रींनीं आपल्या ग्रंथांत नागेशराव वापटांचें चरित्र व उतारा दिला आहे. या चरित्रांत हे पुरफेसर म्हणतात : " नागेशराव वापटांनीं ' चितुरगडचा वेढा ', ' छत्रपती संभाजी महाराज ', ' राजगुरु दादोजी कोंडदेव व छत्रपति शिवाजी महाराज ' हीं पुस्तकें लिहिलीं आहेत, अशी माहिती मिळते. पानपतच्या मोहिमेवर त्यांनीं एक चांगलें पुस्तक लिहिलें आहे, असें मला आठवतें. " ' पानपतच्या मोहिमे 'एवढी मोठी ऐतिहासिक कादंबरी रा. केळकरांना नुसती फुसकट आठवते, हें एक भाग्यच म्हणावयाचें. बाकी ' छत्रपति संभाजी महाराज ' व ' राजगुरु दादोजी कोंडदेव ' या पुस्तकांची तर त्यांना केवळ ऐकीव माहिती आहे. तीं यांनीं वाचलीं तर नाहींतच, पण पाहिलीं देखील नाहींत. मराठी भाषेंतल्या सबंध ग्रंथसंग्रहांत ' छत्रपति संभाजी ' आणि ' राजगुरु दादोजी कोंडदेव व छत्रपति शिवाजी महाराज ' या दोन्ही पुस्तकांतील मराठी भाषेची ज्यांच्याशीं तुलना करतां येईल, अशीं पुस्तकें हाताच्या बोटांइतकींही नाहींत. प्रोफेसरमजकुरांना मी नम्रपणें असें कळवतों कीं, वरीलपैकीं दुसऱ्या पुस्तकांत दादोजी कोंडदेवाच्या तोंडांत घातलेला गोड उपदेश त्यांनीं स्वतः वाचावा व आपल्या छात्रवर्गाकडून नित्यशः वाचवावा असा तो विनमोल आहे. हीं दोन्ही पुस्तकें मुंबईंतल्या हमरस्त्यावरील अत्यंत प्रसिद्ध अशा निर्णयसागर छापखान्यांत छापलेलीं असून तीं त्यांना कोठेंही मिळतील. यांच्या ' पद्यविलासां 'त अशाच गमती आहेत. ज्ञानेश्वरांच्या चरित्रांत अमृतानुभवाचें नांव नाहीं. वामन पंडितांविषयीं लिहितांना हे म्हणतात, " पंडित हे चांगले व्युत्पन्न होते . . . पण रसिकपणा मूळचा अंगांत असल्याशिवाय नुसती विद्वत्ता काव्याला उपयोगी पडत नाहीं. " परशरामपंत गोडबोल्यांच्या चरित्रांत हे म्हणतात, " मराठींत छंद, वृत्तें याविषयीं माहिती देणारें ' वृत्तदर्पण ' नांवाचें उत्तम पुस्तक त्यांनीं लिहिलें आहे. " म्हणजे गरुडांची ' छंदोमंजरी ' केळकरांच्या अवलोकनांत आलीच नाहीं असें दिसतें. सदरहू गरुडांची कृति इतकी अद्वितीय आहे कीं, मराठींत तर तिला तोड नाहींच, पण संस्कृत विद्वानांनीही ती वाचून आपली मान खालींच घातली पाहिजे. केळकरांना हा ग्रंथ त्यांच्याच गांवांत चित्रशाळेंत सहज मिळेल. यांच्यासारखे दुसरे अध्यापक घटनाकार जोशी. त्यांच्या ग्रंथांत काय विचित्र प्रकार भरले आहेत, हें तेथें कोणासही पाहावयास मिळेल. यांनीं मराठी वाङमयासंबंधानें आजन्म दांडगा व्यवसाय केलेला आहे व अजूनही त्या वाङमयावरील त्यांचे परिश्रम अव्याहत चालू आहेत. पण अजून यांना रघुनाथ पंडितांचा काळ बरोबर कळत नाहीं. महीपति हा संतकवि नसून त्या वेळचा सुखवस्तु गृहस्थ होता, असें यांना वाटत आहे. श्रीधरानें मुक्तेश्वरी भारताची आपल्या पांडवप्रतापांत केवळ नक्कल केली आहे, याची वार्ताही नाहीं. रामदासाबद्दल तर हे म्हणतात कीं, दासबोधाचे पहिले सात दशक कांहीं बरे आहेत आणि ते रामदासाचे असतील, असा यांना उडत संशय वाटतो. पण पुढील दशकांबद्दल

मात्र यांची खात्री आहे. ते म्हणतात, " दासबोध हा समग्र ग्रंथ रामदासाचा नसून तो त्याच्या शिष्यमंडळीनें पाहिजे तसा लांबवला आहे. " वामनाच्या कवितेंत विसंगतता, अप्रयोजकता, ग्राम्यता, च्युतसंस्कृति, अश्लीलता, बीभत्सपणा, पूर्वापार असंबद्धता, न्यूनपदत्व, छंदोभंग, यतिभंग, इत्यादि दोष ठिकठिकाणीं पुष्कळ आढळतात. धंदेवाईक छापखानेवाल्यांनीं सांपडल्या त्या प्रतींवरून छापलेले वामनी ग्रंथ वाचण्यापलीकडे जोशीबुवा गेले नाहींत. उत्तम लेखकांनीं लिहिलेल्या वामनाच्या पोथ्या यांनीं पाहिलेल्या दिसत नाहींत. धंदेवाईक छापखानेवाले जुने मराठी ग्रंथ कसे छापीत, याचें एक उदाहरण येथें देतों. निर्णयसागरांतील बहुतेक सबंध काव्यसंग्रह हा सर्वसंग्रह आणि इतर छापील मराठी काव्यग्रंथ हे पुढें ठेवून छापला आहे. वामनी ग्रंथ छापीत असतां वामनाच्या ग्रंथांच्या कांहीं पोथ्या व यथार्थदीपिकेच्या दोन-तीन सुंदर प्रती वाईच्या आसपास व इतरत्र मिळालेल्या सदरहू संपादकाकडे आमचे एक स्नेही घेऊन गेले होते, तेव्हां त्या पोथ्यांच्या रुमालाची गांठही न सोडितां संपादक म्हणाले, " या हस्तलिखित ग्रंथांची नक्कल करा आणि मग ग्रंथ छापा, इतकी खटपट कशाला ? आमचेजवळ सर्वसंग्रह आहे त्यावरूनच आम्ही ठसे जुळवतों आणि हेंच बरें. " जोशीबवांच्या मतानें स्टीफन्सचें ख्रिस्तपुराण मात्र अत्युत्तम साधलें आहे. या संबंधानें जोशीबुवा म्हणतात, " ख्रिस्तपुराण हें स्टीफन्स यानें शास्त्र्यांकडून लिहून त्यावर आपलें नांव घातलें असावें, असें कोणी कुत्सित बुद्धीनें म्हटलें आहे. " हें कोणी म्हटलें आहे, हें जोशीबुवांनीं सांगितलें नाहीं. पण मला वाटतें, ' महाराष्ट्र-सारस्वत ' नांवाच्या भिकार पुस्तकाच्या खाडीकांठ गांवढळ भिक्षुकानें हें असें कांहींसें म्हटलें आहे. ख्रिस्ती भिक्षुकाबद्दल आमच्या भिक्षुकाला असें वाटावें, हें थोडेंसें क्षम्य आहे. पण या भिक्षुकाचें असें वाटणें केवळ कुत्सितबुद्धीचें नसावें, असा माझा तर्क आहे. कारण याला कांहींसें प्रमाण आहे. ' बाळमित्रा 'च्या पहिल्या आवृत्तीच्या मलपृष्ठावर " हा ग्रंथ क्या. जार्व्हिस साहेबानें लिहिला, " असें म्हटलें आहे. ' बाळमित्रा 'च्या तोडीची भाषा गेल्या शंभर वर्षांत अजून एकालाही लिहितां आली नाहीं आणि तो ग्रंथ छत्रे यांनीं लिहिला, याबद्दल कोणास संशयही नाहीं. तरी देखील त्याच्या मलपृष्ठावर हा ग्रंथ जार्व्हिस साहेबांनीं लिहिला, असें खुशालपणें लिहिलें गेलें आहे. असेच इतरही कांहीं प्रकार आढळतील. रा. पेठे आणि ओक हे मिशनऱ्यांना पुस्तकें लिहून देत, असा प्रवाद अनेक वेळां ऐकूं येतो. तेव्हां स्टीफन्सची गोष्ट अशक्य कोटींतील नव्हे. असो. विषयांतर बरेंच झालें. मराठी भाषेंतले इंग्रजी अमदानींतील बरेच ग्रंथ केवळ कांहीं लालसेनें लिहिले आहेत, असें मी सांगत होतों आणि त्याला एक-दोन उदाहरणें दिलीं होतीं. शालोपयोगी व बालोपयोगी बहुतेक सर्व ग्रंथ याच कारणानें निष्पन्न झाले आहेत. बाम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी, डेक्कन ट्रान्सलेशन सोसायटी, दक्षिणा प्राईझ कमेटी वगैरेंच्या खैरातीवर डोळा ठेवून लिहिलेले ग्रंथांची परंपराही अशीच लागेल. यांपैकीं

एका कमेटीनें बालबोध ग्रंथास रु. ४०० व प्रौढ ग्रंथास रु. पांच हजारपर्यंत बक्षिस देऊं, अशी जाहिरात लाविली होती. सरकारनें प्रथम काव्यसंपादकास तुकारामाची गाथा प्रसिद्ध करण्याबद्दल अमुक हजार रुपयांची मंजुरी दिली होती, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पूर्वीपासून तो काव्यसंग्रहापर्यंतच्या मराठी पुस्तकांस एक इंग्रजी व एक मराठी अशीं दोन मलपृष्ठें लागत आणि त्यांपैकीं कित्येकांस एक इंग्रजी व एक मराठी अशा दोन प्रस्तावना देखील लागत, त्यांतलें इंगित हेंच आहे. हरि केशवजींचें यान्त्रिकक्रमण, बाळशास्त्र्यांचे गणितविषयक ग्रंथ, सोहोनींचें शारीरशास्त्र वगैरे ग्रंथांची मूळपीठिका वरप्रमाणेंच आहे. अजूनही हा प्रकार अगदींच मोडला आहे असें नाहीं. ग्रंथरचना करितांना स्वभाषा सोडून राज्यकर्त्यांच्या भाषेचा आश्रय विद्वान् लोक करितात, तेव्हां त्यांच्या मनांत असाच कांहीं हेतु असावा, असा संशय येतो. निदान त्यांच्या मनानें मराठी वाङ्मयाचा दर्जा महाराष्ट्रांतील ग्रंथरचनेकरतांही कमी दर्जाचा आहे, असें वाटत असावें असें दिसतें. रानडे आपला मराठ्यांच्या सत्तेच्या उत्कर्षाचा इतिहास इंग्लंड देशाच्या भाषेंत लिहितात. कुंटे आपला 'व्हिसिसिट्यूड्स्'-सारखा बहुमोल ग्रंथ परकीय भाषेंत रचितात, टिळक आपला 'आर्क्टिक होम' आणि 'ओरायन' इंग्रजी भाषेंत लिहितात. एतद्देशीय संस्थानिकांकडून हजारों रुपये घेऊन पारसनीस आपलीं उत्कृष्ट ऐतिहासिक चरित्रें इंग्रजी भाषेंत लिहितात, भांडारकर आपल्या ग्रंथाला भाषा इंग्रजी योजतात व बर्वे महादजी शिंद्यांचें चरित्र इंग्रजींत गातात, याची व्युत्पत्ति नीटशी लागत नाहीं. या विद्वानांना मराठी भाषा लिहितां येत नव्हती, असें मुळींच नाहीं. ( अपूर्ण )

# काव्य : परमेश्वराचें आणि मानवाचें

एकंदर मानवी व्यवसायाच्या मानानें या व्यवसायाची किंमत व साहित्याची किंमत काय व त्याची जागा कोणती, हेंही पाहिलें पाहिजे. या व्यवसायाची जागा उपयोगापेक्षां करमणुकीच्याच सदरांत पडेल, याविषयीं संशय नाहीं. सर्व दिवसभर वांकवून उपयोगांत आणलेलें धनुष्य जसें संध्याकाळीं दोरी सोडून लांब करून ठेवणें अवश्य आहे, तसेंच सारा दिवस कामकाज व रोजगारधंदा केल्यावर मनाला आल्हाद देऊन सर्व शक्तींचें मांद्य घालवून त्यांना प्रर्ज्वलित करण्यासाठीं सायंकाळीं काव्योदधींत स्वेच्छाचारानें थोडाफार यथेच्छ आहारविहार करणें अवश्य, योग्य व उपयोगी आहे. झालेला क्षीणभाग हरावा व पुन्हां नवीन द्विगुणित उमेद यावी, हा या मनोरंजन-वनस्पतीचा अजब गुण आहे.

पण केवळ आल्हाद या दृष्टीनें पाहतां, परमेश्वरानें आपल्या स्वहस्तानें लिहिलेलें हें सृष्टीचें उघडें पुस्तक वाचतांना जो आल्हाद होतो, तो कांहीं लोकोत्तर आहे. कांटेरी झाडांना कडू चीक नसावा; रुईसारख्या चिकाळ झाडाला कांटे नसावे; जनावराचें तोंड पोंचेइतक्या अंतरापर्यंत मात्र तीक्ष्ण कांटे यावे व झाड पुढें वाढलें म्हणजे कांटे कमी व मृदु होत जावे; फुलांचे आकार, रंग, त्यांवरील वारीकसारीक ठिपके यांचा भ्रमराच्या आवडीनिवडींशीं निकट संबंध असावा व त्या दोघांच्या निकट संबंधाचा दोघांसही उपयोग व्हावा; प्राण्यांना मधुर फळें देऊन त्यांकरवीं वृक्षवल्लींनीं आपलें काम अचानक करवून घ्यावें व सुवासानें मदांध बनून सारा काळ आपली कामगिरी करणाऱ्या भ्रमराला पोरीच्या नादीं वेडावलेल्या मूर्ख छंदिष्टाच्या येरझारा पाहून हांसणाऱ्या आईप्रमाणें लतावेलींनीं चेष्टवावें, आणि फुलझाडांनीं भ्रमराकडोन काबाडकष्ट करवून वर त्याला गालांतल्या गालांत हसत सुटावें; फुलपांखरांनीं बहुरूप्यासारखीं अनेक पर्णकीटकांचीं सोंगें घेऊन आपले कार्यभाग उरकीत राहावें, हें पाहून जो आनंद वाटतो, जो आल्हादाचा भर येतो, तो सर्व काव्यांच्या वाचनापेक्षां अनंत पटींनी अधिक आहे. खऱ्या अमृताची किंवा सुधारसाची चव घरांत बायकांनीं केलेल्या पंचामृतांत किंवा सुधारसांत जितपत उतरते, तितपतच परमेश्वराच्या

चैतन्यानें चेतना पावणाऱ्या या सजीव सृष्टिचमत्काराच्या माधुरीची चव कवींच्या कोरड्या शब्दचित्रांत अनुभवण्यास सांपडते.

याचा अर्थ काव्यांची मजा मी कमी मानतों असें नाहीं. त्यांत रम्यता आहे व तिची गोडी प्रत्येक पुरुषानें अवश्य चाखलीच पाहिजे. पण त्यांचा खरा उपयोग ज्यांना रानावनांतल्या सृष्टीचें ईश्वरप्रणीत काव्य वाचण्याची ताकद नाहीं, अशा माजघरांतल्या आणि माडीवरच्या स्त्रियांनाच जास्त होय. त्यांचा यथेच्छ उपयोग त्यांनींच करावा. तीं खरें पहातां त्यांच्याच पूर्ण मालकीचा विषय आहेत. त्यांनीं त्यांची नीट चव पाहून अधून मधून त्यांचा एखादा चपक पुरुषांस द्यावा व पुरुषांनींही त्यांचा आस्वाद स्वच्छ व प्रसन्न मनानें स्त्रियांच्या सह घ्यावा, हें फार योग्य आहे. पण हें इतकेंच. यापलिकडे काव्याचें स्तोम माजवूं देणें इष्ट नाहीं. जो पुरुष विश्रांतीचा वेळ काव्यचपकाच्या घुटक्यांत घालवतो, तोच काव्यरसाचा खरा भोक्ता व चाहता आहे. परंतु जो उद्योगाचा किंवा व्यवसायाचा काळ काव्य करण्यांत, वाचण्यांत किंवा शोधण्यांत घालवतो, तो ईश्वरानें दिलेल्या काळाचा दुरुपयोग करतो, यांत भ्रांत नाहीं. प्रजोत्पादनाच्या पवित्र कर्तव्यासाठीं रतिसुखाचा अनुभव घेणें हें पुण्यकर्म होय. परंतु त्याचा अव्हेर करणें हें महापाप होय; तसेंच तसेंच त्याच सुखांत निमग्न होण्याची लालसा धरणें किंवा वाजवीपेक्षां जास्त काळ त्याकडे लावणें हेंही शिक्षेस योग्य असें पाप होय. आणि तंतोतंत तोच प्रकार काव्यरंजनाचा आहे, असें समजावें.

आतां उपयोगाच्या व महत्त्वाच्या दृष्टीनें पाहतां या साहित्याची किंमत फारच अल्प आहे. कारण हें केवळ चैनीचें व रंजनाचें एक साधन आहे. आवश्यक गरजा संपवल्यावर, मग सुखाच्या आवाराकडे याचा प्रांत येतो. पूर्वीं एक काडी उगवत होती, तेथें आतां दोन काड्या उगवून दाखवणारा पुरुष, किंवा पूर्वीं कणसाला शंभर दाणे येत होते, तेथें आतां त्याच कणसाला एकशेंएक दाणे आणून देणारा इसम सर्वांत जास्त मोठा, जास्त उपकारी व जास्त सन्माननीय होय. सर्व कवींच्या वर त्याची जागा व सर्व काव्यांपेक्षां श्रेष्ठ अशी त्याची कृति समजावी. रसायनशास्त्राच्या एका लहानशा आपण बसवलेल्या प्रयोगाच्या सिद्धींत जी गम्मत आहे, ती उत्तम काव्यांच्या वाचनांत नाहीं. पेन्सलीच्या पेट्यांनीं आणि हातीं रेशीम गुंडाळलेल्या तारेनें लहानसें विद्युज्जनक यंत्र किंवा डायनेमो वेडावाकडा करून ठिणगी चमकतांना पाहिली म्हणजे मनाला जो आनंद होतो, तो काव्यांतल्या किंवा इतर कोणत्याही चकमकणाऱ्या निळ्या चांदणींत नाहीं. कवींचा कवि परमेश्वर आहे व काव्यांत काव्य सृष्टिकाव्य आहे. प्रत्येक पुरुषानें त्याची माधुरी चाखावी, म्हणजे इतर काव्यें त्याला फिकीं वाटतील. ती मुलींची भातुकली त्याला क्षणभर आनंद देईल; पण परमेश्वराच्या स्वदस्तुरच्या काव्यांत त्याचा आत्मा निरंतर सुख भोगील.

आतां महाराष्ट्र-काव्यांत एक विशिष्ट प्रकार किंवा गुण आहे, त्याचाही उल्लेख येथें केला पाहिजे. महाराष्ट्र-काव्यांपैकीं कांहीं भाग, किंबहुना बराच भाग मनुष्याचे मनास अवश्य ती विश्रांति देऊन पुन्हां द्विगुणित उद्योगांसाठीं तरतरीत करण्यापेक्षां त्याला मंदउत्साह किंवहुना कार्यपराङ्मुख करतो व त्याच्यांत चैतन्य आणण्यापेक्षां त्याला निर्माल्यवत् बनवतो. संतांचे अभंग व भक्तिपर कथानकें यांची गणना अशा काव्यांच्या यादींत मुख्यत्वानें होईल. आणि कांहीं तर अशीं आहेत कीं, भक्ति उत्पन्न करण्याकरतां योजलीं असून तीं काव्यें हास्यरस आणि क्षुद्र मनोरंजनास कारण होतात. सेन्याचा विठोबा मुसलमानांची स्मश्रु करतांना पाहून, चोख्याचा पंढरीनाथ ढोरें ओढतांना पाहून, सजण कसायाचा देव मांस जोखतांना पाहून, दामाजीचा दीनानाथ रसद भरतांना पाहून मनांत भक्ति उत्पन्न व्हावीं, हें खरें; निदान हा हेतु खरा; पण साध्या संसाऱ्या मनांत तसें कांहीं न होतां काव्याची, देवाची व भक्तीची व्यर्थ विटंबना केल्याबद्दल खंती मात्र उत्पन्न होते.

# काव्य आणि त्याचा प्रभाव

चांगलें काव्य आपणां सर्वांना मनापासून आवडतें. या आवडीचें एक कारण असें आहे कीं, तें आपल्या मनांत वेळोवेळीं येणाऱ्या कल्पनांना व विचारांना मूर्त स्वरूप देतें आणि त्या कल्पना व ते विचार यांपासून त्या त्या वेळीं होणारें सुख वाटेल तेव्हां अनुभवतां यावें, अशी सोय तें करून देतें. याचाच अर्थ असा कीं, आपल्या आयुष्यांतल्या अस्पष्ट कल्पनांना कवि शब्दांत बांधून टाकतो व त्या काल्पनिक विचारांची प्रत्यक्ष अनुभवण्यास सांपडेल अशी सृष्टि निर्माण करतो.

होऊन गेलेल्या गोष्टींच्या आठवणी मनुष्याच्या मनाला अनेक वेळां फार प्रिय असतात. निवांत वेळीं त्या आठवाव्या व आठवून मनापुढें घोळत ठेवाव्या, किंवा मन विचारानें मागें वळवून त्या जुन्या काळांत तें नेऊन सोडावें आणि असें करतांना सभोंवतालची प्रत्यक्ष स्थिति विसरून जावी, यांत एक तऱ्हेचा आनंद होतो. पण आपल्या कल्पनाशक्तीचा तणाव असावा तितका जोरदार नसल्यामुळें या आठवणी व्हाव्या तितक्या स्पष्ट आपणांस होत नाहींत आणि झाल्या तरी त्यांचा आनंद उपभोगतां येईल इतका वेळ त्या मनापुढें स्थिर राहत नाहींत. पण ज्याच्या कल्पनाशक्तीचा जोर विशेष आहे, असा कवि या जुन्या आठवणी फार स्पष्टपणें पाहतो व त्यांचें हुबेहूब शब्दचित्र काढून ठेवतो आणि मनुष्यें व त्यांचे विकार येथून तेथून सारखेच असल्यामुळें त्याच्या त्या आठवणी वाचकाच्या जुन्या आठवणींशीं इतक्या जुळतात कीं, त्या आपल्याच असल्याप्रमाणें त्या वाचणाऱ्या वाचकाला वाटतात. इतकेंच नव्हे, तर जसा एखादा कारागीर किंवा दुकानदार सभोंवतालच्या नेहमींच्या आणि साध्याच वस्तु अशा व्यवस्थेनें मांडतो कीं, त्याच्या त्या मांडणीनें त्या वस्तूंना एक नवी शोभा प्राप्त होते आणि त्या साध्या वस्तु आपल्या डोळ्यांना नेहमीपेक्षां जास्त मोहक वाटूं लागतात, तसा चांगला कविही अशाच प्रकारची करामत आपल्या काव्यांत करून ठेवतो. नेहमींच्याच कल्पनांची तो अशी मांडणी करतो व त्यांची नीट जुळणी करून त्यांचें असें रूप बनवितो कीं, तें पाहून आपल्याला त्यांचा मोह पडतो व त्यांपासून एरवीं उत्पन्न होणारे विकार त्या कवीच्या व्यवस्थेशीर

मांडणीनेंच दुणावतात आणि वाचकाचें चित्त भारून टाकतात आणि यामुळेंच प्रत्यक्ष चित्रापेक्षां कवीचें शब्दचित्र जास्त सुंदर वाटतें. आपल्या निःसत्त्व कल्पनेनें जागृत होणाऱ्या आनंद, काम, क्रोध, करुणा वगैरे विकारांपेक्षां कवीनें आपल्या जोरदार कल्पनेनें जागृत केलेले हेच विकार जास्त जोरानें जागृत होतात आणि त्याच मानानें ते जास्त आल्हाद देतात आणि सुरांत म्हटलेलें गोड गाणें जसें कानांत आपोआप गुंगत राहतें, तसे हे जागृत होऊन खवळलेले आपल्या मनाचे विकार आपोआप पुष्कळ वेळपर्यंत तसे भ्रमण करीत राहतात. जो कवि आपल्या काव्यानें हे विकार जास्त जागृत करील, जास्त जोरानें त्यांना मनांत भ्रमण करायला लावील, व हा जोर जास्त वेळ टिकवील, तो कवि आणि त्याचें तें काव्य मनुष्याच्या मनाला त्याच प्रमाणानें जास्त प्रिय वाटेल, यांत संशय नाहीं.

ज्या लेखकाच्या स्वतःच्या मनाचे विचार जोराचे असतील, ज्याच्या कल्पना-शक्तीचा ओघ दांडगा असेल, त्यालाच सुंदर काव्य निर्माण करतां येईल. कवीच्या विकारांचा जोर असा असावा कीं, त्या अंतःकरणांतल्या जोराच्या आघातानेंच जिभेंतून अनुरूप असे शब्द प्रकट बाहेर पडावेत. कवीच्या मनाच्या विकारांचा जोर असा असावा आणि ते अशा शब्दांनीं मांडलेले असावे कीं, त्यांच्या ओघांत वाचक आपल्या इच्छेविरुद्ध वाहून नेला जावा. वाचकाचे मनांत नसलें, तरी कवीच्या क्षोभा-मुळें त्याला क्षोभ वाटावा; कवीच्या दुःखामुळें वाचकाचे मनालाही दुःख वाटावें; कवीचें मन हांसूं लागलें कीं, यालाही अनावर हासूं कोसळावें; कवीच्या काम-विकारांनीं याच्या मनांतही तेच विकार सहज जागृत होऊन त्यांनीं याची गाळण उडवावी, किंबहुना कवीच्या विकारांच्या जोराच्या ओघापुढें वाचकाचें मन स्तब्ध होऊन लुलें बनावें आणि कवीच्या शब्दांच्या आज्ञेंत वागूं लागून नें त्याच्या इच्छेनुरूप वाहूं लागावें. हा चमत्कार ज्याचें काव्य करूं शकेल तोच उत्तम कवि म्हणावा. आपल्या विकारांशीं आपल्या वाचकाचे विचार मिळून टाकावे, आपल्या मनाच्या सुरांच्या आघातानें तसलेच सूर वाचकाच्या मनांतून काढावे, हेंच उत्तम कवीच्या काव्याचें लक्षण होय. मग तो कवि भक्तिमार्गी असो किंवा विषयलंपट असो. कवि भक्त असला तर तो अभक्त वाचकाच्या मनाला भक्तीचे पाझर फोडील. तो स्वतः शूर असला, तर नेभळ्या सात्त्विकालाही चेव आणून हिंमतबहाद्दर करील, आणि तो कवि स्वतः रंगेल फाकडा असला, तर शिष्ट म्हणवणाऱ्या संभाविताला त्याचे कामविकार जागृत करून त्या वेळेपुरता तरी विषयासक्त बनवील आणि विषयानंदांत डोलत ठेवील. यांपैकीं कोणता कवि समाजाच्या किंवा नीतीच्या दृष्टीनें चांगला आणि वाईट, ही गोष्ट अगदी निराळी. पण कुशल कवि या दृष्टीनें जो आपले विचार आणि विकार वाचकाच्या मनांत हुबेहूब उभे करील, तोच कवि उत्तम व श्रेष्ठ. पिशाच्च-वृत्तीच्या मनुष्याच्या मनांत आपल्या काव्यवाचनानें भक्तिभावाचे उमाळे उत्पन्न

करणारा ज्ञानेश्वर जितका श्रेष्ठ, तितकाच भक्तिमार्गी संताला आपल्या काव्यवाचनानें विषयबाधा करवून त्याच्याही मनांत कामवासना चेतवणारा शाहीर हा श्रेष्ठ होय. या कर्तबगारीपुरता ज्ञानेश्वर आणि तमासगीर दोघांचाही अधिकार सारखाच व निव्वळ काव्य या नात्यानें दोघांच्याही कृतीची योग्यता एकच. कधींही न हांसणाऱ्या नाना फडणविसाला पोट धरधरून हांसवणारा हरिदास, किंवा डफाची थाप ऐकावयाची नाहीं असा ज्याचा निर्धार त्या मोरोपंताला माडीवरून उतरवून खालीं आणून रात्रभर तमाशाला बवसवणारा रामजोशी आणि आपल्या कीर्तनानें शिवाजीलाही ईश्वरभजनीं लावणारा तुकाराम हे सर्व एकाच बैठकीवर बसण्याच्या योग्यतेचे पुरुष होत, यांत संशय नाहीं.

याहीपेक्षां आणखी एक कर्तबगारी अशी आहे कीं, कवि हा स्पष्ट चित्र काढीत नाहीं. आपल्या शब्दांच्या मांडणीनें आपल्या मनाशीं वाचकाच्या मनाचें तादात्म्य करून टाकतो आणि मग त्या कवीच्या मनाच्या कल्पनेचा वेग वाचकाच्या कल्पनेलाही उत्पन्न होतो. इतकें साधलें म्हणजे कवि जरा आड होतो आणि त्या जोराची चेतना पावलेल्या वाचकाचें मन स्वयंसंचार करूं लागतें. मग कवि नुसती वाट दाखवतो आणि एखाद्या विकाराची नुसती दिशा उत्पन्न करतो. मग पुढें स्वतः प्रत्यक्षपणें न जातां, वाचकाचें मन आपोआपच त्या दिशेला वाहूं लागतें. ही कुसरी, हा चमत्कार थोडा विशेष आहे. आणि यापासूनचा आनंदही तितकाच विशेष आहे. मुग्ध शृंगार ज्यांना साधतां येतो त्या कवींच्या कृतींत हा प्रकार चांगला नजरेस येतो. यांत कवि स्वतः न बोलतां वाचकालाच बोलवतो, आपण स्वतः चित्र न काढत वाचकाचेच मनाकडून तें काढवून त्याच्या डोळयांना तें दाखवतो व स्वतःचें मन विकारवश होऊं न देतां स्थिर ठेवून वाचकाच्या मनाला मात्र अनेक विकारांच्या झूल्यावर बसवून आंदोलत ठेवतो.

शुद्ध काव्य म्हटलें म्हणजे त्यांत स्वतःचें निरीक्षण तंतोतंत उतरलें पाहिजे. जें डोळयांनी पाहिलें, जें मनानें अनुभवलें, जें कानांनी ऐकलें, तेंच जसेंच्या तसेंच हातांनीं लिहिलें पाहिजे. कविकल्पनांचे जुने पुरातनकाळीं पाडलेले ठापठसे त्यांत उपयोगी आणतां कामा नयेत. प्राचीन वर्णनांतले ठरीव शब्द त्यांत मुद्दाम आणून योजतां कामा नयेत. त्यांत प्रत्यक्ष पहिल्याचा सत्यपणा खणखणला पाहिजे. दुसऱ्याचें उसनें घेतल्याचा म्हणजेच दुसऱ्याचे डोळयानें पाहिल्याचा किंवा दुसऱ्यावर विश्वास ठेवून वर्णन खरें मानल्याचा बद आवाज त्यांत निघतां कामा नये.

# अनंतसुत त्र्यंबक

सुमारें दहा-पंधरा वर्षांपूर्वी 'आनंदतनय'-कृत महाभारत आपण प्रत्यक्ष पाहिलें असल्याचें मला माझ्या एका स्नेह्यानें सांगितलें व ग्रंथ कल्याणप्रांतीं मिळण्याचा संभव आहे, असें सुचविलें. पुढें शोधाअंतीं कल्याणजवळ भिवंडी येथें हा ग्रंथ असल्याचें कळलें व प्रत्यक्ष ग्रंथ पाहतां तो प्रसिद्ध 'आनंदतनया'चा नसून दुसऱ्या कोणा अनंत-तनयाचा आहे, असें दिसून आलें. आणि म्हणूनच तो आनंदतनयाच्या इतर प्रकरणांबरोबर 'महाराष्ट्रकवीं'त छापला नाहीं.

हा ग्रंथ साग्र भारत नसून फक्त उद्योगपर्व आहे. ग्रंथांत कवि 'अनंत-तनय', 'अनंतसुत', 'अनंताचा पुत्र' व त्र्यंबक अशा नामांनीं आपला उल्लेख करतो. "ही त्र्यंबकें आपुली वाणी। वाग्पुष्पांची गुंफिली श्रेणी। अर्पिली असे श्रीकृष्णचरणीं। अर्थसुगंधें घमघमित ॥१२६॥" असें १३ व्या अध्यायाचे शेवटीं म्हटलें आहे.

आपल्या नांवापलिकडे इतर कोणतीही माहिती कवीनें या ग्रंथांत दिली नाहीं. मात्र पंधरावे अध्यायांत योजिलेल्या नौकेच्या रूपकावरून हा समुद्रकांठचा राहणारा असावा, असें वाटतें. महाराष्ट्राच्या हल्लीं परिचयाचे असलेल्या अनंतसुतांहून हा अगदीं भिन्न कवि आहे, एवढें मात्र निश्चित आहे. प्रसिद्ध आनंदतनय म्हणजे अरणीकर बावा गोपाळराव हा उघड नव्हे. रुक्मिणीस्वयंवरकार अनंतसुत तोही हा नव्हे. 'काळेयामर्दन' गाणारा अनंतसुत तोही हा नव्हे व 'विठ्ठलस्तुति' किंवा 'चेंडूफळी' लिहिणारा अनंतात्मजही हा नव्हे. म्हणजे ठाऊक असलेल्या चारी अनंतांखेरीज पुत्रांखेरीज हा कोणा पांचव्या अनंताचा पुत्र आहे, हें उघड आहे.

या अनंततनयानें महाभारताचें उद्योगपर्व कां रचलें, याविषयीं आपल्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे. कवि ग्रंथारंभींच म्हणतो —

असो पूर्वीं मुक्तेश्वरें। ओविकाकवीच्या ईश्वरें।
आरंभिलें भारत सारें। भाषाधारें वर्णावया ॥६॥
परी तें न गेलें समाप्ती। ऐसें तर्कूनी सर्वमती।
चतुर्थानंतरे पंचमीं प्रीती। उद्योगीं मती संचरली ॥७॥

आदि-सभा-वनपर्व । विराटपर्यंत वर्णिलीं सर्व ।
परी उद्योग भारतीं अपूर्व । यास्तव सर्वही प्रेरिती ॥८॥
तया साधूंचिये प्राज्ञे । आरंभ केला असें म्यां अज्ञें ।
परंतु चतुरिं या अवज्ञे । क्षमा कृपेनें करावी ॥९॥
कोठें गहन उद्योग पर्व । कोठें रंक मी प्रज्ञा खर्व ।
जेथें विद्वद्वर्य गर्व । सहजेंचि सर्वही टाकती ॥१०॥
असो कुमुदकळिका कांही । आमुतें विकाशीं म्हणत नाहीं ।
परंतु इंदू स्वउदयें पाहीं । विकास लवलाही करीतसे ॥११॥
साधूसी नलगे प्रार्थणें । खळासी न पाहिजे निंदणें ।
गुण घेणें दोष ठेवणें । निज निज गुणें करिताती ॥१२॥
तयां साधूंचिये कृपे । आरंभिलें म्यां ग्रंथगुंफे ।
तीतें श्रोतीं श्रवणदीपें । प्रकाशरूपें प्रकटावें ॥१३॥

पहिल्या अध्यायाचे शेवटीं कवीनें आपल्या नांवाचा उल्लेख अनंतात्मज असा पुढील ओव्यांत केला आहे :

इतिश्री भारतीं उद्योगपर्व । श्रोता जनमेजय पार्थिव ।
व्यासवाणीचें अर्थगौरव । वैशंपायन निवेदी ॥१४१॥
- ही अनंतात्मजें स्वीय वाणी । आर्पण केली ईश्वरचरणीं ।
तीच श्रोत्यांचिये श्रवणीं । पडतां आनंद देतसे ॥१४३॥

पहिल्या अध्यायाच्या ओव्या लिहिल्यानंतर कवीनें "श्रीमद्भारत व्यास-निर्मित तया ग्रंथांत हें पांचवें । पर्व श्रेष्ठ वरिष्ठ जो परिसतो तो या भवा आंचवे । तें म्यां प्राकृत भाषणें विरचिलें ऐकोनियां पाहिजे । कांहीं अंतरही असेल पडिलें तें सज्जनीं साहिजे ॥" असा एक श्लोक लिहिला आहे. बहुतेक सर्व अध्यायांचे शेवटीं या अनंतात्मज कवीनें त्या त्या अध्यायाचा सारांश देणारा असा एक एक श्लोक योजला आहे.

या उद्योगपर्वाचे एकंदर ४६ अध्याय असून त्याची ग्रंथसंख्या अदमासें ६००० आहे. अदमासें म्हणण्याचें कारण असें कीं, माझे पोथींत मधलेच एक-दोन अध्याय कमी असून, उद्योगपर्वानंतरचीं सर्व पुढील पर्वें कवीनें रचलीं किंवा नाहीं, हें माहीत नाहीं. पण याचें कर्णपर्व तरी असावें, असें मला वाटतें.

उद्योगपर्वांतर्गत कृष्णशिष्टाई, कर्णभेदप्रयत्न, विदुलाख्यान वगैरे सर्व रसभरित आख्यानें यानें चांगलीं गायिलीं आहेत. कृष्णकर्णसंवादांत तुला राज्यप्राप्ति होईल व पांच पांडव तुझ्या चरणीं वागतील, असें आमिष कृष्णानें दाखविल्यावर, मी कानीन म्हणजे कुमारीपुत्र असून पंडुराजाचा व कुंतीचा विवाह होण्यापूर्वींच जन्मलों असल्यामुळें, पंडुराजाच्या राज्यावर माझा हक्क कसा पोंचतो, असा कर्णानें प्रश्न केला आहे.

मराठी वाचकांना तरी हा प्रश्न अगदीं नवीन आहे, असें मला वाटतें.

तसेंच कुंतीनें सांगितलेलें विदुलाख्यानही कवीनें थोडक्यांत व सरस सांगितलें आहे. या उत्साहकारी आख्यानाची अनंतसुतानें वर्णिलेली फलश्रुति, जुन्यांना आणि नव्यांना, भाविकांना किंवा शास्त्रज्ञांना, सर्वांनाही सारखीच पटेल अशी आहे. कवि म्हणतो :

क्षत्रिणी जे गर्भिणी । तिणें ऐकतां हे श्रवणीं ।
पुत्र प्रसवेल वीर्यखाणी । अथवा दाता तपस्वी ।।७१।।
अथवा ब्राह्मणी सादर श्रवणीं । तरी ब्रह्मवर्चस्वी परम गुणी ।
तेजःपुंज जैसा तरणी । पुत्र पावे निर्धारें ।।७२।। अ. ४०

याप्रमाणें या त्र्यंबक कवीनें मुक्तेश्वरी भारत पूर्ण करण्याच्या हेतूनें प्रारंभिलेलें आपलें उद्योगपर्व ४६ अध्यायांत सांगितलें आहे. ४६ व्या अध्यायाचे शेवटीं जरी कौरव व पांडव हे निरनिराळीं सैन्यें उभारून युद्ध चालवीत होते, तरी त्या दोहोंचा खरा चालक तो भगवान् श्रीकृष्णच होता, असें "श्रीमत् कृष्णवळें करूनि सकळें दोन्ही दळें हालती । वाढे ज्या सलिलें पलांडुहि फुले तेणेंच कीं मालती ।।" असा श्लोक योजला आहे.

मुक्तेश्वराचे महाभारतासंबंधें या वेळीं साहजिकपणें कांहीं विचार मनांत येतात ते आपणांपुढें ठेवतों :

१. पुढील पर्वांतर्गत कांहीं त्रुटित आख्यानें सांपडतात.

२. शुकरंभासंवादाचे शेवटीं तें प्रकरण 'तृतीय' अध्याय असल्याचें लिहिलें आहे. सबब हें एखाद्या मोठ्या ग्रंथाचा तुकडा असणें संभवनीय आहे.

३. विराटपर्वाचे शेवटीं "तेंचि निरूपण पुढारें । उद्योगपर्वी सविस्तारें । श्रवण कीजे चतुरें ।" असें लिहिलें आहे.

४. सौप्तिक-पर्वाचे एका पोथीवर शेवटीं 'उद्योगपर्व पुणियाजवळ दाभाडियाच्या तळेगांवीं आहे' असें लिहिलें आहे.

५. फार दिवस हीं पर्वें प्रत्यक्ष लिहिल्याचें लोक सांगत आहेत.

६. सौप्तिकपर्व अलिकडेच सांपडलें आहे.

या सहा मुद्द्यांवरून मुक्तेश्वरानें पुढील पर्वें रचिलीं असावींत व तीं पुढेंमागें सांपडतील, असें वारंवार मनांत येतें. परंतु आज सुमारें २०० वर्षें महाराष्ट्रांतील साधु व कवि व जिज्ञासू संशोधक, महाराष्ट्रांत व बाहेर मुक्तेश्वराच्या काव्याचा शोध करीत असून त्यांस पुढील पर्वें आढळलीं नाहींत.

निराश झालेल्या कवींनी पुढील पर्वें स्वतःच रचण्याचा यत्न केला व कांहीं रचलीं.

मुक्तेश्वरानें स्वप्नांत येऊन आपणांस पुढील पर्वें लिहिण्यास सांगितलें किंवा

पुढील कृति पुरी करण्यासाठीं मुक्तेश्वरानें पुन्हां जन्म घेतला, अशी भावना महाराष्ट्रांत कांहीं पुरुषांची झालेली आढळते.

श्रीधरस्वामींनीं आपला पांडवप्रताप मुक्तेश्वरी भारताच्या साह्यानें रचला, हें तो ग्रंथ वर वर पाहणारासही सहज दिसून येईल. प्रतापाच्या ६४ अध्यायांपैकीं ३५ अध्याय पहिल्या चार पर्वांनीं व्यापले आहेत व पुढील बाकीचीं सर्व पर्वें २९ अध्यायांत धांदलीनें उरकून घेतलीं आहेत. या ६४ अध्यायांत मुक्तेश्वराच्या बहुतेक सर्व कल्पना व दृष्टांत श्रीधरानें आपल्या ग्रंथांत घेतले आहेत. किंबहुना शृंगाराच्या या उसन्या अतिरेकानें तो ग्रंथ एके दृष्टीनें बालबोध कुटुंबांत ठेवण्यास थोडा अयोग्य झाला आहे. प्रतापाचे हे अध्याय वाचीत असतां श्रीधरस्वामींना पांडुरंगानें "तूं स्वर्गारोहणाची कथा सांगूं नको" असें सांगितलें, त्याऐवजीं तूं "मुक्तेश्वरी भारत पाहूं नको" असें सांगितलें असतें, तर बरें होतें, असें दहा वेळां मनात येतें.

तें असो. येथें विचार करण्याची गोष्ट अशीं कीं, ज्या अर्थीं श्रीधरस्वामींनीं मक्तेश्वराचीं चार पर्वें पाहून प्रताप रचिला व पुढें त्यांनीं मुक्तेश्वराचा आधार घेतला नाहीं—आणि हें तो ग्रंथ पहातां सहज दिसेल—त्या अर्थीं तेव्हांपासूनच हीं पर्वें लोकांच्या पाहण्यांत नाहींत, हें उघड आहे. मुक्तेश्वराचा भारतरचनाकाल अदमासें शके १५७५ धरला, तर त्यानंतर ५० वर्षांचे आंतच म्हणजे श्रीधराचे वेळींच (हरिविज. १६२४: पां. प्रताप १६३४) बाकी पर्वें नष्ट झालीं, असें होतें. मुक्तेश्वर हा एकनाथाचा नातू व श्रीधर हा वाडवडलांपासून पांडुरंगाचा भक्त ही बाब लक्षांत घेतां, पर्वें लिहिलीं असून नष्ट होणें हें असंभवनीय वाटतें.

आतां 'त्रुटित प्रकरणें' व 'उद्योगपर्वाचा उल्लेख' या दोन मुद्द्यांसंबंधें असें म्हणतां येईल : 'उद्योगपर्व' रचण्याचा कवीचा मानस असन तो तसाच राहिला असेल व 'त्रुटित प्रकरणें' हीं त्रुटितच रचलीं असतील. महाराष्ट्रांतले मोठमोठे ग्रंथकार अशी त्रुटित रचना करून मागाहून मधले दुवे जोडतात. हें आपणांस माहीतच आहे. संतचरित्रकार महिपतिबावा —

संतांचीं चरित्रें संपूर्ण । एकदांच नाकळतीं जाण ।
जेव्हां जी झाली आठवण । तीं चरित्रें लिहून ठेविलीं ।।

व मग तीं ग्रथित करून ग्रंथ तयार केला, असें प्रत्यक्षच सांगतात. आर्या-भारताचे रचनेसंबंधानेंही मोरोपंतांनीं पुढील पर्वें अगोदर रचल्याचें त्यांचे प्रकाशक सप्रमाण दाखवतात व इतरत्रही हा प्रकार नजरेस येतो.

तेव्हां या सर्व गोष्टी लक्षांत घेतां मुक्तेश्वराचीं पुढील चवदा पर्वें नसावींत, असें वाटतें. कांहीं असलीं तरी तीं चवदा नसावींत. मुक्तेश्वराच्या आदिपर्वाची गोडी सभापर्वांत नाहीं. वनपर्व देखील आदिपर्वाशीं लावून पाहिलें, तर थोडें डावेंच आहे व तिहींच्या मानानें विराटपर्व तर अगदींच नीरस व मळमळीत आहे. तें

इतकें कीं, भाषेची प्रभा अशी कमी कमी होत गेल्यास पुढील पर्वें न रचणें हेंच उत्तम, असें कवीलाच काय, पण कोणालाही वाटेल. मुक्तेश्वराची व मोरोपंतांची दोघांचीही भाषा कुमुदिनी-आनंददायिनी खरी. पण एकाचा चंद्रमा कृष्णपक्षांतला व एकाचा शुक्लपक्षांतला दिसतो. एकाचा प्रकाश कमी होत जातो व दुसऱ्याचा वाढत जातो.

असो. हें वरेंच वाढलें. या माझ्या म्हणण्याचा अर्थ मुक्तेश्वराची कोणतीही कृति आतां शोधीत बसूं नये, व आतां मुक्तेश्वराचें नवीन असें कांहींच सांपडणार नाहीं, असें मुळींच नाहीं आणि असें म्हणण्याचा माझा बिलकुल आशय नाहीं, अशी आपली खात्री करून देण्याकरितां मुक्तेश्वराचें एक पद व एक अप्रसिद्ध अशी आरती वाचून मी या टिपणीची आरती करण्यास घेतों.

**पद**

नाहीं घडलें मातागमन । जळो त्याचें संतपण ।
परद्वार नाहीं ठावें । त्याचें संतपण वावें ।।२।।
परवस्तूचा अभिलाप । तोचि एक विष्णुदास ।।३।।
ऐसा संत वर्ते कोणी । मुक्तेश्वर लोळे चरणीं ।।४।।

**आरती**

कमळ सोडुनी हृदयी कोमळदळमाळ । प्रेमाचे बडिवारें लेतो गोपाळ।।
नाना भजनीं लावुनि गोपीजन सकळ । प्रगट विष्णू आपण तुळसीदळ ।।
जय देव जय देव जय माये तुळसी । अक्षय मोक्षाचेनि फळभारें फुलसी ।।
तुळसीमूळमृत्तिका जो चर्ची भाळी । तुळसीतीर्थें अनुदिनीं करितो आंघोळी ।।
तुळशीकाष्ठें ग्रीवामंडित मणिमाळी । त्यासंगे सर्वदा विचरे वनमाळी ।।
मंजरीया दिसती वज्राच्या धारा । पापाचे पर्वत नुर्वीती अनु थारा ।।
पळती यमकिंकर ह्मणती रविकुमरा । आह्मा भूतळवासी न दिसेचि थारा ।।
तुझीया येका दळें सोडविला देव । ह्मणवुनी तुझे ठायीं धरिला दृढभाव ।।
वृंदावनि देई वस्तिसी ठाव । सहज संगे भेटे वैकुंठराव ।।
मन हे तुळसीदळ श्रीगुरूचे पायीं । याहुनि निश्चळ होतां प्रगटे निजदेहीं ।।
अंती तयाला भवसंकट नाही । ह्मणे मुक्तेश्वर मुक्ति त्या ठायीं ।।

# दासो दिगंबरकृत संतविजय

प्रसंग ५ : नामदेव.

प्रसंग ६ : श्रीधर टीकाकार; विल्वमंगळ, ज्ञानदेव (यांत तिमाजी नाईक सावकाराच्या घरीं पैठणांत हीं भावंडें राहिलीं होतीं व तिमाजी नाईक यांचे घरीं श्राद्ध असतां कोणी ब्राह्मण जेवण्यास आले नाहींत, तेव्हां ज्ञानदेव यांनीं प्रत्यक्ष पितर आणून जेवविले, अशी कथा सांगितली आहे.) याच प्रसंगांत आणखी सावता माळी व गोरा कुंभार यांच्या कथा आहेत.

प्रसंग ७ : चोखामेळा; विसा खेचर; जनाबाई; राकावाका; भानुदास; दामाजीपंत; नरहरी व विठ्ठल पुरंदर.

प्रसंग ८ : मालोपंत; मुद्गल भट (रामार्यांचा कर्ता); वडवाळसिद्ध नागेश; जोगा परमानंद; मुकुंदराज; नागा जगमित्र; वहिरा पिसा; त्रिलोचन; वल्लभाचार्य.

प्रसंग ९ : संतराय; रूपाबाई; नरपाळ; रमाबाई; जगन्नाथ; भुवन चव्हाण; देवपंड्या; कर्मध्वज.

प्रसंग १० : जयमल्लराजा; श्रीधरपंत (प्रसिद्ध श्रीधरस्वामी नाझरेकर नव्हे); रामराया; हरिपाळ; नारायणभट; जसुस्वामी; नंददास; हरिभट; शामराय; नरपाळ; रोहिदास.

प्रसंग ११ : कबीर; पिपाजीराजा; धनाजाठ; सेना न्हावी.

प्रसंग १२ : सुखानंद; सुरसुरीबाई; पद्मनाभ; जीवातत्त्वा; माधवदास; रघुनाथ राजा; नित्यानंद कृष्णचैतन्य; सुरपरमानंद; केशवभट्ट; हरि व्यास.

प्रसंग १३ : त्रिपुरादास; कृष्णदास; वर्धमान; रामदास (प्रसिद्ध समर्थ रामदास नव्हेत. एका राजाचा पुत्र); हरिसंत कमलाकर; नारायण; व्यास गोपाळभट्ट; भगवानदास; नोकनाथ.

प्रसंग १४ : मधु गोसावी; कृष्णदास ब्रह्मचारी; कृष्णदास पंडित; भूगर्भ गोसावी; रसिक मुरारी; सजन कसाई, काशीश्वर गोसावी; खोजीजी; लाडू;

विठ्ठलदास; त्रिलोक सोनार; गोविंददास; गुजा हरी.

प्रसंग १५ : मधुकरशाहा; नरवाहन साधु; गोपाळदास; लाखाभक्त; नरसी मेहता.

प्रसंग १६ : नंददास; राघवदास; अंगद; चतुर्भुज राजा; मिरावाई; पृथ्वीराज; रतनसिंह; रामदासराजा; विमलानंद; सूरदास; मदनमोहन; मुरारदास.

प्रसंग १७ : तुळशीदास; चतुर्भुजस्वामी; कृष्णदास गोपाळनाथ; कान्हा हलालखोर; राघवदास; नारायणभट; हरिदास; परशुराम; गदाधर; करमानंद चारण; कोधु आलू.

प्रसंग १८ : पृथ्वीराज; नारायण; विदुर; केवळकुवा सेखावत; तुवरभगवान; हरिदास वाणी; कुवरवाई.

प्रसंग १९ : प्रेमानिधी; केवळराम; कृष्णदास सोनार; गदाधरदास; नारायणदास; भगवानदास; कल्याणदास; गोविंददास; गिरिधर.

प्रसंग २० : जनार्दनपंत (जनार्दनस्वामी पैठणकर); एकनाथ; दंडवतवोवा; नरसीभारती; विठो रेणुकानंदन.

प्रसंग २१ : जयरामस्वामी ( हे विठोवाचे सांगण्यावरून वडगांवी कृष्णा नापिक यांस शरण गेले. विठागोंदा; कानो पाठक; कृष्णदास मुद्गल; नारायणाश्रम; कमाल-कमाली; कर्मावाई.

प्रसंग २२ : रामचंद्रभट: तुकाराम; माणकोजी वोधला.

प्रसंग २३ : केशवस्वामी; रामदास (समर्थ); उद्धवस्वामी.

प्रसंग २४ : विठ्ठल पुरंदर (याचा कनकदास नांवाचा एक महार शिष्य होता.); जनजसवंत; कृष्णावाई.

प्रसंग २५ : भर्तृहरी; गोपीचंद; विसोवा नाईक; वोडानाभक्त; ताजीमोहना.

प्रसंग २६ : स्वाहाक्षा; वलक वुखार, मधुकरशा; संताजी पोवार.

प्रसंग २७ : वोगरसा; हरि आनंद; शेख फरीद; नानकशा; रामगीर.

प्रसंग २८ : गोरक्षनाथ; कूर्मदास; रमावाई; नरसिंहसरस्वती.

प्रसंग २९ : नयनीस्वामी; रत्नाकर गोसावी; नारायणभट; रुद्राई; विठोवासंत नारायणस्वामी; गुप्तनाथ [ जगांत दासीच्या रूपानें वावरे. ह्याचा शिष्य उद्वोधनाथ व उद्वोधनाथाचे शिष्य तीन : (१) प्रसिद्ध शिवदिननाथ, (२) नारायणस्वामी, (३) अन्नपूर्णावाई. ह्यांचीं चरित्रें ह्या अध्यायांत आहेत. ] माधवदास; हस्तामलक.

प्रसंग ३० : रणछोडदास; जडभरत; सहजराम; रतनभक्त.

प्रसंग ३१ : मावजी भक्त; खंडभट; पूर्णानंद; मनसुखदास.

प्रसंग ३२ : सिहाजी; ब्रह्मानंदस्वामी.

प्रसंग ३३ : अद्वैतानंद; हरिनारायण; चौरंगीनाथ; रामानंद कुंडलीक.

# विभाग तिसरा : भावे-वाङ्मयसूची व संदर्भसाहित्य

# सारस्वतकार वि. ल. भावे – वाङ्मयसूची

ज्या पुस्तकांचे प्रकाशक नोंदविले नाहींत, तीं स्वतः
श्री. वि. ल. भावे यांनींच प्रकाशित केलेलीं आहेत.

## पुस्तकें

१. **महाराष्ट्र-सारस्वत**

**प्रथमावृत्ति** : प्रकाशक– वि. गो. विजापूरकर, कोल्हापूर, १८९९. पृ. २ + ९८ ( 'ग्रंथमाला' मासिकांत छापलेलें प्रकरण ).
**द्वितीयावृत्ति** : प्रकाशक– भा. इ. सं. मंडळ, पुणें, १९१९. पृ. ८ + ५८८.
**तृतीयावृत्ति** : भाग पहिला– प्रकाशक : लेखक स्वतः, ठाणें, शके १८४६. पृ. ८ + ३६०. भाग दुसरा– प्रकाशक : ल. वि. भावे, ठाणें, १९२८. पृ. ८ + ३१ + ३८४.
**चतुर्थावृत्ति** : प्रकाशक–वि. ग. माटे, पुणें, शके १८७६, पृ. ४२ + ११३९ ( पृ. १ ते ८२८ पर्यंत मूळ 'महाराष्ट्र-सारस्वत', पुढें डॉ. शं. गो. तुळपुळे-लिखित पुरवणी आणि सूची ).
**पंचमावृत्ति** : प्रकाशक– ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, शके १८८५, पृ. ४० + १०८० (पृ. १ ते ६३६ मूळ ग्रंथ, पुढें पुरवणी व सूची ).

२. **फलज्योतिष**

ठाणें, शके १८३८, पृ. २९ ( 'धर्मजागृति' मासिकाच्या तिसऱ्या वर्षाच्या अंकांत प्रकाशित झालेल्या निबंधाचें पुनर्मुद्रण ).

३. **चक्रवर्ति नेपोलियन**

**प्रथमावृत्ति** : प्रकाशक– धों. का. फडके, ठाणें, शके १८३९, पृ. ८ + ६५६.

द्वितीयावृत्ति : प्रकाशक– भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई. तीन खंड, १९२१, १९२२, १९२२, पृष्ठें अनुक्रमें ४ + १२ + २२६; ८ + १६७; ८ + २३०.
**संक्षिप्त आवृत्ति :** प्रकाशक–भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, १९३३. पृ. २ + १९५.

४. **अफजलखानाचा वध अथवा श्रीशिवाजीमहाराजांचा पहिला पराक्रम**
प्रकाशक : गो. स. पळसुले, पुणें, शके १८४३, पृ. ४ + ४९.

५. **षाहिस्तेखानाची मोहीम**
प्रकाशक : गो. स. पळसुले, पुणें, शके १८४५, पृ. २ + १६.

६. **महानुभाव-महाराष्ट्र-ग्रंथावली, कविकाव्यसूची**
ठाणें, शके १८४६, पृ.२ + ६ + ३२.
( यांशिवाय '**पुरंदर किल्ल्याची हकीगत**', '**महाराष्ट्र-काव्य-ग्रंथांची यादी, शके १७४० पर्यंतचे**' आणि '**रा. रा. विनायक लक्ष्मण भावे, ठाणें, यांनीं भारत-इतिहास-संशोधन-मंडळास नजर केलेली मासिकांची यादी**' या तीन कृतींचा उल्लेख मिळतो. पैकीं शेवटची हस्तलिखित स्वरूपाचीच असावी. )

७. **पांखरांचा परिचय**
अप्रकाशित. ( हस्तलिखित श्री. ल. वि. भावे, ठाणें, यांच्या संग्रहीं आहे. )

## संपादनें

१. **मराठी दप्तर : रुमाल पहिला**
ठाणें, शके १८३९, पृ. ८ + १७८ ( श्रीमंत महाराज भोसले यांची बखर ).

२. **मराठी दप्तर : रुमाल दुसरा**
ठाणें, शके १८४४, पृ. ४ + ३१ + १४४ ( सरदार गोखले यांची कैफियत, छत्रपतींची शके १७३९ तील दिनचर्या टिपणी, भट पेशवे घराण्याची हकीकत, कंपनी सरकारचा जाहिरनामा ).

३. **मराठी दप्तर : रुमाल तिसरा**
प्रकाशक : ल. वि. भावे, ठाणें, १९२८, पृ. ७ + २२५ ( शिवकालीन व अलीबहादराचीं पत्रें ).

४. **तुकारामबुवांचा अस्सल गाथा, भाग १ व २**
ठाणें, शके १८४१ व १८४२, पृष्ठें अनुक्रमें २२ + १६८; १६९ ते २६२ + १

५. **अज्ञानदासकृत अफजलखानाचा पोवाडा**
प्रकाशक– विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें, पृ. ८.

## ‘ महाराष्ट्रकवि ’ मासिक पुस्तक

**वर्ष पहिलें :**

आश्विन शके १८२५ ते भाद्रपद शके १८२६.
अंक १ ते १३ ( अधिक ज्येष्ठाचा अंक क्र. ९ ) .

**वर्ष दुसरें :**

आश्विन शके १८२६ ते भाद्रपद शके १८२७.
अंक १४ ते २५ ( क्र. १८–१९–२० व २३–२४–२५ हे जोड अंक ).

**वर्ष तिसरें :**

आश्विन शके १८२७ ते भाद्रपद शके १८२८.
अंक २६ ते ३७ ( क्र. २९–३०–३१, क्र. ३२–३३–३४ व क्र. ३५–३६–३७ हे जोड अंक ).

**वर्ष चौथें :**

आश्विन शके १८२८ ते भाद्रपद शके १८२९.
अंक ३८ ते ५० ( अधिक चैत्राचा अंक क्रमांक ४४; क्र. ४०–४१–४२, क्र. ४३–४४–४५, क्र. ४६–४७–४८ हे जोड अंक )

**वर्ष पांचवें :**

आश्विन शके १८२९ चा क्र. ५१ हा अंक निघाल्यावर वंद.

**‘ महाराष्ट्रकवि ’ मासिकांत छापून प्रसिद्ध केलेली**

## ‘ महाराष्ट्र-काव्यग्रंथ ’ माला

१. **शामजी गोसावी मरुद्गणकृत चांगदेवचरित्र**
शके १८२६

२. **दासोपंतचरित्र**
शके १८२६

३. **नागेशकविकृत सीतास्वयंवर**
शके १८२६

४. **श्रीरंगनाथस्वामी निगडीकरकृत कवितासंग्रह**
शके १८२७

५. **श्रीजयरामस्वामी वडगांवकरकृत अपरोक्षानुभव**
शके १८२७

६. **सामराजकविविरचित रुक्मिणीहरण**
शके १८२७

७. **रंगनाथ मोगरेकृत पंचरत्न**
शके १८२७

८. **श्रीदासोपंतकृत गीतार्णव–अध्याय पहिला**
शके १८२७

९. **स्फुटसंग्रह, भाग पहिला**
शके १८२७

१०. **श्रीदासोपंतकृत गीतार्णव–अध्याय दुसरा**
शके १८२८

११. **पंचतंत्र**
शके १८२९

१२. **कृष्णदास मुद्गलकृत रामायण–युद्धकांड**
शके १८२९

१३. **शिवरामकृत शिवकथामृत**
शके १८२९

१४. **स्फुटसंग्रह, भाग दुसरा**
शके १८२९

१५. **माधवकृत रामायण**
अपूर्ण प्रकाशित. पुस्तकरूपानें निघालें नसावें.

१६. **जगन्नाथकृत बोधवैभव**
अपूर्ण प्रकाशित. पुस्तकरूपानें निघालें नसावें.

१७. **गीतार्णव : अध्याय १२ व १३**
अ. १२ वा पूर्ण, १३ वा अपूर्ण. पुस्तकरूपानें निघालें नसावें.

१८. **पंडित दामोदरकृत वच्छहरण**
शके १८४६ ( 'महाराष्ट्र-कवी 'बाहेरील स्वतंत्र पुष्प )

१९. **कवीश्वर भास्करकृत शिशुपालवध**
शके १८४८ ( मृत्यूनंतर प्रकाशित )
प्रकाशक : सी. म. अभ्यंकर, चिटणीस, मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें ( महाराष्ट्रकवी 'बाहेरील स्वतंत्र पुष्प ).

[ क्र. १५, १६ व १७ या तीन पुष्पांची क्रमांकासह नोंद 'वच्छहरण' च्या मलपृष्ठावर आहे. 'वच्छहरण' व 'शिशुपालवध' हीं दोन काव्यें 'महाराष्ट्र-कवीं 'त प्रकाशित झालेलीं नसलीं, तरी त्यांचा 'महाराष्ट्र-काव्यग्रंथ' मालेंत

क्रमांकांसह समावेश केलेला आहे. मृत्युंजयाचे 'स्वरूपसमाधान', 'प्रकाशदीप' व 'सिद्धसंकेत' (अपूर्ण) 'महाराष्ट्रकवीं'त प्रकाशित झाले आहेत; पण त्यांना 'महाराष्ट्र-काव्यग्रंथ' मालेंत कमांक मिळालेला दिसत नाहीं.]

## लेख : प्रकाशित

१. **रंगनाथस्वामी एक कीं अनेक?**
केसरी, ८ ऑक्टोवर १९०१, पृ. २, स्तंभ क्र. २.

२. **म्युनिसिपल कमिशनर**
मासिक मनोरंजन, पुस्तक १५.

३. **नागेशकवीचा काल**
भा. इ. सं. मंडळ अहवाल, शके १८३४ (चैत्र-भाद्रपद), पृ. ५८–५९.

४. **महीपतीचे गुरु मोरोबा तांभेरकर**
भा. इ. सं. मंडळ षाण्मासिक वृत्त, शके १८३४ (आश्विन-फाल्गुन), पृ. ३०७–३०८.

५. **मोरोपंत व महीपति**
भा. इ. सं. मंडळ षाण्मासिक वृत्त, शके १८३४ (आश्विन-फाल्गुन), पृ. ३०८–३०९.

६. **शिवाजीमहाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार**
भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलन-वृत्त, शके १८३७, पृ. ९१.

७. **मोरोपंतकृत धन्य रामायण**
भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलन-वृत्त, शके १८३७, पृ. ९८–१०२.

८. **अनंतसुत त्र्यंबक**
भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलन-वृत्त, शके १८३७, पृ. १०२–१०६

९. **दासो दिगंबरकृत संतविजय**
भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलन-वृत्त, शके १८३७, पृ. १०५–१०७.

१०. **महीपति व इतर चरित्रकार**
भा. इ. सं. मंडळ, तृतीय संमेलन-वृत्त, शके १८३७, पृ. १०८–१२१.

११. **जगमित्र नागा**
भा. इ. सं. मंडळ तृतीय संमेलन–वृत्त, शके १८३७, पृ. १४८–१४९.

१२. **पंचोपाख्यान : महालिंगदासकृत**
भा. इ. सं. मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३७, पृ. १७१,

१३. **शामाराध्य कवि**
भा. इ. सं. मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३७, पृ. ३३९.

१४. **श्रीशिवाजीमहाराजांचा होन**
भा. इ. सं. मंडळ पंचम संमेलन-वृत्त, शके १८३९, पृ. १२१-१२३.
१५. **श्रीशिवाजीमहाराजांचें एक राजकारण**
सहविचार, २.१, ऑगस्ट १९२३, पृ. ३३–४४.
१६. **महाराष्ट्रभाषासरस्वतीच्या महालांतील एक अज्ञात दालन**
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं वाचलेला निबंध ( प्रकाशक अं. गो. पुणतांबेकर व वि. का. शौचे, मुंबई ).
१७. **शिवाजीची वंशकुळी**
चित्रमय जगत्, जुलै १९२२, पृ. २७८–२७९.

## लेख : अप्रकाशित

१. मराठ्यांच्या इतिहासाचीं दोन शतकें
२. मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें
३. महाराष्ट्राच्या पेठेंत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा व किंमत
४. काव्य : परमेश्वराचें आणि मानवाचें
५. काव्य आणि त्याचा प्रभाव
६. सृष्टीचा निर्माता कोणी आहे काय ?
७. अचैतन्ययुग
८. अवशेष
९. महाबळेश्वर : प्रवासवर्णन
१०. होयसळेश्वर : प्रवासवर्णन (अपूर्ण)
११. कौपीनेश्वर-प्रार्थना (२९ ओव्या)
१२. आत्मकथन (अपूर्ण)

[ या अप्रकाशित लेखांपैकीं पहिले ५ लेख प्रस्तुत 'वारसा' या लेखसंग्रहांत समाविष्ट केले आहेत. 'अचैतन्ययुग' आणि 'अवशेष' हे दोन लेख त्या विषया-वरच्या एका संकल्पित पुस्तकाचे भाग आहेत. होयसळेश्वर-मंदिराचें वर्णन करणारा लेख हा हळेबीड-बेलूरच्या यात्रेचें वर्णन करणाऱ्या लेखमालेंतील अंश आहे. ही लेखमाला ( दोन लेख ) १९२२ च्या सुमारास मुंबई येथील एका मासिकांत प्रकाशित झाल्याचें श्री. ल. वि. भावे सांगतात. 'कौपीनेश्वर-प्रार्थना' हें काव्य ठाणें येथील कौपीनेश्वराच्या मंदिरांत युद्ध थांबण्यासाठीं झालेल्या सामूहिक प्रार्थनेसाठीं रचलेलें आहे. 'आत्मकथन' सारस्वताच्या आरंभीं टाकण्याच्या हेतूनें लिहायला घेतलें होतें; परंतु तें अर्धवट सोडून दिलें आहे. या सर्व लेखांचीं हस्तलिखितें श्री. ल. वि. भावे, ठाणें, यांच्या संग्रहीं आहेत. ]

# सारस्वतकार वि. ल. भावे-विषयक संदर्भ-साहित्य

## पुस्तक-परीक्षणें ( समकालीन )

१. महाराष्ट्र–सारस्वत : परीक्षण
ना. कृ. गद्रे, विविधज्ञानविस्तार, एप्रिल, मे १९२०.

२. अफजलखानाचा वध : परीक्षण
'एक मावळा', विविधज्ञानविस्तार, फेब्रुवारी १९२१.

३. तुकारामबुवांचा अस्सल गाथा–भाग १ व २ : परीक्षण
वा. अ. भिडे, विविधज्ञानविस्तार, १९२१.

४. शिवाजीची वंशकुळी आणि रा. भाव्यांचा भाविकपणा
वि. स. वाकसकर, विविधज्ञानविस्तार, ऑक्टोबर १९२२.

## मृत्युलेख

१. कै. वि. ल. भावे : मृत्यूनिमित्तानें स्फुट लेख
राजाराम सखाराम भागवत, विविधवृत्त, १९ सप्टेंबर १९२६.

२. कै. विनायक लक्ष्मण भावे
राजाराम सखाराम भागवत, रत्नाकर, ऑक्टोबर १९२६.

३. कै. वि. ल. भावे : संपादकीय
राजाराम सखाराम भागवत, सहविचार, ऑक्टोबर १९२६.

४. सुप्रसिद्ध ग्रंथकार कै. वि. ल. भावे
सीताराम महादेव अभ्यंकर, मुमुक्षु, नोव्हेंबर–डिसेंबर १९२६ व मार्च-एप्रिल १९२७.

## चरित्रलेख

१. भावे विनायक लक्ष्मण
गंगाधर देवराव खानोलकर, 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक', चतुर्थ खंड, १९५७.

२. महाराष्ट्रसारस्वतकार वि. ल. भावे
अरविंद ताटके, 'संशोधकसप्तर्षि', १९६२.

३. विनायक लक्ष्मण भावे : चरित्र
शं. गो. तुळपुळे, 'महाराष्ट्र-सारस्वत', आवृत्ति पांचवी, १९६३, प्रास्ताविक चौथें.

* * *

REFBK-0018175